# SELECTIONS FROM THE SATARA RAJAS AND THE PESHWAS' DIARIES.

## VI

# SAWAI MADHAVRAV PESHWA

## VOLUME II.

PREPARED BY

*The late Rao Bahadur Ganesh Chimnaji Vad, B. A.*

NATIVE ASSISTANT TO THE COMMISSIONER C. D.

EDITED BY

KASHINATH BALKRISHNA MARATHE, B. A, L. L. B.

PUBLISHED BY

THE POONA DECCAN VERNACULAR TRANSLATION SOCIETY

WITH THE PERMISSION OF THE GOVERNMENT

OF BOMBAY.

**1909**

PRINTED BY

*R. S. Gondhalekar "Jagadhitechhu Press," Poona City,*



Price $2\frac{1}{2}$ Rupees.

ई/१६

# SELECTIONS FROM THE SATARA RAJAS' AND THE PESHWAS' DIARIES.

# VI

## SAWAI MADHAVRAV PESHWA

### VOLUME II.

PREPARED BY

*The late Rao Bahadur Ganesh Chimnaji Vad, B. A.*

NATIVE ASSISTANT TO THE COMMISSIONER C. D.

EDITED BY

KASHINATH BALKRISHNA MARATHE, B. A, L. L. B.

PUBLISHED BY

THE POONA DECCAN VERNACULAR TRANSLATION SOCIETY

WITH THE PERMISSION OF THE GOVERNMENT

OF BOMBAY.

1909

PRINTED BY

*R. S. Gondhalekar "Jagadhitechhu Press," Poona City,*



Price 2½ Rupees.

सातारकर महाराज व पेशवे ह्यांची रोजनिशी.

भाग ६ वा.

# सवाई माधवराव पेशवे

निवडक उतारे

अंक २ रा.

---

रावबहादूर गणेश चिमणाजी वाड बी. ए.
माजी नेटिव्ह असिस्टंट निसबत कमिशनर मध्यभाग

ह्यांनीं निवड करून काढले

ते

काशीनाथ बाळकृष्ण मराठे बी. ए. एल्. एल्. बी.

ह्यांनीं छापण्याकरितां तयार केले.

---

डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी–पुणें.

हिनें

मुंबई सरकारच्या परवानगीनें छापून प्रसिद्ध केले.

---

सन १९०९

---

रा. श्री. गोंधळेकर यांच्या जगद्धितेच्छु छापखान्यांत छापिलें.

किंमत २॥ रुपये.

# अनुक्रमणिका.

# सवाई माधवराव पेशवे
## यांची रोजनिशी.

( भाग ३ )

### १ राजकीय.

### ( ब ) इतर माहिती.

### २४ युरोपांतील राष्ट्रें.

### ( अ ) इंग्रज.

४१४–( १२ ) मेस्त्र मोष्टीदिन (मिस्तर मौस्टिन) कोशलदार बंदर मुंबई दिंमत इंग्रज मुंबईकर याणें कजबे पुणें येथें गोसावियाजपासून घोडा रास १ एकूण किंमत रुपये १५० दीडशें रुपयांस खरेदी केला, त्याचे जकातीचा आकार होईल [तो] याचे नांवें माफ खर्च लिहून जकातीचा तगादा न करणें ह्मणोन, भिकाजी विश्वनाथ कमाविसदार प्रांत पुणें व जुन्नर यांचे नांवें छ. ९ साबान. सनद १.

आर्बा सबैन मया व अलफ रमजान ३०

रसानगी यादी.

### नारो आपाजींच्या कीर्दीपैकीं.

४१५–( १०४ ) टामस मोष्टीन कोशलदार दिंमत इंग्रज मुंबईकर यांणीं रूपा नायकीण कलवंतीण इजपासून मुसलमानाची पोरगी अडीचशें रुपयांस विकत घेतली, तिचे जकातीचा आकार यांस माफ केला असे, तरी सदरहूचा आकार होईल तो यांचे नांवें माफ खर्च लिहून तगादा न करणें

खमस सबैन मया व अलफ रमजान २९

---

[ 1 ] POLITICAL MATTERS.

( B ) Matters relating to

24 European Powers

( a ) English.

( 414 ) Mr. Mostdin ( Monstyn ), Councillor of Bombay, in the service of the English, having purchased a horse of Rupees 150, the Octroi leviable thereon was ordered to be remitted.

A. D. 1773-74.

FROM NÂRO APPÂJI'S DIARY.

( 415 ) Thomas Monstyn, Councillor in the employ of the English

म्हणून, भिकाजी विश्वनाथ कमाविसदार जकात प्रांत पुणें व जुन्नर यांचे नांवें छ. १७ साबान. सनद १.

रसानगी यादी.

४१६-( ११६ ) अपाजी हरी यांस साष्टीस इंग्रजांचे पारपत्यास रवाना केलें आहे, तरी लढाईबद्दल मशारनिल्हे यांजकडे जिनसा वजन पक्कें.

खमस सबैन मया व अलफ सवाल २३

१० दारू कल्याणांत नवी करविली आहे त्यापैकीं दारू खंडी.
५ शिसें तालुके कल्याण पैकीं खंडी.

———

१५

एकूण पंधरा खंडी वजन पक्कें मशारनिल्हेकडे देविलें असे, तरी सदरहू जिन्नस पावता करणें ह्मणोन, त्रिंबक विनायक सरसुभा प्रांत कोंकण यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

गारदी दिंमत ताराचंद जमादार दिंमत तोफखाना यास तुह्मांकडे कोंकणांत साष्टीचे मसलतीस पाठविले आहेत, त्यास दरमाहा. रुपये.

खमस सबैन मया व अलफ सवाल २४

१८५ कदीम असामी यांस छ. १ जिल्कादापासून. रुपये.

७५ जमातदार १ ३० कारकून २
५ अफ्तागिरा १ ———
७५ शिपाई असामी ५ १८५

१३२५ जदीद असामी तुह्मीं रूबरू पाहून करार करून ठेवणें. पाहणी करालं त्यास पंधरा रोज टाकून चाकरीची तारीख लावणें. चांगलें माणूस ठेवणें.

---

A. D. 1774-75. at Bombay purchased a Mahomedan girl from Rupá Naikin for Rs. 250. The Octroi leviable on the transaction was remitted.

( 416 ) Appáji Hari was sent to Salsette to put down the English and was supplied with 250 men and 25 Sawárs from Dhoḍup with 10 Khandis of gunpowder and 5 Khandis of lead from Kalyan. All the big guns at fort Shivaner and Trimbak were given with him. He had 1000 Gárdis under him. Some other Gárdis and a body of horse were also sent.

A. D. 1774-75.

२२॥ निम शेरेकरी.

२ भिस्ती.

१ मर्फाची.

---

३

दर ७॥ प्रमाणें दरमाहा.

१२९० शेरेकरी असामी.

१ तासची. ८३ शिपाई.

१ तबल.

१ निशाणदार. ८६

दरमाहा रुपये १५ प्रमाणें.

१२॥ दरमाहाकरी.

५ मशालजी.

७॥ तुतारी.

---

१२॥

---

१३२५

---

१५१०

एकूण पंधराशें दहा रुपये दरमाहा शंभर असामींस करार करून तुह्मांकडे पाठविले आहेत, तरी यांजपासून चाकरी घेऊन हजिरी गैरहजिरी मनास आणून हजिरीप्रमाणें आकार करून ६७ रोजा तकूब ठेऊन बाकी वीस रोजा रोजमुरा देत जावा, पैकीं तोफखान्याकडील फाजील येणें त्या ऐवजीं दरमहा शंभर रुपये रोजमरियांत वजा करून घेऊन बाकी देत जाणें. नखोदाचा हिशेब हुजूर कारखानियांत केला जाईल. भरमाहा तयारीस एक अगाव देणें. गैरहजिर माणूस होईल त्या ऐवजीं चांगलें माणूस ठेवीत जाणें. निमे ऐवजाचें नाणें द्यावें. त्याबद्दल दरसदे रुपये पंचवीस प्रमाणें बट्टा वजा करून बाकी नक्त व निमे नक्त येणेंप्रमाणें देत जाणें ह्मणोन, अपाजी हरी यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

४१७–( ११८ ) रामाजी अण्णाजी दिंमत नारो कृष्ण यांस सनद कीं, इंग्रजानें बि-

---

( 417 ) The English having commenced hostilities against Govern-

खमस सबैन
मया व अलफ
जिल्काद १

घाड करून साष्टीस मोर्चे वसविले आहेत त्यास नवे लोक चांगलें माणूस ठेवावयाविशीं तुह्मांस पेशजीं लिहिलें होतें, त्यावरून लोकांचा शेर आठ रुपये व जमादारास पंधरा वीस रुपये पावेतों करार केल्यास माणूस चांगलें मिळेल ह्मणोन तुम्हीं लिहिलें; त्यावरून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी माणूस चांगलें लढवई पाहून चौकशीनें एक हजारपावेतों बरकंदाज निवडक व जमातदार शिपाई चांगले त्याचा दरमहा तुम्हीं लिहिल्या अजमासें करार करून जलदीनें लोक ठेऊन पत्र पावतांच लोकांची रवानगी करणें. लोकांस अगाव खर्चास थोडा बहुत ऐवज लागेल तो देणें ह्मणोन, मशारनिल्हेचे नांवें.

सनद १.

परवानगी रूबरू.

४१८–( ११९ ) इंग्रजानें बिघाड करून साष्टीस मोर्चे लाविले आहेत, त्याचें पारपत्य करणें जरूर, व सरकारांत आरब, सिद्दी मर्द माणूस याची दरकार आहे. त्याची दरमाहाची यादी विठ्ठलराव मोरेश्वर यांणीं दाखविली, त्याजप्रमाणें करार करून देऊन हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी नवें माणूस पाईचें व शंभर स्वार असें जलदीनें जे तुह्मांजवळ चाकर असतील ते, व बाकीचे नवे ठेऊन आठा दिवसां अलीकडे तयार करून कोकणचे मार्गें रवाना करणें. लोक यावयास अनमान करतील त्यांची खातरजमा तुम्हीं व विठ्ठलराव मोरेश्वर यांजकडील राघो भिकाजी मिळोन करून जलदीनें पंधरा रोजांत तेथून रवानगी केलियावर हुजूर येऊन पोहोंचत तें करणें. सदरहू लोकांची सरदारी विठ्ठलराव मोरेश्वर यांजकडे सांगितली असे. लोकांचा बंदोबस्त व चाकरी घेणें ते त्यांचे हातें घेतली जाईल. लोकांबरोबर दहा उंट, व डेरा, व राहुटी, चांदणी तयार करून पाठविणें. शहाणा कारकून लोकांबरोबर देऊन रवाना करणें. लोकांस खर्चास तूर्त दुमाही रुपये ३०००० तीस हजार देविले असेत, तरी तुह्मांकडे तालुके अमदाबाद येथील साल मजकूरचे रसदेचा ऐवज येणें, त्यापैकीं पावते करणें. हजार दोन हजार रुपये जाजती लागले तर देणें. त्याची यादी तपशीलवार कारकुनाबरोबर

खमस सबैन
मया व अलफ
जिल्काद १

---

A. D. 1774-75.

ment and having laid seige to Salsette, Rámáji Annáji in the service of Náro Krishṇa was directed to enlist 1000 fighting men on a salary of Rs. 8 each for a soldier, and Rs. 15 to 20 for a Jamádár as proposed by him and to despatch them immediately.

A. D. 1774-75.

( 418 ) A similar order was issued to Appáji Ganesh of Táluká Ahmedábád for enlisting foot-soldiers as well as Sawárs and for sending them through Konkan within 15 days. It is stated in this *sanad* that Government was at that time short of good soldiers such as Arabs and Siddhis.

हुजूर पाठविणें. तुम्हीं किल्ल्यांतील लोक पाठवाल त्याचे ऐवजीं मोबदला दुसरे भरतीस ठेवणें. लोकांचे कराराचे अजमासाचे यादीची नक्कल अलाहिदा पाठविली असे ह्मणोन, अपाजी गणेश तालुके अमदाबाद यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

४१९–( १३१ ) माहालानिहाय प्रांत गुजराथ पैकीं सुरतकर मोंगल व इंग्रज ऐवज घेत होते तो हल्लीं मना करून नारो आनंदराव यांजकडे देविला असे; तरी सदरहू ऐवज मशारनिल्हेस पावता करून कबज घेणें. मोंगलास व इंग्रजास ऐवज एकंदर न देणें ह्मणोन. सनदा.

खमस सबैन मया व अलफ मोहरम २६

१ विष्णु जनार्दन कमाविसदार परगणे सुपें रुपये ४५०० एकूण.

१ माधवराव विश्वंभर कमाविसदार परगणा सरभुवन रुपये ४५०० एकूण.

१ शिवाजी विठ्ठल यांजकडे सरंजामास परगणे उरपाड आहे तेथील रुपये ४२००० एकूण.

१ माहादाजी नीलकंठ यांजकडे फौजेचे सरंजामास महाल आहेत तेथील ऐवज रुपये.

१६००० परगणा आंकलेश्वर.

१२००० नेमणूक.
४००० जाजती.

---

१६०००

१०००० परगणा हसोट.

७६०० नेमणूक.
२४०० जाजती.

---

१००००

६००० परगणा बलसोड.

---

३२०००

---

( 419 ) The revenues received by the Mogal of Surat and the English from certain Mahâls of Gujeráth were resumed and made over to Náro Ánandrám. Orders to this effect were issued to the several Kamavisdárs in Gujeráth.

A. D. 1774-75.

बत्तीस [हजार] व भडोचकराकडे परगणे आंकलेश्वर व परगणा हसोट पैकीं ऐवज पावत असेल तो मशारनिल्हेकडे देणें. भडोचकरांकडे एकंदर न देणें ह्मणोन, मशारनिल्हेस.

सनद.

[१] सखाराम भगवंत यांजकडे फौजेचे सरंजामास महाल आहेत तेथील ऐवज रुपये.

५५०० परगणा पारचोळ.

२५० कसबे बारडोली.

---

५७५०

पांच हजार सातशें पन्नास रुपये. याखेरीज परगणा सत्रागांव येथील ऐवज मोंगलाकडे व इंग्रजाकडे पावत असेल, तो त्यांजकडे न देणें. मशारनिल्हेकडे देणें म्हणून.

सनद.

---

५

परवानगी रूबरू.

४२०–( १३२ ) परगणा अमोद, व परगणा जंबूसर, प्रांत गुजराथ येथील ऐवज भडोचकरांकडे पावतो, व जकातीचा हिसा त्यांजकडे आहे त्यासुद्धां जप्त करून नारो आनंदराव यांजकडे ऐवज दिला असे, तरी ऐवज व जकातीचे हिशाचा ऐवज होईल तो मशारनिल्हेकडे पावता करून कबज घेणें. भडोचकरांकडे ऐवज एकंदर न देणें ह्मणोन.

खमस सबैन मया व अलफ मोहोरम २६

सनदा.

१ कमाविसदार परगणा जंबूसर निजबत नारो शंकर यांजकडे फौजेचे सरंजामास महाल आहे तेथील ऐवज रुपये २०००० वीस हजार व जकातीचा हिसा येविशीं.

१ तुलसी शेट कमाविसदार परगणा अमोद येथील ऐवज रुपये १७००० सत्रा हजार व जकातीचा हिसा येविशीं.

सनद.

---

२

परवानगी रूबरू.

---

( 420 ) Similarly the revenues of Pargáṇá Ámod and Pargaṇa Jambusar received by the Broachkar were also resumed.

A. D. 1774-75.

४२१–( १३५ ) मेहता ब्रजलाल याचे नांवें सनद कीं, भडोच तालुका इंग्रजाकडे आहे, तो किल्लासुद्धां सरकारांत फत्ते करून देतों. आपण सरकार चाकरी बजाऊन दिल्यास जहागीर इनाम वगैरे सरकारांतून द्यावें, ह्मणोन तुम्हीं विनंति केली, त्यावरून तुमची विनंति ध्यानास आणून तुम्हीं भडोचचा किल्ला सरकारांत फत्ते करून दिल्ह्यास तुह्मांस इनाम जाहगीर द्यावयाचा वगैरे करार येणेंप्रमाणें.

खमस सबैन
मया व अलफ
मोहोरम ६

भडोच तालुका सरकारांत येईल त्यापैकीं पंधरा हजार रुपयांचे गांव तुम्हांस इनाम द्यावयाचे करार केले असेत. दिल्हे जातील. कलम १.

सरकारचें काम फत्ते जाल्यावर भडोच घेण्याचे दिवसांत तुम्हांस पोटखर्च वगैरे होईल त्याजबद्दल हजार बाराशें रुपये पावेतों तुम्हांस सरकारांतून दिल्हे जातील. कलम १.

किल्ला फत्ते करून दिल्यावर तुमची शंभर स्वारांची बोली करून सरकारांत तुह्मांपासून चाकरी घेतली जाईल. कलम १.

जुनागड तालुक्यांत परगणे बटवा येथें तुमचें वतन पुरातन आहे, त्याचा बंदोबस्त करून द्यावा ह्मणोन तुमची विनंति, त्यास काम फत्ते तुमचे हातें जाहल्यास तुमचे कामास फौज कुमकेस दिल्ही जाईल. फौजेस खर्च लागेल तो निमे सरकारचा, निमे तुम्हीं द्यावा. येणेंप्रमाणें. कलम १.

तुम्हीं किल्ला घ्यावयाचे मदतीस कसबाती वगैरे लोक मिळऊन काम करोन त्यांस बक्षीस वगैरे द्यावें लागेल, त्यास काम फत्ते जाहल्यास पांच हजार रुपये पावेतों सरकारांतून दिल्हे जातील. कलम १.

---

( 421 ) Mehtá Brajlál having offered to conquer from the English the Táluká of Broach together with the fort, the following terms were made with him.

A. D. 1774-75.

1 On completion of the conquest villages worth Rs. 16,000 in Táluká Broach would be given to the Mehtá in Inám.

2 Rs. 1000 or 1200 would be given to him for his expenses during the campaign.

3 Military Saranjám for keeping up a body of 100 horse would be given.

4 Assistance would be given for securing to the Mehtá his watan in Parganá Batwá of Táluká Junágad.

5 Rs. 5000 would be given to him for distribution among his men as a reward.

येणेंप्रमाणें पांच कलमें करून दिल्हीं असेत, तरी बशर्त काम कराराबमोजीब चालविलें जाईल ह्मणोन, मशारनिल्हे यांचे नांवें छ. ४ सवाल. सनद १.

रसानगी यादी.

४२२–( १३६ ) प्रांत साष्टी येथील बंदोबस्तास राजश्री पंतसचिव यांजकडील हशमी माणूस असामी २०० दोनशें पाठविले आहेत, त्यांस पोटास अडशेरी शिरस्तेप्रमाणें तेथें राहतील तोंपर्यंत देत जाणें ह्मणोन, त्रिंबक विनायक यांचे नांवें छ. ११ सवाल. सनद १.

खमस सबैन मया व अलफ मोहोरम ६

परवानगी रूबरू.

४२३–( १३७ ) प्रांत कल्याण येथें इंग्रजाचे गडबडीमुळें नवें माणूस हशमी असामी दोनशें माणूस जलद करार करून ठेवणें. प्रांत मजकुरीं रिकामें माणूस किल्याकोटाची बेगमी होऊन राहील तें पत्र पावतांच प्रांत साष्टी येथें पाठवणें ह्मणोन, रामराव त्रिंबक यांचे नांवें छ. १२ सवाल. सनद १.

खमस सबैन मया व अलफ मोहोरम ६

रसानगी यादी.

४२४–( १३८ ) तालुके उंदेरी निसबत भिकाजी महादेव यांचे नांवें सनद कीं, इंग्रज सामानसुद्धां तयारीनें साष्टीवर आला आहे. याजकरितां तालुके मजकूरचे बंदोबस्तास जदीद लोक असामी १०० एकशें, ठेवण्याची तुम्हांस आज्ञा करून हे सनद सादर केली असे, तरी सदरहू लोक ठेऊन तालुके मजकूरचा बंदोबस्त ठेवणें म्हणून छ. १२ सवाल. सनद १.

खमस सबैन मया व अलफ मोहोरम ६

रसानगी यादी.

४२५–( १३९ ) साष्टीस इंग्रज येऊन उतरला, याजकरितां त्याजवर विसाजी कृष्ण

---

( 422 ) 200 Hashams of the Sachiv were sent for the protection of Pránt Sálsette.

A. D. 1774-75.

( 423 ) Order was issued to the officer of Kalyán to send all men that could be spared after providing for the safety of the forts of Pránt Sálsette.

A. D. 1774-75.

( 424 ) The English having come with great preparations to Sálsette, the officer of Táluká Underi was directed to entertain 100 new men for the safety of the province.

A. D. 1774-75.

( 425 ) Rámrao Náráyan was informed that the English having

खमस सबैन मया व अलफ मोहोरम ६

यास मातबर फौजसुद्धां रवाना केले आहेत, त्यासमागमें पायदळ माणसांचा भरणा पाहिजे, यास्तव तालुके राजमाची पैकीं पत्र पावतांच हशमी माणूस असामी २०० दोनशें असामी साष्टीस मशारनिल्हेकडे रवाना करणें. तुमचे तिकडे कोळ्यांचा दंगा आहे ह्मणोन ऐकण्यांत आलें, त्यास दंग्याचा प्रकार असल्यास शंभर माणूस किल्याचे भरतीस जाजती, हे लोक जातात यास्तव ठेवणें ह्मणोन, रामराव नारायण यांचे नांवें छ. १३ सवाल. सनद १.

परवानगी रूबरू.

४२६–( १४० ) इंग्रज मुंबईकर लढवाई सामान घेऊन आरमारसुद्धां साष्टीस येऊन बसला आहे; त्यास साष्टीचे किल्ल्यांतून मारगिरी करून लढतच आहेत, परंतु इंग्रजाचें पारिपत्य चांगलें जालें पाहिजे, याजकरितां हुजुरून विसाजी कृष्ण मातबर फौजेनसी रवाना झाले आहेत, व पुढेंही बापूजी हरी याजबराबर गाडदी, व राऊत, व मराठे माणूस दोन अडीच हजार फौजेनिसी गेले आहेत, त्यास तालुके मजकूर येथील भंडारी यांस मसलत पडल्यास चाकरीस जावें ऐसा शिरस्ता आहे; त्याजवरून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी तीनशें भंडारी चांगले बर्मदान निवडक एक मातबर सरदार व कारकून बराबर देऊन अडशेरी खर्चास शिरस्तेप्रमाणें बेगमी करून देणें, आणि जलद कल्याणास येऊन पोहोचत असे रवाना करणें. हुजुरून आनंदराव धुलप वगैरे तालुकदार यांस पत्रें रवाना केलीं आहेत कीं, एक माहागिरी शिलेपोस जलद देऊन पोहचऊन देणें. आधीं विजयेदुर्गास जावें, येते वेळेस तालुकेदारांचीं पत्रें पोहचवावीं. महागिरीवर दोन शिपाई देऊन त्यांणीं जाब जलद घेऊन यावें. याप्रमाणें तागीद करणें, आणि एक घडीचा विलंब न करितां लौकर पत्र पोहोचतें करणें, व भंडारी जलद पाठवणें. व तुह्मी चोहोंकडील बातमी वरचेवर घेऊन हुजूर जलद लिहीत

खमस सबैन मया व अलफ मोहोरम ६

---

A. D. 1774-75.

attacked Sálsette, Visáji Krishṇa was sent against them with a considerable army, and was directed to send 200 of his men to his assistance.

( 426 ) The English of Bombay having come to Sálsette with war-ships and other Military preparations, Visáji Krishṇa was sent against them with a considerable army and was followed by Bápuji Hari with Gárdis, Rauts and Maráthás, in all 2 to $2\frac{1}{2}$ thousand men. It was usual in the province of Rewadanḍá for the Bhanḍáris to join the army when necessity arose, and the officer of Rewadanḍá was accordingly directed to send 300 picked Bhanḍáris to Sálsette at once.

A. D. 1774-75.

जाणें. तुह्मी तालुके मजकूर येथील किल्ल्याचा बंदोबस्त यथास्थित करणें ह्मणोन, आनंदराव शिंदे नामजाद तालुके रेवदंडा यांचे नांवें छ. १३ सवाल. सनद १.

परवानगी रूबरू.

४२७–( १४१ ) आनंदराव यांचें नांवें सनद कीं, तुह्मी विनंतिपत्र वेदशास्त्री बापू जोशी यांजबरोबर मुजरद इंग्रज दुर्बुद्धि धरून आल्याचें सविस्तर वर्तमान लिहिलें तें कळलें, गोविंद हरी किल्लेकरी लोक यांणीं बाहेर राहून एक दोन लढाया दिल्या व अजूनही मार चांगला देत आहां; सर्व सरदार भवानजी कदम मुद्धां एकदील होऊन सरकारांत सेवेंत एकनिष्ठेंत राहून शत्रूस तंबी पोहोंचावीत आहां येविशीं तुमचे पत्रावरून व भटजींचे जबानीवरून सविस्तर विदित जालें. त्यास तेथील पुरातन लोक एकनिष्ठेनें सेवा करीत आलेले, पुढेंही सेवा करून दाखविणार, ही खातरजमा आहे. प्रस्तुत शत्रूचें पारिपत्य होऊन पराभव जाला पाहिजे. तरी हुजुरूनहीं तुमचे कुमकेस राजश्री विसाजी कृष्ण यांस मातबर फौजेसहवर्तमान व हशमी माणूस, सरदार, लोक सुद्धां पाठविले आहेत. लवकरच येऊन दाखल होतील. हे तेथें आले असतां तुह्मी आंतून बाहेरून लगट करून इंग्रजाचें पारिपत्य करून मोर्चे उठऊन देणें. यासमईं तुह्मांजवळ सरदार लोक व शिपाई चाकरी बजाऊन दाखवतील त्यांचें उर्जीत सरकारांतून होईल. तुह्मी लोकांची खातरजमा करणें. वरचेवर दिनचर्येचें वर्तमान लिहीत जाणें. तुह्मांजवळ लढवाईचें जें सामान नुन्य असेल तें लिहून पाठवीत जाणें. तुमचे लिहिल्याप्रमाणें बेगमी होईल. ऐवजाविशीं तुह्मी लिहिलें त्याजवरून भटजी मशारनिल्हेबरोबर वनमाली थोबनदास याची हुंडी दहा हजार रुपयांची तूर्त घेऊन कल्याणचे दुकानची पाठविली आहे. कल्याणास ऐवज गोविंद गंगाधर, व बाळाजी महादेव यांस तुह्मी कल्याणास पाठविले आहेत, त्यांजकडे सदरहू ऐवज साहुकार मशारनिल्हेकडून देविला आहे. त्याजपासून तुह्मी ऐवज बहुत युक्तीनें घेऊन जाणें. आणखी फौज तुह्मांकडे पाठवावयाविशीं राजश्री सखाराम

खमस सबैन मया व अलफ मोहोरम ६

---

( 427 ) Anandrám informed Government that the English had arrived, and that one or two battles were fought between him and the English outside the fort, and that the enemy were being worsted. His zeal and devotion to duty, as also of the men in the fort, was much commended. He was exorted to do all in his power, to compel the English to return, and was informed that in case of their being routed, the officers and men doing duty would be duly rewarded, that daily accounts of what occurred should be submitted, and that officers and men who should distinguish themselves in this matter would be duly rewarded. Rs. 10,000 were sent by a Hundi for his expenses. Sakhárám Bhagwant and Báláji Janárdan were requested to send more succour to Sálsette.

A. D. 1774-75.

भगवंत, व बाळाजी जनार्दन यांस लिहिलें आहे. तेही तिकडून फौज रवाना करितील. तेही लौकरच येऊन पोहोंचतील. तुह्मांस भरतीस आणखी माणूस लागल्यास खातरजमेचें तुमच्या, मिळाल्यास लागेल तें ठेवणें ह्मणोन, आनंदराव यांचे नांवें छ. १३ माहे सवाल.

सनद १.

परवानगी रूबरू.

४२८–( १४२ ) रामराव नारायण तालुके राजमाची यांचे नांवें सनद कीं, साष्टीस इंग्रज तयारी करून येऊन मोर्चेबंदी केली आहे, हें जाणोन तुह्मी शंभर माणूस साष्टीकराकडे कुमकेस पाठविलें ह्मणोन लिहिलें. तुह्मी सर[कार] काम जाणोन माणूस पाठविलें, फार गोष्ट चांगली केली, येथून दोनशें माणूस पाठवावयाविशीं तुह्मांस सनद गेली आहे. त्याप्रमाणें आणखी शंभर माणूस राहिलें तें पाठवावें. तुह्मांस भरतीस शेंपन्नास माणूस लागल्यास पाहून ठेवणें ह्मणोन. छ. १३ सवाल.

खमस सबैन
मया व अलफ
मोहोरम ६

सनद १.

परवानगी रूबरू.

४२९–( १४४ ) वसईकडे फिरंगी आला आहे ह्मणोन वर्तमान आवईचें आहे, त्यास तेथें फिरंगी आला नसिला तर तेथील बंदोबस्त यथास्थित राहून जुन्या माणसांपैकीं दोन चारशें माणसें साष्टीस इंग्रज तयार होऊन आला आहे, त्याचे पारपत्यास कुमक करणें; आणि तुह्मांस तेथें शें दोनशें माणूस इतबारी मिळाल्यास चांगलें पाहून ठेवणें ह्मणोन, विसाजी केशव प्रांत वसई यांचे नांवें छ. १३ सवाल.

खमस सबैन
मया व अलफ
मोहोरम ६

सनद १.

परवानगी रूबरू.

४३०–( १४५ ) तालुके अवचितगड येथें लोकांची भरती कमी आहे, व तिकडे इंग्रजाची व शामलाची गडबड झाली आहे, त्यास किल्ले मजकूरचे बंदोबस्तास जदीद लोक असामी १०० माणूस किल्ले मजकूरचे शिरस्तेप्रमाणें तिकडील गडबड वारे तोंपर्यंत ठेऊन बंदोबस्त करणें

खमस सबैन
मया व अलफ
मोहरम ६

---

( 428 ) Rámrao Náráyaṇ of Táluká Rájmáchi sent assistance to Sálsette on hearing that it was beseiged by the English. His action was approved.

A. D. 1774-75.

( 429 ) A rumour having reached Government that the Portugese had marched towards Bassein, Visáji Keshav was ordered, if the rumour proved to be false, to send 200 to 400 old men for service at Sálsette and to employ new men in their place.

A. D. 1774-75.

( 430 ) Owing to the disturbance of the English, the officer of

ह्मणोन, आबाजी बल्लाळ, व भास्कर महादेव यांचे नांवें. सदरहू लोक जाजती ठेवाल त्याचे ऐवजीं साष्टीस इंग्रज आला आहे, याजकरितां जुने लोकांपैकीं शंभर माणूस जलदीनें साष्टीस सरकारची फौज पाठविली आहे, त्याजवळ रवाना करणें. याचे मोबदला तुमचे भरतीस लागल्यास—शेंपन्नास लागल्यास—ठेऊन बंदोबस्त राखणें. ह्मणोन छ. १४ सवाल. सनद १.

रसानगी यादी.

४३१–( १४६ ) इंग्रजाची गडबड साष्टीस जाली आहे, सबब तालुके उंदेरी निसबत राणोजी बलकवडे येथील बंदोबस्तास लोक असामी १०० शंभर असामी सर सुभाहून जदीद करार करून तालुके मजकूरचे बंदोबस्तास देणें ह्मणोन, त्रिंबक विनायक यांचे नांवें छ. १४ सवाल. सनद १.

खमस सबैन मया व अलफ मोहरम ६

रसानगी यादी.

४३२–( १४७ ) साष्टीस इंग्रज येऊन बसला आहे, यास्तव तालुके सुवर्णदुर्ग येथील बंदोबस्तास लोक असामी २०० तूर्त जदीद ठेवून बंदोबस्त करणें. पुढें गडबडीचा प्रसंग आल्यास याशिवाय शंभर असामीपावेतों ठेऊन तालुके मजकूरचा बंदोबस्त यथास्थित करणें. सदरहू प्रमाणें नेमणुकेशिवाय जाजती लोक ठेऊन बंदोबस्त करणें ह्मणोन, मोरो बापूजी यांचे नांवें छ. १४ सवाल.

खमस सबैन मया व अलफ मोहरम ६

सनद १.

रसानगी यादी. रुजु परवानगी रूबरू.

४३३–( १४८ ) राघोजी आंग्रे वजारत माहा सरखेल हे वसईचे खाडींतून सरंजाम आरमारसुद्धां साष्टीस इंग्रजावर जातील, त्यांस जाऊं देणें, व मशारनिल्हे खासा साष्टीस पोहोंचल्यावर जंगी सामान दारुगोळी लागेल ती द्यावयाचा करार केला असे, तरी तुह्मी वसईहून आपलें आरमारसुद्धां व लोक बरोबर देऊन साष्टीस रवाना करणें. तेथें मशारनिल्हेस दारूगोळी वगैरे सामान लागेल तें वसईपैकीं देणें. एक घडीचा विलंब न लावितां जें सामान लागेल तें देणें.

खमस सबैन मया व अलफ मोहरम ६

---

A. D. 1774-75. Táluká Awachitgaḍ was ordered to entertain 100 new men and to send 100 men in permanent employ for service with the army at Sálsette.

( 431 ) Owing to the disturbance at Sálsette by the English 100 new men were sent to Táluká Underi for its protection.
A. D. 1774-75.

( 432 ) Sanction was given to the entertaining of 200 men for the protection of Táluká Suwarṇadurga.
A. D. 1774-75.

( 433 ) Visáji Keshav was directed to permit Rághoji Ángria proceeding against the English to sail with his fleet through the creek of Bassein and to supply him with ammunition,
A. D. 1774-75.

वसईचे खाडींतून साष्टीस जाऊन शत्रूस नसीदा देऊन पारिपत्य करीत असें करणें, व खाडींतून जातील त्यांस अडथळा एकंदर न करणें. यांचें आरमार वसईचे बाऱ्यावर येईल, तेथून पुढें जाणार नाहीं, याजकरितां यांचे लोक साष्टीस गेले पाहिजेत. यास्तव चाळीस पन्नास माहागिऱ्या देऊन लोक साष्टीस पोहोंचऊन देणें ह्मणोन, विसाजी केशव प्रांत वसई यांचे नांवें छ. १६ सवाल. सनद १.

रसानगी यादी.

४३४–( १४९ ) साष्टीस इंग्रजाची गडबड जाहाली याजमुळें रामचंद्र कृष्ण यांस पाठविलें त्याजविशीं. सनदा.

खमस सबैन
मया व अलफ
मोहरम ६

१ आनंदराव राम यांस कीं, मशारनिल्हे यांस तुमचे मदतीस पाठविले आहेत, तरी सामान जंगी सरंजाम जो लागेल तो देत जाणें. तुह्मी व हे एकत्र होऊन सरकारकाम उत्तम प्रकारें बजाऊन दाखवणें ह्मणोन. सनद.

१ बाबूराव पासलकर यांस कीं, मशारनिल्हे यांस पाठविले आहेत, तरी तालुके बीरवाडीपैकीं शिपाई असामी १० दहा असामी देणें ह्मणोन.

१ बाजी गंगाधर यांस कीं, मशारनिल्हेची रवानगी केली आहे, तरी तुह्मी व हे एकत्र होऊन सरकार काम चांगलें बजाऊन दाखवणें. या कामास तोफा, व जंबुरे, व दारूगोळा वगैरे जिनसा(स) लागेल तो बेलापुराहून पोहोंचऊन देणें ह्मणोन. सनद.

१ मशारनिल्हे यांचे नांवें सनद कीं, गडबडीमुळें तुह्मांस रवाना केले आहेत, तरी चांगलें माणूस मिळऊन शाई शिरस्त्याचें मर्द माणूस पाहून दहा अकरा रुपयेपर्यंत शेरा करून माणूस ठेऊन सरकारकाम उत्तम प्रकारें बजाऊन दाखवणें. दोनशें पावेतों माणूस चांगलें पाहून मिळेल तें ठेवणें ह्मणोन. सनद.

१ विसाजी केशव यांस कीं, मशारनिल्हे यांस पाठविले आहेत, तरी तोफा व दारुगोळा वगैरे सामान लागेल तें वसईपैकीं देणें ह्मणोन. सनद.

---

५

रसानगी यादी.

---

( 434 ) Rámchandra Krishṇa was sent for assistance at Sálsette.
A. D. 1774-75.

४३५–( १५० ) लोक किल्ले सिंहीगडकरी रवाना साष्टीस. अ [ सामी ].

खमस सबैन
मया व अलफ
मोहरम ६

९० ऐन. ३ घोडीं
१० पोर्गे. ——
१०३

एकूण असामी एकशें तीन पैकीं ऐन नव्वद व पोर्गे [ दहा ] व घोडीं तीन, यांसी पाठविले आहेत, यांची नेमणूक नांवनिशीवार अलाहिदा आहे, त्याप्रमाणें हजिरी घेऊन चाकरी घेणें. यांसी अडशेरी हुजूर एकमाही पावली आहे, त्याची तारीख नेमणुकेस लिहिली आहे. त्याप्रमाणें पुढें चाकरी घेऊन अडशेरी चाकरीबरहुकूम देत जाणें ह्मणोन, विसाजी कृष्ण यांचे नांवें. छ. १५ सवाल.

सनद १.

रसानगी यादी.

४३६–( १५१ ) इंग्रज व मोंगल सुरतकर हे सरकारचे तहांत अंतर करून गैर राहा वर्तणूक करूं लागले, सबब शहर सुरत येथील बंदी वगैरे बंदोबस्ताबद्दल फौज सरकारची गुजराथ प्रांतें रवाना जाहली आहे, त्या शिवाय प्यादे लागतील ते तुम्हीं माहितगिरीनें चांगले इतबारी मर्द माणूस पांच सातशें परियंत ठेवणें, त्यांस खर्चास ऐवज मोंगलाई व इंग्रजाचा बाहेरील परगणे-याचा जप्त करून वसूल होईल त्यापैकीं खर्च करणें. मदतीस परराज्यांतील लोक आणाल त्यास खिचडी किरकोळ खर्चाबद्दल पेशजींपासून शिरस्ता असेल त्याप्रमाणें देत जाणें ह्मणोन, बहिरो रघुनाथ यांस छ. २० सवाल.

खमस सबैन
मया व अलफ
मोहरम ६

सनद १.

रसानगी यादी.

४३७–( १५२ ) बाजी गंगाधर यांचे नांवें सनद कीं तुम्हीं हुजूर विनंतिपत्र पाठविलें, तेथें लिहिलें कीं, साष्टीस इंग्रज मोर्चेबंदी करून बसला आहे, त्यास बेलापूरचे कोळ्यांची विनंति आहे कीं, सरकारचा इंग्रजाचा बिघाड जाहला आहे, या समयांत आह्मांस आज्ञा केल्यास आपल्या म-

खमस सबैन
मया व अलफ
मोहरम ६

---

( 435 ) Ninety men of the Sinhgar fort were sent for the same purpose.
A. D. 1774-75.

( 436 ) As the English and the Mogal of Surat were acting in contravention of the treaty entered into with Government, an army was sent to Gujeráth and Bahiro Raghunáth was directed to engage 700 new men, and to arrange for their expenses by attacking the outlying Parganás of the English and the Mogal.
A. D. 1774-75.

( 437 ) Báji Gangádhar communicated to Government the desire of the Kolis of Belâpur, that as the English had beseiged Sálsette and were at war with Government, they would, if directed, proceed to Bombay in their boats and burn
A. D. 1774-75.

हागिऱ्यांवरून मुंबईस जाऊन कोटाबाहेरील घरें व कोळवाडी वगैरे घरें जाळून दंगा करतों. शंभर दीडशें माणूस सरकारचें द्यावें ह्मणजे हें काम करतों. सरकार काम जाहल्यावर आमचें नक्ती देणें आहे तें सरकारांतून आह्मांस माफ करावें, याप्रमाणें त्यांचे बोलण्याचा भाव तुम्हीं लिहिला तो सविस्तर कळला. ऐशास इंग्रजाचा बिघाड तेव्हां हें काम करणें जरूर जाणोन सरकारच्या आरमारास व सरखेतकडील आरमारास पेशजीं आज्ञापत्रें येविशीं सादर जाहलींच आहेत. बेलापूरकर कोळी यांणीं येविशींची उमेद धरून सरकारकाम करून आपलें देणें माफ करून घेणार, उत्तम आहे. लिहिल्या अन्वयें कोळ्यांचे नांवें अलाहिदा कौल सादर केला आहे, व पैक्याचा अदमास पाहतां दीड हजारपर्यंत होईल, यास्तव तुम्हीं त्यांस उमेदवार करून विसाजी कृष्ण यांजकडून दीडशें माणूस तुह्मांकडे देविलें आहे, तें घेऊन लिहिल्याप्रमाणें काम करणें. जर त्यांनीं विनंति केली आहे त्याप्रमाणें काम केलें तरी कौलाप्रमाणें चालविलें जाईल. बहिरो शामजी कारकून दिंमत हिरोजीराव राणे हे कोळी यांजकडील कामकाज करतात. हल्लीं सारे कोळियांस उमेदवार करून मुंबईत जाऊन दंगा करणार, त्याप्रमाणें जाहल्यास मशारनिल्हेस तैनात पेशजीं आहे त्यासुद्धां दोनशें रुपये मोईन सालीना करार करून दिल्ही जाईल, येविशीं तुम्हीं त्यांची खातरजमा करणें ह्मणोन, मशारनिल्हे प्रांत बेलापूर यांचे नांवें. सनद १.

४३८–( १५३ ) मुंबईकर इंग्रज साष्टीस आला आहे, याजकरतां पेणचे बंदरांतून वगैरे मुंबईकराची बंदी करावी लागते, यास्तव जदीद माणूस असामी ५० पन्नास ठेवण्याची आज्ञा तुह्मांस केली असे, तरी चांगलें माणूस दर असामीस दरमहा रुपये ५ प्रमाणें करार करून ठेऊन पेणचे बंदराहून वगैरे मुंबईकराची बंदी करणें. मुंबईकराचा लढा उरकेतोंपर्यंत सदरहू पन्नास माणसाचें कबज होईल तें तालुके नेरळ येथील हिशेबीं खर्च लिहिणें. मजुरा पडेल ह्मणोन, राघो नारायण, व सखाराम बल्लाळ यांचे नांवें. छ. २२ सवाल. सनद.

खमस सबैन मया व अलफ मोहरम ६

रसानगी यादी.

---

all houses and huts outside the fort. The Kolis asked for assistance of 100 or 150 men from Government, and prayed that if they succeeded, the amount due by them to Government might be remitted. The Kolis' request was granted, and they were ordered to sail to Bombay and create a disturbance.

( 438 ) All imports into Pen from Bombay were stopped pending the termination of hostilities with the English.

A. D. 1774-75.

४३९–( १५४ ) इंग्रज मुंबईकर व मोंगल सुरतकर यांणीं सरकारचे तहांत अंतर करून गैर राहा वर्तोन साष्टीस मोर्चेबंदी केली आहे, त्याविशीं शहर सुरत वगैरे येथील बंदोबस्ताचीं. कलमें.

खमस सबैन
मया व अलफ
मोहरम ६

शहर मजकूर येथील बंदी करणें ह्मणोन पेशजीं तुह्मांस निकडीचीं पत्रें सादर जाहलीं आहेत, त्याप्रमाणें बंदी केलीच असेल. हलीं बहिरो रघुनाथ यांस तुह्मांकडे रवाना केले आहेत, तरी यांचे माहितगारीनें बंदी चांगली करणें, तिकडे पक्का पायबंद बसल्यानें तिकडील कुमक मुंबईकरास येणार नाहीं, यास्तव फारच निकडीचा बंदोबस्त करून सुरतकरांचें पारिपत्य करणें. कदाचित तुम्हीं तापीपार गेलेत असाल, अथवा फत्तेसिंग गायकवाड याजकडील मदतीविशीं जलदीचीं बोलावणीं येत गेलीं तिकडे गेलेत असाल, तरी तिकडून जलदीनें येऊन हा बंदोबस्त आधीं करणें. कलम १.

तुह्मांजवळ फौजेचें सामान फार आहे, पावप्यादे बंदीस वगैरे लागतील ते तिकडील खबरदार माणूस इतबारी माहितगारीनें ठेवण्याविषयीं बहिरो रघुनाथ यास आज्ञा केली असे, तरी याचे विद्यमानें ठेऊन त्यास खर्चास ऐवज लागेल तो मोंगलाई जप्तीचे ऐवजीं देत जाणें. कलम १.

शहरची बंदी सतत करून तंबी पोहोचाऊन रस्ते वगैरे लुटून दस्त करणें. कलम १.

इंग्रज व मोंगल यांस तिकडे पायबंद जरूर पोंचला पाहिजे, यास्तव गायकवाड याची फौज तुह्मांजवळ आहे, त्यासुद्धां सुरतेजवळ रहाणें. कदाचित गायकवाड याची फौज नसली तरी सरकारची फौज तुह्मांजवळ आहे, व पावप्यादे नवे ठेवाल याणेंच बंदोबस्त होईल. गुत्ता नाहीं. आधीं हा बंदोबस्त करणें. कलम १.

सुरतेबाहेर महालांत मोंगलाचा अंमल आहे, त्याची जप्ती करून ऐवज वसूल घेणें. येविशीं कमाविसदारास व फत्तेसिंग गायकवाड यांस अलाहिदा पत्रें सादर केलीं आहेत, तरी तुम्हीं सदरहू प्रमाणें करणें. कलम १.

शहरांत जंबूसर व आमोद व घोगे वगैरे खेड्यांतून जलमार्गें जिन्नस येतो, त्यास बंदरास कारकून व प्यादे पाठवून खाड्या बंद करणें, शहरांत सरकार[ चा ] चौथाईचा अंमल आहे, तो इंग्रजें व मोंगल यांणीं उठविला आहे त्याचा बंदोबस्त करून अंमल बसविणें. कलम १.

---

( 439 ) The following orders were issued to Náro Ánandrao regarding Surat and the other possessions of the English and the Mogal of Surat.

A. D. 1774-75.

एकूण सहा कलमें लिहिलीं आहेत, याप्रमाणें निकडीनें बंदोबस्त करून हुजूर जलदीनें लिहून पाठवणें ह्मणोन, नारो आनंदराव यांचे नांवें. छ. २० सवाल. सनद १.

रसानगी यादी.

४४०–( १५५ ) बाणकोटचा किल्ला इंग्रजाकडील घ्यावयाचा विचार मोरो बापूजी यांणीं केला आहे, त्यांचे कुमकेस किल्ले रायगडपैकीं शंभर माणूस चांगलें बरकंदाज मर्द देविलें असे, तरी मशारनिल्हेकडे लौकर सदरहू शंभर माणूस पाठवून देणें, व तुम्हीं इंग्रजाकडील दासगांवची जप्ती करणें ह्मणोन, गणपतराव कृष्ण, तालुके रायगड यांचे नांवें छ. २३ सवाल. सनद.

खमस सबैन मया व अलफ मोहरम ६

परवानगी रूबरू.

४४१–( १५६ ) मोरो बापूजी यांचे नांवें सनद कीं, तुम्हीं विनंतिपत्र पाठविलें कीं कांहीं जाजती लोक ठेवावयाची आज्ञा जाहल्यास बाणकोट घ्यावयाची उमेद आहे, त्यास पेशजीं दोनशें माणूस जदीद ठेवणें, व कामकाज लागल्यास जाजती शंभर माणूस ठेवणें ह्मणोन लिहिलें आहे, तें ठेविले नसतील. तुम्हीं इंग्रजाचे गांवची जप्ती केली व गाफील धरिले, व कपितान ( क्याप्टन ) धरिला, उत्तम आहे, व बाणकोटचा किल्ला घ्यावयाची उमेद धरिली आहे, सबब शंभर माणूस बरकंदाज ठेवणें, कांहीं ऐवज तिकडील गांवचा वसूल होईल तो खर्च करणें, व रायगडपैकीं शंभर असामी व राजापूर तालुक्यापैकीं शंभर असामी एकूण दोनशें तुह्मांकडे

खमस सबैन मया व अलफ मोहरम ६

---

1 All imports into Surat both by land and sea should be entirely stopped. This step would prevent the English of Bombay from getting assistance from Surat.

1 Náro Ánandrao with the Government army and with the assistance of Fatesing Gáikwad should punish Suratkar.

1 The Amal of the Mogal outside Surat should be attached.

1 The Government Amal of chouthai discontinued by the Mogul and the English should be re-imposed.

( 440 ) Moro Bápuji being desirous of taking the fort of Bankoṭ from the English, Ganpatrao Krishna of Taluka Ráygaḍ was directed to send 100 men for his assistance to attack the village of Dásgaum in the possession of the English.

A. D. 1774-75.

( 441 ) Moro Bápuji was informed that he had done well in attacking a village belonging to the English, and in arresting their captain while they were off their guard, and that he might carry out his plan of taking their fort of Bankoṭ.

A. D. 1774-75.

कुमकेस द्यावयाचीं. अलाहिदा पत्रें सादर केलीं असत; ते घेऊन इंग्रजास तंबी पोहोंचवणें, व बाणकोटचा किल्ला हिकमतीनें घेणें ह्मणोन, तालुके सुवर्णदुर्ग, निसबत मशारनिल्हे यांचे नांवें. छ. २३ सवाल.

सनद १.

रसानगी यादी.

४४२–( १५७ ) किल्ले बाणकोट येथील इंग्रजाकडे गांव आहेत, त्यांची जप्ती सरकारांत करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी त्याजकडील गांव जप्त करून वसूल घेऊन ऐवज हिशेवीं जमा करणें ह्मणोन, तालुके हाय यांस.

खमस सबैन मया व अलफ मोहरम ६

सनदा.

१ तालुके सुवर्णदुर्ग, निसबत मोरो बापूजी यांस.
१ तालुके रायगड, निसबत गणपतराव कृष्ण यांस.
१ प्रांत राजापुरी, निसबत चिमाजी माणकर यांस.

———

३

परवानगी रूबरू.

४४३–( १५८ ) इंग्रज मुंबईकर याणें सरकारच्या तहांत अंतर करून गैर राहा वर्तणूक केली, सबब तालुके हायपैकीं शिपाई वगैरे लोक मुंबईस व बाणकोटास व सुरतेस चाकरीस गेले असतील, त्यांचा पत्ता बारकाईनें लावून त्यांचे घरांची जप्ती करून, वस्तभावेचा मोजदादजाबता हुजूर पाठवणें, व त्यांचे माणसांस निकड करून ते लौकर घरीं येत तें करणें ह्मणोन छ. २२ सवाल. परवानगी रूबरू.

खमस सबैन मया व अलफ मोहरम ६

सनदा.

१ बाळाजी गणेश, तालुके देवगड.
१ गंगाधर गोविंद, तालुके विजयदुर्ग.
१ महिपतराव कृष्ण, तालुके रत्नागिरी.
१ कृष्णाजी विश्वनाथ, तालुके अंजनवेल.
१ मोरो बापूजी, तालुके सुवर्णदुर्ग.
१ चिमाजी माणकर, प्रांत राजापुरी.
१ भिकाजी गोविंद, मामले कोहज.
१ भिकाजी महादेव, तालुके उरण.
१ रामराव नारायण, तालुके राजमाची.
१ विसाजी केशव, तालुके वसई.
१ गणपतराव कृष्ण, तालुके रायगड.
१ आनंदराव धुलप, सुभा आरमार

---

(442) The villages attached to the fort of Bankot, belonging to the English, were ordered to be attacked.

A. D. 1774-75.

(443) The officers of the Talukas of Konkan were directed to ascertain after careful inquiry, the inhabitants in their charge who had gone to Bombay, Bankot, and Surat for service under the English, to attach the houses of such persons and to arrange for their return to their houses by bringing influence to bear on their relations.

A. D. 1774-75.

१ बाबूराव पाटील सनकर, तालुके वीरवाडी.
१ आबाजी बल्लाळ, व भास्कर महादेव, तालुके अवचितगड.
१ आनंदराव शिंदे, तालुके रेवदंडा.
१ राणोजी बलकवडे, तालुके उंदेरी.
१ दुर्गोजी शिंदे, किल्ले माहुली.
१ बाजी गंगाधर, तालुके बेलापूर.
१ रामराव त्रिंबक, तालुके कल्याण भिंवडी.
——
२०

१ राघो नारायण, व सखाराम बल्लाळ, तालुके नेरळ.

वीस सनदा दिल्या असत.

विजयदुर्ग यांस कीं, तालुके सौदळ येथून लोक गेले असतील त्याजविशीं, व जलमार्गें हरएक जागांहून कुमक इंग्रजाकडे जाईल, त्याचा बंदोबस्त करून कुमक न पोहोंचे तें करणें ह्मणोन.

४४४–( १५९ ) साष्टीचें ठाणें इंग्रजानें बदमामली करून घेतलें, तेथें त्यास मोर्चेबंदी करावी लागते. टोपीकरासी लढाई. दारूचें सामान पोक्त पाहिजे, यास्तव किल्ले अमदानगर येथें शिलकेस दारू आहे, त्यापैकीं दारू वजन पक्कें खंडी ५० पन्नास खंडी दारू भाड्याचे बैल करून देऊन कल्याणचे रोखे घाटमाथां जाऊन मुक्काम करून रहावें. तेथून तुह्मांकडील कारकून बरोबर जाईल, त्यानें विसाजी केशव यांस लिहून पाठवावें. ते लिहून पाठवितील त्याप्रमाणें त्यांजकडे लौकर पोहोंचाऊन देणें. दारूची रवानगी कराल ते समईं विसाजी केशव यांस लिहून पाठवणें. ह्मणजे दारू घाटमाथां जाईल. तों त्यांचें लिहिलें येईल, त्याप्रमाणें पावती करून कबज घेणें. भाड्याचा आकार होईल तो तालुके मजकूरचे हिशेबीं खर्च लिहिणें. मजुरा पडेल ह्मणोन, महादाजी नारायण, तालुके अमदानगर यांचे नांवें. छ. २९ सवाल. सनद १.

खमस सबैन मया व अलफ मोहरम ६

परवानगी रूबरू.

४४५–( १६० ) साष्टीचें ठाणें इंग्रजानें तह असतां लबाडी करून घेतलें, यास्तव त्याचें पारिपत्य होऊन ठाणें हस्तगत करावयाविषयीं तुम्हांस आज्ञा केली असे, तरी सुरतेहून वगैरे जागांहून सिद्दी वगैरे चांगले लोक मर्द माणूस पाहून हजार दोन हजार नवे लोक मेळवून ठेवणें. या लोकांस

खमस सबैन मया व अलफ मोहरम ६

---

**( 444 )** The English having taken Sálsette, it was necessary to beseige the town, and as it was thought that in an action against that Power a larger supply of ammunition was necessary, 50 khandis of gunpowder were ordered to be sent at once from Ahmednagar,

A. D. 1774-75.

**( 445 )** Visáji Keshav was directed to arrange for the re-taking of Sálsette after enlisting Siddhis and other good soldiers from Surat and other places.

A. D. 1774-75.

वगैरे मसलतीस ऐवज पाहिजे, त्यास सालमजकुरीं तालुके हाय येथील ऐवज रद्द कर्जास लाऊन दिला आहे तो मना करून सरकारांत घ्यावयाचा केला असे. तालुकदाराकडून सदरहू ऐवज हुजूर आणविला असे, वसूल घेऊन तुह्मांकडे पाठविला जाईल. याजप्रमाणें आणखी ऐवज लागेल तोही हुजुरून तुह्मांकडे पाठविला जाईल ह्मणोन, विसाजी केशव, प्रांत वसई, यांचे नांवें छ. २९ सवाल. सनद १.

परवानगी रूबरू.

४४६–( १६१ ) साष्टीस इंग्रज येऊन लागला आहे, तेथें कुमक मातबर पोहोंचली पाहिजे, याजकरितां हुजुरून फौज, व गाडदी, व लोक रवाना केलेच आहेत, परंतु याहूनही भरणा लोकांचा असावा, त्यास आपल्याजवळ माणूस जमा आहे ह्मणोन हुजूर विदित जाहलें, त्यावरून सदाशिव रघुनाथ खाडिलकर यांस बोलाऊन आणून सांगितलें कीं, तुम्हीं पंतांस लिहून पाठवून माणूस जमा असेल तें सरकारकाम उत्पन्न जाहलें आहे तेथें पोहोंचवणें ह्मणोन सांगितल्यावर, मशारनिल्हेनीं विनंति केली कीं, या समयांत आपले यजमान सरकारचे पेचांत, व मीही राजश्री सखाराम पंत व नाना फडणीस यांजवळ करार केला आहे कीं, यांचे कारभारांत आपण सरकारआज्ञेशिवाय शिरणार नाहीं. ऐसी शपत केली आहे, तेव्हां कसें करावें? त्याजवरून सर्व अर्थ एकीकडे ठेवून सरकारांतून मशारनिल्हेस आज्ञा केली कीं, सरकारांतूनही पत्रें लिहितों, व तुम्हींही त्यांचे खातरजमेविशीं आपलें पत्र लिहून त्यांची निशा करून जलदीनें लोक साष्टीस जाऊन पोहोंचत तें करणें. त्याजवरून लोकांचे खर्चाविशीं मशारनिल्हेनीं विनंति केल्यावरून पांच हजार रुपये तूर्त मशारनिल्हेकडे देऊन हें पत्र आपणांस लिहिलें असे, तरी पत्र पावतांच लोक साष्टीस जलदीनें रवाना करावे, बरोबर चार सरदार व कारकून देऊन रवानगी करावी, वरकड आपण कोणेविशीं संशय चित्तांत आणाल तर हे गोष्ट सर्वथैव नसावी. आपलेंही लक्ष पूर्वींपासून असें नाहीं. येथूनही आपणाविशीं आणीक

खमस सबैन मया व अलफ मोहरम ६

( 446 ) Government being informed that Wásudeo Anant had some armed men with him, desired Sadáshiv Raghunáth Khádilkar to induce Wásudev Anant to lend his men to Government for being sent for assistance at Sálsette. Khadilkar represented that his master ( Wásudeo ) was not in the good graces of Government and that he ( Khádilkar ) had pledged his word with Náná Fadnis and Sakhárampant not to interfere in Wásudeopant's affairs. Khádilkar was told not to mind the past and to induce his master to assist Government in the emergency. Wásudevpant was also addressed to the same effect, and was requested to send a thousand men post-haste to Sálsette.

A. D. 1774-75.

सारिखा विचार होणार नाहीं. येविशीं निशा असावी. सविस्तर मशारनिल्हे आपणांस लिहितील, त्याजवरून खातरजमा होईल. लोक तेथें लौकर जाऊन पोहचत तें करावें. तेथें लोकांचे खर्चाविशीं चिंता न करावी. सदरहू अन्वयें एक हजार माणूस त्यांत एकही माणूस कमी न करितां रवाना करावें. त्यांत फार करून बरकंदाज असावे; व सारांश लोकांनीं रात्रीचा दिवस करून जाऊन पोहोंचावें. तर निकडीच्या कामावर पडतील ह्मणोन, वासुदेव अनंत यांचे नांवें. छ. ३ जिल्काद. सनद १.

परवानगी रूबरू.

खमस सबैन मया व अलफ मोहरम ६

४४७–( १६२ ) जानराव धुळप, सुभा आरमार, तालुके विजयदुर्ग यांचे नांवें सनद कीं, साष्टीस इंग्रज येऊन सोखी करून ठाणें घेतलें आहे, याजकरितां त्याचें पारिपत्य जरूर करावें लागतें, यास्तव गोपाळ गंगाधर यांस तुह्मांकडे रवाना केले असेत, तरी शत्रूचें पारिपत्य करावयाचा मजकूर तुह्मांजवळ सांगतील त्याप्रमाणें तुम्हीं लोकांस उमेदवार करून या समईं टोपीकराचें पारिपत्य चांगलें होई तें करणें. येविशीं मशारनिल्हे बरोबर कितेक मजकूर सांगोन पाठविले आहेत, त्याप्रमाणें बशर्त काम करून दाखविल्यास सांगितल्याप्रमाणें अमलांत येईल ह्मणोन छ. ७ जिल्काद. सनद १.

मशारनिल्हे गोपाळ गंगाधर यांजबराबर करारी यादी करून दिल्ही आहे, ती यादी धुळपांस दाखवावी, त्यांतील. कलमें.

१ इंग्रजाचे पाल आहेत त्यांजवर बेजरब घालून पाल शिकस्त केले तर दर पालास सारे आरमारियांस सरकारांतून पंचवीस हजार रुपये बक्षीस क्षेपनिक्षेप पावेल. मरतां मारतां शिकस्ता न होय तर पालांस आगी घालाव्या, त्यामुळें सरकारचे पाल अगर गुराब जळाली तर दर पालास दहा हजार रुपये बक्षीस पावेल. येणेंप्रमाणें करार.

१ मुंबईत उतरून मुंबई जाळून फस्त केली, तरी लूट माफ व दहा हजार रुपये आरमारकरी यांस बक्षीस क्षेपनिक्षेप पावेल, येणेंप्रमाणें करार मुंबईतील तीन हजार

---

A. D. 1774-75.

( 447 ) The English having taken Sálsette, Jánrao Dhuḷap of the navy was directed to proceed against them, and the following inducements were held out to him.

1 The men of the navy would be given Rs. 25000 for every war-ship belonging to the English that they would destroy. If the ship could not be wrecked, it should be set on fire, and in that case a reward of Rs. 10000 for every ship would be given.

1 If Bombay be attacked and burnt, the men would be allowed to appropriate property obtained by plunder, and would also

पांचशें घर जाळल्यास येणेंप्रमाणें करार. मुंबईचे बंदरांत आरमारसुद्धां येऊन साष्टीकडे आरमार जाण्याचें मना करून टोपीकरास तंबी पोहोंचली तर कामाप्रमाणें बक्षीस पावेल येणेंप्रमाणें करार.

१ साष्टीचें ठाणें टोपीकरानें घेतलें आहे, याजकरितां त्यास आरमारसुद्धां तंबी पोहोंचून साष्टीचा किल्ला घ्यावयाविशीं चांगली मेहनत करून बशर्त काम केल्यास सरदारांस बक्षीस पावेल. व जातीसही चांगलें बक्षीस पावेल. येणेंप्रमाणें करार.

१ बशर्त काम करून दाखविल्यास धुळपांकडे दहा पंधरा हजार रुपये सरकारचें फाजील येणें आहे तें माफ केलें जाईल.

१ चांगलें काम केलें तर मनोदयानुरूप चालविलें जाईल.

---

५

येणेंप्रमाणें पांच कलमें करार केलीं असेत, तरी सदरहू मशारनिल्हे बशर्त काम करून दाखविल्यास लिहिल्याप्रमाणें करूं. छ. २ जिल्काद.

रसानगी यादी कराराची.

४४८–( १६३ ) शामलाकडील लोक दासगांव वगैरे जागाजागा जमा होतात. इंग्रजाचा बिघाड याजमुळें बाणकोटासही लोक जमा जाले आहेत. खाडी टोपीकराकडे, गडबडीचे दिवस, शत्रु संनिध, यास्तव किल्ले रायगड येथील बंदोबस्त जाला पाहिजे. याजकरितां हुजुरून किल्ले मजकूरचे भरतीस लोक रवाना केले आहेत, व महादाजी बल्लाळ कारकून शिलेदार पाठविले आहेत. हे किल्ले मजकूरचे लोकांची हजिरी घेऊन गिरदीनवाईचे मेटाची खबरदारी कसकसी आहे तें पाहून बंदोबस्ताचा मजकूर हुजूर लिहीत जातील. तुम्हींही गणेश विश्वनाथ यास नेहमीं किल्ले मजकुरावर ठेऊन त्यांणीं व यांणीं मिळोन मेटाचा, व पहाऱ्याचा, व लोकांचा फेर

खमस सबैन मया व अलफ
मोहरम ६

---

get Rs. 10000. The reward would be given, only if the 3500 houses in Bombay were burnt.

1 If the navy get into the harbour of Bombay, and succeed in preventing the English ships from going to Sálsette, a fitting reward would be given.

1 If the fort of Sálsette be retaken, a fitting reward would be given to the Sirdars and to Dhuḷap personally.

( 448 ) Owing to hostilities with the English, additional men were sent for the protection of fort Ráygaḍ. ( Succour was sent also to other places and forts in Konkan. In some cases the officers were directed to entertain additional men. )

A. D. 1774-75.

मोबदला करून बंदोबस्त बहुत खबरदारीनें करीत जावा. लोकांस सालमजकुरीं रोजमरे-किती पावले, व शिलक गल्ला, व जंगी सामानाचा झाडा यांस समजावणें. हे हुजूर लिहितील. गडबडीचे दिवस आहेत तों मशारनिल्हे किल्ले मजकुरीं राहतील. तुम्हींही तालुके मजकूरची व किल्ले मजकूरची खबरदारी करीत जाणें. किल्ले मजकुरीं तोफा आहेत, व शिलकी गोळे आहेत ते तोफांचे फरमे लाऊन ज्या तोफांचे फरम्यास जे गोळे लागतील, त्या तोफा जवळ ठेवणें ह्मणोन, गणपतराव कृष्ण तालुके रायगड यांचे नांवें. छ. ७ जिल्काद.

सनद १.

परवानगी रूबरू.

तालुके अंजणवेल निसबत कृष्णाजी विश्वनाथ यांजकडे कोंकण प्रांतीं इंग्रजाची गडबड आहे; सबब किल्ले परळी पैकीं माणूस असामी ५० पन्नास देविलें असे, तरी चांगलें मर्द माणूस त्यांत फार करून बरकंदाज असें पाहून, लौकर रवानगी करून, फार जलद पोहोंचतसें करणें ह्मणोन, भवानजी मा(जा?)धव किल्ले परळी यांचे नांवें. छ. ८ जिल्काद.

सनद १.

परवानगी रूबरू.

( कोंकणांतील किल्यांवर व इतर ठिकाणीं मदतीस लोक पाठविले व कित्येक वेळीं अंमलदारास जास्त लोक ठेवण्याचे हुकूम झाले. )

४४९–( १८६ ) महादशेट गोंधळे, व खंडू नगरकर यांणीं हुजूर विदित केलें कीं, आपण मुंबईहून माल खारीक व तुरटी वगैरे गलबत भरून पेशजीं बेलापुरास आणिला आहे. सरासरी शंभर बैलांचे भरित, किंवा अजमासें बाराशा रुपयांची होईल, त्यास इंग्रजाचे बिघाडामुळें किल्ले मजकुरीं अटकाविला, तो देवावयाची आज्ञा केली पाहिजे ह्मणोन, त्याजवरून हें पत्र सादर केलें असे, तरी गरीब साहुकार मजकूर पुण्यांत फार दिवस रहातात. माल फार दिवस ठेवल्यानें नासाडी, सबब शंभर बैल खारीक व तुरटी वगैरे आणूं देणें ह्मणोन, बाजी गंगाधर प्रांत बेलापूर यांचे नांवें चिटणिसी. छ. ७ मोहरम.

खमस सबैन
मया व अलफ
रबिलाखर ५

पत्र १.

( 449 ) Mahádshet Gondhaḷe and Khandu Nagarkar, traders of Poona, purchased some articles in Bombay worth rupees 1200 and brought them in a boat to Belápur, where owing to hostilities with the English, it was attacked. In view of the poor circumstances of the traders and the perishable nature of the articles attacked, the articles were ordered to be restored to them.

A. D. 1774-75.

४५०–( १९९ ) साष्टी इंग्रजानें घेतली, त्याचे मसलतीविषयीं. कलमें.

खमस सबैन मया व अलफ रबिलाखर ५

मसलत संबंधें जसा प्रसंग दिसेल त्याप्रमाणें लोकांची जथ पाडून सरकार काम होय तें करावें. खर्च करणें तो अखत्यारीनें करावा. मसलत संबंधें खर्च होईल तो मजुरा दिल्हाजाईल. सदरहू ऐवजीं तूर्त हुजुरून नेमणूक अलाहिदा करून दिली आहे, त्याशिवाय जाजती ऐवज लागेल तो कोंकणचे मामलेदारापासून रसदेचे ऐवजीं घेऊन खर्च करीत जाणें. कोणी दिक्कत करील त्याचे मामलतीची घालमेल हुजूर समजाऊन करणें. येणेंप्रमाणें करार. कलम १.

दर्यावर्दी असामी ३०० तीनशें, चार माही ठेवावे लागतात, त्याचा आकार तांडेल सारंगसुद्धां देखील अडसेरी अजमासें दरमहा रुपये २५०० प्रमाणें १०००० दहा हजार रुपये पाहिजेत ह्मणोन आकार तुम्हीं समजाविला त्यास सदरहू ऐवज दर एक ऐवजीं घेऊन दर्यावर्दी ठेवणें. कलम १.

साष्टीचे लोकांचे सालमजकूरचे रोजमरेयापैकीं ऐवज राहिला आहे ह्मणोन तुम्हीं अजमासें समजाविलें, ते रुपये ३८००० अडतीस हजार, पैकीं अलाहिदा सनदेंत लिहून दिले ते वजा रुपये १२००० बाकी रुपये २६००० सवीस हजार रुपये प्रांत कोंकण येथील पेस्तर सालचे रसदेचे ऐवजीं घेऊन लोकांची हजीर चवकशीनें मानस आणून यापैकीं वाजवी ऐवज देणें निघेल तो गोविंद गंगाधर दिवाण, व फडणीस मजमदार, व गोविंद हरी वगैरे दरकदार यांचे गुजारतीनें आढावा करून जाबता हुजूर आणून समजावणें. कलम १.

आरमार हंगामी तयार जाहलें पाहिजे, त्यास तामरातीस वगैरे खर्चास पैका लागेल तो कोंकणपट्टीचे रसदेचे ऐवजीं नेमून देऊन हुजूर समजावणें. कलम १.

येणेंप्रमाणें चार कलमें सदरहू लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन, विसाजी केशव यांचे नांवें. छ. ५ रबिलाखर.

सनद १.

( 450 ) The following orders were issued to Visáji Keshav in regard to the recovery of Sálsette taken by the English.

A. D. 1774-75.

1 Full discretion was given to him to entertain such men as might be required. The expenses incurred on that account would be admitted without objection.

1 Permission was given to entertain 300 sailors for 4 months at a cost of Rupees 10000.

1 Permission was given to spend the amount required to prepare boats for temporary use.

## मुतालिक ह्यांचे रोजनिशी पैकीं.

४५१–( ६ ) परगणे भडोच येथील इंग्रेजाकडील अंमल सरकारांत जप्त करून जफ्ती चांगोजी कदम यांस सांगितली असे, तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन परगणे मजकूरचा इंग्रजाकडील अमलाचा वसूल सुरळीत देणें ह्मणोन, जमीदार परगणे मजकूर यांस. सनद १.

खमस सबैन मया व अलफ सफर ११

परवानगी रूबरू.

४५२–( २१८ ) बाजी गंगाधर तालुके बेलापूर यांचे नांवें सनद कीं, आनंदराव जिवाजी, भात वीस खंडी मोष्टिनास मुंबईस पाठवीत आहेत, तें जाऊं देणें, सदरहू भात वीस खंडी तुम्हीं यांस देणें, भात नेलियावर ते पैका देऊं लागतील, ते समई त्यांस सांगणें जे तूर्त पैका घेत नाहीं, हुजूर लेहून जाब आणवून आज्ञा येईल तसें करूं, असें सांगणें; आणि पंधरा दिवस पैका घ्यावयाची आज्ञा नाहीं असें सांगोन पैका न घेणें. सदरहू भात वीस खंडी बारीक देणें. त्यांचे नांवें खर्च लिहिणें ह्मणोन. सनद १.

सीत सबैन मया व अलफ जमादिलाखर २५

परवानगी रूबरू.

४५३–( २२६ ) मुंबईचे बंदरची बंदी सरकारांतून पेशजीं जाली असतां सावकार जिन्नस नेतात व आणतात ह्मणोन हुजूर विदित जालें त्यावरून सदरहूची चौकशी बहिरो रघुनाथ यांस सांगितली असे; तरी तर्फ हाये येथील बंदरीं मशारनिल्हेकडील कारकुनाचे चौकशीनें जिन्नस आढळेल

सीत सबैन मया व अलफ रजब ६

---

### FROM THE MUTÁLIK'S DIARY.

( 451 ) The Jamidárs of Parganá Broach were directed to attach the revenues of the Parganá due to the English.

A. D. 1774-75.

( 452 ) Báji Gangádhar of Belápur was directed to hand over 20 Khandies of excellent rice to Monstin of Bombay, and was instructed not to receive the price thereof. If such an offer ( of payment of price ) were made, he was to tell that he ( Báji ) had no instructions to receive the money, that he would refer the matter to Government and act according to the instructions he might receive.

A. D. 1775-76.

( 453 ) Government being informed that notwithstanding the prohibition of trade with Bombay, merchants continued to send and receive goods from that place; Bahiro Raghunáth was appointed to evquire into the matter, and the Mamletdars were ordered to attach goods found by them to have been clandestinely received from or destined for Bombay.

A. D. 1775-76.

त्याची जप्ती करून पुण्यास रवाना करतील येविशीं मामलेदारास वगैरे पत्रें.

५ मामलेदारास पत्रें कीं जिन्नस आढळेल तो जप्त करून व पुण्यास रवाना करितील त्यांस प्यादे तालुक्यापैकीं देऊन पुण्यास पोंहोंचाऊन देणें ह्मणोन. पत्रें.

१ राघो नारायण, व सखाराम बल्लाळ तर्फ नेरळ यांस.
१ राणोजी बलकवडे तर्फ उंदेरी यांस.
१ आनंदराव शिंदे तर्फ रेवदंडा यांस.
१ चिमाजी माणकर प्रांत राजापुरी यांस.
१ आबाजी बल्लाळ, व भास्कर महादेव तर्फ अवचितगड यांस.

५

३ जकाती महालानिहायचे कमाविसदारार पत्रें कीं, सदरहूचे चौकशीस जकातचि नाक्याचे टिपांचें मशारनिल्हेकडे प्रयोजन लागल्यास दाखल्यास टिपा देणें ह्मणोन. पत्रें.

१ विठ्ठल नारायण प्रांत कल्याण भिंवडी यांस.
१ गणेशराम तर्फ रेवदंडा वगैरे यांस.
१ भिकाजी विश्वनाथ जकात प्रांत पुणें व जुन्नर यांस.

३

१ राघोजी आंग्रे वजारत माहा सरखेल यांस पत्र कीं, तुह्मांकडील तालुके यांत सदरहू चौकशी मशारनिल्हे करितील, तरी तुम्हीं दिक्कत न करावी.

९

नऊ पत्रें. परवानगी रूबरू.

## जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

४५४–( २४८ ) इंग्रज मुंबईकर याजकडील गाफील सालगुदस्तां सुवर्णदुर्गचे आरमारानें पाडाव करून आणिले, त्याजवर इंग्रजाकडील लोक होते, ते सुवर्णदुर्गास अटकेस आहेत. त्यांस सोडावयाचा करार करून बहुमान वस्त्रें खासा कपितान एक व चार इंग्रज एकूण पांच असामी मिळोन

सीत सबैन मया व अलफ रजब २०

## FROM JANÁRDAN APPÁJI'S DIARY.

(454) One captain and four other Englishmen were in the preceding year captured by the fleet at Suvarṇadurga, while off their guard, and were then imprisoned at Suvarṇdurga. Orders were now issued to Moro Bápuji to set them at

A. D. 1775-76.

कापड आंख ३६० तीनशें साठ आखांचीं सनगें हुजुरून तुह्मांकडे पाठविलीं आहेत, त्याची यादी अलाहिदा पाठविली आहे, तरी त्याप्रमाणें बहुमान वस्त्रें व खर्चाबद्दल तालुके मजकूर पैकीं रुपये २० वीस देविले असेत, तरी देऊन व एक गलबत पोहोंचवावयासी देऊन मुंबईस पोहोंचऊन देणें ह्मणोन, मोरो बापूजी यांचे नांवें. छ. २४ साबान. सनद १.

परवानगी रूबरू. राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस.

४५५–( २६७ ) करनेल टामस कीटीण यांस सनद कीं, तुह्मांकडे भाड्याचे बैल ओझ्याबद्दल आहेत. त्याचे हिशेबाचा फडशा आजपर्यंत करून देऊन बैलांची हजिरी तेरीखवार लिहून हुजूर पाठऊन देणें ह्मणोन.

सीत सबैन मया व अलफ जिल्हेज २३

सनद १.

परवानगी रूबरू.

४५६–( २७३ ) जमा जामदारखाना.

सीत सबैन मया व अलफ मोहरम

कमाविसभेट बाबत हाय, गुजारत हरजी सेटगा खिजमतगार निजबत कारखाने मजकूर सनगें. एकूण किंमत रुपये.

३४४०॥ बद्दल कर्नेल अपटेन इंग्रज वकील दिंमत संस्थान कलकत्ते.

२९९३ राजश्री राव यांस.

४५५ शेले साधे धुवट बंगाली.

१०५ प्रत बुटेदार ३ दर ३५

३५० प्रत साधे.

३०० प्रत ४ दर ७५

५० प्रत १

३५० ५

४०५ ( ४५५ )

liberty, to honour them by making a present of clothes worth Rs. 360, to give them rupees 20 for expenses and to send them in a Government boat to Bombay

( 455 ) A Sanad to Colonel Thomas Keating asking him to render an account of the expenses incurred on account of the pack-bullocks in his service.

A. D. 1775-76.

( 456 ) A present of clothes &c to the Peshwa worth Rupees 3440–8 was received from Colonel Uptou, Agent of the English at Calcutta,

A. D. 1775-76.

४१७॥ दुसेनेरें.

८० प्रत पिवळे गज १६॥ सनंग १ रुपये.
६२॥ थोर बुटीचें गज ८ सनंग ·॥· रुपये.
४५ प्रत छडीदार गज ९ सनंग. ·।॥· रुपये.
१५ प्रत गज ३ सनंग ·।· रुपये.
६० प्रत छडीदार गज १२ सनंग १ रुपये.
८० प्रत जरी बुटेदार गज ४ सनंग १
७५ प्रत साधे लहान बुटीचें गज ६ सनंग ·।·

४१७॥

१९८ मखमल लालडी कडे २ एकूण गज १६॥ दर गजीं रुपये १२ प्रत रुपये.

१९२२॥ सकलाद गज एकूण रुपये.

१६४१ प्रत सुलतानी.

गज.

१७॥ १७ १६॥
१७। १६ १७
१७ १८॥

१३६।॥· ८ तागे. दर गजी रुपये १२ प्रत रुपये.

२८१॥ ( २८१। ) प्रत जमरुदल.

तागे २ एकूण.
१९
गज १८॥

३७॥
दर गजीं रुपये ७॥
प्रत १७४।· ( गज )

१९२२॥·

२९९३

सनगें १३(१२।॥)

गज. १९०।॥ (२४६॥)

* * * *

४५७–( २८१ ) परगणे देहनबेरें प्रांत गुजराथ येथील मामलत विठ्ठल नारायण या-
सीत सबैन जकडे होती, त्यास सालगुदस्त इंग्रजाचे दंग्यामुळें महालीं अंमल चा-
मया व अलफ लिला नाहीं, हल्लीं सालमजकुरीं इंग्रजाचा तह होऊन महाल सुटला,
रबिलावल ३ याजकरितां परगणे मजकूरची मामलत सालगुदस्तांप्रमाणें मशारनिल्हे-
कडे सांगितली असे, तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन अमलाचा वसूल मुरळीत देणें ह्मणोन, परगणे मजकूरचे जमीदारांस.

सनद १.

परवानगी रूबरू.

४५८–( २८३ ) जमा.

सीत सबैन मया व अलफ रबिलाकर

जमा जामदारखाना.

कमाविसभेट सनगें एकूण. रुपये.

७४९॥ बाबत कर्नेल इपटेन वकील दिंमत इंग्रज संस्थान कलकत्ते छ. २२ जिल्कादीं भेटी बाबत सनगें आलीं ते जमा सनगें एकूण किंमत रुपये.

३८१॥ राजश्री सखाराम भगवंत यांस, गुजारत मल्हारजी कामथा खिजमतगार दिंमत मशारनिल्हे.

१८१ शालफर्द २ दर [ ९०॥ ] एकूण.

१२५ किनखाप १

७५॥ महमुद्या.

३२॥–३२॥–१०॥

७५॥

३८१॥

---

( 457 ) Owing to the disturbance of the English in the preceding year, Vithal Náráyan Mámlatdár was unable to exercise jurisdiction in the Parganá of Dehajbare in Pránt Gujerath. A treaty having been concluded with the English in the current year, the Mámlatdár was reappointed and directed to hold charge of the Parganá.

A. D. 1775-76.

( 458 ) Clothes worth Rupees 749–8 were presented by Colonel Upton, Agent of the English of Sansthán Calcutta at the time of the visit paid by him on 22nd of Jilkád.

A. D. 1775-76.

Rs. 381—8 clothes presented to Sakhárám Bhagwant.
368—0—Do—Báláji Janárdan.
158—0—Do—The Peshwá and his mother Lady Gangábái.

३६८ राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस यांस.

१६९ शालफर्द २ दर ८४॥

१२५ किनखाप १

७४ महमुद्या

३२॥-३१-१०॥

७४

३६८

७४९॥

१५८ वणगोजी नाईक निंबाळकर, राजश्रीराव यांस, गुजारत खंडोजी पणदरा खिजमतगार. छ. १५ मोहरमीं आलीं तीं सनगें एकूण रुपये.

६० खासा राव यांस.

३० तिवई १

३० जाफरखानी.

६०

९८ मातुश्री गंगाबाई यांस.

९५ लुगडें साधें १

३ खण पै ॥ १

९८ २

१५८ ४

९०७॥

१६

४५९-( २९० ) कर्णेल इफायन वकील निसबत इंग्रज कलकत्तेकर यांणीं पुण्याहून कापड बैल सर वीस २० कापड भरून मुंबईस पाठविलें, त्यास व तिकडून सदरहू बैल भरून जिन्नस आणितील त्यांस आणूं देणें. जकातीचा आकार होईल तो यांचें नांवें खर्च लिहून जकातीचा तगादा न करणें

सीत सबैन मया व अलफ रबिलाकर १५

(459) The duty on clothes sent to Bombay by Colonel Ephael (इफायल), Agent to the English at Calcutta, and on the goods brought by him from Bombay, was remitted.

A. D. 1775-76.

ह्मणोन, भिकाजी विश्वनाथ कमाविसदार प्रांत पुणें व जुन्नर यांचे नांवें. छ. १० रबिलोवल.
सनद १.

रसानगी यादी.

४६०–( २९५ अ ) मुंबईवाले जनरल यांजकडील जाहजें व सिबाडें तुह्मीं धरिलीं आहेत, त्याजवरून हीं पत्रें तुह्मांस सादर केलीं असेत, तरी सदरहू जहाजें पत्रदर्शनीं सोडून देणें ह्मणोन, चिटणिसी छ. १५ मोहरम. पत्रें.

सीत सबैन मया व अलफ रबिलाकर १५

१ माधवराव बेमसे यांस कीं, जहाजें सुमार ३ तीन व सिबाड १ एक एकूण चार अटकाविलीं आहेत त्याविशीं.

१ गंगाधर गोविंद तर्फ विजयदुर्ग यांस कीं, दोनशें खंडींचें शिबाड तुह्मीं धरून नेलें आहे तें सोडून देणें ह्मणोन.

---

२

४६१–( २९८ ) विसाजी केशव याचें नांवें पत्र कीं, इंग्रजाचा तह जाहला त्यास मुंबईची बंदी छ. २९ रविलावलपासून मोकळी करून पूर्ववत् प्रमाणें चालवें, याप्रमाणें करार जाहला आहे; त्यास कोकणचे मामलेदारांस सांगोन बंदी मोकळी करून पूर्ववत् प्रमाणें मुंबईची आमदरफ्ती चालों देणें. येविशीं सर्व मामलेदारांस ताकीद आधीं करणें. याविशींचा मुंबईचा बोभाट हुजूर नये ते गोष्ट करणें ह्मणोन.
पत्र १.

सबा सबैन मया व अलफ जमादिलावल ३

परवानगी रूबरू.

४६२–( ३२८ ) फत्तेसिंग गायकवाड यांजकडील महाल इंग्रजाकडे दिल्हे, त्या ऐवजीं मूबदला मशारनिल्हेस दीड लक्षाचे महाल द्यावे असा करार आहे, त्यापैकीं प्रांत गुजराथ पैकीं सालमजकूरापासून खेरीज दुमाले गांव करार करून दिल्हे त्याविशीं. सनदा.

सबा सबैन मया व अलफ साबान ८

---

( 460 ) Five ships belonging to the General of Bombay, captured by the officers of Government, were ordered to be restored to the English.

A. D. 1775-76.

( 461 ) A treaty having been concluded with the English, the prohibition of trade with Bombay was removed from 29th of Ravilávwal.

A. D. 1775-76.

( 462 ) In view of the territory of Fatesing Gáikwáḍ, given to the English, a province in Gujerath worth Rupees 150,000 was ordered to be made over to him vizt. Pargaṇá Pálanpur, Thámáṇe, Badá Sinore and Virpur without delay.

A. D. 1775-76.

१ तर्फ अमदाबाद निसबत आपाजी गणेशपैकीं. महाल.

१ परगणे पाळणपूर.
१ परगणे धामणें.
१ परगणे बडा सिनोर.
१ परगणे वीरपूर.
———
४

चार महाल ठाण्यासुद्धां देविले असत, तरी मशारनिल्हेचे हवाला करून पावल्याचें कबज घेणें ह्मणोन.

१ परगणे सावली येथील जमीदाराचे नांवें सनद कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन अमल सुरळीत देणें ह्मणोन. सनद.

———
२

सदरहू महालचा अजमास बेरीज रुपये.

५०००० परगणे सावली.

१००००० तर्फ अमदाबादपैकीं महाल. रुपये.

३५००० परगणे पालनपूर.

६५००० कित्ता महाल.

१ परगणे धामणें.
१ परगणे बडासिनोर.
१ परगणे वीरपूर.
———
३

अजमासें बेरीज रुपये.

———
१०००००

———
१५००००

दीड लक्षाचे महाल चार सदरहूप्रमाणें बेरीज लाऊन दोन सनदा दिल्या असत. रसानगी यादी.

फत्तेसिंग गायकवाड यांचे नांवें सनद कीं, तुह्मांकडील महाल इंग्रजाकडे दिल्हे, त्या ऐवजापैकीं मूबदला तुह्मांस दीड लक्षाचे महाल द्यावयाचा करार केला आहे त्यास. महाल.

४ तर्फ अमदाबाद पैकीं.

१ परगणे पालनपूर.
१ परगणे धामणें.
१ परगणे बडासिनोर.
१ परगणे वीरपूर.
———
४

१ परगणे सावळी.

———
५

एकूण पांच महाल खेरीज दुमाले करून साल मजकुरापासून तुह्मांकडे करार करून दिल्हे असेत, तरी महाल घेऊन अमल बसवणें. तुमचे महाल इंग्रजाकडे दिल्हे आहेत, ते ज्या बेरजेनें तुह्मीं त्याजकडे लावून द्याल, त्या अन्वयें तुह्मांस दीड लक्षाचे द्यावे, त्यास हल्लीं सदरहू महाल नेमून दिल्हे आहेत. अमल बसवणें. चार रुपये कमी जाले अगर अधीक जाले तरी तुम्हांकडील कारभारी हुजूर आल्यावरी फडशा केला जाईल. या उपरी कोणाविषईं संशय न ठेवितां इंग्रजाचे महाल त्याचे पदरीं पडत असें लौकर करणें ह्मणोन.

पत्र १.

रसानगी यादी.

४६३—( ३६४ ) नरसिंग राव जनार्दन धायगुडे याजकडे फौजेचे सरंजामास परगणे देहजबेरें दिल्हें होतें, तो महाल त्याजकडून दूर करून इंग्रजास दिल्हा, सबब त्याचे मूबदला परगणे बहादरपुरा प्रांत गुजराथ हा महाल पेशजीचे अमलदाराकडून दूर करून सालमजकुरीं मशारनिल्हे यास फौजेचे सरंजामास दिल्हा येविशीं. सनदा.

सबा सबैन
मया व अलफ
जिल्हेज २

२ परगणे मजकूरचा अमल ठाणेंसुद्धां मशारनिल्हेचे हवाली करून कबज घेणें ह्मणोन. सनदा.

१ चिंतामण हरी यास.

१ गणेश हरी दिंमत चिंतामण हरी यास.

---

२

१ जमीदार परगणे मजकूर यांस कीं मशारनिल्हेसी रुजू होऊन अमल सुरळीत देणें ह्मणोन. सनद.

---

३

रसानगी यादी.

४६४—( ३८८ ) गणेश हरी दिंमत चिंतामण हरी सरसुभा प्रांत गुजराथ याचे नांवें सनद कीं, प्रांत गुजराथैपकीं कुंपनी इंग्रज यांस तीन लक्षाचे महाल सरकाराकडील कमाल जमेप्रमाणें लाऊन द्यावयाचा करार जाहला आहे, त्यास हल्लीं कर्णेल अपटेन बहादर यांसी बोलोन परगणे हसोट

सबा सबैन
मया व अलफ
जिल्हेज २९

---

( 463 ) The Parganá of Dehájbare was given to the English.

A. D. 1776-77.

( 464 ) In accordance with the agreement entered into with the English for the grant to them of a territory worth Rs. three lacs in Gujerath, it was settled after conferring with Colonel Upton that the Parganas of Hasot, Ámod,

A. D. 1776-77.

व परगणे आमोद व परगणे देहजबेरें हे महाल लाऊन द्यावयाचे ठरलें. त्याप्रमाणें परगणे मजकूरचे माजी अमलदारांस ठाण्याविशीं व जमीदारांस सनद लेहून काढून अलाहिदा पाठविली आहे, त्याप्रमाणें जमीदारासी व इंग्रजांसीं रुजू करून देऊन महाल त्यांचे हवाली करून कबज सरकारचे नांवें लेहून घेऊन पाठवणें. तीन लक्षांहून जाजती बेरीज सदरहू तीन महाल मिळोन होईल त्यास जाजती बेरजेचे गांव परगणे अमोद अगर हसोट पैकीं सरकारांत ठेवणें ह्मणोन.

सनद १.

जमीदारांस कीं माजी अमलदाराकडून अमल दूर करून कुंपनी इंग्रज यांजकडे महाल दिले असेत, तरी त्यांसी रुजू होऊन अमल सुरळीत देणें ह्मणोन. सनदा ३.

माजी अंमलदारास कीं परगणे मजकूरचीं ठाणीं गणेश हरी यांचे नांवें विद्यमानें इंग्रजांचे हवाली करून कबज घेणें ह्मणोन.

सनदा ३.

१ परगणे हसोट महादाजी निळकंठ याजकडे सरंजामास होता तो दूर करून.
१ परगणे देहजबेरें नरसिंगराव जनार्दन धायगुडे यांजकडे सरंजामास होता तो.
१ परगणे आमोद येथील महालांत माधव नागशेट याजकडून दूर करून.

३

७

एकूण सात सनदा छ. २३ सवाल.

रसानगी यादी.

४६५–( ३९२ ) महादाजी रामचंद्र याचे नांवें सनद कीं, परगणे जंबूसर प्रांत गुजराथ येथील कमावीस सांगोन तुम्हांस पाठविले असेत, तरी इमानें इतबारें वर्तोन अमल चौकशीनें करणें. सदरहू मामलत संमंधें कलमें.

सबा सबैन मया व अलफ जिल्हेज २९

---

Dehájbare, should be transferred to the English, and orders for the transfer were accordingly issued to Gaṇesh Hari in the service of the Sarsubha Chintáman Hari.

( 465 ) Máhádji Rámchandra was appointed Kamávisdár of Pránt Jambusar in Pránt Gujerath and the following instructions were issued to him.

A. D. 1776-77.

1 The revenue of this Pargaṇá was to be made over to the English. Mahádji should fix the Jamábandi, and should the English agree to be responsible for its collection, the Pargaṇá should be made over to them. Otherwise, the English should transfer the tháṇá of the Pargaṇá to Mahádaji who should remit the collections to the English, as they were received, and take receipts.

परगणे मजकूरचा ऐवज इंग्रजाकडे द्यावयाचा, त्यास जमाबंदी चौकशीनें तुह्मीं करून, जो आकार होईल त्याचा हवाला इंग्रजांनीं घेतल्यास हवाला देऊन इंग्रजांचे कबज ध्यावें. आकाराचा हवाला इंग्रज न घेत, तरी परगणे मजकूरचें ठाणें इंग्रजांकडे आहे तें त्यांणीं तुमचे हवाली करावें. तुह्मीं वसूल करून ऐवज वरचेवर इंग्रजास देत जाऊन कबज घेत जाणें. येणेप्रमाणें. कलम १.

शिबंदीची नेमणूक प्यादे. असामी.

१०० ठाण्यांत.

१०० वसुलास.

———

२००

एकूण दोनशें असामींस दरमाहा महालचे शिरस्तेप्रमाणें आकार होईल तो मजुरा पडेल. येणेंप्रमाणें. कलम १.

सरकारचा व इंग्रजाचा तह छ. १० मोहरम सन सीतांत जाहला त्या तारखेपासून इंग्रजाकडे वसूल परगणे मजकूरचा पडला आहे, तो जमीदाराचे गुजारतीनें रुजुवात करून त्या ऐवजाचे इंग्रजाचें कवज ध्यावें येणेंप्रमाणें. कलम १.

कारकून लिहिण्याचे कामास असामी १ एक, एकूण रुपये दोनशें २०० करार केले असे, मजुरा पडेल. येणेंप्रमाणें. कलम १.

ठाणें व वसूल इंग्रजाकडे लागल्यास तुह्मांबरोबर हुजूरून स्वार वगैरे दिले आहेत, तितकेच ठेवावे, अधिक ठेवूं नये. येणेप्रमाणें. कलम १.

दुमाले गांव व रोजीनदार वर्षासनें याची सनद हुजुरून येईल, त्याप्रमाणें चालवणें. येणेंप्रमाणें. कलम १.

एकूण सहा कलमें करार करून दिल्हीं असेत. सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन. सनद १.

१ जमीदार परगणे मजकूर यांसी कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन अमल सुरळीत देणें, व सरकारचा व इंग्रजाचा तह छ. १० मोहरम सन सीतांत जाहला त्या तारखेपासून हर सनद पैवस्तगिरी पावेतों इंग्रजाकडील जामीन कमाविसदारांनीं वसूल घेतला आहे, तो त्यांचे गुजारतीनें मशारनिल्हेसी रुजू करून देणें ह्मणोन. चिटणिसी ३.

२ इंग्रजांस पत्रें कीं परगणे मजकूरचें ठाणें जकिरासुद्धां यांचे हवालीं करणें. तहाची तेरीख छ. त्यापासून परगणे मजकूरचा वसूल तुह्मांकडे जाहला असेल तो मशारनिल्हे पैवस्ता होत तोंपावेतों मशारनिल्हेसी रुजू करून देणें, त्या बमोजीब ऐवज पावल्याचें कबज याजवळ द्यावें, व पुढें आपलेकडील मातबर माणूस जंबूसरास

1 A receipt should be taken from the English for any collections made by them.

The purport of this letter was communicated to William Hornby, President and Governor of Bombay, and to the Governor of Surat.

ठेऊन घ्यावयास ठेवावा. जमाबंदीचा ठराव महादाजी रामचंद्र करून ऐवज देतील, त्याप्रमाणें त्यांणीं घेत जावा. जसा जसा ऐवज पावेल, तसें कबज याजवळ लेहून देत जावें म्हणून. पत्रें.

१ उईल्यम हर्नबी प्रेजीदेंत गोवर्नदोर जनराल बंदर मुंबई यांस.

१ हुनरी बदाम गोवर्नदोर बंदर सुरत यांस.

---

२

---

३

रसानगी यादी. छ. २ जिल्काद.

४६६--( ४०६ ) कर्नेल इपटेन वकील कलकत्तेकर यांणीं उंट व घोडीं, व बैल मिळोन रास ४३ कसबे पुणें वगैरे जागा खेरदी केली त्याची किंमत रुपये ४१४३ येकेचाळीसशें त्र्येताळीस रुपयांस खेरदी केली आहे, त्यास सदरहू रुपयांचे जकातीचा आकार होईल तो मशारनिल्हेचे नांवें खर्च लिहिणें, मजुरा पडतील ह्मणोन, भिकाजी विश्वनाथ कमाविसदार जकात प्रांत पुणें, व जुन्नर याचे नांवें. सनद.

सबा सबैन मया व अलफ मोहरम ६

रसानगी यादी.

४६७–( ४०९ ) गणेश हरी यास पत्र कीं, परगणे आमोद व हसोट व देहजबेरें येथील कमाल आकाराची बेरीज जमीदार यांचे मार्फतीनें इंग्रजास तीन लक्षाचे महाल पदरीं त्याचे घालणें, कमाल बेरजेस कमजाजतीनें जाबसाल करितील, त्यासी बोलणें, जे करारनाम्यांत कमाल बेरीज तीन लक्षाची द्यावी, ह्मणोन सरकारचा व इंग्रजाचा करार जाहला आहे, त्याप्रमाणें इंग्रजाचे दस्तावैज सरकारांत आहेत, व सरकारचे इंग्रजाजवळ आहेत. आज नवीन बोलावें हें उ-

सबा सबैन मया व अलफ मोहरम ९

---

( 466 ) Colonel Upton, Agent of the English at Calcutta, purchased horses and camels and bullocks for Rs. 4143. The octroi duty leviable on the purchase was remitted.

A. D. 1776-77.

( 467 ) Ganesh Hari was directed to hand over to the English a territory worth three lacs of Kamál revenue ( gross assessment ) in the Parganá of Ámod, Hasot and Dehájbare in Gujerath. In case the English made any additional demand, Ganesh Hari was instructed to represent to them that the figure of three lacs was settled at the treaty entered into with them and that it was improper to urge any new demand. The English had sent General (करन्हाक Carnac) an officer of position recently arrived from

A. D. 1776-77.

चित नव्हे; ऐसें त्याजवळ बोलणें. मुंबईकरांनीं जनरेल करण हक मातबर माणूस विलायतेहून आला, तो व बदाम जनराल सुरतचा व रामजी ऐसे भडोजेस तीन लक्षांचा मुलूख घ्यावयास पाठविले असेत, तरी तुह्मीं त्यांपर्यंत जाऊन त्यांस करारनाम्याचा मजकूर सदरीं लिहिला आहे त्याप्रमाणें तिघांस समजाऊन फडशा करणें. करारनाम्याची नक्कल त्या तिघांजवळही आहे. गंभीर दुराग्रही आहे यास्तव या तिघाजणांस पाठविले आहेत. फडशा करून टाकणें. या उपरांतीक हा गुत्ता न ठेवणें. असेंही करतां दहा पांच हजार रुपयांची तोडजोड कमजास्त पडली तरी कबूल करून फडशा करणें. ज्या सालची कमाल बेरीज धराल त्या सालांत बाकीपैकीं वसूल आला असेल तो जमेस न धरणें. मुंबईहून पत्रें गंभीरास आणविलीं होतीं, त्यास मुंबईकरांनीं करण हक वगैरे यांस पत्र परभारें पाठविलें आहे, व त्याची नक्कल हुजूर पाठविली ती तुह्मांकडे पाठविली असे. करण हक वगैरे यास देऊन तीन लक्षाचे मुलुखाचा फडशा करून टाकणें, व जंबूसरचे वसुलाविषयीं या पत्रांत मजकूर असे, तरी जनरल बदाम याचें पत्र जंबूसरांत इंग्रज राहतो त्याचे नांवें घ्यावें कीं, महादाजी रामचंद्र व तुह्मीं एक मतें राहून जमाबंदीचा आकार महादाजी रामचंद्र याचे मार्फतीनें करून हल्लीं सालचें कबज असल सालापासून देणें. पुढेंही येणेंप्रमाणें ऐवज फिटे तों करणें. ह्मणोन पत्र घेऊन महादाजी रामचंद्र याजकडे रवाना करणें. सदरहू तीन महाल पैकीं सालमजकुरीं वसूल आला असेल तो इंग्रजांस द्यावा लागतो, सबब जमीदाराचे मार्फतीनें इंग्रजासी रुजू करून यादी इंग्रजाची घेऊन हुजूर पाठऊन देणें ह्मणोन. पत्र.

परवानगी रूबरू.

४६८–(४१०) गणेश हरी यास सनद कीं, परगणे आमोद व परगणे हसोट व परगणे देहजबेरें, या तिन्ही परगण्यांचा कमाल आकार जमीदारांचे विद्यमानें पाहून त्यापैकीं सुरत व भडोज येथील मोंगलास साता वर्षांपूर्वीं ऐवज सालाबाद पावत होता त्याप्रमाणें वजा करून बाकी

सबा सबैन
मया व अलफ
मोहरम २७

England, Badham General of Surat, and Ramsay, to Broach, to take possession of the territory above referred to. Gaṇesh Hari was ordered to repair to them and get the matter settled. Gaṇesh was informed that these men were sent as गंभीर was an obstinate person. Ganesh was permitted for the settlement of the question to concede an additional sum of Rs. 10,000, if such a concession became necessary. He was further instructed to obtain a letter from General Badham to the English officers residing at Jambusar for fixing the Jamábandi in conjunction with Mahádaji Rámchandra, and for receiving the revenue so fixed.

(468) A similar letter was again addressed to him on the 27th of this very month.

A. D. 1776-77.

तीन लक्षांचा मुलूख इंग्रजास लाऊन देणें ह्मणोन, पेशजीं तुह्मांस सनद सादर जाहलीच आहे. ऐशास करनेल व बदाम व रामजी मातबर मनुष्य मुंबईहून आले आहेत, यांचे मार्फतीनें सदरहूप्रमाणें तीन लक्षांचा मुलूख लाऊन देऊन लौकर विल्हेस लाऊन टाकणें. दुसरे पत्राचा उजूर न करणें ह्मणोन.

सनद १.

परवानगी रूबरू.

४६९–( ४११ ) महादाजी रामचंद्र यांस पत्र कीं, मुंबईहून पत्र सुरतकर इंग्रजांस जंबूसरचे मजकुराविशीं आणविलें होतें, तें त्यांणीं परभारें जनरल करण हक व बदाम व रामजी यांस पाठविलें, व त्याची नकल हुजूर पाठविली. ते गणेश हरी याजकडे पाठविली असे, ते जनरल करण हक वगैरे तिघांस देऊन त्यांचें पत्र जंबूसरांत इंग्रज राहतो त्याचें नांवें घेऊन तुह्मांकडे पाठवितील. तुह्मीं जंबूसरास जाणें. जंबूसरचें ठाणें इंग्रजाकडे राहावें असें ठरलें आहे. तुह्मी परगणे मजकूर येथील जमीदार व पाटील गांवगन्नाचे आणून सालमजकूरचे जमाबंदीचा ठराव करून इंग्रजांसी रुजू करून त्याप्रमाणें कबज इंग्रजांचें घेणें. पेशजीं तुम्हांस सनदा दिल्या ते समईं सालगुदस्तांचे दाहावे मोहरमापासून अलीकडील ऐवजाचें कबज घ्यावें ऐसा करार जाहला होता. परंतु ती गोष्ट ठरण्यांत आली नाहीं, मजकूर राहिला. सालमजकूर अवल सालापासून कबज घ्यावें ऐसा ठराव जाहला, सबब सालमजकूरची जमाबंदी करून त्याप्रमाणें कबज घेणें. जंबूसरचा इंग्रज व तुह्मीं एक विचारें कारभार करणें. जमाबंदीचा ठराव करून तुह्मीं देत जाणें. वसूल करून इंग्रज घेतील ह्मणोन. पत्र १.

सबा सबैन मया व अलफ मोहरम १०

परवानगी रूबरू.

४७०–( ४२२ ) बदल देणें इंग्रजास सरकारांतून कर्नेल आपटीण कलकत्तेकर याचे विद्यमानें ऐवज द्यावयाचा करार जाला आहे, त्यापैकीं रसानगी यादी. रुपये २५००० सदरहू ऐवज गोविंद हरी यास पावेतों, मशारनिल्हेचे रदकर्जीं लिहिला, सबब गैर आदा. पंचवीस हजार रुपये शिवजी विठ्ठल याजकडे जातीचे तैनातचा व दहीयला पट्टीचा ऐवज येणें, त्यापैकीं यादवराव रघुनाथ याजकडून उरपाडचे ऐवजीं देविले.

सबा सबैन मया व अलफ मोहरम २३

---

( 469 ) A letter was sent to Mahádaji Rámchandra directing him to settle the Jamábandi of Jambusar in concert with the English officer at the place, and to allow the latter to recover the revenue.

A. D. 1776-77.

( 470 ) Rs. 25000 were sent to the English in part payment of the sum agreed to be paid to them.

A. D. 1776-77.

४७१–( ४२८ ) मौजे दासगांव, परगणे महाड; व मौजे कुबले, तर्फ तुंडील हे दोन गांव इंग्रज बाणकोटकर याजकडे होते. ते सन खमस सबैनांत इंग्रजाचे बिघाडामुळें सरकारांत जप्त करून जप्तीची कमावीस तुम्हांस प्रांत राजापुरीकडे सांगितली, ऐशास हे गांव रायगड तालुक्यापैकीं सबब तुह्मांकडून जप्तीची कमावीस दूर करून तालुके मजकूर रघुनाथ सदाशिव याजकडे सांगितला, सबब जप्तीची कमावीस मशारनिल्हेकडे सांगितली असे, तरी हे अंमल करितील ह्मणोन, गोविंदराव माणकर याचे नांवें. सनद १.

सबा सबैन मया व अलफ सफर १३

मोकदम, व रयानी यांस कीं मशारनिल्हेसी रुजू राहून अंमल सुरळीत देणें ह्मणोन २.

———

३

रसानगी यादी.

४७२–( ४३६ ) कमाविसभेट राजश्री रावसाहेब यांस बाबत मोष्टीन इंग्रज वकील मुंबईकर याच्या भेटी डेऱ्यांत जाहल्या तेथें सनगें आलीं तीं जमा गुजारत खळोजी मान्या खिजमतगार सनगें एकूण किंमत रुपये.

सबा सबैन मया व अलफ रबिलावल ६

६५० किमखापे.
३५० ३००
——— ———
६५० २
१५० सुजनी अस्तर ताफ्ता. १
४० वोढणी जरी बादली १
१०० चिरा जरी बादली १
१०० मुसेजर ·॥·
१५० जामेवार जरी बादली २, दर ७५
३०० शाला फर्द ४ दर ७५

२४० मखमल गज १६, दर १५
२० कोरेजरी वजन तोळे.
१३॥ प्रत सोनेरी तोळे ९ दर १॥
६॥ प्रत रुपेरी तोळे ६॥ दर १
——— ———
२० १५॥
———
१७५०

| सनगें | गज | तोळे. |
|---|---|---|
| ११॥ | १६ | १५॥ |

---

( 471 ) The village of Dásgaon in Pránt Mahád and another village which were held by the English at Bankot in A. D. 1774-75 were attached by Government in consequence of hostilities with that Power. The attachment still continued.

A. D. 1776-77.

( 472 ) Mr. Mostin, Agent of the English at Bombay, had an interview with the Peshwá in a tent. The following articles were presented by him:

A. D. 1776-77.

जमा जिनसखाना.

कमाविस भेट राजश्री रावसाहेब यांस बाबत मोष्टीन इंग्रज वकील मुंबईकर याच्या भेटी डेऱ्यांत झाल्या सबब तेथें आली ती जमा गुजारत रवळोजी मान्या खिजमतगार. सुमारें.

१ घोड्यावाघाची लढाई, वरून तावदान, समेत घर लाकडी.

१ बैलवाघाची लढाई, वरून तावदान, घर लाकडी.

१ तसबीर श्रीकृष्णाची.

―――

३

जमा कमाविसभेट राजश्री रावसाहेब यांस बाबत इंग्रज मुंबईकर याजकडून मोष्टीन वकील आला त्याणें नजर केले ते जमा गुजारत खंडोजी पणदरा खिजमतगार किंमत.

रुपये १६३८=

१ साखळी एकेरी कडेवजा सोनें वजनी दर तोळा रुपये १४॥ प्रमाणें किंमत रुपये १६३८= एकूण सोनें वजन. तोळे ११।

२ हर जिनसी. दागिने.

१ घड्याळ सिंहावरील समेत किल्ली.

१ रागमालीकेची पेटी लहान समेत किल्ली.

―――

२

―――

३

४७३–( ४४७ ) बरहुकूम देणें मोष्टीन इंग्रज ममईकर यास मेजवानी ऊल्फा सिध्याबद्दल दररोज नक्त रुपये २० प्रमाणें. इजारत छ. ७ रबिलावल तारीख छ. ७ रबिलाकर एक माही बेगमी बद्दल. रुपये ६००

सबा सबैन मया व अलफ रबिलाकर १

रसानगी यादी.

---

1 Clothes worth Rs. 1750,

1 A portrait of Shri Krishna,

1 A घड्याळ ( either clock or watch ) with its key and other things.

( 473 ) Rupees 600 were paid to Mostin for his boarding expenses at Rs. 20 per day from 7th Rabilával to 7th Rabilákhar.

A. D. 1776-77.

४७४–( ४८३ ) टामस मोष्टीन इंग्रज मुंबईकर यांणीं घोडे रास २ दोन, व तट्टू रास एक एकूण तीन घोडीं एक हजार तीनशें रुपयांस पुण्यांत विकत घेतलीं आहेत, त्याची जकात माफ केली असे, तरी सदरहूचे जकातीचा आकार होईल तो त्यांचे नांवें माफ खर्च लिहून जकातीचा तगादा न करणें ह्मणोन, भिकाजी विश्वनाथ कमाविसदार, जकात प्रांत पुणें व जुन्नर याचे नांवें छ. १३ जमादिलाखर. सनद १.

सबा सबैन मया व अलफ रजब ३०

रसानगी यादी.

४७५–( ४८५ ) चिंतामण हरी यांचे नांवें सनद कीं, परगणा देहजबरें प्रांत गुजराथ राजश्री नरसिंगराव जनार्दन याजकडे सरंजामास महाल सालगुदस्त दिला होता, त्याजकडून दूर करून इंग्रजाकडे महाल द्यावयाचा करार करून सनदा तुह्मांकडे पाठविल्या, त्यास इंग्रजास महाल दिला नाहीं, सुभाकडे जप्तीस आहे त्याची कमावीस सालमजकुरापासून राजश्री त्रिंबकराव गोविंद याजकडे सांगितली असे, तरी परगणे मजकूर येथील ठाणें जकीरासुद्धां मशारनिल्हेचे हवाली करून कबज घेणें ह्मणोन. सनद १.

सबा सबैन मया व अलफ रजब ३०

रसानगी यादी. छ. २५ जमादिलाखर.

४७६–( ५१५ ) टामस मोष्टीन वकील दिंमत इंग्रज मुंबईकर यांणीं पुण्यांत जनावरें एकूण किंमत रुपये.

समान सबैन मया व अलफ सवाल ३०

| | | |
|---|---|---|
| २७० | घोडी रास | ३ |
| २० | बैल सर | १ |
| २९० | | ४ |

एकूण दोनशें नवद रुपयांस चार जनावरें खरेदी केलीं, त्याचे जकातीचा आकार माफ केला असे, तरी आकार होईल तो माफ खर्च लिहून जकातीचा तगादा न करणें ह्मणोन, भिकाजी विश्वनाथ कमाविसदार, जकात प्रांत पुणें व जुन्नर यांस छ. ११ रमजान. सनद १.

रसानगी याद.

---

( 474 ) Thomas Mostin purchased 2 horses and 1 pony at Poona for Rs. 1300. The octroi duty leviable on the transaction was remitted.

A. D. 1776-77.

( 475 ) The Mahál of Dehájbare in Pránt Gujerath, which was previously ordered to be transferred to the English, was not made over to them.

A. D. 1776-77.

( 476 ) Thomas Mostin purchased 3 horses and 1 bullock for Rs. 290; the octroi duty on the purchase was remitted.

A. D. 1777-78.

४७७–( ५५३ ) सेवकराम यासी कलकत्त्यास कामगिरीस रवाना पेशजीं केलें आहे. त्याचा लेक गुलाबराय अटकेंत ठेवायाबद्दल तुमचे हवाली केला आहे, त्यास सोडावयाची आज्ञा केली असे, तरी सेवकराम याचे भाऊ चिमणलाल यांचे हवाली गुलाबराय मजकूर यास मोकळें करून करणें ह्मणोन, आनंदराव भाऊ कोतवाल कसबे पुणें याचे [नांवें] चिटणिसी. पत्र १.

समान सबैन
मया व अलफ
रबिलावल २७

४७८–( ५९१ ) अनंतगीर गोसावी याणें राऊत ठेऊन इंग्रजाकडे जात होता तो वस्तभाव, व घोडीं सुद्धां कैद करून ठेवणें ह्मणोन तुह्मांस पेशजीं सनद सादर जाहली होती. त्याजवरून घोडींसुद्धां कैद करून चादवडास ठेविला आहे, त्यास हुजूर आणावयास खिजमतगार पाठविले आहेत, तरी गोसावी मजकूर याचीं घोडीं, व वस्तभाव जी असेल ती व गोसावी यास बंदोबस्तानें हुजूर पाठवणें ह्मणोन, तुकोजी होळकर यांचे नांवें. सनद १.

तिसा सबैन
मया व अलफ
रबिलावल ५

४७९–( ५९२ ) पागा दिंमत नागो राम यांणीं इंग्रजाकडे सिलेदार जात होते त्यांचीं घोडीं पाडाव करून पागा मजकुरीं आणिलीं त्यांचे चंदीविशीं कलमें.

तिसा सबैन
मया व अलफ
रबिलावल ७

किता घोडीं रास ८२ एकूण दररोज चंदी केली.

| | |
|---|---|
| ऽ१। नर रास | १५ दर ऽऽ१ |
| ऽ४ऽ१ मादवाना | ४९ दर ऽऽ१ |
| ऽ॥· तट्टें | १८ दर ऽऽ॥· |
| ·।१ऽ१ | ८२ |

एकूण सहा मण एक पायली गल्ला दररोज इस्तकबिल छ. १७ मोहरमपासून तागाईत छ. ४ सफर पावेतों. महिन्याच्या दोन एकादशा वजा करून देणें.

कलम १.

किता घोडीं रास ३२ बत्तीस नेहमीं तेथें राहिलीं आहेत त्यांस रोज चंदी केली.

| | |
|---|---|
| ऽ॥·१ नररास | १० |
| ऽ१॥१ मादवाना | १९ |
| ऽऽ२। तट्टें | ३ |
| ऽ२॥१। | ३२ |

एकूण अडीच मण सवा पायली चंदी इस्तकबिल छ. ५ सफरापासून १४ पर्यंत पागा तळ्यास राहील तोंपर्यंत महिन्याच्या दोन एकादशा वजा करून बाकी दररोज चंदी सदरहू प्रमाणें देत जाणें. कलम १.

---

( 477 ) Sewakrám was sent on some business to Calcutta. His son Ánandrao? who was in prison, was ordered to be released.
A. D. 1777-78.

( 478 ) Anantgir Gosávi enlisted some horsemen and was going over to the English. He was arrested, and kept at Chándwad. Tukoji Holkar was directed to send him to Poona.
A. D. 1778-79.

( 479 ) The cavalry under Nágo Rám captured some horsemen who were going over to the English.
A. D. 1778-79.

एकूण दोन कलमें करार केलीं असत, तरी सदरहू प्रमाणें चंदी प्रांत राजापुरी पैकीं देणें ह्मणोन, गोविंदराव, व चिमाजी माणकर यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

४८०–( ६०९ ) ५ पोटखर्च कसबे पुणें येथील बेगारी माळी व महार लष्कराहून जखमी लोक पुण्यास आणावयाबद्दल तळेगांवचे मुक्कामीं रवाना केले. यास दर असामीस रुपये ।· प्रमाणें असामी वीस २० एकूण रसानगी यादी. छ. २८ जिल्हेज. रुपये.

तिसा सबैन मया व अलफ जमादिलावल १८

११ बक्षीस खर्च लष्कराहून इंग्रज पळाल्याची बातमी घेऊन आले, त्यास वगैरे परवानगी रूबरू. छ. २३ जिल्हेज. रुपये.

१० तानाजी मोडकर खास बारदार दिंमत राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस, लष्करांतून आला त्यास.

१ भवानसिंग वलद सीतळसिंग प्यादा दिंमत बू( भू )पसिंग चाकणकर याणें पुण्यांत बातमी पुढें येऊन सांगितली त्यास.

---

११

४८१–( ६१० व ६११ )

तिसा सबैन मया व अलफ जमादिलावल १८

१४७ भाडें खर्च.

१३८ इंग्रजाचे गडबडीमुळें सरकारचें सामान किल्यास न्यावयासी बैल भाड्याचे केले त्यास. रुपये.

३ छ. २१ जिल्हेज शहर पुणें येथील बेगारीचे बैल सामान भरून न्यावयास आणिले, त्यास एक रोजा वैरणीबद्दल बैल ४५ परवानगी रूबरू.

१३५ छ. १ मोहरम. रसानगी यादी. जामदारखाना व एकबेर्जी दप्तरचे रुमाल वगैरे सिंहीगडास रवाना केले त्याचे

---

(480) Rs. 5 were given as wages to Mális and Mahárs sent from Poona to Talegaon to bring the wounded. Rs. 11 were given as a reward to the messenger bringing information of the flight of the English.

A. D. 1778-79.

(481) The jewellery and the records of Government were sent to fort Singhar owing to the disturbance of the English. Owing to the same cause Lady Párvatibai went to Purandar.

A. D. 1778-79.

वोझ्यास वाण्याचे वगैरे बैल सर ९० दर बैली रुपये १ प्रमाणें.

| | |
|---|---|
| ६ नरसापा आवटी. | ३ गणशेट. |
| ३ विठू माळी. | १० खेमचंद चारण. |
| ८ महादू भगप्या. | १० येसू बोरसा. |
| ८ लाडखान. | २ काबाडी. |
| ५ तगापा. | २५ वाणी पेठ पुरंदर. |
| ६ संभूसेट. | |
| ४ सदाशिव. | ९० |

४५ सौभाग्यवती पार्वती बाई यांची स्वारी पुरंदरास गेली त्याजबरोबर वोझ्यास बैल सर ३० दर बैली रुपया १॥ प्रमाणें. रुपये.

२७ गुजारत काबाडी बैल १८ एकूण.

१८ गुजारत रामजी शिवनेरकर बैल १२

४५

१३५

१३८

४८२–( ६१३ ) श्रीदेव देवेश्वर वास्तव्य पर्वती यास दंग्यामुळें किल्ले सिंहीगडास रवाना केलें असे, तरी श्रीस पूजेचे व खटपटेचे ब्राह्मणास एकूण असामी तीन यांस उत्तम प्रतीचा शिधा व दररोज नंदादीपास तेल वजन पक्के पावशेर व तूप पावशेर येणेंप्रमाणें दररोज देत जाणें ह्मणोन, नारो महादेव किल्ले मजकूर यांस. छ. २१ जिल्हेज. सनद १.

तिसा सबैन मया व अलफ जमादिलावल १८

४८३–( ६४३ ) तालुके रायगड येथें इंग्रजाचे गडबडीमुळें गाडदी असामी १०० यांस शेरा दरमहा दर असामीस रुपये ७॥ साडे सात निवळ बारमाही शिरस्तेप्रमाणें ठेवावयाविशीं तुम्हांस आज्ञा करून हे सनद सादर केली असे, तरी सदरहू असामी ठेवून रोजमरा तालुके मजकूर

समानीन मया व अलफ जिल्काद ४

---

( 482 ) The idol Shri Deva Deweshwar of Parwati was owing to the disturbance sent to fort Singhar.

A. D. 1778-79.

( 483 ) Owing to the disturbance of the English the entertainment of a hundred additional Gárdis at Táluká Ráygaḍ was sanctioned.

A. D. 1779-80.

पैकीं गडबड वारे तोंपर्यंत देणें. गडबड वारल्यावर हे लोक दूर करणें ह्मणोन, रघुनाथ सदाशिव यांस.

सनद १.

रसानगी यादी.

समानीन मया व अलफ जिल्काद ९

४८४–( ६४६ ) कोंडाईबारी येथील बंदोबस्त करावयाविशीं तुह्मांस आज्ञा केली असे, तरी बंदोबस्ताकरितां जदीद असामी १०० शंभर लोक चांगले पाहून तालुके मुल्हेरीकडे ठेवावयाचा करार केला असे, तरी तालुके मजकूरचे लोकांच्या शिरस्तेप्रमाणें तैनात करून ठेवणें, आणि बारीचा बंदोबस्त चांगला करून इंग्रजाचा बंदोबस्त जाहल्यावर सदरहू लोक दूर करणें ह्मणोन, रामचंद्र कृष्ण यास.

सनद १.

रसानगी यादी.

समानीन मया व अलफ जिल्हेज २८

४८५–( ६६३ ) प्रांत कोंकण येथील मामलेदारांचे नांवें सनदा कीं, तुम्हांकडील तालुक्याहून सावकार भात खरेदी करून मुंबईस व साष्टीस इंग्रजाकडे नेतील त्यास नेऊं न देणें, बंदी करणें, येविशींचा बंदोबस्त चांगला करणें ह्मणोन.

सनदा.

१ तालुके नेरळ निसबत लक्ष्मण हरी याचे नांवें.
१ प्रांत बेलापूर निसबत कृष्णाजी नारायण याचे नांवें.
१ प्रांत कल्याण भिंवडी निसबत गोविंद राम याचे नांवें.
१ परगणे साळासे ऊर्फ पेण निसबत भास्कर लक्ष्मण याचे नांवें.

४

चार सनदा दिल्ह्या असेत. परवानगी रूबरू.

समानीन मया व अलफ जिल्हेज २८

४८६–( ६६४ ) सर्वोत्तम शंकर यांस चार असामी इंग्रज विजेदुर्गास सांपडले आहेत ते तुह्मांकडे किल्ले पालगड अगर रसालगड तालुके सुवर्णदुर्ग येथें पाठवितील, त्यास तुह्मीं किल्ले मजकुरीं पक्या बंदोबस्तानें अटकेंत ठेवून त्यांचे पोटाचे बेगमीविशीं मशारनिल्हे तुम्हांस लिहितील त्याप्रमाणें

---

A. D. 1779-80.

(484) Rámchandra Krishna was directed to entertain 100 additional men at Táluká Mulher to guard the pass of Kondáibári, owing to the disturbance of the English.

A. D. 1779-80.

(485) The Mámlatdárs of Paránt Konkan were directed to prevent merchants from purchasing rice in the Tálukás for being taken to the English at Bombay and Salsette.

(486) Sarvottam Shankar found 4 Englishmen at Vijaydurga. He

तालुके मजकूरपैकीं बेगमी करून देणें ह्मणोन, मोरो बापूजी याचे नांवें. सनद १.
परवानगी रूबरू.

सदरहू चहूं असामींस घाटसरीस किल्ला पाहून किल्ल्याचे पायीं ठेवणें. किल्यावर न ठेवणें; आणि पोटास चांगली बेगमी करून देणें ह्मणोन सनदेंत लिहिलें असे.

४८७–( ६७१ ) ३८ मेस्तर बेल इंग्रज व सालीम आरब सरकारांत अटकेस आहेत, त्यांस पोटास वगैरे रसानगी यादी. रुपये.

समानीन
मया व अलफ
रबिलावल ५

३३ पोटास बेगमीचे इस्तकबिल छ. २७ सफर तागाईत छ. ३० रबिलावल अखेरपर्यंत.

५ मराठा माणूस असामी एक चाकरीस आहे, त्यास रोजमरा माहे रबिलावलचा. रुपये.

———
३८

४८८–( ६७६ ) ४७ कमाविस गुन्हेगारी परशराम भोसले अमदाबाद येथें हल्ला जाहला ते समई इंग्रजाकडील लोकांनीं लष्करचीं घोडीं लुटून नेलीं, त्यास मशारनिल्हेचीं घोडीं नसतां आपली ह्मणोन दोन घोडीं आणलीं सबब ठरावून घेतले ते जमा नक्त आरकटी.

समानीन
मया व अलफ
रबिलाकर ११

४८९–( ६७९ ) परगणे बलवाड प्रांत गुजराथ महाल बळवंतराव धोंडदेव याजकडे सरंजामास आहे, त्यास पेशजीं इंग्रजांनीं परगणे मजकुरीं ठाणें वसविलें होतें तें तुह्मीं उठवून सरकारचें ठाणें बसविलें आहे. ह्मणोन हुजूर विदित जाहलें; त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, तरी हल्लीं मशारनिल्हेनीं आपले तर्फेनें कमाविसदार पाठविला आहे त्याचे स्वाधीन परगणे

समानीन
मया व अलफ
जमादिलावल ४

---

A. D. 1779-80. was asked to send them either to fort Pálgaḍ or to fort Rasálgaḍ. Moro Bápuji was directed to receive them, to keep them at the fort and to make suitable arrangements for their food.

( 487 ) Rs. 33 were debited as spent on account of food expenses from 27th. Safar to 30th Rabilával of Mr. Bell, an Englishman, and Salim, an Arab, who were in prison.

A. D. 1779-80.

( 488 ) This sanad refers to the attack of Ahamadábád by the English who forcibly took away the horses in the camp.

A. D. 1779-80.

( 489 ) The English took the Pargaṇá of Balwád in Pránt Gujerath which was assigned in Saranjám to Balwantrao Dhondeo. The Pargaṇá was taken back by Ganesh Vishwanáth.

A. D. 1779-80.

मजकूरचें ठाणें करणें, हे अंमल करतील, तुह्मीं महालास कोण्हेविशीं उपद्रव न देणें ह्मणोन, गणेश विश्वनाथ यांचे नांवें. चिटणिसी. पत्र १.

४९०–( ६८२ ) प्रांत बुंदेलखंड वगैरे महाल येथील मामलत संबंधें कलम प्रांत मजकुरीं तेजगडवाला लोधी व गढेमंडल्याचे राज्यानें दंगा केला, व सिवाजारचे गुजराचा दंगा, यामुळें जाजती फौज ठेविली, व हल्लीं इंग्रजाचीं पलटणें बुंदेलखंडांत येणार, म्हणून आवाई आहे. आलीं तरी फौजेवांचून बंदोबस्त राहणार नाहीं, म्हणून तुमची विनंति त्यास इंग्रजाचा प्रसंग पडल्यास तुह्मीं यख्तीयारी आहां. जसा समय पाहाल तसी फौज वगैरे ठेवणें ती ठेवावी. मजुरा पडेल. कलम १.

समानीन
मया व अलफ
जमादिलावल २९

४९१–( ६९० ) माधवराव वौकसे यास सनद कीं, जंजिरे अरनाळा येथें इंग्रजाचे गडबडीमुळें नेमणुकीशिवाय भरतीस सालमजकुरीं जदीद लोक ठेविले आहेत ते, व हल्लीं ठेवावयाचे, मिळोन दोनशें असामी करार करून दिल्हे पाहिजेत, ह्मणोन तुह्मीं हुजूर विनंति केली त्याजवरून असामी.

इहिदे समानीन
मया व अलफ
सवाल १६

१२५ पेशजी अवल सालापासून रजब अखेर पावेतों ठेविले आहेत ते.
७५ हल्लीं ठेवावयाचे.

२००

एकूण जदीद असामी दोनशें पैकीं अवल सालापासून रजब अखेरपर्यंत ठेवले आहेत. सवाशें व हल्लीं ठेवावयाचे पाऊणशें जंजिरे मजकूरचे शिरस्तेप्रमाणें ठेवावयाचा करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी चांगले लोक ठेवून जंजिरे मजकूरचा बंदोबस्त करणें. इंग्रजाची गडबड वारलियावरी सदरहू लोक दूर करणें ह्मणोन. सनद १.

४९२–( ६९१ ) प्रांत राजापुरी येथें शामलाचे दंग्यामुळें जदीद लोक ठेवले आहेत, त्यांपैकीं तालुकेहाय येथें इंग्रजाचे गडबडीमुळें लोक देविले असत, तरी लोक रवाना करणें म्हणून, गोविंदराव, व चिमाजी माणकर यांचे नांवें. सनदा.

इहिदे समानीन
मया व अलफ
सवाल २०

---

( 490 ) Full authority was given to the Mámlatdár of Bundelkhaṇḍ to retain such forces as he might deem necessary in case the English entered Bundelkhaṇḍ, as it was rumoured they intended doing.

A. D. 1779-80.

( 491 ) Additional men were ordered to be entertained at fort Arnáḷá owing to the disturbance of the English.

A. D. 1780-81.

( 492 ) Additional men were sent to Tálukás Underi and Revdanḍa for assistance in consequence of the disturbance of the English.

A. D. 1780-81.

१ तालुके उंदेरी निसबत गणेश बल्लाळ याजकडे लोक असामी १५० दीडशें पाठवणें ह्मणोन.

१ तालुके रेवदंडा निसबत आनंदराव शिंदे याजकडे लोक असामी १५० देणें ह्मणोन.

---

२

एकूण दोन सनदा दिल्या असत. रसानगी, सदाशिव केशव दात्ये.

इहिदे समानीन मया व अलफ सवाल १२

४९३–( ६९२ ) लक्ष्मण हरी याचे नांवें सनद कीं, सालमजकुरीं इंग्रजाची गडबड आहे, यामुळें तो हलींचे पिकाचा गल्ला घेऊन जाईल, यास्तव तालुके नेरळ येथील रयतीकडे सरकारचा ऐवज नक्त बाब व महसूल वगैरे येणें, त्या ऐवजीं दरोबस्त ऐन जिन्नस गल्ला वसूल घ्यावयाची आज्ञा केली असे, तरी तर्फ वरेडी, व तर्फ वजे, व तर्फ तळोजें तालुके मजकूर, हे तीन महाल किल्ले विकटगड निसबत आनंदराव राम यास किल्यास लगते आहेत, तेथील गल्ला किल्ले मजकुरीं न्यावयाविशीं मशारनिल्हे यास अलाहिदा सनद सादर केली असे; ते महालांत किल्ल्याचे लोक व कारकून जागा जागा पाठवितील व तुह्मीं आपलेकडील कारकून व महागार पाठवून भात वगैरे जिन्नस कापवून मळून त्यापैकीं किल्ले मलंगगड प्रांत कल्याण भिंवडी निसबत गोविंदराम या किल्ल्यास तर्फ तळोजें पैकीं लगत गांव असतील तेथील गल्ला किल्ले मजकुरावर व बाकी झाडून महालचा गल्ला किल्ले विकटगड येथें रात बेरात करून जलदीनें पावता करणें, मुलकांत दास्तान न करणें, सदरहू लिहिल्याप्रमाणें तर्तूद न जाहली, आणि गल्ला इंग्रजानें नेला तरी परिछिन्न कार्यास येणार नाहीं ह्मणोन. सनद १.

रसानगी, सर्वोत्तम शंकर.

इहिदे समानीन मया व अलफ रबिलाखर १५

४९४–( ६९३ ) शेख अबदूल खिजमतगार दिल्लीचा राहाणवाला दिंमत आपटीन इंग्रज याजकडून बातमीस लष्करांत आला होता तो सांपडला, सबब किल्ले विसापूर येथें अटकेंत ठेवावयास पाठविला असे, तरी पोटास शेर दररोज शिरस्तेप्रमाणें देऊन चौकीपहाऱ्यांत ठेवणें ह्मणोन, भिकाजी

---

A. D. 1780-81.

( 493 ) Owing to the disturbance of the English, Laxuman Hari was directed to hasten on the reaping of the crops in Táluká Neral, to recover the Government revenue in kind and to send it as speedily as possible to the several forts for whose support it was assigned. Laxuman Hari was informed that if the matter was delayed, and the English carried away the crops, he would have to answer for the loss.

( 494 ) Sheik Abdullá khijmatgár in the service of Upton who

गोविंद, किल्ले विसापूर याचे नांवें. सनद १.

रसानगी, रामचंद्र गोविंद कारकून.

शिलेदार.

## माधवराव रामचंद्र यांच्या कीर्दीपैकीं.

४९५–( ६९५ ) किल्ले सेवगांव, व किल्ले गंभीरगड तालुके सुधा, व परगणे नगर हावेली हे स्थलें इंग्रजाकडून हल्लीं सरकारांत घेऊन तेथील बंदोबस्त तुह्मांस सांगोन त्याविशीं बीतपसील. कलमें.

इहिदे समानीन मया व अलफ जमादिलाखर.

किल्ल्याचे व ठाण्याचे बंदोबस्तास शिबंदी प्यादे वगैरे नेमणूक असामी.

१५० किल्ले सेवगा.
५० ठाणें चिंचणी.
५० किल्ले गंभीरगड.
१०० ठाणीं तालुके गंभीरगड.
१०० ठाणीं दोन परगणे नगर हवेली.
१०० जवारीस भरणा असावा सबब.

५५०

तैनात दरमहा रुपये.

८०० आरब व सिंदी असामी १०० यांस दरमहा दर असामीस रुपये आठ प्रमाणें आकारमाही शिरस्तेप्रमाणें.

तालुक्याचे बंदोबस्ताकरितां कोळी असामी २०० जदीद ठेवावे, त्यास दरमहा दर असामीस रुपये तीन प्रमाणें एकमाही तैनात रुपये ६०० सहाशें रुपये दसमाही कबज बारमाही चाकरी शिरस्तेप्रमाणें करार केले असत. कलम १.

कोळी नाईकवाडी, वतनदार, इनामदार, सदरहू तालुकियांत आहेत त्यांचे सुदामत पेशजीं सरकारांतून चालत आलें असेल त्याप्रमाणें; येणेंप्रमाणें. कलम १.

दोन्ही किल्ल्यांस चार असामी कारकून त्यास तैनात सालीना दर असामीस रुपये १२५ सवाशें प्रमाणें, व ठाणीं असतील तेथें एकेक कारकून त्यास तैनात सालीना साठ रुपये प्रमाणें करार करून ठेवणें. ऐवज मजुरा पडेल. येणेंप्रमाणें. कलम १.

---

A. D. 1780-81. had come into camp to collect information was arrested and confined in the fort of Visápur.

## FROM MÁDHAVRAO RÁMCHANDRA'S DIARY.

( 495 ) The forts of Shevgaon and Gambhirgaḍ in Táluká Sudhá in Tránt Nagar Haveli were at this time taken by Government from the English, and a Mámlatdár was appointed to the place. He was directed to give pardon to all persons who had joined the English in case they proved useful to Government.

A. D. 1780-81.

२७०० कित्ता असामी ४५० यांस तैनात दरमहा दर असामीस रुपये ६ प्रमाणें दसमाही शिरस्तेप्रमाणें.

३५०० ५५०

तीन हजार पांचशें रुपये सदरहू साडेपांचशें असामींस दरमहा शिरस्तेप्रमाणें करार करून दिल्हे असेत, यांत कांहीं लोक तुह्मीं ठेविले आहेत व हल्लीं ठेवाल त्या तेरखापासून मजुरा पडेल. [कलम १.]

किल्ल्याचे बेगमीस गल्ला वगैरे हरजिन्नस जकीरा खरेदी करावयाबद्दल रुपये.

१५०० किल्ले सेवगा.

५०० गंभीरगड.

२०००

दोन हजार रुपये खरेदीबद्दल नेमणूक करून दिल्ही असे, तरी जप्तीचे ऐवजीं सदरहू रुपये घेऊन जिन्नस खरेदी करून ठेवणें. कलम १.

किल्ले सेवगांव हस्तगत होण्याविशीं यशवंतराव भोसले यांणीं मेहनत चांगली केली, सबब मशारनिल्हेस तैनात दरमहा रुपये वीस प्रमाणें बारमाही चाकरी, अकरमाही कबज. चाकरीची तेरीख अवल साल सन इसन्ने समानीन पासून देत जाणें. कलम १.

स्वारीचे कामाकरतां कारकून नवे ठेवावे त्यांस सालीना.

२५० यशवंतराव.

२०० राघो महादेव.

४५०

कोळी नाईकवाडी आहेत त्यांत सरकारचाकरीस उपयोगी पडतील त्यांजला बक्षीस चाकरी पाहून पावेल. येणेप्रमाणें. कलम १.

महालमजकुरीं खर्च पेशजींचे वहिवाटीचे अन्वयें व स्वारीसंबंधें शिधा व भोजनखर्च कार्याकारण करीत जाणें. मजुरा पडेल. कलम १.

किल्ले सेवगांव, व गंभीरगड ह्या दोहीं किल्ल्यांचे सरंजामाचे महाल, व परगणे नगर, हवेली, सुधा मामलत जकाती मिळोन तुह्मांकडे सांगितली असे, तरी महालाचा ऐवज वसूल होईल तो स्वारीसंबंधानें ऐवज मिळेल तो घेऊन खर्चाविसीं नेमणूक करून दिली आहे त्याप्रमाणें खर्च करणें, मजुरा पडेल. जमेचा ऐवज कमी येईल तो पुढें हिशेब पाहून मजुरा सरकारांतून दिला जाईल. येणेप्रमाणें. कलम १.

( फाटलेलें ) तैनात सालीना शागीर्द पेशा. ५०० रुपये.

पांचशें रुपये तैनात सालीना पेस्तर साल सन इसन्ने समानीन पासून करार केले असत. कलम १.

इंग्रजाकडे मिळाले असतील त्यांपैकीं तुह्मांस भेटतील ते सरकार उपयोगीं पडल्यास त्यांचे अपराध माफ केले जातील. कलम १.

+ + + कलम १.

येणेप्रमाणें बारा कलमें करार करून दिल्हीं असत, तरी सदरहू लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन, कृष्णाजी महादेव याचे नांवें. रसानगी यादी, छ. ६ जमादिलाखर. सनद १.

४९६–( ६९६ ) किल्ले कर्नोळा येथें इंग्रजाचे गडबडीमुळें कुमकेस लोक हेटकरी दिंमत हाये, निसबत कृष्णाजी नारायण याजकडील पाठविले आहेत, यांस अडशेरी दरमहा भात साडे तीन सेरी मापें केली. खंडी.

इहिदे समानीन मया व अलफ जमादिलाखर ६

५॥।·॥१॥ दिंमत साबाजी नाईक तावडे.

५॥। ऐन असामी ९२ दर ८१ प्रमाणें.
८॥१॥ पोर्गा १

५॥।·॥१॥ ९३

३८३८१॥ दिंमत अपसावंत.

३८२॥ ऐन असामी ५० दर ८१।
८॥१॥ पोर्गा १

३८३८१॥ ५१

२॥।३८१॥ दिंमत गोपाळ सावंत.

२॥।२॥ ऐन असामी ४६ दर ८१।
८॥१॥ पोर्गा १

२॥।३८१॥ ४७

२८३८१॥ दिंमत गोप सावंत.

२८२॥ ऐन असामी ३४ दर ८१।
८॥·१॥ पोर्गा १

२८३८१॥ ३५

१।·॥१॥ दिंमत गोप सावंत माणगांवकर.

१। ऐन असामी २० दर ८१।
८॥१॥ पोर्गा १

१।·॥१॥ २१

१५।·॥१॥ २४७

(496) Some Hetkaris were sent for assistance at fort Karnāḷā A. D. 1780-81. owing to the disturbance of the English.

एकूण दोनशें सत्तेचाळीस असामी पैकीं ऐन असामी दोनशें बेचाळीस व पोर्गे पांच, यास दरमहा अडिसेरी सवापंधरा खंडी अदमण दीड पायली भात केली देविलें असे, तरी सनद पैवस्तगिरीपासून दरमहाचे दरमहा हजिरी घेऊन हजिरीप्रमाणें अडिसेरी किल्ले मजकूर पैकीं देत जाणें ह्मणोन, अनंदराम(व) राम याचे किलेमजकूरचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

## दादासाहेबांच्या कीर्दीपैकीं.

४९७–( ७०५ ) उत्राजी नरसी व सदाशिव महादेव यांचे नांवें सनद कीं, जकात नाकें मौजे कुंभारी परगणा चवऱ्यासी, येथील अमल पेशजीं इंग्रजाकडे होता, तो हल्लीं सरकारांत घेऊन तेथील कमावीस तुह्मांस सांगितली असे, तरी इमानें इतबारें वर्तोन कच्चा हिशेब हुजूर पाठवणें ह्मणोन, मशारनिल्हेचे नांवें.

इसन्ने समानीन मया व अलफ रजब १९

सनद १.

४९८–( ६९७ ) पर्वतसिंग दलपतराव संस्थान पेंठ हे तुह्मांकडे किल्ले कोहज येथें चाकरीस पाठविले आहेत. त्याविशीं. कलमें.

इसन्ने समानीन मया व अलफ जमादिलाखर १२

मशारनिल्हे इंग्रजाकडील कोळी फोडून आणून वगैरे कोळ्यांचा जमाव करून इंग्रजाचे कवजांतील मुलुक मारून सरकार चाकरी करून दाखवणार, त्यास तुमचे रजातलबेंत वर्तणूक करून, कोळ्याचा जमाव करितील, त्याची चौकशीनें हजिरी ठाव ठिकाणदार घेऊन तपशीलवार जाबता लिहून हुजूर पाठवणें. कलम १.

मशारनिल्हे खासा सुद्धां पांच असामीनिशीं तेथें चाकरीस येतील त्यास सनद पेवस्तगिरीपासून किल्ले मजकूरचे शिरस्तेप्रमाणें अडसरी देत जाणें. कलम १.

---

## FROM DÂDÂSAHEB'S DIARY.

( 497 ) Utráji Narasi and Sadáshiv Mahádeo were appointed to take charge of the Kamávis of the Octroi Náká of Kumbhári which was taken from the English.

A. D. 1781-82.

( 498 ) Parwatsing Dalpatrao, Sansthánik of Peint, offered to win over the Kolis in the service of the English and with their assistance to lay waste the territory in the possession of the English. He with his 4 attendants was sent to the officer of the fort Kohaj, and the officer was directed to send a detailed list of the Kolis who might be got together by Parwatsing.

A. D. 1781-82.

एकूण दोन कलमें करार करून हे सनद सादर केली असे, तरी सदरीलप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन, आबाजी यादव याचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

४९९–( ६९९ ) लोक दिंमत हाय तुह्मांकडे इंग्रजाकडील बंदोबस्तास पाठविले आहेत.

असामी.

इसन्ने समानीन मया व अलफ जमादिलाखर २३

२२२ लोक दिंमत हुजूर हशम निसबत अण्णाजीराव बोकसे.
३५ दिंमत कृष्णाजी राणे.
१७ दिंमत लक्ष्मण नाईक जाधव.

---

२७४

एकूण दोनशें चवऱ्याहत्तर असामी पाठविले आहेत, त्यांचा नांवनिसीवार जाबता अलाहिदा आहे, त्याप्रमाणें हजिरी घेऊन चाकरी घेणें ह्मणोन, दुर्गोजी शिंदे नामजाद किल्ले माहुली याचे नांवें. सनद १.

रसानगी याद.

५००–( ७०९ ) भिकाजी गोविंद किल्ले विसापूर यांस सनद कीं, इंग्रजाकडील उद्धव ब्राह्मण मालवी, व सेख अबदल्ला खिजमतगार एकूण दोन असामी, हरी बल्लाळ यांणीं स्वारींतून साल गुदस्तां किल्ले मजकूर येथें अटकेस ठेवावयास पाठविले आहेत, त्यांस सोडून देणें; व तुळाजी आंगरे याची बायको किल्ले मजकुरीं अटकेस आहे, तीस पक्का जामीन निशेचा घेऊन किल्ल्याखालीं उतरून हुजूर पुणियास पाठऊन देणें; व जामीनकतबाही पाठवणें ह्मणोन. सनद १.

इसन्ने समानीन मया व अलफ साबान १२

रसानगी यादी.

५०१–( ७१२ ) मुंबईची बंदी जाली असतां हरएक जागाहून माल साहुकार मुंबईस नेतात; व तेथून आणितात, त्याचे बंदोबस्ताचें वगैरे कामकाज बाबूराव साळोखे, व हरजी नाईक पाटील यास सांगितलें आहे, सबब यांजकडे गलबतें सुमार.

इसन्ने समानीन मया व अलफ साबान १८

---

( 499 ) 274 men were sent to fort Máhuli for assistance against the English.
A. D. 1781-82.

( 500 ) Udhav, a Máḷwi Brahmin, and Shek Abdullá khismatgár, both in the employ of the English who were prisoners at fort Visápur, were ordered to be set at liberty.
A. D. 1781-82.

( 501 ) Báburao Sáḷokhe was deputed to prevent traders from carrying merchandise to and from Bombay and some ships were placed at his disposal for this purpose.
A. D. 1781-82.

६ आरमारी गलबतें स्वारीचे उपयोगीं चांगलीं.
४ महागिऱ्या सिले पोस.

----
१०

एकूण दहा गलबतें देविलीं असेत, तरी आरमारी गलबतांवर नेमणुकेप्रमाणें शिपाई लोक व दर्यावर्दी व लडवाई सामान दारूगोळा वगैरे, याप्रमाणें भरती करून देऊन भाद्रपदे पौर्णिमे आलीकडे सदरील लिहिलेप्रमाणें गलबतें यांचे हवालीं करणें; लोकांनीं यांचे रजातलबेंत राहून चाकरी करावी. याप्रमाणें ताकीद करणें. लोकांस व दर्यावर्दी यांस रोजमरा व अडशेरी नेमणुकेप्रमाणें वरचेवर देत जाणें. हे गलबतें पाडाव करून तालुके मजकूरचे बंदरीं आणितील, त्याजवरील माल सरकारचे कारकून बाजी धोंडदेव याजबद्दल दिल्हे आहेत, त्याचे गुजारतीनें घेऊन जाब देणें. याचा पुस्तपन्हा हरएकविशीं करीत जाणें. तालुके मजकूरचे हरएक बंदरीं हे गलबतें सुद्धां येऊन पाणीलाकूड घेतील त्यास घेऊं देणें. दिक्कत न करणें ह्मणोन.

सनदा.

१ तालुके अंजणवेल निसबत त्रिंबक कृष्ण याजकडून गलबतें. सुमार.

३ आरमारी.
२ महागिऱ्या.

----
५

पांच गलबतें देविलीं त्याविशीं.

१ तालुके रत्नागिरी निसबत महिपतराव कृष्ण याजकडून गलबतें. सुमार.

३ आरमारी.
२ महागिऱ्या.

----
५

पांच गलबतें देविलीं त्याविशीं.

----
२

दोन सनदा दिल्या असेत. रसानगी याद.

५०२–( ७१७ ) दिनकर बाबूराव फडणीस परगणे शहाडोरा यांणीं गुदस्तां इंग्रजापासून परगणे मजकूरचें ठाणें घेतलें, त्या बाबत शिबंदीखर्च कार्याकारण वाजवी जाला असेल, तो नारो शिवदेव यांचे विद्यमानें तुह्मीं देऊन ठाणें हवालीं करून घ्यावें, येविशीं पेशजीं नारो शिवदेव यांस

इसन्ने समानीन मया व अलफ रमजान १९

( 502 ) Dinkar Báburao Faḍnis of Pargaṇá Shahádorá recovered the Parganá from the English in the preceding year.

A. D. 1781-82.

पत्र सादर जालें, त्यास तुह्मीं महादजी शिंदे याजकडे साल मजकूरची रसद देऊन कमावीस केलीत, कमाविसीवर तुह्मांकडून लक्ष्मण भिकाजी गेले, त्यांणीं याचा सदरील शिबंदीखर्चाचा ऐवज आपण देऊं म्हणून हवाला घेतला असतां ठाणियांत गेल्यावर, तुमचा ऐवज कांहीं आह्मांकडे नाहीं, असें ह्मणों लागले, व शिंदे याचें पत्र शिबंदीखर्च ज्याचा त्यांणीं समजोन घ्यावा, याप्रमाणें घेतलेंत; व सावकारापासून यांणीं कर्ज घेतलें त्यास व इंग्रजापासून ठाणें घेतलें तेव्हां ठाण्यांत जकीरा नव्हता, सबब जमीदार व रयेत यांजपासून गल्ला वगैरे सामान ठाण्यांत घेऊन बंदोबस्त केला, त्यास सांगोन दिनकर बाबूराव यांस मनस्वी निकड करवितां ह्मणोन हुजूर विदित जालें. ऐशास हें कार्याचें नसे. हल्लीं हें पत्र सादर केलें असे, तरी दिनकर बाबूराव यांस शिबंदीखर्च कार्याकारण वाजबी जाला असेल तो ऐवज व जमीदार व रयेतेपासून ठाण्यांत जकीऱ्याबद्दल जिन्नस घेतला आहे, त्या ऐवजाची व सालगुदस्ताची बाकी यांचे कारकीर्दीची राहिली असेल त्याची रुजुवात करून घेऊन, ऐवजाचा फडशा करून देवणें, सदरहू ऐवजाचा फडशा होय तोंपर्यंत मशारनिल्हेस सावकार व जमीदार वगैरे यांचा उपसर्ग लागों न देणें; व मशारनिल्हेस हुजूर यावयाची आज्ञा केली असे, तरी फडणिसीचे कामावर कारकून ठेऊन चीजबस्त सुद्धां येतील त्यास अडथळा न करणें ह्मणोन, रंगो गोविंद यांस चिटणिसी. पत्र १.

५०३–( ७२१ ) इंग्रजाकडील चाकर काहार भोई तीन, व मोतीराम वाणी गांडापूरकर कल्याणास व मुंबईस जाऊन येऊन उदीम करीत होता, ऐसे चार असामी बोरघाट तळघाट येथें चौकीवर सांपडले ह्मणोन लिहिलेंत व त्याजवळ वस्तभाव व रोख ऐवज सांपडला, त्याची याद चारशें चौऱ्यासी रुपयांची लिहून पाठविलीत ते पावली. सदरील चार असामींस हुजूर रवाना करावें, किंवा सोडून द्यावें ह्मणोन लिहिलेंत. त्यास पुन्हां इंग्रजाकडे जाऊं नये अशी जरब देऊन सोडून देणें; आणि त्याजवळ वस्तभाव सुद्धां चारशें चौऱ्यासी रुपयांचा ऐवज सांपडला, तो तुह्मीं तालुके कावनई येथील हिशेबीं जमा धरणें ह्मणोन, गोपाळ बल्लाळ तालुके मजकूर यांचे नांवें. सनद १.

इसन्ने समानीन मया व अलफ सवाल ५

परवानगी रूबरू.

---

( 503 ) 3 Bhois (carriers) in the service of the English and Motirám Wani were found trading with Bombay. They were arrested at the chouki at Borghát Talghát. The property found with them worth Rs. 484 was confiscated and they were set at liberty with a strict warning not to go to the English again.

A. D. 1781-82.

५०४–( ७२२ ) मदनराव येरूणकर हे तुह्मांजवळ किल्ले कोहाज येथें चाकरीस आहेत त्यास त्यांणीं स्वारी करून इंग्रजाचे लोकांशीं लढाई चांगली केली, व पुढेंही चाकरी करून दाखविणार, सबब मशारनिल्हे यांस सालमजकुरापासून पालखी सरकारांतून करार करून दिल्ही त्याविशीं.

इसन्ने समानीन मया व अलफ सवाल ६

कलमें.

पालखीची तैनात सालीना रुपये ५०० एकूण पांचशें रुपये खेरीज शिरस्ता, छ. १५ रमजानापासून करार केले असेत, तरी सदरहूप्रमाणें तैनात पाववीत जाणें.

कलम १.

पालखीचे सामानाबद्दल रुपये १०० एकूण शंभर रुपये देविले असेत, तरी देणें. कलम १.

एकूण दोन कलमें करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदरील प्रमाणें मामले कोहाजपैकीं देणें ह्मणोन, आबाजी यादव याचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

५०५–( ७२६ ) त्रिंबक कृष्ण मामलेदार तालुके अंजणवेल यांस सनद कीं, तालुके मजकूर येथें बंदरकिनारा इंग्रजाची वगैरे गडबड आहे, त्याचे बंदोबस्तास जदीद शंभर लोक ठेवावयाची आज्ञा केली पाहिजे, ह्मणोन तुह्मीं हुजूर विनंति केली; त्याजवरून तालुके मजकूरचे अजमासाखेरीज जदीद लोक असामी १०० शंभर चांगले बरखंदाज मर्द इतबारी देशचे व कोंकणचे मिळोन ठेवावयाचा करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदरीलप्रमाणें शंभर लोक तालुके मजकूरचे शिरस्तेप्रमाणें तैनाता करून जामीन घेऊन ठेवणें; आणि बंदोबस्त चांगला करणें. गडबड वारल्यावर लोक दूर करणें ह्मणोन. सनद १.

इसन्ने समानीन मया व अलफ जिल्काद ५

रसानगी यादी.

५०६–( ७३० ) इंग्रजाचे तारूतरांडे धरावयास, व त्याच्या मुलकांत धामधूम क-

---

( 504 ) Madanrao Yerunker of fort Koháj gave the English a good battle. A palanquin पालखी with an allowance of Rs. 500 per annum for its expenses was therefore given to him.

A. D. 1781-82.

( 505 ) There being a disturbance of the English on the sea-side of Táluká Anjanwel, 100 additional men were permitted to be entertained.

A. D. 1781-82.

( 506 ) Trimbak Suryáji was entrusted with the work of capturing

इसन्ने समानीन मया व अलफ जिल्काद २६ — रावयास त्रिंबक सूर्याजी यास आज्ञा केली आहे, तरी यांचे तर्फेनें रायाजी नाईक बोरकर, व गणोजी नाईक भाटकर, व विठोजी नाईक पनळेकर, व गोविंदराम यांस रवाना केले असेत. इंग्रजाचे तारूतरांडे धरितील, व दाणागल्ला मुंबईस जाईल, त्याचा बंदोबस्त करितील. त्यास तुह्मी मुजाहिम न होणें; व इंग्रजाचे मुलकांतील कमाविसीच्या आसाम्या दस्त करून आणितील, त्यांस तुह्मीं अटकेस ठेवणें, त्यांस अडशेरी वगैरे खर्च पडेल तो मशारनिल्हे देत जातील; अटकेंतील कुळाची खंडणी हे करून ज्यास सोडावयास सांगतील त्याप्रमाणें सोडीत जाणें ह्मणोन चिटणिसी. पत्रें.

१ तालुके विजयदुर्ग निसबत गंगाधर गोविंद.

१ तालुके देवगड निसबत चिमणाजी रामचंद्र याचे नांवें पत्र कीं, इंग्रजाकडील आसाम्या आणितील त्यांस किल्ले भगवंतगड येथें ठेवणें. हे आचरे याचे बंदरीं राहतील त्यास राहूं देणें ह्मणोन. पत्र.

१ तालुके रतनागिरी निसबत महिपतराव कृष्ण यास.

———

३

एकूण तीन पत्रें दिल्हीं असेत.

५०७–( ७३२ ) किल्ले अर्जुनगड, व इंद्रगड, तालुके वसई येथें सरकारचीं ठाणीं होतीं, त्यास सालगुदस्तां इंग्रजानें किल्ले घेऊन आपला अमल बसऊन तुह्मांस किल्यावर ठेविलें आहे, त्यास तुमचें मानस किल्ले सरकारचे सरकारांत द्यावे, येविशींचा मजकूर गोपाळ त्रिंबक यांणीं हुजूर समजाविला; त्याजवरून तुमचें निखालसतेचें बोलणें सरकारांत कळलें, सबब हें अभय पत्र सादर केलें असे, तरी किल्यावर शिलकी गल्ला, व जकीरा, व तोफा वगैरे सर जाला असेल, तो सरकारचे कारकून व लोक व सरदार किल्यावर चढतील त्यांजवळ मोजदाद करून देऊन ठाणीं हवालीं करणें; आणि तुह्मी आपली खासगत वस्तभाव हत्यारें सुद्धां

इसन्ने समानीन मया व अलफ जिल्हेज ९

---

A. D. 1781-82. — English vessels and creating a disturbance in their province; and Ráyáji Naik Borkar, Ganoji Naik Bhátkar and Vithoji Naik Panaḷeker and Govindrám were deputed by him for the purpose.

( 507 ) Fort Arjungaḍ and Indragaḍ in Tarf Bassein were taken by the English in the preceding year, and officers were appointed by them. The officers intimated through Gopál Trimbak their desire to surrender the forts to Government. They were informed that if they surrendered the forts to-

A. D. 1781-82.

किल्याखालीं उतरून घरीं सुखरूप जाणें. अभय असे. तुह्मांस सरकारांत चाकर राहावयाचें असल्यास हुजूर येणें. चाकरीस ठेविलें जातील, कोणे गोष्टीचा वसवसा न धरणें ह्मणोन, समस्त सरदार व लोक किल्ले मजकूर यांचे नांवें अभय. पत्र १.

रसानगी यादी.

५०८–( ७३७ ) अर्जोजीराव ढमाले हवालदार, व कारकून, किल्ले घनगड याचे नांवें सनद कीं, तांबा इंग्रज याजकडे अन्याय लागला, सबब किल्ले मजकूर येथें अटकेस ठेवावयास पाठविला असे, तरी पक्के बंदोबस्तानें अटकेस ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें ह्मणोन. सनद १.

इसन्ने समानीन मया व अलफ सफर १

रसानगी, राघो विश्वनाथ गडबोले, कारकून शिलेदार.

येविशीं फिरोन बोभाट येऊं न देणें ह्मणोन, छ. ३ जमादिलाखर रामचंद्र कृष्ण याचे नांवें चिटणिसी.

पत्र १.

५५८–( ८० ) संस्थान नरगुंद पेशजीं योगीराव राम तुह्मांकडे, व भास्करराव दादाजी यांजकडे होतें, त्यास भास्करराव दादाजी सालगुदस्त मृत्यु पावले, सबब तुह्मां उभयतांकडे संस्थान मजकूर, देखील किल्ले व ठाणीं सुद्धां पूर्ववत्प्रमाणें सालगुदस्तां बहाल करून देऊन, कलमें करार केलीं, त्याप्रमाणें हल्लीं करार करून दिल्हीं, कलमें;

खमस सबैन मया व अलफ जमादिलाखर २९

बीतपशील.

नजर एक साला ४,५०,००१ रुपये एकूण चार लक्ष पन्नास हजार एक रुपया नक्त ध्यावयाचा करार केला असे, तरी गुदस्ताचे कराराप्रमाणें भरणा करून पावलियाचा जाब घेणें. कलम १.

बलवंतराव याची रदबदली ऐकूं नये ह्मणोन तुह्मीं विनंति केली, त्यास संस्थान पैकीं बलवंतराव याजकडे बारा हजार रुपये याचे गांव चालतात. त्याप्रमाणें चालवणें, याशिवाय त्यांणीं रदबदल केल्यास ऐकणार नाहीं, जाजती उपसर्ग त्यांस व त्यांजकडील माणसांस न करणें पेशजींप्रमाणें वर्तणूक करणें. कलम १.

किल्ले नरगुंद येथील आह्मी हवालदार ठेविला होता. तो तिगस्तां मृत्यु पावला, त्या पोटीं संतान नाहीं, किल्याचा एकतियार आह्मांकडेच आहे, त्याचे मालमवेशीचे वगैरे कोणीही सरकारांत समजावतील, तर ऐकूं नये, ह्मणोन तुह्मीं विनंति केली, त्यास नजरेचा ऐवज तुह्मांकडे मातबर करार केला, त्यांत हवालदाराचा देखील जाबसाल उगवला, याजउपरी कोणी हवालदाराचा मजकूर सरकारांत समजाविल्यास ऐकणार नाहीं. तुह्मी त्याचे माणसांस उपद्रव करूं नये. कलम १.

नजरेचा ऐवज तुह्मांकडे भारी करार

---

(558) The Sansthán of Nargund was in the possession of Yogirao Rám and Bháskarrao Dádáji. Bháskarrao having died in the preceding year, an agreement was entered into with Government as follows:—

A. D. 1774-75.

1 The Sansthán should be continued to Bháskarao. [ Son Venkatrao ] and Yadavrao Rám.

1 A nazar of Rs. 4,50,001 should be paid.

1 The appointment of Havaldar of the fort should be made by the holder of the Sansthán.

1 Villages worth Rs. 12,000 should be continued to Balwantrao. No further intercession would be made on his behalf.

1 Sowars should be furnished for service by the holder of the Sansthán from the year A. D. 1775-76.

हल्लीं तुमचा करार करून दिला आहे, त्याप्रमाणें निभाविलें जाईल, तुमचे घालमेलीविशीं कोणीं रदबदली केली तरी न ऐकतां तुमचें तुह्मांकडे कराराप्रमाणें चालविलें जाईल. तुह्मीं कोणेविशीं संशय न धरतां सरकारांत एकनिष्ठतेनें असणें. कलम १.

केला, सबब संस्थान मजकूरचे स्वार सालाबाद चाकरी करतात, त्यांची चाकरी सालगुदस्तांची, व सालमजकूरची, सन खमसची माफ केली असे, व तिगस्तां सलासांत चाकरी स्वारांची जाहली नाहीं, त्यास नजरेचा ऐवज तुह्मांकडे करार जाहला, त्यांत तिगस्ताचे चाकरीचा ऐवज आला असेल, पुढें पेस्तर साल सन सीत सबैनापासून पेशजींचे कराराप्रमाणें स्वारांनिशीं चाकरी करीत जाणें. कलम १.

एकूण पांच कलमें सदरहूप्रमाणें करार करून दिलीं असत, तरी सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन, योगीराव रामराव, व व्यंकटराव भास्कर यांचे नांवें. छ. ११ जमादिलाखर.

सनद १.

रसानगी यादी.

५५९-( २७७ ) संस्थान पेठ येथील राज्यावर रामनगरकर कोळ्यांनीं चढाई करून संवस्थान त्याणें घेतलें, ह्मणोन पेठकर नासिकास पळोन येऊन आपली संस्थान मजकुरीं स्थापना करावी, त्यास खर्च लागेल त्या ऐवजीं संवस्थान मजकूरचे किल्ले वगैरे आहेत, ते गहाणवट देतों, व्याजसुद्धां ऐवज फिटेतोंपर्यंत घालमेल करणार नाहीं, येणेंप्रमाणें संस्थानिक ह्मणतो. ऐशास सदरीलचा बंदोबस्त सरकारांतून करावयाचा असल्यास करावा, अगर आह्मांस आज्ञा जाली तरी आह्मी बंदोबस्ती करूं, आणि किल्ले वगैरे आमचे स्वाधीन जाल्यास सरकारांत मागूं नये. येविशींचें अभय असावें, ह्मणोन तुह्मीं बाळाजी माणकेश्वर यांस लिहिलें, त्यावरून मशारनिल्हे यांणीं सरकारांत विनंति केली, त्यास तुह्मीं आपल्याकडील स्वार व प्यादे पाठवून पेठकराची कुमक करून त्यांच्या संस्थानचा बंदोबस्त करून देणें. स्वार व प्यादे यांस शिबंदी खर्च होईल तो पेठकरांनीं तुह्मांस द्यावा. तूर्त ऐवज थांस द्यावयासी नाहीं. याकरितां पेठकर संवस्थान मजकूरपैकीं किल्ले व मुलुख गहाण तुम्हांस लेहून देतील. तो घेऊन, हस्त-

सीत सबैन मया व अलफ सफर २

( 559 ) The Kolis of Rámnagar attacked and took the Sansthán of Peth, and compelled the Rájá to fly to Násik. He applied to Raghupatrao Náráyaṇ Ráje Bahádar for aid; and promised, as he had no money, to pledge with him his forts &c. till the expenses of the expedition were paid. Permission was given to Ráje Bahádar to accept the arrangement.

A. D. 1775-76.

गत करून बंदोबस्त करणें. तुमचा ऐवज व्याजसुद्धां फिटे तों सरकारांतून घालमेल होणार नाहीं ह्मणोन, रघुपतराव नारायण राजे बहाद्दर यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

५६०-( ३२६ ) राजे भारतशाहा हटियाराय संस्थान कालीभींत ममडाई यांचे नांवें सनद कीं, तुह्मांकडे दहकाचा ऐवज, व पाटील कुळकर्णी यांचे हक्काचा ऐवज एकसाल सरकारांत घ्यावयाचा करार करून वसुलाची आज्ञा नारो बल्लाळ कमाविसदार सरकार हांडे यास केली असे, तरी दहलापट्टीचा पाटीलकुळकर्णीसुद्धां ऐवज ठरावाप्रमाणें रुपये २५०० अडीच हजार येणें, त्याचा भरणा मशारनिल्हेकडे करून पावलियाचें कबज घेणें ह्मणोन. सनद १.

सबा सबैन मया व अलफ साबान ७

परवानगी रूबरू.

## जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

५६१-( ४५६ ) गुमानसिंग संस्थान मांडवी यांचे नांवें सनद कीं, भगवंतसिंग बिन दुर्जनसिंग याजकडे संस्थानचा अधिकार होता, त्यास ते मृत्यु पावले, सबब दुर्जनसिंग यांची स्त्री रतनकुवर यांणीं तुह्मांस दत्तपुत्र घेतलें येविशीं सरकारचें अभय असावें, ह्मणोन तुह्मांकडील भाईदास बिन किशोरदास यांणीं हुजूर विनंति केली, त्यावरून संस्थानावर नजर देऊन, तुह्मांवर कृपाळु होऊन, संस्थानचा अधिकार तुमचे नांवें करार करून दिल्हा असे, तरी तुह्मीं सरकारांत रुजू राहून, संस्थानचा बंदोवस्त करून, सेवा एकनिष्ठेनें करीत जाणें, अभय असे ह्मणोन. छ २० रबिलाखर—यादी पुरंधर. सनद १.

सबा सबैन मया व अलफ रबिलाखर २६

५६२-( ४६१ ) जमा जामदारखाना.

कमाविस भेटबद्दल फैज महमदखान रोहिले, संस्थान भूपाल यांजकडून हरदयाळ वकील वस्त्रें घेऊन आले, तीं गुजारत जानोजी जांबळा खिजमतगार, सनगें एकूण किंमत. रुपये.

समान सबैन मया व अलफ जमादिलावल २

---

( 560 ) Ráje Bhárat Sháhá Hatiyáráy of Sansthán Kálibhint Mamdai was informed that a levy of Rs. 2500 on account of Dahak and the Haks of Patils and Kulkarnis was imposed on him and that he should pay the amount to Náro Ballál Kumávisdár of Sirkár Hánde.

A. D. 1776-77.

( 561 ) After the death of Bhagwantsing bin Durjansing, Rájá of Sansthán Mándwi, Durjansing's widow Ratankuwar adopted Gumánsing as her son. On the representation of Gumánsing's agent the continuance of the Sansthán to him was guaranteed. A nazar of Rs. 30,000 was imposed.

A. D. 1776-77.

( 562 ) A present consisting of clothes worth Rs. 819 was received from Faiz Mahomedkhán Rohile of Sansthán Bhopál.

A. D. 1777-78.

| | | |
|---|---|---|
| ५५५ राजश्री राव यांस सनगें एकूण | | रुपये. |
| | ५५ चिरा बादली | १ |
| | २५० जामेवार जरीबादली | २ दर १२५ प्रमाणें. |
| | १५० शालफर्द | २ दर ७५ प्रमाणें. |
| | १०० किमखाप | १ |
| | ५५५ | ६ |
| २६४ मातुश्री गंगाबाई यांस. | | |
| | १५० पातळ जरीबादली | १ एकूण. |
| | १४ खण जरीबादली | १ एकूण. |
| | १०० किमखाप | १ एकूण. |
| | २६४ | |
| ८१९ | | ९ |

५६३–( ४९१ ) संस्थान वासदें येथील उदेसिंग संस्थानिक मृत्यु पावला, त्याचे पोटीं संतान नाहीं, सबब त्याचे स्त्रीनें वीरसिंग यास दत्तपुत्र घेतलें, त्याप्रमाणें सरकारांतून करार करून येविशीं. सनदा.

समान सबैन मया व अलफ साबान १६

१ गणेश विश्वनाथ यास कीं, संस्थान वीरसिंग याचे स्वाधीन करणें, ह्मणोन पेशजीं राजाराम खंडेराव याजबरोबर पत्र तुह्मांस सादर केलें आहे, त्याप्रमाणें वीरसिंगाची स्थापना करणें. राजाराम खंडेराव याचे विद्यमानें भगवान दयाळजीस दिवाणगिरी सांगोन, नजरेचा ऐवज ठराऊन, सालाबादचा संस्थान मजकूर येथील चौथाईचा ऐवज यावयाचा, त्याचा पक्का बंदोबस्त करून घेणें. सालमजकूर वसूल तुह्मांकडे पडला असेल, तो महाल मजकूर वजा करून, चौथाईत मजुरा देऊन बाकी राहील तो व नजरेचा ऐवज वसूल घेणें ह्मणोन.

---

( 563 ) Udesing of Sansthán Wásade ( Bansda ) died childless. His widow adopted Virsing. The adoption was recognised by Government and Gaṇesh Vishvanáth was directed to instal Virsing on the throne, to hand over the territory to him, and to appoint Bhagwán Dayálji as his Dewán,

A. D. 1777-78.

१ वीरसिंग याचे नांवें कीं, तुह्मीं संस्थानचा बंदोबस्त करून, सरकारचा सालाबादचा ऐवज देत जाऊन सुखरूप राहणें, ह्मणोन.

---

२

दोन पत्रें.

रसानगी यादी.

५६४-( ४९४ ) बाळाजी गोविंद यास सनद कीं, हिंदूपंत बुंदेले यांचे पुत्र राजे सरजेतसिंग यांच्या राज्याचे बंदोबस्तास सरकारांतून गणेश संभाजी यांस पाठविले आहेत, यांस राहावयास ठिकाण पाहिजे, सबब प्रांत बुंदेलखंडपैकीं मोहाब श्रीनगर तपेसुद्धां याजकडे देविले असेत, तरी मशारनिल्हेचे हवाला करून कबज घेणें. सरजेतसिंग यांचे राज्याचा बंदोबस्त जाला ह्मणजे ठाणें तुमचे हवाला केलें जाईल. या महालची रसद सालमजकुरीं तुह्मीं घेतली असल्यास त्यांत तुह्मांकडील कमाविसदाराकडे वसूल पडला असेल, त्याची रुजुवात मशारनिल्हेचे नांवें गुजारतीनें करून, वसुलांत शिबंदी हिसेरसीद वजा घालून, बाकी ऐवज राहील, तो रसीदेंत वजा करणें; आणि सदरील महालचे जमाबंदीपैकीं बाकी ऐवज राहील, तो मशारनिल्हे वसूल करून तुह्मांकडील कमाविसदाराकडे देतील ह्मणोन. सनद १.

समान सबैन मया व अलफ रमजान ४

रसानगी यादी.

५६५-( ५३८ ) विठ्ठलराम याचे नांवें सनद कीं, तुह्मांस संस्थान सुरापूर येथील मसलत सांगितली येविशीं

समान सबैन मया व अलफ सफर २६

कलमें.

सुरापूर तालुक्यांत फौज घेऊन लौकर जावें. फौज गेल्यावर संस्थानचा वकील खंडणीस हुजूर येईल, त्यास खंडणीचा जाबसाल सालाबादप्रमाणें तुमचे विद्यमानें होईल, जाजती ऐवज साधल्यास तुह्मांस फौजेचे खर्चास देविला जाईल येणेंप्रमाणें. कलम १.

सरकारचे तालुक्यास व नवाबाकडील तालुक्यास उपद्रव लागों नये, बोभाट येऊं नये. येणेंप्रमाणें. कलम १.

सुरापूरचे तालुक्यांत जाऊन बंदोबस्त करणें, या कामास शिबंदी खर्च होईल तो सरकारचा तालुका, व नवाबाकडील तालुका खेरीज करून सुरापूरवाल्याचे तालुक्यांत ऐवज साधून घेणें. येणेंप्रमाणें. कलम १.

---

(564) Ganesh Sambhāji was sent to manage the kingdom of Sarjetsing, son of Hindupant Bundele.

A. D. 1777-78.

(565) Vithal Rám was ordered to proceed immediately with an army to Surápoor. This, it was expected, would lead the head of the Sansthán to send an agent to Poona to make an offer of tribute. Vithal Rám was informed that in

A. D. 1777-78.

एकूण तीन कलमें करार केलीं असत, सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन. सनद १.
रसानगी याद, छ. १९ जिल्काद—पुरंधर.

५६६–( ५६८ ) कमाविस नजर बद्दल सरजेतसिंग राजे बुंदेले हिंदूपत यांचे पुत्र,

तिसा सबैन मया व अलफ जमादिलावल २९

हिंदूपत राजे मृत्यू पावले, सबब त्यांचे वडील पुत्रास संस्थानावर स्थापना करावी, ऐसा करार करून त्याजकडे सरकारचे नजरेचा ऐवज गणेश संभाजी याचे विद्यमानें घ्यावयाचा करार केला, त्यापैकीं अबाजी नाईक वानवळे साहुकार यांणीं हवाला घेतला आहे, त्यापैकीं कापड रोकडीचे खरेदीनें घ्यावयाचें त्यापैकीं जमा, गुजारत अबाजी वानवळे. रुपये.

| | | | |
|---|---|---|---|
| २८८३॥= | तिवटें साधीं. | | |
| | २७५६।= पैठणी | २०० | |
| | १२७। धुवट जैनाबादी | १४ | |
| | २८८३॥= | | २१४ |
| ५०९५॥।- | जाफरखानी. | | |
| | ५०१८४- पैठणी | १३१ | |
| | ७७॥ जैनाबादी धुवट | २ | |
| | ५०९५॥।- | | १३३ |
| ३९५५। | पासोड्या | | ४२ |
| २९५४४= | गजन्या | | १७९। |
| २३५॥ | शेले साधे. | | |
| | ३१॥ चंदेरी | | १ |
| | २०४४- जैनाबादी धुवट | | ६ |
| | २३५॥- | | ७ |

that case the amount of the tribute would be fixed through him. He was directed to abstain from molesting the territories of Government and of the Nizám, and to levy the expenses of the army from the villages of the Sansthán.

( 566 ) Hindupant, Rájá of Bundele, having died, orders were issued to establish on the throne his son Surjetsing Ráje and to levy the Nazar imposed.

A. D. 1778-79.

| | | |
|---|---|---|
| ३१८ | ताफ्ते कद | २२ |
| १८५॥। | सुशा | ३० |
| ८८॥। | किमखाप | १ |
| १९३७।- | तिवट, छिटी बऱ्हाणपुरी | ३४ |
| ४९८≡ | दुपटे छिटी बऱ्हाणपुरी | ५ |
| १०३ | तिवटें चुनडी | ३ |
| ११६५।= | जामेवार छिटी बऱ्हाणपुरी | २५॥ |
| १५२८≡ | पातळें छिटी बऱ्हाणपुरी | ४ |
| २३ | खाद्या पासोड्या | २३ दर १ |
| २११०६॥=(१९१४६॥।=) | | ८२९॥। (७२२॥।) |

५६७–( ५७० ) सोमदेव राणा संस्थान रामनगर यांचे नांवें सनद कीं, नारायण देव राणा पेशजीं संस्थान मजकुरीं अधिकारी होते, ते मृत्यु पावले त्यांचे पोटीं संतान नाहीं, याजकरतां त्यांचे स्त्रीनें तुम्हांस दत्तपुत्र सन सबा सबैनांत गणेश विश्वनाथ याचे विद्यमानें घेऊन सरकारची नजर रुपये १५००० पंधरा हजार मशारनिल्हे यांणीं तुम्हांकडे करार केली, त्याप्रमाणें सरकारांतून करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी तुम्हीं संस्थान मजकूर येथील अधिकार करून सुखरूप राहणें. सदरहू नजरेचे ऐवजापैकीं बाकी राहिली असेल त्याचा वसूल गणेश विश्वनाथ याजकडे देणें; आणि संस्थानाकडे सालाबाद सरकारचीं कलमें असतील त्यांचा फडशा हुजूर करीत जाणें म्हणोन, मशारनिल्हेचे नांवें. सनद १.

तिसा सबैन मया व अलफ जमादिलाखर १२

रसानगी यादी.

## माधवराव रामचंद्र यांच्या कीर्दीपैकीं.

५६८–( ९९४ ) तालुके गंभीरगड सरकारांत हस्तगत जाहला, त्यास तालुके मजकूरच्या जकाती जोतपूर येथें सरकारचा अंमल अलिकडे चालत नाहीं, त्यास सुदामत जकातीचा अंमल चालत आला, त्याप्रमाणें कृष्णाजी महादेव याजकडे चालवणें म्हणोन, सोमदेव राणा संस्थान रामनगर

इहिदे समानीन मया व अलफ जमादिलाखर

(567) Náráyaṇdev, Ráṇá of Sansthán Rámnagar, died without issue. His widow therefore adopted, with the consent of Gaṇesh Vishwanáth, Somdeva Ráṇá as her son in Sabá Sabain, and agreed to pay a nazar of Rs. 15,000. The adoption was ratified by Government, and Somdeva Râṇá was allowed to succeed to the throne of his adoptive father.

A. D. 1778-79.

(568) Somdeo Ráṇá of Sansthán Rámnagar was asked to continue to Krishṇáji Náráyaṇ the right to levy octroi in Táluká Gambhirgaḍ which had fallen into the hands of Government.

A. D. 1780-81.

याचे नांवें चिटणिसी. पत्र १. छ. ६ जमादिलाखर.

५६९–( ७४८ ) महादजी शिंदे याचे नांवें पत्र कीं, संस्थान करोली मंडरायेल येथील राजा माणिकपाल याजकडे संस्थानचा अंमल सरकारचा येणें, त्याचा फडशा सन सबैन पावेतों विसाजी कृष्ण, व रामचंद्र गणेश यांणीं स्वारींत करून, ऐवज ठराविला, त्यापैकीं कांहीं सरकारांत दिल्हा, बाकी ऐवज येणें, त्यावर वराता जाहल्या, त्यास वरातेप्रमाणें ऐवज पावता जाला नाहीं; व अलीकडील सन इहिदे सबैन तागाईत इसन्ने समानीन पावेतों अंमलाचा फडशा होणें; व सालमजकुरीं महिपतराव कृष्ण याजकडील कमाविसदार आनंदराव गोपाळ होते, त्यांचे कर्जाचा ऐवज राज्याकडे येणें तो सुरळीत वसूल देत नाहीं, ह्मणोन हुजूर विदित जालें, त्याजवरून हें पत्र लिहिलें असे, तरी तुह्मीं संस्थानास ताकीद करून, पेशजींच्या करा[रा]प्रमाणें ऐवज बाकी येणें, तो महिपतराव कृष्ण याजकडील कारकून सांगतील त्याजप्रमाणें ऐवज वसूल येई तें करून, महिपतराव कृष्ण याजकडील कमाविसदाराकडे देवणें. पुढें अंमल सुरळीत चालते करणें; आणि हुजूर लिहून पाठवणें; व आनंदराव गोपाळ याचें कर्ज संस्थानाकडे येणें आहे, त्याविशीं ताकीद करून आनंदराव याचे पुत्र गोपाळ आनंदराव याजकडे वसूल देत असें करणें ह्मणोन, चिटणिसी. पत्र १.

इसन्ने समानीन मया व अलफ रबिलाकर २२

५७०–( ५६३ ) मौजे ठाकेर तलावपैकीं नंदुरबार हा गांव तालुके कुकरमुंढे याजकडे आहे, तो पेस्तर साल सन सलास समानीनापासून राणा हिमतसिंग संस्थान आखराणी यांणी सरकार चाकरी एकनिष्ठपणें केली, सबब जातीस सरंजामास द्यावयाचा करार केला, त्यास मौजे मजकूर येथील तनखा.

इसन्ने समानीन मया व अलफ जमादिलावल २९

रुपये.

७२८॥ ऐन तनखा.
९१ सरदेशमुखी.

———

८१९॥

एकूण आठशें साडे एकोणवीस रुपये मशारनिल्हे यांचे नांवें ल्याहावयाचा करार करून, हे सनद तुह्मांस सादर केली असेत, तरी मौजे मजकूर हा गांव यांचे दुमाला करून देऊन

( 569 ) Rájá Máṇikpál of Sansthán Karoli Manḍaráyel having failed to pay the dues of Government, Mahádji Scindia was directed to arrange for their recovery.

A D. 1781-82.

( 570 ) Ráṇá Himatsingh of Sansthán Akraṇi, having rendered good assistance to Government, was given the village Ṭákertaláv in Parganá Nandurbár as personal Saranjám.

A. D. 1781-82.

सदरहू आठशें साडे एकुणीस रुपये तालुके मजकूरचे हिशेबीं यांचे नांवें खर्च लिहीत जाणें म्हणून, यादवराव रघुनाथ यांचे नांवें. सनद १.

येविशीं मोकदम, व जमीदार यांस कीं तुह्मीं मशारनिल्हेसीं रुजू होऊन मौजे मजकूर येथील अंमलाचा वसूल सुरळीत देत जाणें ह्मणोन, जमीदार नंदुरबार यांस चिटणिसी. पत्र २.

———

३

तीन सनदा व पत्रें दिल्हीं असेत.

रसानगी यादी.

५७१–( ७६० ) पर्वतसिंग दलपतराव संस्थान पेठ यांस, सालमजकुरीं सरकारांतून मामले कोहेज येथें चाकरीस पाठविलें होतें, त्यांस पर्वतसिंग मृत्यु पावले, सबब त्यांचे पुत्र हिंमतसिंग व भावसिंग उमेद धरून चाकरी करीत आहेत, याजकरितां उभयतांस तैनात करार करून देऊन रोजमरा द्यावयाची आज्ञा जाहली पाहिजे, ह्मणोन तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें, त्याजवरून हिंमतसिंग व भावसिंग यांस दरमहा तैनात रुपये १२० एकशें वीस रुपये करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी मामले मजकुरीं उभयतांपासून चाकरी घेऊन तैनातेप्रमाणें रोजमरा दरमहा देत जाणें ह्मणोन, आबाजी यादव याचे नांवें. सनद १.

इसन्ने समानीन मया व अलफ जमादिलाकर २०

रसानगी यादी.

५७२–( ७६१ ) संस्थान रामनगर, व संस्थान वासदें येथील अंमल सरकारांत आहे, त्याची कमावीस सालमजकुरीं धोंडो महादेव यांस सांगितली असे, तरी तुह्मीं मशारनिल्हेचे ऐकमतें चालोन संस्थान मजकूर येथील सरकार अंमल सुरळीत देणें ह्मणोन. सनदा.

इसन्ने समानीन मया व अलफ जमादिलाकर २१

१ सोमदेव राणा संस्थान रामनगर.
१ उदेसिंग संस्थान वासदें.

———

२

रसानगी यादी.

---

(571) Parvatsingh Dalpatrao of Sansthán Peth was sent in this year for service to fort Kohaj. He died. His sons Himatsingh and Bháwsingh were taken into service.

A. D. 1781-82.

(572) The Amal of Sansthláns Rámnager, Wásade, was under the management of Government. It was given in Kamávis to Dhondo Mahádeo. Somdeo Ráṇá of Sansthán Rámnager and Udesingh of Sansthán Wásade were requested to act in harmony with him and to pay him the Government Amal without objection.

A. D. 1781-82.

५७३–( ७७५ ) कमाविस भेट राजश्री राव यांसी चेतसिंग राजे काशीचे, यांजकडून नारायण निगेव्ये वस्त्रें घेऊन आले तीं गुजारत जानोजी जाबक खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

सल्लास समानीन मया व अलफ जिल्हेज २८

| | | |
|---|---|---|
| ३० | तिवट | १ |
| ७५ | जाफरखानी | १ |
| ३५ | शेले साधे, धुवट | २ |
| ८० | किमखाप | १ |
| २२० | | ५ |

५७४–( ८०० ) नवाब फत्ते अल्लीखान बहादर यांचे नांवें जाब कीं, तुह्मांकडे सन ११९५ हिजरी शके १७०३ प्लवनामसंवत्सरेचे पेषकसीचे ऐवजाचा ठराव केला त्याचा भरणा. रुपये.

सलास समानीन मया व अलफ रजब ३

१०,००,००० गुजारत नूरमहमदखान हस्ते अच्यापा नाईक, गुमस्ते दिंमत राघवेंद्र नाइक जखाते.

२,००,००० आनंदराव भिकाजी रास्ते याचे पथकास खर्चास देविले, त्याच्या वराता अलाहिदा दिल्या आहेत. रुपये.

५०,००० कित्ता वरात सन इहिदेंत पेस्तर सालचे खंडणीचे ऐवजीं दिल्ही आहे ते. रुपये.

१,५०,००० कित्ता वरात सन इसन्नेंत दिल्ही ते. रुपये.

२,००,०००

१२,००,०००

एकूण बारा लक्ष रुपये सदरहूप्रमाणें सरकारांत पोहोंचले असेत ह्मणोन. जाब १.

५७५–( ३५ ) बाळाजी महादेव लवाटे हे कोळीयांचे मलईत मिळोन, जवारकर राणीचे निसबतीस राहून, कल्याण प्रांतांत वगैरे जागा दंगा करीत होते, सबब मशारनिल्हेचे मुलांमाणसांस जामीन घेऊन कतबा तुह्मीं सुभा घेतला आहे, त्यास हल्लीं जवारकर राणी आनंदराव भिकाजी यांचे

अर्बा समानीन मया व अलफ रबिलाखर ५

( 573 ) Clothes worth Rs. 220 were received as a present from Chetsing, Rájá of Kâshi.
A. D. 1782-83.

( 574 ) Receipt was acknowledged of 12 lakhs of rupees received from Nabob Fate Alli Khán Bahádur as tribute for the year A. D. 1781-82.
A. D. 1782-83.

( 575 ) Báḷáji Mahádeo Lawâte joined the Koḷis, and living under

गुजारतीनें येऊन, सरकारांत रुजू जाली, त्याजबराबर बा(ळा)जी महादेवही रुजू जाहले, सबब मशारनिल्हेचा जामीनकतबा घेतला आहे तो, व वस्तभाव घेतली असेल ती, माघारे द्यावयाचा करार करून, हे सनद सादर केली असे, तरी जामीनकतबा घेतला आहे तो, व वस्तभाव घेतली असेल ती माघारी देणें ह्मणोन, आनंदराव धुळप यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

५७६–( ८३७ ) जमा जामदारखाना.

अर्बा समानीन मया व अलफ रबिलाखर २१ — कमाविस भेट राजश्री राव यांसी बाबत राजे रणसिंग संवस्थान नेपाळ, यांजकडे लज्या शंकर वकील हुजुरून पाठविले होते, त्यांजबरोबर राज्यांनीं मुसेजर पाठविले, ते गुजारत सिदोजी मान्या खिजमतगार सनंग १, एकूण किंमत रुपये ७५.

५७७–( ८४५ ) धोंडो महादेव यांचे नांवें सनद कीं, तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. संस्थान रामनगर येथील राजा सोमदेवराणा यास आषाढमासीं देवाज्ञा जाहली, त्याच्या सावत्र आया, व कारभारी यांणीं राजाच्या मुलांस विषप्रलय करावयाचा मनसबा केला होता. ऐसें सोमदेवचे राणीस कळल्यावर कारभारी यास कैद करून पारपत्य केलें. आणि मुलांस घेऊन मांडवीस गेली, ते वेळेस राणीचे ममतेचे येसू दळवी किल्ले पेडवळ येथें आहे तो, व आवजीनाईक पालवे, वगैरे यांस सांगितलें कीं, तुह्मीं श्रीमंतांकडे चांगल्या माणसांचे हातें सूत्र

(Margin: अर्बा समानीन मया व अलफ जमादिलाखर २९)

---

A. D. 1783-84 — the protection of the Jowár Râṇi created disturbances in Práṇt Kalyáṇ &c. A security-bond was therefore taken from his relations. The Jowár Râṇi and Bá(ḷá)ji Mahádeo having now tendered their allegiance to Government, the security-bond was annulled, and the property of Bá(ḷá)ji that had been attached was ordered to be restored to him.

( 576 ) Lajjá Shankar Vakil was sent to Ráje Raṇsingh of Sansthán ( Nepâḷ )? नेपाळ. The Rájá sent a present with him.

A. D. 1783-84

( 577 ) The Rájá of Sansthán Rámnagar, Somdeo Ráṇá, died in the month of Ashâḍh of this year. His step-mothers and Kárbhári entered into a plot to poison his infant son. The Rájá's widow having got scent of the matter arrested and punished the Kárbhári and went away with her child to Mánḍvi. She then communicated to Esu Daḷvi of fort Peḍwaḷ, Âwji Naik Pálve and others, who enjoyed her confidence, her desire to throw herself on the mercy of the Peshwá and to live under his protection. Esu Daḷvi thereupon sent Âwji Naik to Dhoṇḍo Mahádeo for negotiation. Dhoṇḍo sent men to the

A. D. 1783-84

लावून त्यांचे पदरीं पडावे, त्याजवरून येसू दळवी किल्ले पेडवळ याणें आवजीनाईक यास पाठवून, कुमाजीनाईक याचे हातें आह्मांस येऊन भेटले. आह्मी तिकडील सर्वांचे संमत घ्यावयास कुमाजीनाईक खाडे यांस पाठऊन, दळवी वगैरे नाईक-वाडी व जमीदार व रयतेचे संमत आणिले. आवजी नाईक याचा लेक आणिला ह्मणून लिहिलें तें कळलें, व नाईक-वाडी व किल्लेकरी वगैरे यांस बक्षीस व इनाम द्यावयाची याद पाठविली, ती पावली. ऐशास बक्षीस व इनाम द्यावयाविशीं सनद अलाहिदा सादर केली आहे. तुह्मीं तालुके त्रिंबकपैकीं वगैरे शेंदोनशें लोक, व चाळीस पन्नास स्वार, व शहाणा माणूस पाठऊन सोमदेव राणा याच्या सावत्र आया रामनगरास आहेत, त्यांस, व पेडवळ किल्ला हस्तगत करावयासी पैरवी करणें. सरकारातून फौज व गाडदी रवाना केले आहेत. लौकरच येऊन पोहचतील. तुह्मांकडील यादीप्रमाणें पत्रें पाठविलीं आहेत, तर सरदारांस व जमीदारांस दिलभरंवसा देऊन संस्थानाचा व किल्याचा बंदोबस्त करणें. मसलत फार न लांबवितां युक्तीनें संस्थान हातास येईल ते गोष्ट करणें ह्मणून मशारनिल्हे यांचे नांवें. छ. २९ रविलाखर सनद १.

परवानगी रूबरू.

संस्थान रामनगर व किल्ले पेडवळ येथील बंदोबस्ताविशीं तुह्मीं विनंतिपत्र, व नाईकवाडी वगैरे यांस बक्षीस व इनाम द्यावयाची यादी पाठविली ती प्रविष्ट जाहली, ऐशास संस्थानाचा व किल्याचा बंदोबस्त तुम्हांस सांगोन, हे सनद सादर केली असे, तरी संस्थान मजकूरचे व किल्याचे कारभारी व नाईकवाडी यांस बक्षीस व इनाम द्यावयाविशींचीं.

कलमें.

| बक्षीस एकसाली. | रुपये. | इनामगांव. | रुपये. |
|---|---|---|---|
| ५५० कडीं सोन्याचीं. | | ५०० येसाजी दळवी किल्ले पेडवळ देहे १ एकूण. | |
| ३५० किल्लेदारास. | | ३०० आवजी नाईक पालवे यास. | |
| २०० कारभारियास. | | २०० मांडवीकर नाईक यास. | |
| ५५० | | ३०० रतन नाईक गावरीकर यास. | |

---

province and obtained the consent of the Jamidárs and the rayots ( to the province being taken under the protection of the Peshwá ). He then reported the circumstances to the Peshwá. He was directed to depute men to secure the persons of the Rájá's step-mothers and to obtain possession of the fort of Peḍwaḷ. Rewards to the fort-officers and others were sanctioned. Forces were sent from Huzur for his assistance. He was further directed to induce the Dowager Ráṇi to live with her son at some place in the Government territory and to make provision for his expenses.

१०० कडीं रुप्याचीं सुमार ४ एकूण.
५० लोकांस पोस्त वगैरे मिळोन.

७००

एकूण सातशें रुपये संस्थान पैकीं देणें.

कलम १.

मध्यस्तास इनाम गांव. रुपये.
२५० कुमाजी नाईक खाडे यास.
७५ कमाजी नाईक वाघ यास.

४२५

एकूण सवा चारशें रुपयांचे गांव द्यावयाविशीं लिहिलें त्यास मध्यस्तास एकसाली बक्षीस द्यावें. इनाम गांव द्यावयाचें ठीक नव्हे; परंतु जरुराती देणेंचे, तर कांहीं कमी करून संस्थानपैकीं गांव नेमून देणें.

कलम १.

२५० कित्ता नाईक असामी ५ एकूण दर असामीस रुपये पन्नास प्रमाणें.

१५५०

एकूण साडे पंधराशें रुपयांचे गांव इनाम कमकसर द्यावयाचा करार करून संस्थानाचा, व किल्याचा बंदोबस्त करून सदरील बेरीजेचे इनाम गांव कमालाप्रमाणें संस्थानपैकीं नेमून देणें. कलम १.

एकूण तीन कलमें करार केलीं असेत, तरी संस्थानाचा व किल्याचा बंदोबस्त करून सदरीलप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन, धोंडो महादेव याचे नांवें. छ. २९ रविलाखर सनद १.

परवानगी रूबरू.

संस्थान रामनगर येथील बंदोबस्त करावयास धोंडो महादेव यास आज्ञा केली असे, तरी मशारनिल्हेशीं रुजू होऊन महालची आबादी करून अंमल सुरळीत देणें ह्मणोन. छ. २९ रविलाखर.

सनदा.

१ देशमुख, व देशपांडे महालानिहाय, संस्थान मजकूर यांस.
१ मोकदम, व रयान महालानिहाय, संस्थान मजकूर यांस.

परवानगी रूबरू.

२

सोमदेव राणा संस्थान रामनगर याचे राणीनें एका वर्षाचा पुत्र होता तो घेऊन मांडवीस गेली, त्यास राणीनें पुत्र सुद्धां सरकार तालुक्यांत एखादी जागा योजून तेथें रहावें.

त्यांचे खर्चाची बेगमी कांहीं इतलाख व एक दुसरा गांव देऊन करावी. याप्रमाणें कोणी शहाणा माणूस पाठऊन आणावयाची पैरवी करणें. राणी बाहेर राहिल्यास सरकार बंदोवस्तांत कमी पडेल, यास्तव सोईस पडेल तसे करणें. सोमदेवाच्या सावत्र आया व जुने कारभारी रामनगरास आहेत, त्यांस हस्तगत करून आपल्या तालुक्यांत पक्या बंदोबस्तानें ठेवणें ह्मणोन, धोंडो महादेव यांचे नांवें. छ. २९ रविलाखर. सनद १.

परवानगी रूबरू.

५७८–( ८५२ ) जमा जामदारखाना.

खमस समानीन मया व अलफ रमजान १३ — कमाविस भेट राजश्री राव यांसीं, बाबत हरीसिंग राजे, संस्थान गढाकोट, प्रांत बुंदलखंड, यांणीं लग्नाचा पोशाक धरणीधर वकील याजबरोबर सनगें पाठवलीं, ते गुजारत जानोजी जाबळा खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

| | | |
|---|---|---|
| २५ | तिवट कोरदार | १ |
| १०० | शाला थिर्के | २ |
| २५ | महमुदी जरी | १ |
| २५ | पटका अमदाबादी | १ |
| ५० | किमखाप | १ |
| २२५ | | ६ |

५७९–( ८५६ ) राजे व्यंकटापा नाईक बहिरी बहाद्दर संस्थान सुरापूर यांचे नांवें

खमस समानीन मया व अलफ रमजान २७ — जाब कीं, तुह्मीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट जहालें. हरिदत्त हत्ती, नग१ एक सरकारांत नजर पाठविला तो पावला म्हणून. जाब १.

५८०–( ८५७ ) जमा जामदारखाना.

खमस समानीन मया व अलफ सवाल ११ — कमाविस भेट बाबत हाय लग्नाचे अहेराचीं वस्त्रें आलीं, तीं गुजारत जिवाजी काटकर खिजमतगार, सनगें एकूण. रुपये.

---

( 578 ) A present of clothes was sent by Harising, Ráje of Sansthán Gadhâkot in Piránt Bundelkhand, with his agent Dharṇidhar to the Peshwá in honor of the latter's marriage.
A. D. 1784-85.

( 579 ) Ráje Venkaṭapá, Naik Bahiri Bahádar of Sansthán Surápur, sent an elephant as a present to the Peshwá.
A. D. 1784-85.

( 580 ) Presents were received by the Peshwá, in honor of his marriage, from Tuḷjáji Ráje of Sansthán Chandáwar and from Soma Bhupál Ráje of Sansthán Gadwâḷ.
A. D. 1784-85.

९२८॥ बाबत तुळजाजी राजे, संवस्थान चंदावर, यांजकडून सांब शिवराव वकील घेऊन आले, तीं सनगें एकूण. रुपये.

१०७॥ (७०७॥) राजश्री राव यांसीं.

२५८॥(२५७॥) प्रत पोशाख.

| | | |
|---|---|---|
| २० | चिराबादली, कारचोबी | १ |
| ८७॥ | जामेवार बादली | २ |
| २० | गोषपेच | १ |
| ४० | चादर | १ |
| ९० | किमखाप | १ |
| २५८॥ (२५७॥) | | ६ |

४५० प्रत पोशाख.

| | | |
|---|---|---|
| १०० | तिवट, छिटी बालापुरी, वर काम सोनेरी | १ |
| १२५ | दुपटा, छिटी बालापुरी, वर काम सोनेरी | १ |
| १०० | जामेवार, छिटी बालापुरी, काम सोनेरी | १ |
| १२५ | किमखाप | १ |
| ४५० | | ४ |

७०७॥ १०

२२० सौभाग्यवती रमाबाई यांसीं.

| | | |
|---|---|---|
| १५० | छीट जसोऊ, बालापुरी, वर काम सोनेरी | १ |
| १० | चोळखण छिटी बालापुरी | १ |
| ६० | चादर, जरीबादली | १ |
| २२० | | ३ |

९२७॥ १३

२९३ बाबत सोमभूपाल राजे, संवस्थान गदवाल, यांजकडून नरसिंगराव वकील घेऊन आले, तीं सनगें. रुपये.

२०९ राजश्री राव यांसीं.

| | | |
|---|---|---|
| २४ | चिरा तमामी सोनेरी. | (१) |
| ३२ | वोढणी तमामीन सोनेरी | १ |
| १०३ | जामेवारे तमामी सोनेरी | २ |
| ५० | किमखाप | १ |
| २०९ | | ५ |

८४ सौभाग्यवती रमाबाई यांसीं.

| | | |
|---|---|---|
| ८० | लुगडें ताडपत्री | १ |
| ४ | चोळखण ताडपत्री. | १ |
| ८४ | | २ |
| २९३ | | ७ |
| १२२०॥ | | २० |

५८१–( ८७५ ) लाला रणछोड वकील यांणीं हुजूर येऊन विनंति केली कीं, सोमदेव राणे, संस्थान रामनगर, हे मृत्य पावले, सबब त्यांचे पुत्र रूपदेव राणे यांची स्थापना संवस्थान मजकुरीं पूर्ववत्प्रमाणें करावी ह्मणोन, त्याजवरून तुमची एकनिष्ठता जाणोन, संस्थान मजकुरीं, तुमची स्थापना पूर्ववत्प्रमाणें केली असे, तरी तुह्मीं सरकारांत एकनिष्ठपणें वर्तणूक करून सुखरूप राहणें, अभय असे ह्मणोन, रूपदेव राणे संवस्थान रामनगर, यांचे नांवें. कौल १.

खमस समानीन मया व अलफ रविलाखर ११

रसानगी यादी.

५८२–( ८७७ ) अबई राणी जवारकर इंग्रजाकडे कल्याणास होती, त्यास प्रांतांत कोळ्यांचा उपद्रव होऊं लागला, याकरितां तीस सरकारांत आणली ते समर्थीं ठराव जाहला आहे, त्यापैकीं हल्लीं सालगुदस्तापासोन जातीस तैनात वगैरे तालुके वसईपैकीं द्यावयाचीं कलमें.

खमस समानीन मया व अलफ रविलाखर २९

---

( 581 ) Lálá Ranchhoḍ Vakil prayed that Rupdeo Ráṇá, son of Somadeo Ráṇá deceased of Sansthán Rámnagar, might be allowed to succeed to the Sansthán. The prayer was granted.

A. D. 1784-85.

( 582 ) Abai Ráṇi of Jowár was residing at Kalyáṇ with the English. The Kolis having created a disturbance in the country, the lady was brought to the Peshwá and

A. D. 1784-85.

भोजनखर्च व पालखीचे व कारकुनास नेमणूक सालीना. रुपये.

१७५० अबईस.

१००० भोजनखर्च वगैरे

७५० पालखीचे भोई यांस.

१७५०

४५० कारकून.

३०० बाजी महादेव.

१५० विष्णु महादेव.

४५०

२२००

एकूण दोन हजार दोनशें रुपये सालीना नेमणूक केली असे, तरी राणी तेथें राहील तोंपावेतों सदरीलप्रमाणें देत जाणें.

कलम १.

कित्ता अबईस.

पालखीचे सरंजामास रुपये १५० दीडशें रुपये देणें पुढें दोन सालें आड जाऊन तिसरे सालीं देत जाणें.

दिवटीस तेल दरमहा वजन पक्कें ८८३।।। प्रमाणें बारमाही वजन पक्कें ८१८५ एकूण एक मण पांच शेर तेल सालीना करार करून दिल्हें असे, तरी सदरील प्रमाणें देत जाणें.

एकूण सदरीलप्रमाणें. कलम १.

लोक गाडदी वगैरे यांचे सालीना रुपये.

१००० सरदार असामी १० दरमहा दर असामीस रुपये १० प्रमाणें एकमाही रुपये १००. रोजमरे १० प्रमाणें रुपये.

३२०० गाडदी असामी ५० दरमहा दर असामीस रुपये ८ प्रमाणें रुपये ४००, एकूण रोजमरे ८

२२४० हशम असामी ४० दरमहा दर असामीस रुपये ७ प्रमाणें रुपये २८० एकूण रोजमरे ८

६०० राऊत असामी ५ दरमहा दर असामीस रुपये १२ प्रमाणें रुपये ६० एकूण रोजमरे १०

७०४० १०५

एकूण एकशें पांच असामींचे सात हजार चाळीस रुपये करार करून दिल्हे असेत, तरी सदरील लोकांपासून तालुके वसई येथील शिबंदीचे नेमणूकपैकीं लोकांची गैर हजेरी होईल त्याचा आकार वजा करून बाकी तालुके मजकूरचे शिरस्तेप्रमाणें देत जाणें.

कलम १.

an engagement was entered into with her, by which it was agreed to pay her and her Sardárs and attendants, some allowances. The allowances were now ordered to be disbursed.

शिपाई लोकांचे कबीले व गुरूंढोर वगैरे ठेवावयासी पांचशें रुपयाचे आकारांचा एक गांव तैनातेंत नेमून द्यावयाचा करार केला असे, तरी सदरील बेरजेचा एक गांव तैनातेंत नेमून देणें; आणि फडफर्मास सालाबादी असेल, ते यांजकडे चालवणें. कलम १.

एकूण चार कलमें करार करून देऊन, हे सनद सादर केली असे, तरी सदरीलप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन, जिवाजी गोपाळ यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

५८३–( ९०५ ) कमाविस भेट राजश्री राव यांसी, बाबत संस्थान कर्नोल निसबत रणमस्तखान याचे पुत्र इब्रामखान यांजकडून राघवेंद्र नारायण वकील वस्त्रें घेऊन आले, ते गुजारत जिवाजी काटकर खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

सीत समानीन मया व अलफ मोहरम १०

| | | |
|---|---|---|
| ६० | तिवटें | २ |
| ३५० | शेले जाफरखानी | २ |
| ४१० | | ४ |

५८४–( ९२४ ) संस्थान करोली, निसबत राजे माणिकपाल यांजकडे सन सलास समानीन तागाईत सन सीत समानीन चार साला खंडणीचा ऐवज येणें, त्याचे वसुलाचें कामकाज महिपतराव कृष्ण साठे यांचे मारफातीनें तुह्मांकडे आहे, त्यास तुह्मीं खंडणीपैकीं ऐवज पाठविला तो. रुपये.

सीत समानीन मया व अलफ जमादिलाखर २९

१००० छ. ३० जमादिलावल, जमा पोता.

५००० रदकर्ज, गुजारत महिपतराव कृष्ण यांचें कर्ज सरकारांत आहे त्यापैकीं. जमाखर्च छ. २९ जमादिलाखर.

६०००

एकूण सहा हजार रुपये सदरहूप्रमाणें सरकारांत जमा जाले असत ह्मणोन, गोपाळ अनंदराव यांचे नांवें. जाब १.

---

(583) Presents were received from Ibráhimkhán, son of Ranamastakhán of Sansthán Karnol.
A. D. 1785-86.

(584) Rs. 6,000 were received from Ráje Mánikpál of Sansthán Karoli on account of tribute.
A. D. 1785-86.

५८५–( ९६४ ) जमा जामदारखाना

समान समानीन मया व अलफ जमादिलाखर २० — कमाविस भेट राजश्री राव यांसी बाबत राजे मर्दनसिंग संस्थान गढाकोट, यांजकडून वकील पोशाक घेऊन आले, ते गुजारत जिवाजी काटकर खिजमतगार, सनगें एकूण किंमत. रुपये.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० तिवट धुवट कोरदार | १ | | २० पटका काशीचा | १ |
| १२० शाला थिर्के | २ | | १०० जामेवार जरी बुटेदार | ·॥· |
| २० शेले आंबवे | २ | | | |
| ६० महमुद्या धुवट | २ | ३४० | | ८॥· |

५८६–(१०११) जमा जामदारखाना.

इहिदे तिसैन मया व अलफ सवाल १९ — कमाविस भेट सनगें एकूण. रुपये.

२८६ राजश्री राव यांसी, बाबत राजे मर्दनसिंग संस्थान गढाकोट, यांणीं पर्वतसिंग याजबरोबर पोशाख पाठविला, तो गुजारत रायाजी वागमारा खिजमतगार, सनगें एकूण. रुपये.

| | | |
|---|---|---|
| १६ तिवट चंदेरीचें, कोर | १ | |
| १०० शालफर्द | २ | दर ५० |
| १२५ किमखाप | १ | |
| ३० शेले साधे धुवट | २ | दर १५ |
| १५ शेले आंबुवे | २ | दर ७॥ |
| २८६ | ८ | |

·॥· सौभाग्यवती रमाबाई यांसी, बाबत मातुश्री लक्ष्मीबाई जोशी, श्रीकाशीयात्रेहून आली, त्यांणीं दिला, तो गुजारत केदारजी येवला खिजमतगार चोळखण. १

२८६॥ ९

५८७–( १०१२ ) जमा जामदारखाना.

इहिदे तिसैन मया व अलफ सवाल २१ — कमाविस भेट बाबत हाये सनगें एकूण. रुपये.

---

(585) A present was received from Rájá Mardansingh of Sansthán Gadhákot. A. D. 1787-88.

(586) Presents were received by the Peshwá from Mardansingh of Sansthán Gadhákot. A. D. 1790-91

(587) Presents were received by the Peshwá from Dhokalsingh Rájá of Sansthán Parane. A. D. 1790-91.

६२७ राजश्री राव यांसी, सनगें एकूण. रुपये.

५७७ बाबत ढोकलसिंग राजे, संवस्थान परणे, यांजकडून चिमट हजारी व लाला अखेरेमण यांजबरोबर पोशाख पाठविला, तो गुजारत रायाजी वागमारा खिजमतगार, सनगें एकूण. रुपये.

| | |
|---|---|
| १२ तिवट धुवट | १ |
| १७ तिवट कोरदार धुवट चंदेरीचें | १ |
| २० तिवट आंबवे | १ |
| ११० दुपटे काशीचे | २ |
| १६ पटका आंबवी | १ |
| २० शेले आंबवे | २ |
| ७२ शेले साधे धुवट | ४ |
| ७५ शाला फर्द | २ |
| २३५ किमखाप | ३ |
| ५७७ | १७ |

५० बाबत रामराव नारायण देशमुख यांची मातुश्री काशीयात्रेहून आली, त्याणीं दिल्हा, तो गुजारत गणोबा काणा, पितांबर मर्दानी काशीचा जरी किनारदार. १

६२७ १८

४।।। सोभाग्यवती रमाबाई यांसी, बाबत हाये श्रीकाशीयात्रेहून आली, त्यांणीं दिल्हे, ते गुजारत केदारजी यवला खिजमतगार चोळखण एकूण. रुपये.

३ बाबत रामराव नारायण देशमुख यांची मातुश्री, खण पितांबराचा जरी किनारदार लाल १

१।।। बाबत खण ताफ्त्याचे बुटेदार २ एकूण.

४।।। ३

६३१।।। २१

.५८८–( १०३७ ) चिमणाजी दलपतराव राजे, संस्थान पेठ, यांणीं संस्थान व महाल जकात सुद्धां, देखील खैराई किल्ला तुह्मांकडे कर्जांत दिल्हा होता, त्यास हल्लीं सरकारांतून तुमचे कर्जाचा ठराव करून किल्ला व किल्याचे सरंजामास पांच हजाराचे गांव परगणे हरसूलपैकीं सरकारांत घ्यावयाचा करार करून, बाकी संस्थान व महाल जकातसुद्धां संस्थानिक याजकडे देविले त्यासंमंधें.

इहिदे तिसैन मया व अलफ सवाल १

कलमें.

संस्थानिक यांजपासून ऐवज घ्यावयाचा

रुपये.

१४५८३४ नजरेचा ऐवज सरकारांत घ्यावयाचा करार केला.

रुपये.

१२५००० ऐन नजर एकसाला.

२०८३४ नजरेचे सवालक्ष व तुमचे कर्जाचे पंचवीस हजार एकूण दीड लक्ष रुपये नऊ सालांत हसेबंदीनें घ्यावयाचे ठराविले, सबब व्याजाबाबद मोघम घ्यावयाचे २५००० रुपये पैकीं वजा तुमचे

संस्थानचा अमल, व घोडीं, व कुणबिणी, व भांडीं वगैरे वस्तभाव कागदपत्र खतासुद्धां दस्ताऐवजीं असतील ते चिमणाजी दलपतराव यांचे स्वाधीन करून त्यांस नरहर गोपाळ यांजकडे पोहोचते करून कबज घेणें. कलम १.

किल्ले खैराई सरकारांत घ्यावयाचा करार केला आहे, त्याचा बंदोबस्त नरहर गोपाळ यांस करावयाची आज्ञा केली असे. तरी किल्ला, तोफा व जेजाला वगैरे जकीरासुद्धां मशारनिल्हेचे स्वाधीन करून कबज घेणें, तीन सनदांचा उजूर न करणें. कलम १.

देवजी अवधूतराव वेलकर, व खंडोजी नाईक वगैरे असामी ४ चार किल्ले त्रिंबक येथें

---

( 588 ) Chimṇáji Dalpatrao, Rájá of Peṭh, mortgaged his Sansthán with the fort Khairai to Dhonḍo Mahádeo, officer of Trimbak. The debt due to Dhonḍo was agreed to be paid by Government, and the Sansthán was freed from mortgage and made over to the Rájá excepting the fort and the villages in Parganá Harsul, worth Rs. 5,000 attached to the fort which were retained by Government. The amount of debt with interest as also a large amount of Nazar was levied from the Rájá by Government.

A. D. 1790-91.

| | |
|---|---|
| कर्जाबाबद हिसेरसीद ४१६६ रुपये बाकी रुपये. | अटकेंत आहेत त्यांस फैल जामीन घेऊन नरहर गोपाळ यांचे हवालीं करून कबज़ घेणें. कलम १. |

१४५८३४

२९१६६ तुमचें कर्ज संस्थानिकांनीं देणें. त्याचा ठराव जाहला ते रुपये.

२५००० ऐन कर्ज.

४१६६ नऊ सालांत हसेबंदीनें ऐवज ध्यावयाचा सबब व्याजाबाबद.

२९१६६

१७५०००

यासी हसेबंदी सालें बीतपशील.

२०००० सालमजकूर, सन इहिदे तिसैन.

२०००० सन इसन्ने तिसैन.

२०००० सन सलास तिसैन.

२०००० सन अर्बा तिसैन.

२०००० सन खमस तिसैन.

२०००० सन सीत तिसैन.

२०००० सन सबा तिसैन.

२०००० सन समान तिसैन.

१५००० सन तिसा तिसैन.

१७५०००

एकूण पावणेदोन लक्ष रुपयांची निशा सदरहू हसेबंदीप्रमाणें नरहर गोपाळ याची सरकारांत घेऊन ऐवज तुह्मांकडे देविला असे, तरी तुह्मीं आपले कर्जाचे एकूण तीस हजार एकशें सासष्ट घेणें. व एक लक्ष पंचेचाळीस हजार आठशें चौतीस रुपये नजरेबाबद तुमचें

फाजील सरकारांत आहे, त्याऐवजीं रद्द कर्ज सालाचे सालांत अखेर सालीं नासिकांत नासिक चलणी घेऊन कबज देणें.

कलम १.

एकूण चार कलमें लिहिलीं असेत, तरी सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणून धोंडो महादेव, तालुके त्रिंबक, यांचे नांवें.

सनद १.

रसानगी यादी.

५८९–( १०३८ ) तुह्मांकडील राघो मुकुंद पुरोहित, व भवानीशंकर मजमदार, व कृष्णाजी सदाशिव फडणीस, व सुंदर शामजी यांणीं हुजूर येऊन विनंति केली कीं, धोंडो महादेव याजकडे कर्जात संस्थान गुंतलें आहे, त्यास त्यांचे कर्जाचा ठराव करून संस्थान आमचें आह्मांकडे देविलें पाहिजे ह्मणोन; त्याजवरून संस्थान तुह्मांकडे द्यावयाचा करार करून धोंडो महादेव यांचे कर्जाचा ठराव केला, सबब तुह्मांपासून ऐवज घ्यावयाचा.

इहिदे तिसैन मया व अलफ सवाल १

रुपये.

१४५८३४ नजरेबाबत सरकारांत घ्यावयाचे ते. रुपये.

१२५००० ऐन नजर.

२०८३४ नजरेचे सवा लक्ष, व धोंडो महादेव यांचे कर्जाचे पंचवीस हजार, एकूण दीड लक्ष रुपये नऊ सालांत हप्तेबंदीनें घ्यावयाचे ठराविले, सबब व्याजाबाबद मोघम करार केले रुपये २५००० पैकीं वजा धोंडो महादेव यांस कर्जाचा बाबद हिसेरसीद द्यावयाचे रुपये ४१६६ बाकी. रुपये.

———

१४५८३४

२९१६६ धोंडो महादेव यांचें कर्ज तुह्मीं देणें ते. रुपये.

२५००० ऐन.

४१६६ नऊ सालांनीं हप्तेबंदीनें ऐवज घ्यावयाचा, सबब पंचवीस हजार

---

( 589 ) This arrangement was made at the request of the Rájá.

A. D. 1790-91.

रुपये व्याजाबाबद ध्यावयाचे क-
रार केले, त्यापैकीं हिसेरसीद.
रुपये.

२९१६६

१७५०००

यासी हसेबंदी.

| | | | |
|---|---|---|---|
| २०००० | सालमजकूर सन इहिदे तिसैन. | २०००० | सन सबा तिसैन. |
| २०००० | सन इसन्ने तिसैन. | २०००० | सन समान तिसैन. |
| २०००० | सन सलास तिसैन. | १५००० | सन तिसा तिसैन. |
| २०००० | सन अर्बा तिसैन. | | |
| २०००० | सन खमस तिसैन. | १७५००० | |
| २०००० | सन सीत तिसैन. | | |

एकूण एक लक्ष पंच्याहत्तर हजार रुपये सदरहूप्रमाणें ध्यावयाचे त्यापैकीं धोंडो महादेव यास कर्जाबाबद एकूणतीस हजार एकसें सासष्ट रुपये देऊन, बाकी एक लक्ष पंचेचाळीस हजार आठशें चौतीस रुपये सरकारचे नजरेबाबद येणें ते मशारनिल्हेचें फाजील सरकारांत आहे, त्यापैकीं रद्द कर्जास देविले असेत, तरी सदरहू मुदतीप्रमाणें सालाचे सालांत अखेर सालीं नाशिकांत नाशिक चलनी पावते करून पावलियाचें कबज घेत जाणें; व किल्ले खैराई व किल्याचे खर्चास परगणे हरसूलपैकीं पांच हजार रुपयांचा सरंजाम सरकारांत ध्यावयाचा करार केला आहे, त्याचा बंदोबस्त नरहर गोपाळ जोशी यांस करावयाची आज्ञा केली असे, तरी किल्ला, तोफा, जेजाला वगैरे जकीरासुद्धां मशारनिल्हेचे स्वाधीन करून, कबज घेणें; व किल्याचे सरंजामास पांच हजार रुपयांचे गांव परगणे मजकूरपैकीं नेमून देणें; आणि सरकार लक्ष राखोन तुम्हीं आपले संस्थानचा बंदोबस्त करून सुखरूप राहणें, म्हणोन, चिमणाजी दलपतराव राजे संस्थान पेठ यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

५९०–( १०४५ ) नारो कृष्ण यांचे नांवें सनद कीं, ममडाई तालुका सरकारांत घेतला, ते समई भारतशहा हटियाराय, संस्थान मजकूर, यांजकडे तालुके मजकूरपैकीं किल्लासुद्धां पंचवीस हजारांची जहागीर ठेवली, तेव्हां सरकारांत प्रयोजन लागल्यास आपले सरंजामानिसीं येऊन हाजर होऊं,

इसन्ने तिसैन मया व अलफ रमजान २३

( 590 ) When the Sansthán of Mamdai was taken by Government, a portion worth Rs. 25,000 was continued in Jahágir to Bháratsháha Haṭiyáráya, the Rájá of the Táluká,

A. D. 1791-92.

याप्रमाणें करार केला असतां, सरकारांत मसलत पडली असोन चाकरीस आले नाहीं; व कर्जपटीचा ऐवज सर्वांप्रमाणें सरकारांत दिल्हा नाहीं; सबब तूर्त पंचवीस हजार रुपयांची वरात अलाहिदा करून ऐवज तुह्मांकडे देविला असे, तरी सरसुभा प्रांत खानदेश येथील नेमणूकेपैकीं स्वार व कारकून पाठऊन सदरील पंचवीस हजार रुपये वसूल घेऊन सरकारांत पावते करून जाब घेणें, याप्रमाणें फडशा न पडे तरी रामचंद्र कृष्ण भुसकुटे यांचे विद्यमानें तोडजोडीमुळें निदान पंधरा हजार रुपये ठरावांत आणून, फडशा करून घेणें ह्मणोन.

सनद १.

सदरील अन्वयें भारतशहा हटियाराय यांस कीं, पंचवीस हजार रुपये नारो कृष्ण यांजकडे देविले असेत, तरी देऊन कबज घेणें. सदरीलप्रमाणें ऐवज न दिल्यास तुह्मांकडे गांव चालतात त्या गांवापासून परभारा ऐवज घेतील ह्मणून.

सनद.

---

२

रसानगी, त्रिंबक नारायण परचुरे कारकून निसबत दप्तर.

५९१–( १०४७ ) संवस्थान वासदें प्रांत गुजराथ, वीरसिंग यांजकडे चालत होतें. त्यास ते मृत्य पावले, त्याचे पोटीं पुत्रसंतान नाहीं, याजकरितां त्याचे सापत्न भाऊ तुह्मीं, सबब तुमचे नांवें संवस्थान करार करून द्यावें ह्मणोन, तुह्मांकडील जगुलाला यांणीं विनंति केली, त्याजवरून तुह्मीं त्याचे सापत्न भाऊ, यास्तव तुमचे नांवें संस्थान मजकूर करार करून देऊन, नजरेचा वगैरे ऐवज ध्यावयाचा करार केला आहे, त्याप्रमाणें ऐवजाचा भरणा सरकारांत करून, संवस्थानचा बंदोबस्त राखोन, सरकारांत रुजू राहोन, एकनिष्ठपणें वर्तणूक करीत जाणें ह्मणोन, न्याहारसिंग राजे यांचे नांवें.

इसन्ने तिसैन मया व अलफ सवाल १२

सनद १.

राजश्री गोविंदराम आपटे, कारकून निसबत दप्तर.

---

on condition of his assisting Government with his troops when required. He however failed to send troops. Náro Krishṇa of Khándesh was directed to recover Rs. 25,000 from him, and the Rájá was told that in case he failed to pay the amount it would be recovered from the villages direct

(591) Virsing of Sansthán Wásade died without issue. His step-brother Nyáhársing having agreed to pay Nazaráṇá amounting in all to Rupees 29001, he was recognized as the ruler of the Sansthán. It was agreed that he should remit the amount due to Government from the Sansthán regularly and make suitable provision for the maintenance of Virsing's mother and widows.

A. D. 1791-92.

५९२–( १०५९ ) कमाविस भेट राजश्री राव यांसी, बाबत चेतसिंग राजे, श्री काशी, यांणीं पाठविली, ती नारायणराव वकील यांणीं आणून दिल्ही ती गुजारत जानाजी जाबक खिजमतगार सनगें एकूण. रुपये.

सलास तिसैन मया व अलफ सफर १९

| | | | |
|---|---|---|---|
| २० तिवट पैकीं | १ | ७५ मुसेजरी बुटेदार | १ |
| १२५ शालाफर्द | २ | | |
| २५ शेला साधा घुवट | १ | २९५ | ६ |
| ५० किमखाप | १ | | |

५९३–( १०७८ ) राजे भारतशा, संस्थान ममडाई, यांजकडे तालुके मजकूर सरकार हांडेपैकीं, तपे जुनवण्या, व गोमगांव वगैरे चालत आहे, त्यास ते मृत्य पावले, पोटीं संतान नाहीं, सबब तपे मजकूर, व गांव वगैरे सरकारांत जप्त करून जप्ती रामचंद्र कृष्ण यांजकडे सांगितली असे, तरी मशारनिल्हेसीं रुजू होऊन अमल सुरळीत देणें ह्मणोन, जमीदार व मोकदम यांचे नांवें. सनदा.

अर्बा तिसैन मया व अलफ जिल्काद ८

१ तपे जुनवण्यापैकीं देहे बीतपशील.

| किता. | किता. |
|---|---|
| १ कसबे जुनवण्या मजरेसुद्धां. | १ मौजे डगांव खुर्द. |
| १ मौजे ढालेगांव बुद्रूख. | १ मौजे घागड्या खुर्द. |
| १ मौजे ढालेगांव खुर्द. | १ मौजे विश्रामपूर बुद्रूख. |
| १ मौजे बर्ड्या बुद्रूख. | १ मौजे विश्रामपूर खुर्द. |
| १ मौजे सितली. | १ मौजे खुद्या. |
| १ (२)मौजे रामपुरा माकणपुरा. | १ मौजे मढीशेट. |
| १ मौजे बांदी. | १ मौजे जात्राखेडी. |
| १ मौजे महालीवाबगा. | १ मौजे पिपल्या उंदऱ्या. |
| १ मौजे कोटाकुंड. | १ मौजे दयाळपूर. |
| १ मौजे पंढराव्या. | १ मौजे झिरण्या. |

---

( 592 ) Presents were received from Chetsing Rájá of Benáres.

A. D. 1792-93.

(593) Rájá Bháratshahá of Sansthán Mamdai having died childless, the villages of Tapen Junwaṇyá, Gomgaum, &c. in Sarkár Háṇḍe enjoyed by him were attached.

A. D. 1793-94.

१ मौजे मर्दानपूर. १ मौजे भटपुरा.

१२ ११

देहे २३

एकूण तेवीस देहे येथील अमल येविशीं मोकदमास. सनद.

१ तपें गोमगांव पैकीं देहे बीतपशील.

किता.

१ कसबे गोमगांव.
१ मौजे धनखार व कोटा.
१ मौजे दीपगांव.
१ मौजे महेरागांव.
१ मौजे गावगवाळी.
१ मौजे रामपुरी.
१ मौजे चौकी खुर्द.
१ मौजे वावड्या.

८

किता.

१ मौजे कासीपुरा.
१ मौजे आबखान.
१ मौजे खुटवल.
१ मौजे रतनपूर.
१ मौजे नवलपूर.
१ मौजे घोगतपूर.
१ मौजे जांबुलखान.
१ मौजे जावण्या.

८

देहे १६

एकूण सोळा देहे येथील अमल येविशीं मोकदमास. सनद.

१ मौजे जाद्या, तर्फ संवताडा, व कसबे दीपगांव येथील अमल येविशीं मोकदमास. सनद.

१ तपे राळेगांव, पटाजण्या, व चौकी रेहेट्याचे जकातीचा अमल व गड हवेलीपैकीं गाडी देहे ३९ एकूणचाळीस येथील अमल येविशीं जमीदारांस. सनद.

४

चार सनदा दिल्हद्या असेत.

रसानगी, त्रिंबक नारायण परचुरे कारकून, निसबत दप्तर.

५९४–( १०९२ ) चंद्रसिंग, व भगवंतसिंग यांणीं हुजूर येऊन विनंति केली कीं,

(594) Chandrasing and Bhagwantsing of Sansthán Budháwal

अर्बा तिसैन मया व अलफ जमादिलावल २ आपलें संस्थान बुधावल, दित्या भिल्लानें घेतलें. तें त्याजपासून सरकारांत घेतलें आहे, तें पेशजींप्रमाणें आह्मांकडे करार करून द्यावें, आज्ञा होईल ते समयीं सरकारचाकरीस येत जाऊं, ह्मणोन; त्याजवरून संवस्थान मजकूर सरकारांत जफ्तीस ठेविलें होतें, तें मोकळें करून, पूर्ववत्प्रमाणें उभयतांनीं संस्थान अनुभऊन, आज्ञा होईल ते समयीं सरकारचाकरीस येत जावें. याप्रमाणें करार करून, हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी संवस्थान मजकूरचे गांव वगैरे जफ्तीस आहेत, त्यांची मोकळीक करून यांजकडे चालवणें ह्मणोन, नारायणराव यादव यांचे नांवें.

सनद १.

सदरील अन्वयें नारायणराव यादव कमावीसदार, परगणे नंदुरबार, व सुलतानपूर, दिंमत तुकोजी बेलकर यांस कीं, संवस्थान मजकूरचा गिरास हरद्द महालीं आहे तो सुदामत प्रमाणें चंद्रसिंग, व भगवंतसिंग यांजकडे देत जाणें ह्मणून. सनद १.

---

२

रसानगी यादी.

उभयतां संस्थानिक यांस हाजर जामीन राजाराम वलद गंगाराम शेट, वस्ती किल्ले कुकरमुंढे, यास हुजूर घेऊन जामीन कतबा छ. मजकूरच्या देण्याचे यादींत लाऊन ठेविला असे.

५९५—( ११०३ ) राजे व्यंकटापा नाईक बहिरी बहाद्दर, संवस्थान सुरापूर, यांचे नांवें सनद कीं, तुह्मांकडील सुबराव लक्ष्मीकांत, व गोविंद दासो, यांणीं हुजूर येऊन विनंति केली कीं, संवस्थान देवदुर्ग, किलीच नाईक याजकडे होतें, त्यास त्याचें नकल जाहालें. उपरांत त्याचे घरचा बंदा रंगापा नाईक संवस्थानची वहिवाट करूं लागला, त्यास किलीच नाईक याचे अफलाद वें-

अर्बा तिसैन मया व अलफ सवाल ६

---

A. D. 1793-94. prayed that the Sansthán which was taken from them by Dityá Bhil, and from him by Government, might be restored to them on condition of their assisting Government with troops whenever required. Their prayer was granted.

( 595 ) The Sansthán of Devadurg belonged to Kilich Naik. On his death the Sansthán was usurped by Rangappá Naik, his illegitimate son ( बंदा ) Rájá Vyankaṭapá Naik Bahiri Bahádur of Sansthán Surápur being a descendant of Kilich Naik in the female line attacked the Sansthán. Rangappá killed himself and the Sansthán fell into the hands of Rájá Venkaṭappá. He requested the Peshwá to recognize his claim to succeed to the Sansthán. His request was granted.

A. D. 1793-94.

कटापा नाईक असतां बंदा वहिवाट करितो, व संवस्थानाकडे याचा फसावा भारी जाहला, सबब सन इहिदे तिसैनांत कस्त मेहेनत करून, यांणीं संवस्थान हस्तगत केलें. रंगापा नाईक मुलांमाणसांसुद्धां दारू पसरून जळून मेला. याजकरितां संवस्थान मजकूर, वेंकटापा नाईक याजकडे करार करून दिल्हें पाहिजे ह्मणोन; त्याजवरोन मनास आणितां संवस्थानिकाचे नक्कल जहालें. तुह्मीं त्यांचे अफलाद व तुमचा फसावाहि त्याजकडे भारी जाहला, यामुळें तुह्मीं कस्त मेहेनत करून संवस्थान हस्तगत केलें, सबब तुह्मांकडे देवदुर्गचें संवस्थान करार करून दिल्हें असे, तरी सालाबाद सरकारचे स्वराज्याचे अमलाचा ऐवज वाजबी देऊन, सरकारासीं एकनिष्ठपणें राहून, संवस्थानची वहिवाट करीत जाणें ह्मणोन.

सनद १.

रसानगी याद.

५९६–( ११०७ ) राजे भारतशहा हटियाराय यांचे नांवें संवस्थान ममडाई, सरकार हांडे चालत होते, त्यास ते मृत्य पावले, पोटीं पुत्र नाहीं, सबब संवस्थान मजकूरची जफ्ती सरकारांत करून कमावीस तुह्मांकडे सांगितली होती, त्यास हटियाराय याजकडील दुर्गादास भवानी हुजूर आले; त्यांणीं संवस्थान पेशजींप्रमाणें भारतशहा याचे चुलते राजे खंडणशहा हटियाराय यांजकडे करार करून द्यावें, ह्मणोन विनंति केली, त्याजवरून जफ्ती मोकळी करून पेशजींप्रमाणें राजे खंडणशहा हटियाराय यांजकडे संवस्थान चालवण्याचा करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी शिबंदी वगैरे खर्च पडला असेल त्याची व जफ्तीचा वसूल पडला असेल त्याची, व लुटीचे ऐवजाची रुजुवात सरकारांतून कारकून जाऊन करून आणील, त्याप्रमाणें समजोन फडशा केला जाईल. तुह्मीं संवस्थानाविशीं दखलगिरी न करणें ह्मणोन

अर्बा तिसैन
मया व अलफ
जिल्काद ५

रामचंद्र कृष्ण याचे नांवें

सनद १.

येविशीं संस्थानानजीक तुह्मांकडील महाल आहेत. त्यास तुह्मीं आपलेकडील कमावीसदारास ताकीद करून संवस्थानास हरएकविशीं उपद्रव लागों न देणें ह्मणोन. सनदा.

१ रघोजी भोंसले सेना साहेब सुभा यांस.

१ दौलतराव शिंदे यांस.

२

३

तीन सनदा दिल्ह्या असेत.

रसानगी याद.

(596) The Sansthán of Mamḍai in Sirkár Hánde was attached owing to the death of Rájá Bháratshahá Hatiyáráya. It was now ordered to be restored to Khanḍanshahá uncle of the deceased.

A. D. 1793-94.

५९७–( १११३ ) दुर्जनसिंग राजे, संस्थान मांडवी यांचे नांवें सनद कीं, गुमानसिंग यांजकडे संस्थान मजकूरचा अधिकार होता, त्यास ते मृत्यु पावले, पोटीं पुत्र नाहीं, सबब त्यांणीं तुह्मांस दत्तकपुत्र घेतलें आहे, येविशीं सरकारचें अभय असावें ह्मणोन, तुह्मांकडील जीवनराम शिवलाल यांणीं हुजूर विनंति केली, त्याजवरून संस्थानावर नजर देऊन, तुह्मांवर कृपाळू होऊन, संस्थानचा अधिकार तुमचे नांवें करार करून दिल्हा असे, तरी तुह्मीं सरकारांत रुजू राहोन, संस्थानचा बंदोबस्त करून, सेवा एकनिष्ठेनें करीत जाणें. अभय असे ह्मणोन. सनद १.

खमस तिसैन मया व अलफ सफर १

परवानगी रूबरू.

---

# १. राजकीय.

## ( क ) देशातील बंडें.

### १ तोतया

### जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

५९८–( २५० ) महिपतराव कृष्ण, तालुके रत्नागिरी, यांचे नांवें सनद कीं, किल्ले मिरज येथें तोतया होता, तो तुह्मांकडे तालुके मजकुरीं पाठविला असे, त्यास तुह्मांपाशीं दाखल जाहल्यावर पक्या बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन पोटास शिधा मध्यम प्रतीचा देत जाणें ह्मणून. मशारनिल्हे यांस. सनद १.

सीत सबैन मया व अलफ रमजान ३०

येविशीं वामनराव गोविंद यांस सनद कीं, तोतया डोलींत घालून, बरोबर रखवालीस प्यादे देऊन पक्या बंदोबस्तानें तालुके रत्नागिरीस पावता करून, पावल्याचें कबज घेणें. ह्मणून. १.

२.

परवानगी रूबरू, बाळाजी जनार्दन फडणीस छ. २५ साबान.

---

( 597 ) Gumánsing of Sansthán Mándwi having died, Durjansing his adopted son succeeded him. The latter requested Government to recognize his adoption and his succession to the Sansthán. His request was granted.

A. D. 1794-95.

[ 1 ] POLITICAL MATTERS.

( C ) Risings in the Country

( 1 ) By the Pretender ( continued )

( 598 ) The Pretender who was a prisoner at the fort Miraj was now transferred to Ratnágiri.

A. D. 1775-76.

५९९–( २९९ ) जैराम कृष्ण यांस सनद कीं, तुह्मीं विनंतिपत्र पहिले जमादिलावलचें
सबा सबैन पाठविलें तें पावलें, लिहिला मजकूर सविस्तर विदित जाहला. तोत-
मया व अलफ याचे लोक हातलोटाचे घाटाखालीं आले आहेत, यास्तव किल्ले प्रता-
जमादिलावल ४ पगड येथील पोक्त भरती असावी, ह्मणोन लिहिलें. त्याजवरून दोनशें लोक ठेवावयाची आज्ञा केली असे, तरी चांगले दोनशें लोक पंचरूड ठेऊन बंदोबस्त किल्लेमजकूरचा चांगला करणें मसलत जाहल्यावर लोक दूर करणें ह्मणोन. सनद १.

परवानगी रूबरू.

६००–( ३०६ ) तोतयाकडे रत्नागिरीस जाऊन मिळाले आहेत येविशींचीं कलमें.

सबा सबैन
मया व अलफ
जमादिलाकर २

बाबूराव मराठे वस्ती सिध्धेश्वर तालुके सिमावल, यास सरकारांतून धुळपाकडे पाठविला होता, तो रत्नागिरीस तोतयाकडे जाऊन, त्यास मिळोन, सरदारांचे बुद्धीस भ्रंश करून, बखेडा करित आहे, सबब त्याचीं मुलें माणसें कैद करून किल्ले अवचितगड येथें अटकेंत ठेवणें, व घर जप्त करून वस्तभाव जराबजरा सरकारांत लाऊन मोजदादीची यादी हुजूर पाठवणें. वरकड कोणी तिकडे गेले असतील, त्यांचा पत्ता लाऊन जप्ती करणें. अष्टमी येथील कुळकर्णी तेथें गेला आहे, त्याचा थांग लाऊन त्याचे घराची व मुलांमाणसांची जप्ती करणें कलम. १.

राघो जोशी यांचें घर भोरपेखालीं आहे, तो चिंतो विठ्ठल यांजकडे पेशजीं होता. व त्यांशीं जोशी तोतया घनगडास होता, तेव्हां त्याजकडे जात येत असे. देवभक्तीण ह्मातारी रत्नागिरीस गेली आहे. तिचा तो जांवई हल्लीं तोतयाकडे जाऊन राजपुरी प्रांतींचे वगैरे मराठे यांस पत्रें घेऊन आला आहे. त्याचा पत्ता लाऊन, युक्तीनें त्यास कैद करून, कागदपत्रसुद्धां हुजूर पाठवणें. घर जप्त करणें. फार बारकाईनें पत्ता लावणें तो लबाड आहे. कलम १.

एकूण दोन कलमें लिहिलीं आहेत, तरी सदरहू लिहिल्याप्रमाणें करणें ह्मणोन, आबाजी बल्लाळ, व भास्कर महादेव तालुके अवचितगड यांस.

सनद १.

परवानगी रूबरू.

---

(599) The men of the Impostor having come below the Ghát of
A. D. 1776-77. Hâtloṭ, the Kamávisdár Jayrám Krishṇa asked for reinforcements at fort Pratápgaḍ. He was permitted to enlist two hunderd additional men.

(600) Báburao Maráthe and Rágho Joshi were suspected of
A. D. 1776-77. inducing Sardárs to join the standard of the Impostor who was at Ratnágiri. Their houses and property were ordered to be attached.

६०१–( ३०७ ) गोविंदराव चिमाजी माणकर यास पत्र कीं, तुह्मीं पत्रें पाठविलीं तीं

सबा सबैन मया व अलफ जमादिलाकर ३

पावलीं. तोतयाकडील लोक महाडास आले, तिकडे कुलाबकर वगैरे लोक चाकरीस गेले आहेत, त्यांचे कबिले वगैरे जप्त करण्याचा मजकूर लिहिला तो कळला, त्याजवरून विसाजी केशव यास महाडास येण्याविशीं पत्रें सादर केलीं आहेत, त्यास आठ चार दिवस निघावयासी लागतसारीखे असल्यास, हजार दीड हजार माणूस तुह्मांकडे पत्र पावतांच पाठवणें ह्मणोन मशारनिल्हेस लिहिलें आहे. ते तुह्मांकडे लोक रवाना करतील तुह्मीं त्यांस लेहून लोक लौकर आणावे, व सदाशिव पंडित सचिव यांजकडून भोरपे पैकीं वगैरे तीनशें माणूस तुह्मांकडे पाठवावयाविशीं त्यांस पत्र गेलें आहे. तुह्मीं त्यांजकडे कारकून पाठऊन लोक लौकर आणवणें. रामचंद्र महादेव याच्या भावा–पुतण्यानें तोतयासीं बेडी तोडून बंड उभें केलें. याजकरितां मशारनिल्हेस रत्नागिरीस पाठविलें होतें. ते जाऊन पाहून तेथील एक दोघे बंडाचे मिलाफू यांस सुचऊन तेथून निघोन येऊन, सरदारांस पत्रें लिहिलीं आहेत. त्याजवरून त्यांस लबाड ऐसे पक्कें समजलें. याउपरी तोतयास कोणी मिळणार नाहीं. हुजूरूनही पारिपत्याची पैरवी केली आहे. लौकरच बंड मोडेल. महाडास त्याचे लोक आहेत. तुह्मांजवळ जमात पडिल्यावर त्याचें पारिपत्य करणें. तिकडे लोक गेले आहेत, त्यांचीं मुलेंमाणसें जप्त करणें ह्मणोन पत्र १.

परवानगी रूबरू.

६०२–( ३१९ ) बंसीधर परदेशी वस्ती कसबे मजकूर, याचे चार पांचशें गाडदी

सबा सबैन मया व अलफ जमादिलाकर २९

हल्लीं कोकणांत तोतयाकडे व कृष्णाजी लक्षुमण तोतयाकडून पुण्यांत येऊन, त्याचा माणूस अकोल्यास परदेशी मजकूर यास आणावयाविशीं तोतयाचीं पत्रें घेऊन गेला आहे. ह्मणोन, हुजूर विदित जाहलें. त्यावरून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी परदेशी याचा बारकाईनें शोध लाऊन, घरीं चौकी बसऊन, त्यास व त्याचे मुलामाणसांस कैद करून, परदेशी याचे पायांत बिडी घालून,

---

( 601 ) The men of the Impostor having come to Mahád, Govindrao Chimṇáji Máṇkar was directed to proceed against them. Visáji Keshav and the Pantsachiv were asked to send 1000 and 300 men respectively to assist Govindrao ( It is stated that the shackles of the Impostor were taken off by the brother and nephew of Rámchandra Mahádeo ).

A. D. 1776-77.

( 602 ) Government was informed that Banshidhar Pardeshi had sent 500 Gârdis to assist the Impostor in Konkan and that Krishṇáji Laxmaṇ had come with letters from the Pretender to Banshidhar. Orders were issued for Banshi's arrest and for the arrest of his relations.

A. D. 1776-77.

अटकेंत ठेवणें. आणि पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देणें. घरांतील वस्तभावेची मोजदाद करून जाबता हुजूर पाठऊन देणें. हें काम आधीं फार जपोन करून बंसीधर यास हस्तगत बोभाट न होतां करून, पायांत बिडी घालून, जतन ठेवणें; आणि हुजूर लेहून पाठवणें ह्मणोन खंडो बाबूराव कमावीसदार परगणे अकोले याचे नांवें छ. १४ जमादिलाकर, परवानगी रूबरू. रसानगी, रामचंद्र महादेव परांजपे.

सनद १.

६०३–( ३२० ) नारो रानडे हा तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडे होता. तो कोकणांत तोतयाकडे जाऊन, आपले घरीं फलटणास येऊन, तेथून दोन तीनशें राऊत घेऊन, फिरोन तोतयाकडे जाणार ह्मणोन हुजूर विदित जाहलें. त्यास तुह्मीं बारकाईनें शोध लाऊन, मशारनिल्हेचे घरीं चौकी चांगली ठेवून, त्यास व त्याचे मुलामाणसांस पक्के बंदोबस्तानें अटकेंत ठेवणें; आणि वस्तभावेची मोजदाद करून जाबता हुजूर पाठवावा. त्याचीं घोडीं दहा पंधरा आहेत, तीं पुण्यास पाठऊन द्यावीं. तोतयाचें बंड कोकणांत जालें आहे. ते लबाड, तिकडे कोणी जाईल त्याचें घरदार जप्त केलें जाईल, अशी लोकांस निक्षूण ताकीद आपले महालांत करावी ह्मणोन, गुणाबाई निंबाळकर यांचे नांवें.

सबा सबैन
मया व अलफ
जमादिलाकर २९

सनद १.

छ. १४जमादिलाकर परवानगी रूबरू. रसानगी, रामचंद्र महादेव परांजपे.

६०४–( ३३४ ) मौजे हुणशाल, परगणे गोकाक हा गांव देसाई यांजकडून व्यंकटराव नारायण घोरपडे, यांजकडे आहे, त्यास मशारनिल्हे तोतयास मिळाले, सबब मौजे मजकूरची जफ्ती करून जप्तीची कमावीस तुह्मांकडे सांगितली असे. आकार होईल तो ऐवज सरकारांत पावता करून पावलियाचे जाब घेणें ह्मणोन, येसाजीराम याचे नांवें परवानगी रूबरू सनद १.

सबा सबैन
मया व अलफ
रमजान १२

येविशीं मोकदमाचे नांवें

सनद १.

२

(603) Government was informed that Náro Ránaḍe who was with Dádásáheb had joined the Impostor and that he was now about to take 200 or 300 horsemen from Phalṭaṇ to assist him. Saguṇábai Nimbáḷker was requested to keep him in confinement and to make it publicly known in her province that should any person join the Impostor, his house and property would be sequestrated.

A. D. 1776-77.

(604) Vyankaṭrao Náráyaṇ Ghorpaḍe having joined the Impostor his village of Huṇshál in Pargaṇá Gokák was attached.

A. D. 1776-77.

६०५–( ३३६ ) तोतया रत्नागिरीस अटकेंत होता, त्याणें फितूर करून किल्लेहायाचे लोकांची घालमेल केली होती, त्यास हल्लीं तोतयास कैद करून बाळाजी गोविंद यास फौजसुद्धां तालुकेहायचे बंदोबस्तास हुजुरून पाठविलें असेत, तरी किल्ले जकीरासुद्धां मशारनिल्हे यांचे स्वाधीन करून कबज घेणें, तुह्मांस उपसर्ग लागणार नाहीं. अभय असे ह्मणोन, किल्लेहायचे हवालदार, व कारकून, व सरदार यांचे नांवें दर किल्यास तीन तीन प्रमाणें. सनदा.

सबा सबैन
मया व अलफ
रमजान २०

१५ तालुके सुवर्णदुर्ग येथील किल्यास.

| | |
|---|---|
| ३ जंजिरे सुवर्णदुर्ग. | ३ किल्ले मंडनगड. |
| ३ किल्ले रसाळगड. | ३ किल्ले सुमारगड. |
| ३ किल्ले पानगड. | |

१२ तालुके अंजणवेल येथील किल्यास.

| | |
|---|---|
| ३ किल्ले अंजणवेल. | ३ किल्ले विजयगड. |
| ३ किल्ले गोविंदगड. | ३ किल्ले बहिरगड. |

१२ तालुके रत्नागिरी येथील किल्यास.

| | |
|---|---|
| ३ जंजिरे रत्नागिरीस. | ३ किल्ले जयगड. |
| ३ किल्ले महिपतगड यांस. | ३ किल्ले पूर्णगड. |

---

३९

१ बाळाजी गोविंद याचे नांवें सनद कीं, तालुके मजकूर येथील बंदोबस्त करणें ह्मणोन.

---

४० परवानगी रूबरू.

तोतया रत्नागिरीस अटकेंत होता, त्याणें फितूर करून तालुके देवगड येथील किल्याचे लोकांची घालमेल केली होती, त्यास हल्लीं तोतयास कैद करून बाळाजी गणेश यास तालुके मजकूर येथील बंदोबस्त पेशजींप्रमाणें हुजुरून सांगितला असे, तरी किल्ले जकीरासुद्धां मशारनिल्हे यांचे स्वाधीन करून कबज घेणें. तुह्मांस उपसर्ग लागणार नाहीं. अभय असे, ह्मणोन, किल्लेहायचे हवालदार, व कारकून, व सरदार यांचे नांवें दर किल्यास तीन तीन प्रमाणें. सनदा.

---

(605) The Impostor while under imprisonment at Ratnágiri conspired to create disaffection among the men of some forts in the Konkan. He was now arrested and kept in confinement. and Báláji Govind was sent with an army to take charge of the forts in question. The officers of the forts were directed to surrender the forts to him.

A. D. 1776-77.

३ किल्ले देवगड.

३ किल्ले रामगड.

३ किल्ले भगवंतगड.

---

९

१ बाळाजी गणेश यास कीं, प्रांत कोंकण येथील तालुके सुवर्णदुर्ग, व अंजणवेल, व रत्नागिरी येथील बंदोबस्तास हुजुरून बाळाजी गोविंद यास फौजेसुद्धां पाठविले आहेत, त्याजकडे तालुके देवगड येथील किल्याचे हवालदार, व कारकून, व सरदार यांचे नांवें दर किल्यास तीनप्रमाणें सनदा पाठविल्या आहेत. ते तुह्मांकडे पाठवितील. त्या घेऊन तालुके मजकूरचा बंदोबस्त करून हुजूर लेहून पाठवणें. ह्मणोन.

सनद.

---

१०

परवानगी रूबरू.

६०६–( ३४१ ) कोकणांत तोतयाचे पारिपत्यास तुह्मांस हुजुरून रवाना केले, त्यास त्याचे पारिपत्याकरितां हशमी लोक असामी २०० दोनशें असामी तुह्मांस ठेवावयाची आज्ञा केली असे, तरी सदरीलप्रमाणें दोनशें असामी चांगले मर्द माणूस फारकरून बरकंदाज याप्रमाणें ठेवणें, आणि लोकांची हजिरी अंताजी रघुनाथ याजकडून घेवऊन हुजूर लिहिणें ह्मणोन बापूजी शिंदे याचे नांवें छ.५ रजब.

सबा सबैन
मया व अलफ
रमजान २९

सनद १.

परवानगी, राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस.

६०७–( ३४५ ) तालुके राजमाची येथील किल्यास कोळ्याचे दंग्यामुळें जाजती लोक साल गुदस्तां ठेविले होते. त्यांस कोळ्याचा बंदोबस्त जाला, सबब दूर करणें ह्मणोन, तुह्मांस सनद गेली होती परंतु तुह्मीं विनंति केली कीं कोकणांत तोतयाची गडबड जाहली आहे, याजकरितां जाजती लोक ठेविले होते, त्याप्रमाणें किल्यास ठेवावयासी आज्ञा जाली ह्मणजे किल्याचा बंदोबस्त करून राहूं ह्मणोन त्याजवरून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी कोळ्याचे गडबडीमुळें बेहड्याचे नेमणुकेशिवाय जाजती लोक तुह्मीं ठेविले होते, त्याप्रमाणें हल्लीं तोतयाची गडबड कोकण-

सबा सबैन
मया व अलफ
रमजान २९

---

( 606 ) Bápuji Scindia was directed to proceed against the Impostor and was permitted to enlist 200 men for the purpose.
A. D. 1776-77.

( 607 ) The order previously issued for reducing the additional men employed at fort Rájmáchi was cancelled and the men were allowed to be retained as the insurrection raised in the Konkan by the Impostor had not yet subsided.
A. D. 1776-77.

प्रांतीं आहे; याजकरितां जदीद ठेवून रोजमरा सालगुदस्तां पावत होता, त्याप्रमाणें तालुके मजकूरपैकीं देऊन चाकरी घेत जाणें, तोतयाची गडबड वारल्यावर लोक दूर करणें, ह्मणोन, रामराव नारायण तालुके मजकूर यांचें नांवें. छ.२५ रजब. सनद १.

रसानगी यादी.

६०८–( ३४७ ) कर्यात मावळ किल्ले सिंहीगड येथील सरंजामास आहे, त्यास किल्ला तोतयाकडे गेला, सबब कर्यात मजकूरची जफ्ती करून जफ्तीची कमावीस तुह्मांस सांगितली असे, तरी इमानें इतबारें वर्तोन आकार होईल तो सरकारांत पावता करित जाणें ह्मणोन, नारो बापूजी याचे नांवें. छ. ३० साबान. सनद १.

सबा सबैन मया व अलफ रमजान २९

देशमुख, व देशपांडे कर्यात मजकूर यांस कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें ह्मणोन. १

―――

२

बरहुकुम सनद पुरंधर.

६०९–( ३४९ ) राघोजी आंगरे वजारत महासरखेल याजकडील लोक तुह्मांबरोबर तोतयाचे पारपत्यास आहेत, त्यास अडशेरीपैकीं रुपये ३१०० एकतीसशें रुपये देविले असे, तरी पावते करणें ह्मणोन, भिवराव येशवंत याचे नांवें छ. १५ माहे रमजान. सनद १.

सबा सबैन मया व अलफ रमजान २९

रसानगी यादी.

६१०–( ३५१ ) भिवराव येशवंत याचे नांवें सनद कीं, तुह्मांस तोतयाचे पारपत्यास बराबर फौज देऊन पाठविलें आहे, त्यास मसलत संमंधें कोंकणांत किल्यास वगैरे कौल सनदा पत्रें द्यावीं लागतील, याकरितां हुजुरूनची शिक्केकटार सामानसुद्धां बहिरजी बोडिगा व जानोजी पवार खिजमतगार

सबा सबैन मया व अलफ रमजान २९

---

( 608 ) The fort of Sinhgaḍ having fallen into the hands of the Impostor, Karyát Máwaḷ, assigned for the support of the fort, was attached.

A. D. 1776-77.

( 609 ) Some men were sent by Rághoji Ângriá Vazárat Mahá Sarkhel to put down the Impostor. Their pay was given by Government.

A. D. 1776-77.

( 610 ) Bhivrao Yeshwant was sent with an army into Konkan to put down the Impostor. As it might be necessary from him to issue kowls or sanads to forts &c. the Mutálki seal was sent to him, and he was directed to keep it in charge of the same Khismatgár and to use it when required.

A. D. 1776-77.

याजबरोबर देऊन तुह्मांकडे पाठविली आहे. घेऊन मसलत संमंधें कागदपत्रावर सिके करीत जाणें; आणि याच खिजमतगाराजवळ बाळगावयासी देऊन सिकेकटार पावल्याचा जाब पाठवणें ह्मणोन. छ. १७ रमजान.

सनद १.

६११–( ३५४ ) लक्ष्मण कृष्ण कोलटकर तोतयाबरोबर सांपडले आहेत, त्यांस तूर्त कुलाब्यास चांगला बंदोबस्त करून ठेवावे. पुढें येथून पत्र येईल तसें करावें. तूर्त तेथें ठेवावे. दोन माणसें, एक ब्राह्मण, बरोबर आहेत, त्यांसुद्धां ठेवावे ह्मणोन, राघोजी आंगरे वजारत महासरखेल यांस.

सबा सबैन मया व अलफ रमजान २९

सनद १.

परवानगी रूबरू. छ. २८ रमजान.

६१२–( ३५५ ) शिवाजी बल्लाळ, व गोपाळ बल्लाळ केतकर यांचीं गुरेंढोरें, व वस्तभाव, व गल्ला तोतयाकडे, लोक फितुरांत मिळाले होते, त्यांनीं नेलें आहे, त्यास मशारनिल्हेचीं गुरें, व वस्तभाव ज्याजकडे ठिकाणीं लागेल, व ज्यांणीं परस्परें वस्तभाव नेवविली असेल, त्यांचीं घरें जप्त करावीं; आणि मशारनिल्हेचे वस्तभावेचा आकार करून पैका होईल तो यास देवणें. याचा पैका वसूल होई तोंपर्यंत दोन प्यादे देणें. फिरोन बोभाट येऊं न देणें ह्मणोन, विसाजी राम हवालदार, तर्फ अवचितगड याचे नांवें. चिटणिसी.

सबा सबैन मया व अलफ जिल्काद ८

पत्र.

६१३–( ३५९ ) तर्फ बीरवाडी येथें सालमजकुरीं तोतयाची गडबड जाली, सबब सरकारच्या फौजा प्रांत मजकुरीं गेल्या, त्यामुळें मुलकाची तसनस जाली, त्याचे बंदोबस्ताचीं वगैरे कलमें बीतपशील.

सबा सबैन मया व अलफ जिल्काद ३०

---

(611) Rághoji Ángriá was directed to keep at Kolábá Laxmaṇ Krishṇa Kolaṭkar, found with the Impostor, till further orders.

A. D. 1776-77.

(612) The cattle and other property belonging to Shiwáji Ballál & Gopál Ballál Ketkar were taken away by persons who were in conspiracy with the Impostor. It was ordered that the houses of these persons should be attached, that they should be punished, and that from out of the proceeds of their property the Ketkars might be reimbursed for the loss they had sustained.

A. D. 1776-77.

(613) The following orders were issued to Táluká Birwáḍi.

A. D. 1776-77.

1 The Kamávisdár and the Darakdárs should honestly ascertain the damages caused in the Parganá by the movements of the

परगणा बीरवाडी येथील गांवगन्नाची पायमाली जाली आहे, त्याची चौकशी करून रयतीस मजुरा द्यावी लागेल ह्मणोन तुह्मीं विनंति केली, त्यास इमानें इतबारें तुह्मीं, व दरकदार मिळोन पायमालीची चौकशी करून जाबता गांवगन्नावार लेहून कारकुनाबरोबर हुजूर पाठवणें. पाहून आज्ञा करणें, ते केली जाईल. येणेंप्रमाणें. कलम १.

रखमाजी भोसले, व हुजूरचे लोक किल्ले मजकुरीं आहेत, सरभराई त्यांच्या सरोभारीयांकरितां त्यास हुजूर यावयाची आज्ञा असावी, ह्मणोन तुमची विनंति, त्यास हुजूरून लोक जातील त्यांस ठेवणें, आणि पहिल्या लोकांस यावयाची आज्ञा होईल त्याप्रमाणें किल्ले मजकुरींहून पाठवणें येणेंप्रमाणें. कलम १.

किल्ले मजकुरीं दारू व गोळा होता, त्यापैकीं तोतयाकडील लोकांनीं उतरून नेला आहे, त्यास सरदेची जागा, सबब किल्ले बीरवाडी शामलाचे सरदेची जागा नाजुक, तेथें लोकांचा भरणा असावा, ह्मणोन तुह्मीं विनंति केली, त्यास बेहड्याप्रमाणें लोक ठेवावे, जाजती ठेवावयाचे नाहींत. कामकाज विशेष पडिल्यास हुजूर ल्याहावें. कुमक पाठविली जाईल येणेंप्रमाणें. कलम १.

पर्जन्यकाळीं किल्ले मजकूरची तटबंदी दोनशें हात कोसळून पडली आहे, व चौबुर्जीचा बुरूज कोसळला आहे. त्याचे बंदिस्तीस दोन हजार रुपये अजमासें लागतील ह्मणोन तुमची विनंति, त्यास दोन हजार रुपयांपैकीं निमे एक हजार रुपयांत तर्फ मजकूरचे लोक तोतयाचे मिलाफी जाहले होते, त्यांपासून गुन्हेगारी घेऊन त्याऐवजीं सदरहू इमारत व तटबंदीचें काम करावें. येणेंप्रमाणें. कलम १.

तर्फ मजकुरीं ऐवजाच्या वराता जाल्या आहेत, देवसावंताचें लोकांची वरात मना

---

Government armies through the province for putting down the Impostor and report the loss sustained by each village. The question of granting remissions would then be considered.

1 No additional men should be entertained at the fort of Birwádi; should any contingency arise, assistance should be called for from the Huzur.

1 Rs. 1000 were sanctioned for the repairs of the rampart and one of the bastions. Another thousand required for the purpose should be recovered from the men in the fort by way of punishment for their defection to the cause of the Impostor.

1 The quantity of ammunition in the fort was taken away by the friends of the Impostor. Rs. 500 were sanctioned for the purchase of a new supply.

1 Out of the sanctioned strength at the fort, half the number should be selected by the officer, and the remaining half should be the nominees of Government.

बेगमी असावी, म्हणून तुह्मीं विनंति केली त्यास दारूगोळा पांचशें रुपयांचा कमाविसीचे ऐवजीं खरेदी करून देणें. मजुरा पडेल येणेंप्रमाणें. कलम १.

खास बारदार जदीद दहा असामी ठेवावयाची आज्ञा असावी ह्मणोन विनंति केली, त्यास दहा असामी पहिल्या शिबंदींत ठेवणें. पहिले खासबारदार आठ असामी आहेत, त्यांचे तैनातेच्या शिरस्त्याप्रमाणें त्यांची तैनात करणें. कलम १.

किल्ले मजकुरीं हुजूरचे लोक आहेत, त्यांस पेशजींचे नेमणुकीपैकीं निमे लोक तुह्मीं आपले मार्फतीचे ठेविल्यावर, हुजूरचे लोक आहेत त्यांपैकीं नेमणुकेप्रमाणें निमे नेमणुकीचे भरतीस ठेवून, बाकी जाजती होतील त्यांस हुजूर रवाना करणें येणेंप्रमाणें. कलम १.

करावी, ह्मणोन तुमची विनंति, त्यास वराता पहिल्या जाहल्या आहेत त्यांस ऐवज द्यावा. मामलत तुह्मांकडे बहाल जाली, सबब दुसऱ्या वराता होणार नाहीं. येणेंप्रमाणें करार. कलम १.

किल्ले मजकुरीं पेशजींचे नेमणुकेप्रमाणें लोक ठेवावयाचे, त्यास निमे लोक इतबारी चांगले तुह्मीं आपले निशेचे, देशचे, मावळचे ठेवणें. त्यांचा शेरा सरासरी दरमहा रुपये सहा प्रमाणें, दसमाही शिरस्तेप्रमाणें करणें; आणि जामीन साकळी करून लेहून हुजूर पाठवणें. नेमणुकेपैकीं निमे लोक राहिले ते हुजूरचे पाठविले जातील. येणेंप्रमाणें. कलम १.

एकूण नऊ कलमें करार करून दिलीं असेत. सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन, बाबूराव पासलकर याचे नांवें.

सनद १.

रसानगी यादी.

६१४–( ३६१ ) नारो महादेव रिसबूड तोतयाचे फितुरांत होते, यास्तव त्यांस बेडी घालून किल्ले चाकण येथें अटकेस ठेविले आहेत, त्यांचा वृद्धापकाळ जाला आहे, ह्मणोन धोंडो नारायण यांणीं हुजूर विनंति केली, त्यावरून तोतया संबंधें अन्याय माफ करून फंदफितुराविशीं रामचंद्र बल्लाळ मोडक यांस जामीन घेऊन हें पत्र सादर केलें असे, तरी मशारनिल्हेची बेडी तोडून त्यांस रामचंद्र बल्लाळ यांचे स्वाधीन करणें ह्मणोन नारायणराव कृष्ण किल्ले चाकण यांस सनद १.

सबा सबैन
मया व अलफ
जिल्हेज १३

रसानगी यादी.

---

(614) Náro Mahádeo Risbud was sent to prison for conspiring with the Impostor. In consideration of his old age orders were issued that he should be released on his furnishing security.

A. D. 1776-77.

६१५-( ३६३ ) किल्ले सिंहगड येथील लोक फितुरांत मिळोन किल्ला तोतयाकडे दिल्हा, तो तुह्मीं सरकारांत घेतला आहे. त्यास हल्लीं किल्ले मजकूर जनार्दन आपाजी याजकडे देविला असे, तरी जकीरासुद्धां मशारनिल्हेचे हवालीं करून कबज घेणें ह्मणोन, तुकोजी होळकर याचे नांवें.

सबा सबैन
मया व अलफ
जिल्हेज १९

सनद १.

रसानगी यादी.

६१६-( ३७७ ) ह्या महिन्यांत कोकणांतील पुष्कळ कामगार, दरकदार, जमीनदार, व घाटावरील मुलखांतीलही कांहीं लोक तोतयाकडे मिळाले होते, असें ह्या महिन्यांततील रोजकीर्दीवरून दिसतें.

सबा सबैन
मया व अलफ
जिल्हेज

६१७-( ३८१ ) कोंकणतालुक्यांत तोतयाचे पारपत्यास फौजा उतरल्या होत्या, त्याजमुळें रयतेची शेताभाताची तसनस झाली आहे, याजमुळें सारेच तालुक्यांत रयतीस बोलावयास निमित्य होईल. तेव्हां सरकारचे नुकसानीचा जाबसाल याजकरितां तालुक्यातालुक्यास चांगले कारकून जलदीनें शेतेंभातें आहेत तों पाठऊन, त्यांजकडून चौकशी करऊन, कोणते तालुक्यांत कोणा रयतीचा किती माल खराब जाहला, तो तमाम आकारून आणावा. बाकीचा माल रयतीचे जिम्मेस तालुकदाराचे विद्यमानें लावून द्यावा, ह्मणजे सरकारची जमा यथास्थित आकारेल, याकरितां ये गोष्टीची पैरवी आधीं करून कारकून तालुकियास पाठऊन चौकशी जलदीनें करणें. राजश्री बाजी गोविंद यांसही याच अन्वयें लिहिलें आहे, तरी लिहिल्याप्रमाणें करणें ह्मणोन, विसाजी केशव सरसुभा प्रांत कोंकण याचे नांवें छ. १३ सवाल. सनद १.

सबा सबैन
मया व अलफ
जिल्हेज २९

परवानगी रूबरू.

---

(615) Tukoji Holkar having retaken the fort of Sinhgad from the Impostor, it was entrusted to the care of Janárdan Appáji.

A. D. 1776-77.

(616) The diaries of this month show that many officers, Darakdárs, Jamidárs in Konkan, and also some in the territory above the Ghauts had gone over to the Impostor.

A. D. 1776-77.

(617) Owing to the movements of the armies sent into Konkan for putting down the Impostor, the rayats had suffered damage in some cases. To prevent people from urging false claims to remissions on this account, the Sarsubhá was directed to send experienced Kárkoons to the several Tálukás in his charge at an early date, to have the damage assessed by them while the crops were standing.

A. D. 1776-77.

६१८—( ३८३ ) वेंकटराव नारायण घोरपडे तोतयाकडे गेले, सबब मशारनिल्हेकडे महालनिहाय पैकीं गांव वगैरे आहेत, त्यांची जप्ती सरकारांत करून जप्तीची कमावीस तुह्मांस सांगितली असे, त्याची जप्ती करावयाविशींचीं कलमें.

सबा सबैन मया व अलफ जिल्हेज २९

महालनिहाय येथील गांव बीतपशील.

७ प्रांत मिरज पैकीं देहे.
- १ मौजे आरगर कर्यात बेडग.
- १ मौजे करोली.
- १ कसबे बेडग कर्यात मजकूर.
- १ कजबे मौजे राजुरी.
- १ मौजे टांकळी.
- १ मौजे सुलकुंडें.
- १ मौजे इतलकर्जी.

———
७

२ परगणापैकीं.
- १ मौजे कट.
- १ मौजे रांगोळी.

———
२

२ परगणे हुकेरीपैकीं देहे.
- १ मौजे सिपूर.
- १ बहिरसवाडी.

———
२

१ मौजे सिंदवड प्रांत कागल.

२ परगणे रायबागपैकीं देहे.
- १ मौजे नांदणी.
- १ मौजे सिराढोण.

———
२

१ मौजे हुणसालपैकीं गोकाक.

१ मौजे वोतूर, परगणे आजरें.

———
१६

सोळा गांव एकूण. कलम १.

प्रांत मिरज येथील देशमुखी मशारनिल्हेकडे आहे, त्याचा हक्क व इनाम वगैरे. कलम १.

परगणे आजरेंपैकीं मशारनिल्हेकडे गांव आहेत, ते चौकशीनें किती ते मनास आणून त्यांची जप्ती करणें.

कलम १.

एकूण तीन कलमांची जप्ती सदरहू लिहिल्याप्रमाणें करून इमानेंइतबारें वर्तोन, सदरहूचा आकार होइल तो सरकारांत पावता करून जाब घेत जाणें ह्मणोन, लक्ष्मण वेंकाजी कारकून शिलेदार याचे नांवें. छ. १४, सवाल.

सनद १.

मोकदम देहाये सदरहू गांवचे यांस कीं मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें ह्मणोन.

सनदा १६.

(618) Vyankaṭrao Náráyaṇ Ghorpaḍe having joined the Impostor, his villages in several mahâls were ordered to be attached.

A. D. 1776-77.

प्रांत मिरज येथील देशमुखी मशारनिल्हेची आहे, ती जप्त करून जप्तीची कमावीस यांजकडे सांगितली येविशीं. सनदा २.

१ पांडुरंगराव गोविंद यास कीं देशमुखी संमंधें हक, व इनामें वगैरे जें असेल, त्याचा वसूल मशारनिल्हेकडे देववणें ह्मणोन. सनद.

१ तिमाजी भिकाजी यांस कीं, मशारनिल्हे देशमुखीचा अंमल करतील. तुह्मीं दखलगिरी न करणें ह्मणोन. सनद.

---

२

जमीदार परगणें आजरें यांस कीं, परगणे मजकूरपैकीं मशारनिल्हेकडे गांव आहेत, त्यांची जप्ती करून जप्तीची कमावीस यांजकडे सांगितली असे, तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें, ह्मणोन. सनद १.

सदरहू अन्वयें कीं मशारनिल्हेकडील जप्ती करून जप्तीची कमावीस यांजकडे सांगितली असे, तरी तुह्मीं आपलेकडील एक सरदार जमाव फौजासुद्धां पाठऊन सरकारच्या अलाहिदा सनदा सादर जाहल्या आहेत, त्याप्रमाणें ठाणीं, व गांव घेऊन मशारनिल्हेचे स्वाधीन करणें. सदरहू ठाण्याचे व गांवचे अमलांत कोणी दिलेल करतील त्यांस तंबी पोहोंचऊन अंमल सुरळीत घेऊन देणें. हरएकविशीं मशारनिल्हे तुह्मांस लिहित जातील त्याप्रमाणें साहित्य करित जाणें ह्मणोन. सनदा २.

१ परशराम रामचंद्र यांस.

१ रामचंद्र गणेश यांस.

---

२ ——— २२

बावीस सनदा दिल्या आहेत. परवानगी रूबरू.

६१९–( ३८४ ) कोंकणप्रांतीं तोतयानें दंगा केला, त्याचें पारिपत्य करून किल्ले सर करावयाबद्दल सरकारच्या फौजा घांटाखालीं उतरल्या ते दहशतीनें रयत उठोन गेली. पुढें किल्ले सरकारांत सर जाहालीयावर रयतीस सुभाहून कौल देऊन वसाहत होऊं लागली. तो सरकारचे रावतांनीं

सबा सबैन मया व अलफ जिल्हेज २९

---

(619) Armies having marched in Konkan to put down the Impostor and to gain back the forts taken by him, the rayats of Prânt Râjpuri absconded after the conquest of the fort. Kowls were issued by the Subhá and people began to return. Some horsemen of Government however having caused some damage in one or two Turfs in the province, the rayats thereof lost confidence and could not be induced to take to cultivation without an assuarance from Govern-

A. D. 1776-77.

गोरेगांव वगैरे प्रांत मजकूरच्या एक दोन तर्फांत कांहीं तसनस केली, याजमुळें रयतीस भरंवसा पुरत नाहीं. यास्तव हुजुरून कौल सादर जाहली—या[स] वसाहत होऊन सालमजकूरचे पिकाची आळेपणी करून पेस्तर सालची कीर्द आबादी करतील ह्मणून तुमचे बावे जयराम त्रिंबक यांणीं हुजूर विनंतीपत्र पाठविलें, याजवरून तुमचे हरद्र ध्यानास आणून हें अभयपत्र सादर केलें असे, तरी तुह्मीं बेवसवसापणें आपले गांवीं गुरेंढोरें वस्तभाव सुद्धां येऊन, वसाहत करून, सालमजकूरचे पिकांची आळेपणी करून, पेस्तर सालची कीर्द आबादी करणें. सालमजकुरीं शेताची खराबी जाहली असेल, त्याची चौकशी करून, जीवन पाहून, जमाबंदी करून निभावणी केली जाईल, रयतीस कोणेविशीं उपसर्ग देउं नये ह्मणून, सरकारचे सरदारास आज्ञापत्रें सादर जालीं आहेत. याउपरी या प्रांतीं सरकारच्या फौजा येऊन उपद्रव लागणार नाहीं. कोणेविशीं वसवसा न धरणें. अभय असे ह्मणोन, रयान देहाय प्रांत राजपुरी मामलेदार याचे नांवें. छ. १८ जाब.

कौल १.

सदरहूअन्वयें जयराम त्रिंबक याचे नांवें.

सनद १.

---

२

परवानगी रूबरू.

६२०–( ३८९ ) वेदशास्त्र दादंभट लिमये तोतयाचे प्रकरणांत होते. त्यास हुजूर पुण्यास पाठऊन देणें, ह्मणून पेशजीं तुह्मांस पत्र सादर केलें आहे. त्यास त्याजकडे बाजी गोविंद यांणीं सरकारांत गुन्हेगारीचे पहिल्यानें पांच हजार रुपये, व मागाहून दुसरे पुणीयास नेऊं नये येविशींचे पांच हजार, एकूण दहा हजार रुपये करार केले. त्यास मुदती रुपये.

सबा सबैन
मया व अलफ
जिल्हेज २९

५००० एका महिन्यानें.
५००० दोहो महिन्यांनीं.

---
१००००

एकूण दहा हजार रुपये द्यावयाचे केले आहेत, त्यास भटजीपासून पक्का जामीन घेऊन

---

ment. A letter of assuarance was therefore sent, and people were informed that no further damage would be caused by the armies of Government.

(620) Dádambhat Limaye being implicated in the conspiracy of the Impostor, Báji Govind fined him first in the sum of Rs. 5000, and afterwards in the same amount for excusing his attendance at Poona. The levy of the amount was sanctioned and it was ordered that the amount should be sent to Poona.

A. D. 1776-77.

घरीं राहूं देणें; आणि सदरहू मुदतीप्रमाणें ऐवज वसूल करून हुजूर पुणीयास पाठऊन देणें ह्मणोन, सदाशिव केशव तालुके रत्नागिरी याचे नांवें. छ. २५ सवाल. सनद १.

मशारनिल्हेचे नांवें सनद कीं, अंजणवेल, सुवर्णदुर्ग, या दोहों तालुक्यांत तोतयाकडील हरामखोर लोक आहेत. त्यांची चौकशी मोरो हरी यांस सांगितली आहे, तरी शंभर माणूस तालुके रत्नागिरी पैकीं मशारनिल्हेकडे पाठऊन देणें ह्मणोन. सनद १

२

६२१–( ३९१ ) सदाशिव केशव, तर्फ रत्नागिरी यांचे नांवें सनद कीं, तोतयाचे कुळांतील सखाराम केशव याणें जमाव करून देवगड तालुक्यांतील रामगड बळकाऊन होता. त्याचें पारिपत्य बाळाजी गणेश यांणीं करून कैदेंत ठेविला आहे. तो तुह्मांकडे पाठवावयाची आज्ञा केली असे, तरी मशारनिल्हे त्यांस तुह्मांकडे पाठवितील तो बेडी सुद्धां अटकेंत तालुके मजकुरीं बिकट किल्ला असेल तेथें पक्के बंदोबस्तानें ठेऊन चांगला राखणें. पोटास शेर पीठ नागलीचें देत जाणें ह्मणोन. छ. २९ सवाल. सनद १.

सबा सबैन
मया व अलफ
जिल्हेज २९

परवानगी रूबरू.

६२२–( ३९३ ) सुखनिधान तोतया पतित कोंकणांत जंजिरे रत्नागिरीस अटकेंत होता, त्यास तेथील कमावीसदार याजकडील कारकून शिवाजी आपाजी वगैरे ब्राह्मण मिळोन तोतयाची बेडी तोडून कोंकणामध्यें दंगा मांडला. त्याजवरून हुजूरून फौज पाठऊन, तोतयास व त्याचे मिलाफी शिवाजी आपाजी वगैरे होते, ते धरून आणून, त्यांचीं पारिपत्यें केलीं. परंतु तोतयाकडे कोंकणांतील व देशांतील जागाजागाचे ब्राह्मण गेले होते त्यांचा शोध करून, ज्यांणीं तोतयाचे पंक्तीस प्रत्यक्ष अन्नव्यवहार केले असतील, त्यांजला व तोतयाची श्रावणी ज्या ब्राह्मणांनीं

सबा सबैन
मया व अलफ
जिल्हेज २९

---

( 621 ) Sakhárám Keshav, a confederate of the Impostor, who collected some men and took the fort of Rámgaḍ in Turf Deogaḍ, was arrested by Báḷáji Gaṇesh and imprisoned. He was sent to the officer of Ratnágiri and the latter was directed to keep him in an inaccessible place and to arrange for his safe custody.

A. D. 1776-77.

( 622 ) Sukhnidhán Impostor while in prison at fort Ratnágiri was joined by Siwáji Appáji and others, Brahmin Kárkuns of the Kamáwisdár. They removed his chains and raised an insurrection. An army was sent against them and they together with the Impostor were punished. Instructions were now issued for excommunicating all who messed with the Impostor or who

A. D. 1776-77.

केली ते, व श्राद्धपक्षाचा क्षण ज्यांणीं घेतला आहे, त्या ब्राह्मणांस तूर्त प्रायश्चित्त द्यावयाचें नाहीं. त्यांणीं कोणाचे पंक्तीस अन्नव्यवहार केले असतील त्यांस व त्यांचे संसर्गीयांस यथोक्त प्रायश्चित्त मार्गशीर्ष कृष्ण चतुर्दशीस देऊन शुद्ध करावें. याप्रमाणें निश्चय करून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, तरी येविशींचा शोध तालुके मजकुरीं करून, ज्यांणीं पतित तोतयाचे पंक्तीस प्रत्यक्ष अन्नव्यवहार केले असतील, त्यांणीं व तोतयाची श्रावणी ज्या ब्राह्मणांनीं केली, व श्राद्धपक्षाचा क्षण ज्यांनीं घेतला आहे, त्या ब्रह्मणांनीं कोणाचे पंक्तीस व त्यांचे पंक्तीस कोणी ते शुद्ध होत तोंपर्यंत अन्नव्यवहार करूं नयेत. याप्रमाणें ताकीद करून वरकड संसर्गीयांसी मार्गशीर्ष वद्य चतुर्दशीस प्रायश्चित्त द्यावयाचीं कलमें. बीतपसील.

पतितपंक्तीस प्रत्यक्ष जेवले, त्यांचे पंक्तीस ज्यांणीं अन्नव्यवहार केला असेल.

एक वेळ केला असेल, त्यास अर्धप्राजापत्य प्रायश्चित्त. कलम १.

बहुत वेळां केला असेल त्यास मुंडणपूर्वक प्राजापत्य प्रायश्चित्त. कलम १.

पतितपंक्तीस जेवले त्यांची पंक्ति ज्यांस जाली असेल त्यांस.

एक वेळ पंक्ति जाली त्यांची पंक्ति ज्यास एकच वेळ जाहली असेल त्याजला उपोषणपूर्वक पंचगव्य; व बहुत वेळ जाहली असेल त्यास पादप्राजापत्य प्रायश्चित्त. कलम १.

बहुत वेळां पंक्ति जाहली त्यांची पंक्ति एक वेळ ज्यांस जाहली असेल, त्यांस पादप्राजापत्य प्रायश्चित्त; व बहुत वेळां जाहली असेल त्यांस अर्धप्राजापत्य प्रायश्चित्त. कलम १.

सदरहूचे संसर्गी असतील त्यांस पंचगव्य. कलम १.

येणेंप्रमाणें यथाशक्ति प्रायश्चित्त देऊन शुद्ध करवणें; आणि शुद्ध केल्याचें वर्तमान, व याखेरीज ज्याकडे दोष बहुत असोन थोडका, ऐसें मिथ्या बोलोन पंचगव्य घेतलें असें ह्मणोन, अगर त्याप्रमाणें बोलोन, घेईल, त्याजपासून गुन्हेगारी सरकारांत घेऊन, त्याचीं नांवनिशी हुजूर लिहून पाठविणें. सर्वत्र प्रायश्चित्त एकेच दिवशीं सदरहू तिथीस द्यावयाचा निश्चय केला असे, तरी सदरहू लिहिल्या तिथीस प्रायश्चित्त घेवणें ह्मणोन मामलेदारास चिटणिसी. पत्रें.

१ प्रांत कल्याण भिंवडी निसबत रामचंद्र कृष्ण यांस.

१ दुर्गोजी शिंदे किल्ले माहुली यांस.

---

officiated as priests at his *Shrvāṇi* or *Shrá dha* ceremonies. Those who had dined with the persons above referred to were also excommunicated but were to be admitted into the caste on the performance of certain penances, which were specified. A date was fixed for the performance of these penances. Sanads were issued to the officers of all the mahāls to give effect to these instructions.

१ प्रांत वसई निसबत विसाजी केशव यांस.
१ प्रांत बेलापूर निसबत बाजी गंगाधर.
१ प्रांत कर्नाळा व तर्फ अटगांव निसबत आनंदराव राम यांस.
१ तालुके अवचितगड निसबत आबाजी बल्लाळ, व भास्कर महादेव.
१ राघोजी आंगरे वजारत महासरखेल यांस.
१ तर्फ रेवदंडा निसबत आनंदराव शिंदे यांस.
१ जयराम त्रिंबक यांस, प्रांत राजपुरी येथील प्रायश्चित्ताविशीं.
१ तालुके रायगड निसबत गणपतराव कृष्ण यांस.
१ तर्फ सुवर्णदुर्ग निसबत मोरो बापूजी यांस.
१ तर्फ अंजणवेल निसबत कृष्णाजी विश्वनाथ यांस.
१ तालुके रत्नागिरी निसबत सदाशिव केशव यांस.
१ तर्फ विजयदुर्ग निसबत गंगाधर गोविंद यांस.
१ सुभा आरमार निसबत आनंदराव धुळप यांस.
१ तालुके देवगड निसबत बाळाजी गणेश यांस.
१ प्रांत मिरज निसबत पांडुरंगराव गोविंद यांस.
२ तालुके त्रिंबक देखील जवार तालुका मिळोन. पत्रें.
  १ धोंडो महादेव यांस.
  १ समस्त ब्राह्मण वास्तव्य त्रिंबक यांस.

---

२

१ मामले कोहज निसबत भिकाजी गोविंद यांस.
१ परगणा वाई निसबत भवानी शंकर हैबतराव.
१ कृष्णराव अनंत मुक्काम सातारा यांस.
१ मामले पाली निसबत माधवराव राम यांस.
१ परशराम रामचंद्र यांस, चिकोडी तालुक्याविशीं.
१ केसो बाबाजी यांस, जानोली तालुक्याविशीं.
१ तर्फ उंदेरी निसबत राणोजी बलकवडे यांस.
१ प्रांत जुन्नर निसबत रामराव त्रिंबक यांस.
१ तर्फ पटा निसबत बालकृष्ण केशव यांस.
१ प्रांत कराड निसबत श्रीनिवास शामराव यांस.
१ तालुके नेरळ निसबत राघो नारायण यांस.
१ तर्फ कायनई निसबत परशराम त्रिंबक यांस.

१ श्री देवस्थान चिंचवड यांस.

८ समस्त ब्राह्मण क्षेत्रस्थ यांस. पत्रें.

१ क्षेत्र नाशीक.
१ श्री शंभुमहादेव.
१ क्षेत्र पुणतांबें.
१ क्षेत्र वाई.
१ क्षेत्र करवीर.
१ क्षेत्र माहुली.
१ क्षेत्र वोझर.
१ क्षेत्र कराड.

८

१ बाबूराव सदाशिव परगणे बारामतीविशीं.

१ सदाशिव पंडित सचीव यांस.

१ खेम सावंत भोसले वाडीकर यांस.

१ सुबराव पंडित यांस.

१ श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यांस.

३ लष्करांत स्वारीस आहेत त्यांस. पत्रें.

१ बाजी गोविंद यांस.
१ रामचंद्र गणेश यांस.
१ भिवराव येशवंत यांस.

३

१ आबाजी पंडित यांस, तर्फ विशालगड येथील प्रायश्चित्ताविशीं.

१ बाळकृष्ण महादेव कमावीसदार परगणे नेवासें, फौर महाल, निसबत रामचंद्र नारायण यांस.

१ परगणे कर्डे रांजणगांव निसबत बाबूराव माणकेश्वर यांस.

१ परगणे कोडील निसबत गोविंदराम यांस.

१ मालोजी नाईक निंबाळकर फलटणकर यांस.

१ किल्ले प्रतापगड निसबत जैराम कृष्ण यांस.

२ मोरो विश्वनाथ यांचें नांवें.

१ तर्फ कलानिधी.
१ किल्ले दातेगड.

२

१ परगणे पारनेर निसबत महादाजी नारायण.

१ तालुके नगर निसबत विठ्ठल नारायण.

१ प्रांत पुणें निसबत रामचंद्र नारायण.

१ श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति स्वामी करवीर यांसी.

५ समस्त ब्राह्मण क्षेत्रस्थ यांस. पत्रें.

१ क्षेत्र परशराम.

१ क्षेत्र धोम.

१ क्षेत्रें टोकें, व कायगांव, व प्रवरासंगम.

१ क्षेत्र महाबळेश्वर.

१ हरिहरेश्वर.

५

१ परशराम रामचंद्र यांस लष्करांतील प्रायश्चित्ताविशीं.

२६ समस्त ब्राह्मण क्षेत्रस्थ यांस. पत्रें.

१ क्षेत्र थेऊर.
१ कसबे सासवड.
१ जेजुरी.
१ कसबे शिरवळ.
१ दिवे, व श्रीवर्धन.
१ कसबे वामोरी.
१ क्षेत्र पंढरपूर.
१ बावधन प्रांत वाई.
१ कसबे सातारे.
१ कसबे निंब प्रांत वाई.
१ प्रांत गंगापूर.
१ कसबे पाटण.
१ वूध.
१ कसबे खेड.
१ कसबे पाली.
१ चास.
१ तारळें.
१ कसबे भोर.
१ फलटण.
१ मौजे मेणवली प्रांत वाई.
१ अष्टागर प्रांत चेऊल.
१ कसबे तळेगांव.
१ वडूथ.
१ प्रांत जुन्नर.
१ संगमनेर.
१ उकसाण.

२६

१ तर्फ बीरवाडी निसबत बाबूराव पासलकर.

१ तर्फ शिवनेर निसबत उद्धो विरेश्वर.

१ आत्माराम रघुनाथ दिंमत सचिव भोरप० तर्फविशीं.

१ रामचंद्र शिवाजी परगणे वडरें.

१ परगणे सुपें निसबत आनंदराव त्रिंबक.

२ समस्त ब्राह्मणांचे नांवें.

१ क्षेत्र नरसिंहपूर.

१ कसबे इंदापूर.

---

२

१ परगणे इंदापूर निसबत गोपाळ भगवंत.

---

छ. १० जिल्काद.

१०१ (१००)

६२३–( ३९६ ) तोतयाकडील लोक किल्ले सिंहीगडावर होते, ते तुकोजी होळकर यांचे मार्फतीनें सरकारांत बोलोन किल्ला हवाला केला, त्याविशीं छ.२३ जिल्कादि चिटणिसी. पत्रें.

सबा सबैन मया व अलफ जिल्हेज २९

१६ लोकांचे नांवें अभयपत्रें कीं, तुह्मीं हुजूर येऊन रुजू जाहालेत, सबब तुम्हांस पत्रें सादर केलीं असेत, तरी तुह्मीं आपले गावीं जाऊन घरीं सुखरूप राहणें कोणेविशीं उपसर्ग लागणार नाहीं ह्मणोन. पत्रें.

१ रामजी नाईक सिवलकर कसबे पावस तर्फ रत्नागिरी यांस.

१ गणोजी नाईक गोळपकर तर्फ रत्नागिरी यांस.

१ चांद सावंत वस्ती दिवली तर्फ अंजणवेल.

१ बाळाजी हरी केळकर.

१ हिरोजी सिर्के, वस्ती कुडप तालुके अंजणवेल.

१ सदाशिव काशी वस्ती मौजे बोरपाडळ.

१ बाळाजी कोकणराव चव्हाण, वस्ती कळंबुसी तर्फ सोंदल, तर्फ अंजणवेल.

१ बाळाजी नाईक भोई, वस्ती वेळजलें, तर्फ देवळें महाल तालुके रत्नागिरी, ब्राह्मण असामीसुद्धां.

१ रामचंद्र बाबूराव वस्ती वडझीरें, तर्फ कर्डे.

१ खेरा सिंपी आसामी २०.

१ कमालखान सिंपी असामी पंचवीस एकूण.

---

( 623 ) Letters promising immunity from punishment were granted to the men of fort Sinhgad, who had joined the Impostor, but who afterwards handed back the fort to Government through the inspection intervention of Tukoji Holkar. They were permitted to repair to their homes, and orders were issued for their houses and property being restored to them.

A.D. 1776-77.

१ हरूनखान, असामी ४५.

१ गोविंद हरी बिडवलकर, वस्ती तर्फ देवगड.

१ गोविंद कानो वस्ती वरवडें, तर्फ देवगड, लोकसुद्धां.

१ हैबतराव शिंदे व जनापा शिंदे वस्ती कणेरखेड यांस.

१ लिंगोरुद्र.

---

१६

पत्रावर बार केले नाहीं, दाखल्यास लिहून ठेवली असेत.

६ मामलेदारांस पत्र कीं, लोकांस आपले घरास जावयास निरोप दिल्हा असे, तरी घरांची वगैरे जप्ती केली असल्यास, मोकळी करून वस्तभाव यांची यांस माघारी देणें. कोणेविशीं तोसीस न करणें ह्मणोन. पत्रें.

१ कृष्णाजी विश्वनाथ, तर्फ अंजणवेल यांसी, चांद सावंत याविशीं.

३ सदाशिव केशव, तर्फ रत्नागिरी याचे नांवें.

१ रामजी नाईक सिवलकर वस्ती पांवस.

१ गणोजी नाईक गोळपकर.

१ बाबाजी वलद भोई.

---

३

१ खेम सावंत भोसले सरदेसाई मामले कुडाळे, वगैरे महाल यांस, हरूनखान लोक सुद्धां याविशीं.

१ बाळाजी गणेश, तर्फ देवगड यांस गोविंद हरी बिसवलकर याविशीं.

---

६

१ हवालदार व कारकून किल्ले मदनगड यास, निळो बाबाजी याविशीं, याचीं भांडीं किल्ले मजकुरीं पेठेंत रामसेट कासार याचे घरीं ठेविलीं आहेत, तीं याचे स्वाधीन करणें ह्मणोन.

५ किल्ले मामलेदारांस पत्रें कीं, लोकांस आपले घरांस जाण्यास निरोप दिला असे, तरी यांचे घराची जप्ती केली असल्यास मोकळी करणें; आणि यांची वस्तभाव माघारी देणें ह्मणोन

२ कृष्णाजी विश्वनाथ, तर्फ अंजणवेल, यांचे नांवें.

१ बाळाजी कोकणेराव चवाण याविशीं.

१ हिरोजी सिर्के याविशीं.

---

२

१ गंगाधर गोविंद, तर्फ विजयदुर्ग, यांस रहिमानखान असामी ३७ याविशीं.
१ बाबूराव माणकेश्वर परगणा कर्डे रांजणगांव यांस, रामचंद्र बाबूराव वस्ती वडझरें याविशीं.
१ बाळाजी गणेश तर्फ देवगड, यांस गोविंद काणे लोकसुद्धां याविशीं.

५

२ हैबतराव शिंदे, व जनापा शिंदे, वस्ती कणेरखेड, यांसी लोकसुद्धां घरास जाण्यास निरोप दिला असे, त्यास यांचे घराची जप्ती केली असल्यास मोकळी करणें. जप्तीमुळें मुलेंमाणसें परागंदा जाहलीं आहेत. त्यास कौल देऊन गांवीं आणावीं; व निसबतीचे लोकांचीं मुलेंमाणसें गांवीं आणावीं, याविशीं. पत्रें.
१ श्रीनिवास पंडित यांस.
१ कृष्णराव अनंत, जिल्हा सातारा यांस.

२

३०

६२४–( ४०० ) तर्फ हवेली पाल, येथें तोतया आला, तेव्हां सरकार शिलकेचीं, व रयतेचीं भातें होतीं, तीं नेलीं, व तोतया पळोन गेल्यावर शिंदे घाटाखालीं उतरले, याजमुळें रयत परागंदा जाहली. शेतें जागाजागाचीं उभींच गळालीं; व कांहीं फौजेचे दळवाटानें गेली, आणि सरकारचा तो महसूल द्यावा लागेल याजकरितां रयत यावयासी अनमान करित्ये, ह्मणोन हुजूर विदित जाहलें. त्याजवरून हें पत्र सादर केलें असे. रयत तजावजा जाहली आहे, तीस कौल देऊन गांवीं आणणें; व फौजेमुळें शेतें वगैरे पायमाली जाहली असेल, त्याची चौकशी करून,

सबा सबैन मया व अलफ जिल्हेज २९

(624) It was represented to Government that the Impostor on his arrival at Tarf Haveli Pál took away all grain belonging to Government as well as to rayats, that after he had run away, Scindia marched down the Ghauts, that the rayats consequently left their villages, that the crops were destroyed for want of men to cut them down and also in consequence of the movements of the Government army through the province, and the rayats feared that they would be called upon to pay the revenue notwithstanding the above circumstances. The officer of the Parganá prayed that a Kowl might therefore be given by Government to the villages. The request was complied with and orders were issued that the Tarf in question should receive the same remissions as other Tarfs.

A. D. 1776-77.

जसा सर्वत्र प्रांतांत पायमल्ली मजुरा द्यावयाचा शिरस्ता पडेल, त्याप्रमणें तर्फ मजकूरचे रयतेस पायमल्ली मजुरा देणें, जाजती उपद्रव न देणें ह्मणोन, बाजी गोविंद यांचें नांवें चिटणिसी छ. २२ जिल्हेज. पत्र १.

६२५–( — ) महालानिहाय येथील सरदार लोक व शिपाई लोक तोतयास मिळोन होते, त्यास सरदार लहान, व मातबर पाहून वीस पंचवीसपासून पन्नास रुपये, व शिपायी लोक यांजपासून पंधरा रुपयेपर्यंत दरअसामीस गुन्हेगारी घ्यावयाचा करार करून, हें पत्र सादर केलीं असेत, तरी सदरहू लिहिल्याप्रमाणें गुन्हेगारी घेऊन ऐवज जमा करणें, हुजुरून वराता होतील त्यास वराताप्रमाणें ऐवज देणें ह्मणोन, कमाविसदारांस. सनदा.

सबा सबैन मया व अलफ मोहरम, ९

१ तालुके अवचितगड निसबत आबाजी बल्लाळ, व भास्कर महादेव यांस.

१ प्रांत राजपुरी निसबत गोविंदराव माणकर यांस.

---

२

परवानगी रूबरू.

## भिवराव यशवंत पानसी यांच्या कीर्दीपैकीं.

६२६–( ४१४ ) कमावीस, बद्दल सुखनिधान तोतया याणें किल्ले राजमाची येथें, गडदेंत सोनें रुपें वगैरे ठेविलें होतें, तें आबाजी यादव मजमदार प्रांत वसई यांणीं मोजदाद करून आणिली त्यापैकीं.

सबा सबैन मया व अलफ मोहरम ११

जमा रुपये.

९९८॥। पुतळी तांटें २०० एकूण वजन तोळे ६३।२ दर १५॥

११२८६।≡ सोनें तोळे एकूण.

५४६३॥= प्रत तोळे ३६४८२॥।१ दर १५

३२४६॥। प्रत तोळे २२९॥।१।१ दर १४८=

७१६॥।=॥ प्रत तोळे ५१८२॥ दर १४

१३६९८॥ प्रत तोळे ७८॥ (१०१॥) दर १३॥

२६० प्रत तोळे २० दर १३

११२८६।≡(११०५६।=)७७६॥।०॥(७६६॥।०॥)

---

( 625 ) All the Sardárs and men in Táluká Awachitgaḍ in **Pránt** Rájpuri who had joined the Impostor were fined, the former at a sum varying from Rs. 20 to 50 each and the latter at Rs. 15 each.

A. D. 1776-77.

( 626 ) Property kept by Sukhnidhán Impostor in the fort of **Ráj**máchi was attached.

A. D. 1776-77.

१२३२६। रुपें रुपये भार १२३४३।।। पैकीं वजा खोटें रुपें गाळून जमा होईल, सबब भार २१।। बाकी. जमा.

---

२४६११।।

७५० (१५०) माळ रुद्राक्ष, व मोत्यें मिळोन.

८५ मोत्यें.

८५ रुद्राक्ष जुने.

---

१७०

पैकीं मोत्यांची किंमत दर मोत्यास रुपये १।। प्रमाणें.

---

२४७६१।।

१० चमचा दगडी लाल १

---

२४७७१।।

६२७–( ४१५ ) इनाम खर्च जासूद दिंमत महादजी शिंदे असामी २ तोतयास धरलियाची खबर घेऊन आले, सबब परवानगी रूबरू तिवटें एकूण आंख.

सबा सबैन मया व अलफ मोहरम ११

| | |
|---|---|
| १२।। बाबूजी | १ |
| १० आनाजीस | १ |
| २२।। | २ |

## जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

६२८–( ४४२ ) बलवंतराव मल्हार दिंमत हुजरात, याजकडे मौजे सोंव, परगणे महाड, तालुके रायगड, हा गांव आहे, त्यास त्याचे भाऊ तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडे गेले होते, सबब; व याचे दुसरे बंधु तोतयाकडे गेले, याजकरतां मौजे मजकूरची जप्ती सरकारांत केली होती, त्यास तीर्थरूपां-

सबा सबैन मया व अलफ रविलावल २९

---

( 627 ) Reward was given to messengers of Máhádji Scindia who brought news of the arrest of the Impostor.

A. D. 1776-77.

( 628 ) Balvantrao Malhár employed under the Sátárá Rájá held the village of Sowa in Parganá Mahád. One of his brothers having gone over to Dádásáheb and another having joined the Impostor, the village was attached. He now represented that

A. D. 1776-77.

कडून सर्वांबरोबर याचे भाऊ इकडे आले; व तोतयाकडे जाण्याचें कारण याणीं विदित केलें कीं, आपला गांव तोतयानें इंग्रजास द्यावयाचा करार करून आपले भावास बोलाविलें. न जावें तरी गांव जातो याजकरितां गेले, याखेरीज दुसरी लबाडीची गोष्ट केली नाहीं; ह्मणोन विनंति केली, त्यावरून येविशीं जामीन हुजूर घेऊन, मोजे मजकूरची जप्ती मोकळी करून, हें आज्ञापत्र सादर केलें असे, तरी जप्ती उठवून गांव पेशजींप्रमाणें याजकडे चालता करणें; व जप्तीमुळें वसूल घेतला असेल, तो माघारा देणें ह्मणोन; महादाजी बल्लाळ कारकून शिलेदार याचे नांवें चिटणिसी छ. २० मोहरम. पत्र १.

येविशीं मोकदम मौजे मजकूर अंमल सुरळीत देणें ह्मणोन. १.

२

सबा सबैन मया व अलफ रविलाखर २६

६२९–( ४५७ ) तालुके रेवदंडा येथील लोकांनीं सालमजकुरीं तोतयाचा वेढा बसला होता; तेसमयीं चाकरी मेहनतीनें केली; सबब लोकांस पेस्तर साल सन समान सबैनपासून जाजती नेमणूक करून दिल्ही त्याचीं वगैरे. कलमें.

१ आतफागिरे सरदारास नवीं दिल्हीं त्यास आतफागिरे यांस तैनात शाईशिरस्ता दरमहा रुपये.

| | |
|---|---|
| ५ जावजी शिंदे | १ |
| ५ लक्ष्मण नाईक मदनळीकर | १ |
| ५ बाजी बागराव | १ |
| ५ गोविंदराव जवार | १ |
| ५ गोविंदराव दरेकर | १ |
| ५ रामजी शिंदे | १ |
| ३० | ६ |

---

his brother who had gone over to Dádásâheb had returned to the side of Government along with others, and that his second brother joined the Impostor through fear of losing the village in question, as it was promised by the Impostor to the English. A security was taken from Balvantrao, and the attachment placed over his village was ordered to be removed.

A. D. 1776-77.

( 629 ) Rewards were given to and honors conferred on men and officers of Táluká Rewadandá, who did good service during the siege of the Impostor in the current year.

एकूण सहा असामी यांस तैनात शाईशिरस्ता तीस रुपये करार केले असेत, तरी सदरहू सहा असामी सरदारांकडे चालवून रोजमरे शिरस्तेप्रमाणें देत जाणें. कलम.

१ दिवट्ये सरदारांस करार करून दिल्हे त्यास तैनात, व तेल दरमहा. शाईशिरस्ता.

| | आसामी | तैनात | पक्कें तेल वजन. |
|---|---|---|---|
| जावजी शिंदे | १ | ३ | ८८२॥ |
| गोविंदराव दरेकर | १ | ३ | ८८२ |
| गोविंदराव जवार | १ | ३ | ८८२ |
| राजोजी राणे | १ | ३ | ८८२ |
| दसोजी वणजारे | १ | ३ | ८८२ |
| राघोजी मोरे | १ | ३ | ८८२ |
| गोपालजी नाईक मदनळीकर | १ | ३ | ८८२ |
| | ७ | २१ | ८।४॥ |

एकूण सात आसामी यांस तैनात शाईशिरस्ता एकवीस रुपये व तेल दिवटीस, दरमहा साडेचवदा शेरप्रमाणें; करार करून दिल्हे असे; सदरहूप्रमाणें पाववीत जाणे. कलम.

१ इजाफा लोकांस तैनात दरमहा रुपये १५० दीडशें करार केली असे; तरी जे लोक या मसलतींत कामास मेहनतीस उपयोगी पडले असतील, त्यांस नांवनिशीवार कदीम शिरस्त्याप्रमाणें इजाफा सदरहू दीडशें तैनातपैकीं रोजमरा शिरस्तेप्रमाणें पाववीत जाणें. कलम.

१ जावजी शिंदे यास चवरी दिल्ही; त्यास चवरीबारदार असामी १. एकूण तैनात आकारमाही शिरस्ता दरमहा रुपये ४ चार करार करून दिल्हे असेत; तरी सदरहू असामी यांजकडे चालवून रोजमरे शिरस्तेप्रमाणें देत जाणें. कलम.

१ बाळपर्वेसी लोक तोतयाचे लढाईत ठार जाले. त्यांस मोईन सालीना. रुपये.

६० दिंमत जावजी शिंदे.

३५ बाजीराव मालुसरे याचे आईस, व बायकोस.

२५ संभाजीराव कदम याचे आईस, व बेट्यास.

६०

४० माजी रायगडकरी दोन असामी ठार झाले त्याची बाळपर्वेसी तालुके मजकुराकडे नेहमीं नेमणूक करून दिल्हे ते.

२० संभाजी जागड, दिंमत बाबूराव दरेकर याचे आईस, व भावास.

२० अबदुल रहिमान, दिंमत लक्ष्मण गणेश याचे आईस, व भावास.

---

४०

---

१००

एकूण शंभर रुपये नेमणूक करून दिल्ही असे, पाववीत जाणें. कलम.

१ शिरस्ते मुबदला सरदाराची तैनात पेशजीं शाईशिरस्ता होती, ते दूर करून मोईन करार केली असामी ४ पैकीं ऐन २, व पोर्गे २.

एकूण सालीना रुपये.

२०० गोविंदराव जठार असामी २
पेशजींची तैनात रुपये २५ पंचवीस दूर करून हल्लीं.

२०० बाजी बागराव असामी २
पेशजींची तैनात रुपये १८ अठरा दूर करून हल्लीं.

---

४००

एकूण चारशें रुपये मोईन सालीना करार केली असे, चाकरी घेऊन सदरहू वेतन पावविीत जाणें. कलम.

१ बाबूराव कदम भंडारी मुकादम याचा बाप महादजी नाईक फितूर होता. त्याचें पारिपत्य जाहलें, त्यास बाबूराव कामाचा माणूस, सबब मोकादमी पेशजींप्रमाणें याजकडे करार केली असे, तरी वर्तणुकेस जामीन सरसुभा चौकशीनें देऊन कतबा सरसुभा देणें; आणि याजपासून चाकरी घेऊन पेशजींप्रमाणें रोजमरा व अडीसरी देत जाणें. कलम.

१ कानोजी धर्मोजी नाईक आमटे आगरी भंडारी जदीद असामी १ एक यासी दरमहा

नक्त दसमाही शिरस्ता तैनात रुपये. अडिसेरी भात. कैली मापें.

४ ८१।

एकूण चार रुपये दसमाही पथक शिरस्ता तैनात व अडिसेरी सवामणप्रमाणें करार केली असे, तरी वर्तणूकेस जामीन घेऊन कतबा हुजूर पाठवणें; आणि यांजपासून चाकरी घेऊन रोजमरा व अडिसरी शिरस्तेप्रमाणें देत जाणें. कलम.

१ दमाजी नाईक जगदळे यानीं रायगडकर दिंमत हुजूर हशम तालुके मजकुरीं नामजाद आहेत, त्यास दिवट्या असामी १ तैनात शाईशिरस्ता दरमहा रुपये तीन

व दिवटीस तेल दरमहा वजन, पक्के ८८२ दोन शेरप्रमाणें करार करून दिल्हें असे, तरी सदरहूप्रमाणें देत जाणें.

---

९

कलम.

एकूण नऊ कलमें करार करून हे सनद सादर केली असे, तरी सदरहूप्रमाणें पेस्तर सालापासून वर्तणूक करणें ह्मणोन, आनंदराव शिंदे याचे नांवें. छ. २०रबिलाखर. सनद १.

रसानगी यादी, पुरंदर.

६३०-( ५४२ ) केसो बाबाजी किल्ले विसापूर यांणीं हुजूर विनंति केली कीं, कसबे मजकुरीं सालगुदस्तां तोतयाचे पारिपत्यास माहादजी शिंदे फौजसुद्धां गेले तेव्हां जळाला त्यामुळें रयत परागंदा जाहली. कसब मातबर उदमी खुमाविना बाजारची अमदानी होत नाहीं. आठा दिवशीं बाजार भरतो, त्यास उदमी खुमाकडे जकातीचा मक्ता सवाशें रुपये आहे, तो तीन सालें माफ केल्यास पूर्ववतप्रमाणें रयत येऊन वसाहत होईल ह्मणोन; त्याजवरून मनास आणितां सालगुदस्तां महादजी शिंदे तोतयाचे पारित्यास फौजेसुद्धां गेले, तेव्हां कसबे मजकूर लुटला, यामुळें रयत परागंदा जाहली, त्यास आबादीवर नजर देऊन जकातीचा मक्ता उदमी खुमाबद्दल दरसाल रुपये १२५ सवाशें आहे, तो सालमजकूर, व पेस्तर सन तिसा सबैन दुसाला माफ केला असे, तरी तुह्मीं कसबे मजकुरीं येऊन आबादी करणें. माफी दोन सालें भरलीयावर मक्त्याप्रमाणें दरसाल वसूल देत जाणें ह्मणोन, वाणी उदमी वगैरे खुम कसबे खालापूर तर्फ बेरेटी, प्रांत कल्याण यांचे नांवें.

समान सबैन मया व अलफ सफर २६

कौल १.

जकात प्रांत कल्याण भिंवडी निसबत भिकाजी विश्वनाथ याचे नांवें कीं, कसबे खालापूर तर्फ बेरेटी येथील उदमी खुमाकडे जकातीचा मक्ता सवासें रुपये दरसाल आहे, तो सालमजकूर व पेस्तर सन तिसा सबैन दुसाला अडीचसें रुपये माफ खर्च लिहिणें. पुढें दोन साला माफी भरलीयावर मक्त्याप्रमाणें दरसाल वसूल घेत जाणें ह्मणोन. सनद १.

---

२

रसानगी याद. छ. २ जिल्हेज. पुरंधर.

---

(630) The village of Visápoor was burnt during the march of Mahádji Scindia with his army against the Impostor in the preceding year. The inhabitants of the village absconded and trade languished. In order to induce traders to take up their business, octroi yielding Rs. 125 every year was remitted for 2 years.

A. D. 1777-78.

६३१–( ७६८ ) जमा जामदारखाना.

कमाविस भेट सनगें, एकूण रुपये.

सलास समानीन मया व अलफ रजब १६

कमाविस बाबद तोतया राजमाचीहून सन सबा सबैनांत पळोन गेला, ते समयीं रामराव नारायण मामलेदार याचे घरीं जिन्नस होता तो हुजूर आणविला त्यापैकीं गुजारत नारो अनंत, व शंकरभट वैद्य निसबत मशारनिल्हे सनगें एकूण चौपट आंख.

| | | |
|---|---|---|
| ११० | तिवटें | ६ |
| ४० | तिवट कळसपाकी | १ |
| १४४ | शेले साधे | २॥= |
| २२५ | किमखाप | १ |
| ६० | ताफ्ता कद | ।॥≡ |
| ३५५४ | मुशेजरे | २१ |
| ४१३३ | | ३२॥‒ |

# १. राजकीय

## ( क ) इतर माहिती. ( देशांतील बंडें. )

### २ भिल्ल व कोळी.

६३२–( ११० ) तालुके पटा या प्रांतीं कोळ्यांचा उपद्रव जाहला आहे. तालुके मजकुरीं लोकांची नेमणूक आहे त्याखेरीज जाजती लोक पाहिजेत, सबब गंगापुराहून व हुजुरून स्वार व लोक रवाना केले आहेत. ऐशास कोळ्यांचा बखेडा निवारण न जालियास मसलतीवर पडतें, यास्तव

खमस सबैन मया व अलफ रमजान २१

(631) The Impostor having fled in A. D. 1776-77 from fort Rájmáchi, his property found at Mámlatdár Rámrao Nârâyan's house was attached and is credited on this date.

A. D. 1782-83.

1 POLITICAL MATTERS.

(C) Risings in the country,

2. By Bhils and Kolis.

(632) There being a disturbance of the Kolis in Táluká Patá, some men were sent to quell the disturbance.

A. D. 1774-75.

कोळ्यांचा बंदोबस्त करावयासी कार्याकारण जदीद लोक ठेवून कोळ्यांचें पारपत्य करणें. पारपत्य जाहल्यावर दूर करणें ह्मणोन, बाळकृष्ण केशव तालुके पटा, यास. सनद १.

रसानगी यादी.

## नारो आपाजीच्या कीर्दींपैकीं.

६३३–( १८७ ) कोळ्यांनीं दंगा बहुत केला आहे ह्मणोन तुह्मीं विनंतिपत्रें पाठविलीं, तीं पावलीं. ऐशास संताजी सीरकंद्या कोळी तो हस्तगत जाहला असतां कोळी दंगा करितात ही गोष्ट ठीक नाहीं; तरी तुमच्या तालुक्यांत कोळ्यांचीं घरें आहेत, व कोळ्याच्याच पाटीलक्याही आहेत. त्यास कोळ्यांचीं घरें व पाटीलक्या जप्त करणें. व रयत कोळी जे सांपडतील ते कैदेंत ठेवणें. रयत ह्मणोन कोळी यांस सोडतां कामा नये. दिवसास रयत, रात्रीं आपले कर्मास प्रवर्ततात. याजकरितां लिहिल्याप्रमाणें शोध करून बंदोबस्त करणें. तुह्मीं राऊत व लोक पाठवून द्यावयाविशीं लिहिलें. त्याजवरून हल्लीं गाडदी निसबत बापूजी हरी असामी १०० शंभर पाठविले आहेत. हे सत्वरच येऊन पोहोंचतील. व दोन पागा मागाहून तयार केल्या आहेत येऊन पोहोंचतील. बंदोबस्त करणें. ह्मणोन. छ. १२ मोहरम. पत्रें.

खमस सबैन मया व अलफ रबिलाखर ५

१ तालुके शिवनेर निसबत उद्धो विरेश्वर याचे नांवें कीं, गाडदी व पागा तुह्मांकडे रवाना केल्या आहेत, त्यास तुमचे तालुक्याचा बंदोबस्त जाहल्यावर तालुक पेटा निसबत बाळकृष्ण केशव याचे तालुक्यांत कोळ्यांचा दंगा जाहला आहे, तरी तिकडे गाडदी पागा रवाना करणें.

१ तालुके पेटा निसबत बाळकृष्ण केशव याचे नांवें कीं, तालुके शिवनेर वगैरे जागा कोळ्यांनीं दंगा केला आहे त्याचे बंदोबस्त हुजुरून दोन पागा व गाडदी असामी शंभर असे रवाना केले आहेत. ते तालुके मजकूरचा बंदोबस्त करून तुह्मांकडे लौकरच येऊन पोहोंचतील.

---

२

---

( 633 ) The Koḷis having raised an insurrection in Táluká Siwaner and Peṭá, 100 Gárdis and 2 detachments of cavalry were sent to put it down. The officers of the Tálukás were further directed to attach the houses and Páṭil-watans of Koḷis in their Tálukás, and to keep in confinement all rayats of the Koḷi caste. It was remarked that these people call themselves rayats during day and take to their evil deeds at night, and that they should not therefore be left at large.

A. D. 1774-75.

६३४-( २०६ ) यादवराव रघुनाथ यास सनद कीं, तालुके कुकरमुंढें येथें माधवराव कदम बांड्ये यांणीं भिल्ल मेळवून दंगा करितात, ठाणें तोरखेड पैकीं पागा दिंमत बाबूराव निकम पथक सुद्धां, व शंभर गारदी देऊन, रोजमऱ्याची बेगमी करून, तालुके मजकुरीं जलदीनें रवाना करणें. ठाणें तोरखेड येथील बंदोबस्त यथास्थित राखणें ह्मणोन.

सीत सबैन
मया व अलफ
रबिलाखर १२

सनद १.

रसानगी यादी.

## जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

६३५-( २२५ ) कोळ्यांनीं उपद्रव मुलुखांत मांडिला आहे. त्याचा बंदोबस्त जाला पाहिजे, यास्तव संभाजी जाधवराव यांचें पथक सरंजामी स्वार असामी १६५ एकशें पासष्ट तुह्मांकडे पाठविले आहेत, तरी हे तेथें पोहोंचल्यावर गणती घेऊन, यांजबरोबर आणखी महालपैकीं कुमक देऊन, परगणे मजकुरानजीक वगैरे जेथें जेथें कोळी उपद्रव करीत असतील त्या ठिकाणीं पाठऊन, कोळ्यांचें पारपत्य चांगलें करून बंदोबस्त यथास्थित करणें ह्मणून, नारो बाबाजी कमाविसदार परगणे पारनेर यांसी छ. २० जमादिलावल.

सीत सबैन
मया व अलफ
जमादिलाखर २९

परवानगी रूबरू.

६३६-( २४९ ) तालुके शिवनेर येथील किल्ले हायचे हवालदार. असामी

१ सोनजी सावंत, हवालदार किल्ले कुंजरगड.

१ संताजी सावंत हवालदार किल्ले हरिश्चंद्र.

———

२

सीत सबैन
मया व अलफ
रमजान ३०

एकूण दोन असामी कोळ्यांचे बंदोबस्ताबद्दल हुजुरून जुन्नर प्रांतांत गोपाळ बल्लाळ कारकून शिलेदार पाठविले होते. त्यासमागमें चाकरीस दिल्हे होते, ते फिरोन किल्याचे किल्यास पाठविले असेत, तरी पूर्ववत्प्रमाणें यांचे हातून हवाल्याचें कामकाज घेऊन रोज-

---

( 634 ) Madhavrao Kadam Bandye, having collected Bhils, was creating a disturbance in Táluká Kukarmundhe. A detachment was sent against him.

A. D. 1775-76.

FROM JANÂRDAN APPÂJI'S DIARY.

( 635 ) The Kolis having created a disturbance in Parner, a detachment was sent against them.

A. D. 1775-76.

( 636 ) Sonji and Santáji Sáwants, Haváldárs of forts Kunjargad and Harishchandra, who were deputed to assist the detachment sent against the Kolis, were now permitted to rejoin their former posts. In consideration of the cold climate of fort Kunjargad, Sonji was permitted to serve for two months in the year at the Táluká leaving his brother in charge of the fort.

A. D. 1775-76.

मरा वगैरे नेमणूकेवरहुकूम पावीत जाणें. कुंजरगडचा हवाला सोनजी सावंत याजकडे आहे. त्यास किल्ला सरदींचा, यास्तव प्रजन्यकाळीं याची चाकरी सालमजकुरीं दोन महिने सुभा घेऊन त्याचे भाऊ बावजी सावंत याजपासून किल्ले मजकूरचे हवाल्याचें कामकाज दोन महिने घेणें. दोन महिने जाहलियावर पूर्ववत्प्रमाणें सोनजी सावंत याचे हातें काम घेणें ह्मणून, उद्धो वीरेश्वर यांचे नांवें. छ. २३. साबान. रसानगी यादी.

६३७–( २६६ ) संगमनेर प्रांतें कोळ्यांची गडबड आहे, त्यास दोन तीनशें पावेतों नवें माणूस ठेवण्याची आज्ञा व्हावी, ह्मणोन तुह्मीं लिहिलें, ते कळलें. त्यास तीनशें माणूस चांगलें ठेवून बापूजी हरी तिकडे कोळ्यांचे पारिपत्यास गेले आहेत, त्यांस सामील होणें.

सीत सबैन
मया व अलफ
जिल्हेज २९

६३८–( २८४ ) कोळ्यांनीं मळई केली आहे. त्यांसीं तहाचें बोलणें धोंडो महादेव तालुके त्रिंबक यांणीं लाविलें आहे. त्याजविशीं.

सीत सबैन
मया व अलफ
रबिलाखर १५

परवानगी रूबरू.

सनदा.

१ जावजी नाईक बकले, व संताजी नाईक सिरकंदे, व खोड भांगरे, व समस्त सरदार कोळी यांचे नांवें कौल कीं, वेदमूर्ती गोपीनाथ दीक्षित, व धोंडो महादेव यांणीं पंढरपूरचे मुक्कामीं येऊन तुह्मांविषयीं विनंति केली कीं, मागील अपराध क्षमा करावे. सरकारचीं स्थळें सरकारांत हवाला करितात. याजउपरी सरकारांत याजपासून अंतर पडणार नाहीं; ह्मणून कितेक प्रकारें तुह्मांविशींची खातरजमा उभयतांनीं केली. त्याजवरून येविशींची आज्ञा मशारनिल्हे जवळ करून हें आज्ञापत्र तुह्मांस सादर केलें असे, तर बेवसवसा यांसी रूजू होऊन सरकारचीं स्थळें वगैरे धोंडो महादेव यांचे हवालीं करणें. लिहिल्याप्रमाणें तुह्मांकडून अमलांत आल्यावर, यामागें तुह्मांपासून अपराध जाहले असतील, ते माफ केले जतील ह्मणून.

---

( 637 ) Owing to the disturbance of the Koḷis in Prānt Sangamner, 200 or 300 men were ordered to be newly entertained in the province.

A. D. 1775-76.

( 638 ) Jiwáji Naik Bakle, Santáji Naik Sirkande and other Koḷi Sardárs being desirous of reconciliation with Government the following terms were offered to them through Dhoṇḍo Mahádeo, officer of Trimbak—

A. D. 1775-76.

1 That they should surrender all the places belonging to Government taken by them, and that on their doing so all their previous offences would be condoned.

१ बाळकृष्ण केशव तालुके पटा यांस कीं, किल्ले मजकूर येथें कोळी व कोळ्यांच्या बायका कैदेंत असतील, त्या धोंडो महादेव तालुके त्रिंबक यांजकडे देविल्या असेत, तरी मशारनिल्हे तुह्मांस लिहितील त्याप्रमाणें त्यांजकडे पाठऊन देणें ह्मणून.

१ धोंडो महादेव तालुके त्रिंबक यांस कीं तालुके राजूर परगणे अकोले येथील जमीदार कोळ्यांचे मळईत होते. त्यांस पांडुरंग कृष्ण गडबोले यांणीं धरून हुजूर आणिले आहेत. ते अपराधी, सबब त्यांणीं सरकारांत गुन्हेगारी द्यावयाची कबूल केली आहे, त्यास जमीदारास आपले स्वाधीन करावें ह्मणून तुह्मीं विनंति केली, त्याजवरून तुह्मांकडे देविले असेत, तरी यांणीं कोळ्यांचे मळईत मिळूं नये वगैरे बदफैलीची वर्तणूक करूं नये, येविशीं जामीन घेणें; आणि सरकारची गुन्हेगारी घेऊन तालुके मजकूरचे हिशेबीं जमा करणें. संताजी सिरकंदा कोळी याजकडील कारकून राजाराम महादेव हुजूर आणिला होता. तो व किल्ले पटा येथें कोळी, व कोळ्यांच्या बायका अटकेस आहेत, त्या तुह्मांकडे देविल्या आहेत तरी कोळ्यांचे बंदोबस्ताविशीं त्यांसीं तुमचें बोलणें लागोन तहत येईल त्याप्रमाणें करणें ह्मणून. सनद १.

छ. १४ रबिलाखर.

---

२
६३९–( ३१५ ) प्रांत कल्याण भिंवडी येथील हशमनिशी लक्ष्मण गोपाळ याजकडे आहे, त्यास प्रांत मजकूरपैकीं सालगुदस्तां किल्ले कोळ्यांनीं घेतले होते, ते सरकारांत घेऊन सरसुभाकडे ठेवले आहेत, तेथील हशमनिशीचें कामकाज मशारनिल्हेचे हातें घेत नाहीं, ह्मणोन हुजूर विदित जाहलें, त्यास लक्ष्मण गोपाळ याचे हातें किल्ले हाय येथील हशमनिशीचें कामकाज पेशजींप्रमाणें घेणें; येविशीं विसाजी केशव, सरसुभा प्रांत कोंकण, याचे नांवें. सनदा.

सबा सबैन
मया व अलफ
जमादिलाखर २९

१ हशमनिशीचें कामकाज घेणें ह्मणोन.

१ सालगुदस्तांचें वेतन पावलें नाहीं, त्यास नेमणूकप्रमाणें देणें ह्मणोन.

---

२ रसानगी यादी.

---

1 That all the Koḷi prisoners, male and female, at fort Paṭá should be released and made over to Dhonḍo Mahádeo who should send them back to Government if the above offer was not accepted.

(639) It is stated that some forts in Pránt Kalyáṇ were in the preceding year taken by the Koḷis and were subsequently retaken by Government.

A. D. 1776-77.

६४०–( ३३२ ) रामजी राजकुवर, व जावजी नाईक बांबळे, व येसाजी नाईक कोकाटे, वगैरे मावळे कोळी वस्ती कसबे जुन्नर प्रांत मजकूर, यांस अभय पत्र कीं, तुकोजी होळकर यांणीं तुह्मांविशीं विदित केलें कीं, सदरील तिघे नाईक कोळी आपल्या विद्यमानें सरकारांत रुजू जाहले. सरकार चाकरी एकनिष्ठपणें करावी ऐसा करार केला. याजकरितां सदरील तिघे नाईक बमये बिरादरीचे लोकांस कौल सरकारचा मुलुख लुटिला, व किल्ले घेतले, ते सरकारांत दिल्हे, व खून केले, मुलकांत खंडण्या घेतल्या. यास्तव सर्व अन्याय माफ करून कृपाळु होऊन, कौल द्यावा, ह्मणोन विनंति केली. ऐशास तुह्मीं मशारनिल्हेचे विद्यमानें सरकारांत येऊन रुजू जाहलां. सरकार चाकरी करून दाखवणार, याजकरितां सर्व अन्याय माफ मशारनिल्हेचे मारुफातीनें करून, हें अभयपत्र सादर केलें असे, तरी याउपरी सरकारचे आज्ञेप्रमाणें सेवाचाकरी करून वर्तणूक करणें ह्मणोन अभय.

सबा सबैन मया व अलफ रमजान ३

पत्र १.

६४१–( ३३३ ) जावजी बांबळा, याजकडील लोक खाडे, व भांगरे, व पिचुंड राजूर वगैरे शिपाई लोक सुद्धां जावजी हुजूर येऊन रुजू जाहाले. एकनिष्टपणें वर्तणूक करावयाचा करार, तुकोजी होळकर यांचे विद्यमानें जाला आहे, याजकरितां यांचे निसबतीचे लोक सोडावयाविशीं होळकरांनीं विनंति केली, त्याजवरून जावजीचे मळईचे संमंधीक याचे बिरादरीचे कोळी सोडावयाचा करार केला असे, तरी यांस जामीन चांगला घेऊन, चौकशी करून, खंड न मागतां सोडून देणें ह्मणोन, येविशीं चिटणिसी.

सबा सबैन मया व अलफ रमजान ७

पत्रें.

१ परशराम त्रिंबक यास कीं, किल्ले कावनई येथें भोईर अटकेस आहे त्याविशीं.

१ दुर्गोजी शिंदे यास कीं, किल्ले माहुली येथें असामी.

१ खंडोजी वाघ याची बायको.

३ कित्ता बंदीवान असामी.

४ चार असामी सोडवायाविशीं.

---

(640) Through the intercession of Tukoji Hoḷkar, the following Koḷis viz. Rájkuwar, Jáwaji Naik Bámbaḷe and Esáji Naik Kokáṭe, and their clans residing at Junnar were granted a free pardon for all past offences viz. rising in arms against Government, taking forts, plundering Government territory and committing murders, on condition of their agreeing to serve Government with loyalty.

A. D. 1776-77.

(641) Jáwaji Bámbaḷá and his clansmen having surrendered to Government, orders were issued to the several forts to release their relations after taking security from them, but without demanding any fine.

A. D. 1776-77.

१ बाळाजी जनार्दन यास, किल्ले लोहगड येथें असामी अटकेस आहेत, ते असामी.

२ बायका, लांघे वगैरे.

२ पोरगे.

——

४ चार असामीविशीं.

१ बाळकृष्ण केशव यांस, किल्ले पटा येथील असामी.

१ भवानी तलपाड याची बायको.

३ टिकाराम परदेशी, भाऊसुद्धां, शिवाय माणसें टिकारामाचीं.

——

४ चार असामीविशीं.

१ नीळकंठराव रामचंद्र यास कीं, चासेंत अटकेंस असामी.

१ कुमाजी ढगले.

२ जावजी, व सजणाजी मोरे.

२ खंडु धोंड्या याची बायको, व पोर.

——

५

२ लखमाजी पाटील, व त्याचा लेक.

——

७ सात असामीविशीं.

१ उद्धो विरेश्वर यास कीं, तालुके शिवनेर येथें अटकेस आहेत त्याविशीं. असामी.

४ किल्ले हडसर येथें ठाकूर. असामी.

५ किल्ले चां(द)वड येथें, असामी.

१ हरी हरवल्याचा लेक.

२ ठाकूर.

१ खरवळा कोळी.

१ कुणबी शिपाई.

——

५

——

९ नऊ असामीविशीं.

१ धोंडो महादेव यास तालुके त्रिंबक येथील बंदिवानाविशीं.

१ जाखोजी नाईक भांगरा, किल्ले त्रिंबक येथें आहे.

२ किल्ले भास्करगड येथें खंडोजी खंडीत, व त्याचा लेक वगैरे मुलेंमाणसें.

३ तीन असामीविशीं.

१ सदाशिव मोरेश्वर, व कृष्णाजी रामचंद्र यांस कीं, प्रांत कल्याण येथें, असामी.

१ निळोजी कोथा.

१ मावजी भोईर याची बायको.

१ रामजी भोईर याची बायको.

१ कामळोजी बहरे याची बायको.

१ मालजी लाडे याची बायको.

५ पांच असामीविशीं.

८ आठ पत्रें दिल्हीं असेत.

६४२–( ३३८ ) किल्ले अलंग, व मदनगड हे दोन किल्ले कोळ्यांपासून धोंडो महादेव याणीं सरकारांत घेतले, त्यास सदरील किल्ले सरकारांत होते, ते समयीं किल्ले मजकूर येथील बेगमीस कारसाई चूडवोढा वगैरे सालाबाद जहागीर तालुके कावनईपैकीं पावत होती, त्याप्रमाणें सालमजकुरीं तालुके मजकूरचे जाहगिरीचे गांवगन्नापैकीं सदरील किल्याचे बेगमीस कारसाई चूडवोढा वगैरे मशारनिल्हेकडे देणें ह्मणोन, तालुके कावनई निसबत परशराम त्रिंबक याचे नांवें. छ. ३ रजब.

सबा सबैन मया व अलफ रमजान २९

सनद १.

रसानगी यादी.

६४३–( ३५० ) नाशिक प्रांतीं गडबड झाल्यास तुह्मीं बंदोबस्तापुरते कार्याकारण लोक ठेऊन बंदोबस्त करणें ह्मणोन, धोंडो महादेव तालुके त्रिंबक याचे नांवें. छ. १७ रमजान.

सबा सबैन मया व अलफ रमजान २९

सनद १.

रसानगी यादी.

( 642 ) The Government forts of Alang and Madangad which were taken by the Kolis were taken back from them by Dhondo Mahádeo.

A. D. 1776-77.

( 643 ) Orders were issued to the officer of Trimbak to entertain additional men if a disturbance occurred in Pránt Násik.

A. D. 1776-77.

६४४–( ३९० ) बाबूराव रघुनाथ सबनीस, किल्ले अलंग तर्फ कावनई, यांणीं हुजूर

सबा सबैन
मया व अलफ
जिल्हेज २९

विदित केलें कीं, किल्ले मजकूर येथील सबनिशी पेशजींपासून आपल्याकडे आहे, त्यास किल्ला कोळ्यांनीं घेतला होता, तो हल्लीं सरकारांत आला, याजकरितां पेशजींप्रमाणें सबनिशीचें कामकाज आपल्या हातें घेऊन, वेतन नेमणुकेप्रमाणें द्यावयाविशीं आज्ञा जाहली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी किल्ले मजकूरचे सबनिशीचें कामकाज मशारनिल्हेचे हातें घेऊन नेमणुकेप्रमाणें वेतन तालुके मजकूरपैकीं देत जाणें ह्मणोन, धोंडो महादेव तालुके त्रिंबक यांचे नांवें छ. २६ सवाल.

सनद १.

रसानगी यादी.

६४५–( ४४० ) कासारबारीपासून अजिंठ्यापावेतों भिल्लांच्या आळ्या आहेत,

सबा सबैन
मया व अलफ
रबिलावल २९

त्यांणीं प्रस्तुत उपद्रव फार मांडिला आहे. मुलकांत उपद्रव करून वाटा सुरळीत चालों देत नाहीं. याजकरितां भिल्लांचें पारिपत्य करावयाची आज्ञा हुजुरून सरसुभा प्रांत खानदेश निसबत नारो कृष्ण यास केली आहे, त्याप्रमाणें सरसुभाहून भिल्लांचे पारिपत्य करितील, त्याचे शिबंदी खर्चाची वांटणी सरसुभाहून परगणे मजकुरीं बसेल, ते सरकार ऐवजाशिवाय देणें, दिकत न करणें ह्मणोन, महालानिहायचे कमाविसदारांस व जमीदारांस चिटणिसी.

पत्रें.

२ राजश्री देहरे.

१ वेंकटराव बल्लाळ कमाविसदार यांस. १ जमीदारांस.

२ परगणे चाळीसगांव.

१ शंकराजी विरेश्वर कमाविसदार. १ जमीदार.

२ परगणे मेहुणबारें.

१ कमाविसदार दिंमत माधवराव रामचंद्र यांस. १ जमीदार.

---

( 644 ) Báburao Raghunáth Sabnis of fort Alang, Tarf Káwanai,

A. D. 1776-77.

prayed that as the fort which had been taken by the Kolis was taken back from them by Government, he may be reinstated in his former appointment.

( 645 ) The Bhils of the territory extending from Kásárbári to

A. D. 1776-77.

Ajinthá having created disturbances in the country and rendered the roads unsafe, Náro Krishṇa Sar Subhá was directed to put them down, and the officers of the various mahals were directed to levy from their mahals, in addition to the Government revenue, such amounts as might be fixed by the Sar Subhá for the expenses of the troops entertained for the purpose.

२ परगणे झोडगे.

१ कमाविसदार दिंमत माधवराव रामचंद्र यांस. १ जमीदारांस.

२ परगणे चिखल वाहाळ.

१ कमाविसदार दिंमत महादाजी निळकंठ. १ जमीदार.

२ परगणे भडगांव.

१ कमाविसदार दिंमत महादाजी निळकंठ. १ जमीदार.

२ परगणे पाचोरें.

१ विनायक रघुनाथ कमाविसदार. १ जमीदार.

२ परगणे लोहारें.

१ मैराळ भिकाजी कमाविसदार दिंमत महादजी शिंदे. १ जमीदार.

२ परगणे वाकडें.

१ कमाविसदार दिंमत. १ जमीदार.

२ परगणे उत्राण.

१ बाळाजी नारायण कमाविसदार दिंमत तुकोजी होळकर यास. १ जमीदार.

२ परगणे जामनेर.

१ शामराव निंबाजी कमाविसदार दिंमत आनंदराव रास्ते. १ जमीदार.

२ परगणे बेरजार.

१ गोपाळ बल्लाळ कमाविसदार यास. १ जमीदार.

५ जमीदारांस.

१ परगणे शेंदुरणी. १ परगणे माणिकपूर.
१ परगणे सुतोडा. १ परगणे पाटोदें.
१ परगणे अंतूर.

५

---

२९

एकूणतीस पत्रें दिल्हीं असेत छ. ५ मोहरम.

६४६–( ४४१ ) परगणे जैनाबाद, व परगणे जळगांव, पैकीं एदलाबाद प्रांत खानदेश, या तिहीं महालांचे दरम्यान डोंगर आहे, त्यास जैनाबाद परगणियाचे हद्दींत पोर व जंबूपाणी, व जामठी एकूण तीन आळ्या भिल्लांच्या आहेत. त्या भिल्लांस इनाम जमीन व रहदारीपैकीं चौक्या अ-

सबा सबैन मया व अलफ रबिलावल २९

( 646 ) The Bhils residing in the villages of Por, and Jambupáṇi, and Jámṭhi in the hills on the borders of Parganás Jainábád, and Edlábád and Jaḷgaon of Khándesh enjoyed Inám lands,

A. D. 1776-77.

सोन सदरील महालांत उपद्रव करून वाणीउदमी वगैरे रहादार यांस लुटून वाटा मारिता-त. यामुळें डोंगरा लगते गांव आहेत, त्यांची आबादी होत नाहीं, व वाटाही यथास्थित चालत नाहीं, ह्मणोन हुजूर विदित जाहलें; त्याजवरून सदरील भिल्लांचें पारपत्य करायाची आज्ञा सरसुभा प्रांत खानदेश निसबत नारो कृष्ण यांस केली आहे, तरी सरसुभाहून भि-ल्लांचें पारपत्य करतील, त्याचे शिबंदी खर्चाची वांटणी सरकारऐवजाशिवाय सरसुभाहून तुमचे महालावरी घालितील ते देणें. दिक्कत न करणें ह्मणोन, कमाविसदारांस, व जमीदा-रांस चिटणिसी. पत्रें.

१ नारो कृष्ण सरसुभा यांस.

२ परगणे जळगांव.

१ विश्वासराव रामचंद्र, व दामोदर गोविंद कमाविसदार यांस.

१ जमीदारांस.

२

२ परगणे एदलाबाद.

१ नानाजी सखदेव कमाविसदार, दिंमत शिंदे यांस पत्र.

१ जमीदारांस.

२

२ परगणे जैनाबाद.

१ आपाजी गणेश कमाविसदार, दिंमत खंडेराव त्रिंबक.

१ जमीदारांस.

२

७

सात पत्रें दिल्हीं असेत. छ. ५ मोहरम.

## भिल—पट्टी.

६४७–( ५९६ ) तुकोजी होळकर यांचे नांवें सनद कीं, परगणे सुलतानपूर, व परगणे

---

and were in charge of Choukis on the high roads. They however took to committing high-way robberies. The neighbouring villages as also the trade of the country consequently suffered. Náro Krishṇa was directed to put down the Bhils, and to collect money for the purpose from the inhabitants of Mahàls in question.

( 647 ) A wooden fort was built in Táluká Kukermundhe for keeping

तिसा सबैन मया व अलफ रबिलावल १५

नंदुरबार, प्रांत खानदेश, हे दोन महाल तुह्मांकडे सरंजामास आहेत, त्यास तालुके कुकरमुंढें येथील रानांत भिल्लांचे बंदोबस्ताकरितां नाक्यावर लकडकोट घालून नवी शिबंदी ठेविली आहे. तेथील खर्चाचे बेगमीस तुह्मांकडून कृष्णाजी विश्वनाथ याजकडे ऐवज देविला होता, परंतु हल्लीं तालुके मजकूरची मामलत त्यांजकडून दूर करून यादवराव रघुनाथ यांस कमाविस सांगितली, सबब तो ऐवज याजकडे द्यावयचा करार केला त्याचीं कलमें.

सरसुभा प्रांत खानदेश येथील घासदाणा वगैरे ऐवज हरदू महालाकडे सालाबाद नेमणूक आहे रुपये ६००० पैकीं सरसुभाकडे द्यावे रुपये १००० बाकी रुपये ५०००पांच हजार रुपये तालुके मजकुराकडे देणें. कलम १.

हरदू महालीं पेशजीं भिल्लांचा उपद्रव लागत होता, त्यास तालुके मजकूरचे रानांत लकडकोट घालून बंदोबस्त केल्यापासून महालास उपद्रव होत नाहीं, सबब शिबंदी खर्चाबद्दल रुपये ५००० पांच हजार रुपयांची रयेतनगपटी करून तालुके मजकुराकडे ऐवज द्यावयाचा करार केला असे, तरी सदरील ऐवज महालांत रयत निसबत साधून मशारनिल्हेकडे देणें. कलम १.

एकूण दोन कलमें करार केलीं असेत, तरी सदरीलप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन. सनद १.

येविशीं कमाविसदार दिंमत मशारनिल्हे यांस कीं, सदरीलप्रमाणें ऐवज देणें ह्मणोन.

सनदा २.

१ गणपतराव विष्णु परगणे सुलतानपूर यांजकडून ऐवज देविला रुपये.

२००० सरसुभाकडील घासदाणा वगैरे परगणे मजकुराकडे नेमणूक रुपये ४०००पैकीं सरसुभाकडे द्यावे रुपये १००० बाकी.

३००० शिबंदीखर्चाबद्दल पट्टी करून रयत निसबत साधून द्यावे ते.

६००० सहा हजार रुपये येविशीं.

१ नारायणराव यादव, व परगणे नंदुरबार यांजकडून ऐवज देविला. रुपये.

२००० सरसुभाकडील घासदाणा वगैरे नेमणूक आहे ते.

---

A. D. 1778-79. down the Bhils and some soldiers were kept there. Tukoji Hoḷkar, the holder of the adjoining Mahâls of Sultánpoor and Nandurbár, had to pay Rs. 5000 for their expenses. It was now ordered that the amount should be recovered from the rayats as the erection of the fort had saved them from the attacks of the Bhils.

२००० शिबंदीखर्चाबद्दल पट्टी करून रयतेनिसबत साधून ऐवज द्यावा ते.

४०००
चार हजार रुपये येविशीं.

२

जमीदारांस सनदा कीं, महालांत रयत निसबत पट्टी करून ऐवज साधून मशारनिल्हेकडे देणें ह्मणोन. सनदा.

१ परगणे सुलतानपूर रुपये ३००० तीन हजार रुपये येविशीं.
१ परगणे नंदुरबार रुपये २००० दोन हजार रुपये येविशीं.

२ ५

पांच सनदा. रसानगी यादी.

६४८–(६५६) तर्फ कोरकडा व परगणे गोरठ, प्रांत कल्याण येथें कोळ्याचा उपद्रव होऊं लागला आहे. याजकरतां तेथील बंदोबस्तास हुजुरून लोक द्यावयाची आज्ञा जाली पाहिजे, ह्मणोन तुह्मीं विनंति केली, याजवरून माजी सिंहगडकरी लोक असामी १०० एकशें पाठविले आहेत, त्यांचा नावनिशीवार जाबता अलाहिदा आहे, त्याप्रमाणें हजिरी घेऊन चाकरी घेणें; आणि सदरी(ल) लोकांस अडशेरी दरमहा रुपये २५५ दोनशें पंचावन रुपये देविले असत, तरी तुह्मांजवळ चाकरीस राहतील तोंपावेतों प्रांत मजकूरपैकीं चाकरीबद्दल देत जाणें ह्मणोन, गोविंदराम याचे नांवें. सनद १.

समानीन
मया व अलफ
जिल्हेज ६

रसानगी यादी.

६४९–(६६५) परगणे नवापूर येथें भिल्लांनीं दंगा केला आहे, याजकरितां स्वारी पाठवून, धरून आणून, अपराधानुरूप शिरच्छेद वगैरे पारपत्य करावयास आज्ञा असावी ह्मणोन तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें; त्याजवरून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी भिल्लावर स्वारी पाठऊन, धरून

समानीन
मया व अलफ
जिल्हेज २९

---

(648) There being a disturbance of Kolis in Tarf Korkade and Parganá Gorat in Prânt Kalyán, 100 Gadkaris of Fort Sinhgad were sent to that province for assistance.

A. D. 1779-80.

(649) Rámchandra Krishna was directed to arrest the Bhils, who had raised an insurrection in Parganá Navápoor, and was authorized to inflict on them such punishment, capital or other, as they might deserve.

A. D. 1779-80.

आणून, ज्याजकडे जसा अपराध लागेल, त्या अपराधानुरूप शिरच्छेद वगैरे पारपत्य करून हुजूर लिहून पाठवीत जाणें ह्मणोन, रामचंद्र कृष्ण यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

६५०–( ७२७ ) संताजी सिरकंदा कोळी याणें नायकीस जूज केला, मिळऊन कोंकण-पट्टींत दंगा जागाजागा खंडण्या घेतल्या, व गांव लुटले, सबब त्याचीं माणसें धरून आणिलीं, त्यांस किल्ले शिवनेर तालुके मजकूर येथें रवाना केलीं आहेत. असामी.

इसन्ने समानीन मया व अलफ ज़िल्काद ६

४ पुरुष.

२ बेड्या घालून पाठविले आहेत.

१ दौलतराव बिन येवजी भालेराव पाटील मौजे वडनेर.

१ परशरामगीर गोसावी.

१ आबाजी सिरकंदा, संताजीचा भाऊ.

---

३

१ रामजी बिन संताजी गायकवाड मौजे उस्थल.

---

४

५ बायका.

१ उमी, संताजीची बायको.

२ संताजी सिरकंदा याचे भावांच्या बायका.

१ तुलसी–शिवाजीची.

१ भिवी–कृष्णाजीची.

---

२

२ संताजी सिरकंदा याच्या बहिणी.

१ ठकी.

---

( 650 ) Santáji Sirkandá Koḷi collected some men under his banner and pillaged some villages in Konkan and levied tributes from others. His relations, both male and female, were arrested and sent to fort Shivner to be imprisoned.

A. D. 1781-82.

१ हिरी.

———

२

———

५

४ पोरें.

१ आबाजी सिरकंदा याचा पोर.

३ पोरी.

२ संताजीच्या.

१ संताजीची बहीण हिरी इची पोर.

———

३

———

४

१ रुपी कुणबीण.

———

१४

एकूण चौदा माणसें, पैकीं बेड्यांचीं तीन व मोकळे अकरा, तुह्मांकडे पाठविलीं आहेत, तरी त्यांस किल्ले मजकुरीं पक्या बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें ह्मणोन, बाळाजी महादेव यांचे नांवें. सनद.

रसानगी नारो विश्वनाथ गोडबोले, कारकून शिलेदार.

६५१–(७४३ अ) संताजी सिरकंदा कोळी याचे नांवें अभयपत्र कीं, तुवां कोळी मेळऊन मुलकांत धामधूम करित होता, त्यास बजीद होऊन तुवां अर्ज केला कीं, मागील अन्याय सरकारांतून माफ जाहल्यास हुजूर येऊन एकनिष्ठेनें वर्तणूक करीन ह्मणून, गंगाधरराम कारलेकर यांणीं विदित केलें, त्याजवरून तुझे बजीदीवर नजर देऊन मागील अन्याय माफ करून हें अभयपत्र सादर केलें असे, तरी तुवां बेवसवसा सरकारांत येऊन एकनिष्ठेनें वर्तणूक करित जाणें, अभय असे ह्मणोन. कौल १.

इसन्ने समानीन मया व अलफ रबिलावल २

रसानगी यादी.

---

(651) Santáji Sirkandá Koḷi, who was plundering the country with his confederates, offered to surrender and to be loyal in future on condition of being given a free pardon for past offences. The offer was accepted.

A. D. 1781-82.

६५२–( ७४४ ) संताजी सिरकंदा कोळी याची बायको, व मुलें वगैरे किल्ले शिवनेर येथें अटकेस ठेविलीं आहेत, तीं हल्लीं सोडावयाचा करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी कोळी याचीं माणसें गंगाधरराम कारलेकर यांचे हवालीं करून पावलियाचें कबज घेणें म्हणोन, बाळाजी महादेव मामलेदार तालुके मजकूर याचे नांवें.

इसन्ने समानीन मया व अलफ रबिलावल २

सनद १.

रसानगी यादी.

६५३–( ८३९ ) भिल्ल महालास उपद्रव करितात त्यांचे बंदोबस्तास अहद कासारबारींत (त)हद अजंठेपर्यंत तळघाट व वरघाट येथें ठाणीं ठेऊन, बंदोबस्त करावयाचा करार करून, तळघाटचा बंदोबस्त तुम्हांस सांगोन, शिबंदीची वगैरे नेमणूक सालीना.

अर्बा समानीन मया व अलफ जमादिलविल ४

रुपये.

१२४९६ ठाणीं बसवावयास शिबंदी.

असामी.

२५ मौजे कासारी परगणे पाटोदें.
२० मौजे पिंपरीपैकीं.
२५ मौजे वरढेपैकीं.
२५ मौजे सायगव्हाणपैकीं.
२५ मौजे किनई, परगणे अंतूर.
२० मौजे वाडी बनोटी, परगणे सुतोडा.
२० मौजे राजोलें, परगणे पाचोरें.
२५ मौजे जरडीपैकीं सुतोडा.
२५ मौजे मणेगांव, परगणे शेंदुरणी.
२५ मौजे दलासखेड, परगणे वेताळवाडी.
१५ मौजे नांदगांव, परगणे माणिकपुंज.

२७५ (२५०)

एकूण दोनशें पंचाहत्तर असामींस दरमहा.

रुपये.

---

(652) His wife and children who were in confinement were ordered to be set at liberty.

A. D. 1781-82.

(653) It was deemed necessary to establish Tháṇás above and below the Ghauṭs from Kásárbári to Ajinṭhá for protecting the country from the Bhils. The duty of establishing the Tháṇás &c above the Ghauṭs was entrusted to **Náro Krishṇa** and Jotyáji Jádhavrao Wágholikar, and they were authorized to levy for the purpose a tax called Bhilpaṭṭi assessed on the revenues of Parganás Rájdeher, Mehuṇbáre, &c, &c, at the rate of five per, cent.

A. D. 1783-84.

१०८ जमातदार असामी १८ दर असामीस रुपये ६ प्रमाणें.
१०२८ प्यादे असामी २५७ दर असामीस रुपये ४ प्रमाणें रुपये.

———

११३६

एक हजार एकशें छत्तीस रुपये दरमहा प्रमाणें आकारमाही. रुपये.

५६९४ फिरस्ते स्वारीस कारकून वगैरे. रुपये.

५०० कारकून.

३०० खासा.

२०० हजिरी गणती लिहिण्यास वगैरे, असामी १ एक.

———

५०० एकूण रुपये.

११४४ प्यादे असामी २५ दरमहा. रुपये.

१२ जमातदार असामी २ दर ६ प्रमाणें रुपये.

९२ प्यादे असामी २३ फिरस्ते स्वारीस कारकून वगैरे रुपये दर असामीस रुपये ४ प्रमाणें. रुपये.

———

१०४ आकारमाही रुपये.

३७५० स्वार असामी २५ दर स्वारास सालीना रुपये १५० प्रमाणें.

३०० खेरीज मुशाहिरा भोजनखर्च वगैरे.

———

५६९४

———

१८१९०

अठरा हजार एकशें नव्वद रुपये यासी ऐवज महालानिहाय येथील सरदेशमुखी सुद्धां ज्या महालास फार उपद्रव लागतो, त्याचा दरोबस्त तनखा, व थोडा उपद्रव लागतो त्या महालचा अजमासें हिसेरसीद तनखा. रुपये.

दरोबस्त तनखा.

२१६९० परगणे राजदेहरे.
१४०६५८= परगणे मेहुणबारें.
४६५६१८-। परगणे चाळीसगांव.
४५४०६८= परगणे पाचोरें.
१९३४०।=॥ परगणे शेंदुर्णी.

| | |
|---|---|
| ५४९४०॥ | परगणे निंबईत. |
| ३६४६७। | परगणे लोहारें. |
| ४३९३०॥≡ | परगणे भडगांव. |
| ५२६३१॥।॰ | परगणे बाहाल. |
| २१७२२ | परगणे चिखलवहाळ. |
| ७३१२॥ | परगणे झोडगें. |
| ६१८७॥ | परगणे माणिकपुंज. |
| | हिसेरसीद तनखा. |
| ५८१८८॥ | परगणे जामनेर येथील निमे. |
| ४१२२१। | परगणे धुळें येथील निमे. |
| ४९४८८॥।॰ | परगणे उत्राण येथील निमे. |

५,१९,१५३।०॥।

एकूण पांच लक्ष एकूणीस हजार एकशें सवात्रेपन रुपये पाऊण आणा तनख्यावर सरकार जमे खेरीज भिलपट्टीचा ऐवज दरसदे रुपये ५ पांच प्रमाणें रुपये २५९५७॥ पंचवीस हजार नऊशें साडेसत्तावन रुपये ध्यावयाचा करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदरीलप्रमाणें भिलपट्टीचा ऐवज वसूल करून नेमणुकेप्रमाणें चौकशीनें खर्च करून भिल्लांचा बंदोबस्त करणें; आणि अखेरसालीं हिशेब हुजूर समजावणें. ठाण्याचा बंदोबस्त होई तोंपावेतों लोक दिंमत शहा मीरखान रोहिले यास दोन महिने ठेऊन त्यास रोजमरा एकमाहीपैकीं निमे पट्टीचे ऐवजीं द्यावयाविशीं तुह्मांस अलाहिदा सनद सादर जाली आहे, त्याप्रमाणें देणें ह्मणून, नारो कृष्ण सरसुभा प्रांत खानदेश यांचे नांवें. सनद १.

येविशीं देशमूख, व देशपांडे यांस कीं, भिल्ल महालास उपद्रव करितात, त्यांचे बंदोबस्तास अहद कासारबारी तहद अजंठेपर्यंत तळघाट व वरघाट येथें ठाणीं ठेऊन बंदोबस्त करावयाचा करार करून, तळघाटचा बंदोबस्त नारो कृष्ण सरसुभा प्रांत खानदेश यांस सरकारांतून सांगितला, त्यास शिबंदीचे खर्चाबद्दल ज्या महालास भिल्लाचा उपद्रव लागतो, त्या महालचे सरदेशमुखीसुद्धां दरोबस्त तनख्यावर सरकार जमेखेरीज भिलपट्टीचा ऐवज दर सदें रुपये ५ पांच प्रमाणें ध्यावयाचा करार करून, वसूल मशारनिल्हेकडे देविला असे, तरी सदरील ऐवजचा वसूल सरसुभाकडे देत जाणें ह्मणून. सनदा १५.

| | |
|---|---|
| १ परगणे राजदेहरें. | १ परगणे बाहाल. |
| १ परगणे मेहुणबारें. | १ परगणे चिखलवहाळ. |
| १ परगणे चाळीसगांव. | १ परगणे झोडगें. |
| १ परगणे पाचोरें. | १ परगणे माणिकपुंज. |
| १ परगणे शेंदुर्णी. | १ परगणे जामनेर. |

| | |
|---|---|
| १ परगणे निंबाईत. | १ परगणे धुळें. |
| १ परगणे लोहारें. | १ परगणे उत्राण. |
| १ परगणे भडगांव. | १५ |

१६

सोळा सनदा दिल्या असेत. रसानगी यादी.

तळघाटचा भिलपट्टीचे ऐवजाचा वसूल सरसुभा प्रांत खानदेश यांजकडे देविला आहे, त्यास कांहीं महालचा हिसेरसीद तनखा धरिला आहे, त्यामुळें दरोबस्त तनख्याचे महालचे जमीदार भर तनख्याप्रमाणें वसूल द्यावयास बखेडा करितील, याजकरितां हिसेरसीद तनख्याचे महालचा सरदेशमुखीसुद्धां दरोबस्त तनख्यावर भिलपट्टीचा ऐवज दरसदें रुपये ५ पांच प्रमाणें देत जाणें ह्मणोन, जमीदारांस सनदा सादर केल्या आहेत; परंतु वसल घेणें तो नारो कृष्ण सरसुभा प्रांत मजकूर यांचे नांवें सनद सादर जाली आहे त्याप्रमाणें घ्यावा.

भिल्ल महालास उपद्रव करितात, त्यांचे बंदोबस्तास अहद कासारबारी तहद अजंठेपर्यंत तळघाट व वरघाट येथें ठाणीं ठेऊन बंदोबस्त करावयाचा करार करून वरघाटचा बंदोबस्त तुह्मांस सांगोन, शिबंदीची वगैरे नेमणूक सालीना. रुपये.

२२००० ठाणीं बसवावयास शिबंदी. असामी.

१५० किल्ले कणेरा.

२५ महादेव डोंगरांत ठाणें नजीक जातेगांव.

१२५ परगणे कन्नड येथील गावगन्ना ठाणीं.

२५ मौजे मेंढरें.

२५ मौजे कळकी.

५० मौजे सातकुंड.

२५ मौजे आबळें.

१२५

५० कसबे गोताळे, परगणे मजकूर.

७५ परगणे अंतूर येथील गांवगन्ना ठाणीं.

२५ मौजे तडवळ.

२५ मौजे मेहूण.

२५ मौजे सेंदरें.

७५

३५ परगणे सुतोंडा येथील गांवगन्ना ठाणीं.

१० मौजे जोगेश्वरी.

२५ मौजे जंजाळें.

———

३५

२५ परगणे वेतालवाडी येथें वरघाटीं ठाणें जागा पाहून ठेवावें.

———

४८५

चारशें पंच्याइशीं असामींस, दरमहा. रुपये.

१८० जमातदार असामी ३० दर असामीस रुपये ६ प्रमाणें. रुपये.

१८२० प्यादे असामी ४५५ दर असामीस रुपये ४ प्रमाणें. रुपये.

———

२०००

दोन हजार रुपये दरमहाप्रमाणें आकारमाही. रुपये.

३०० किल्ले कणेरा येथें कारकून बंदोबस्तास असामी १ एकूण भोजनखर्च वगैरे सुद्धां. रुपये.

९५४४ फिरस्ते स्वारीस कारकून वगैरे. रुपये.

५०० कारकून.

३०० खासा.

२०० हाजिरी गणती लिहिण्यास वगैरे असामी १ एक एकूण. रुपये.

———

५००

११४४ प्यादे असामी २५ दरमहा. रुपये.

१२ जमातदार असामी २ दर ६ प्रमाणें रुपये.

९२ प्यादे असामी २३ दर ४ प्रमाणें. रुपये.

———

१०४

आकारमाही. रुपये.

७५०० स्वार असामी ५० पन्नास एकूण दर असामीस रुपये १५० प्रमाणें सालीना. रुपये.

४०० खेरीज मुशाहिरा भोजनखर्च वगैरे.

---

९५४४

---

३१८४४

एकतीस हजार आठशें चवेचाळीस रुपये यांसी ऐवज महालानिहाय येथील सरदेशमुखीसुद्धां ज्या महालांस फार उपद्रव लागतो, त्यांचा दरोबस्त तनखा, व थोडा उपद्रव लागतो त्या महालचा अजमासें हिसेरसीद तनखा. रुपये.

दरोबस्त तनखा.

| | |
|---|---|
| १३९६९२॥= | परगणे अंतूर. |
| ३२६०९॥-॥ | परगणे टाकळी, देखील सुलताबाद. |
| ९१३६।= | कसबे जातेगांव, व टाकळे, सरकार दौलताबाद. रुपये. |
| ५११६९।= | परगणे खानापूर. |
| ५४४३०८-॥ | परगणे वेरूळ. |
| १४२०५३।॥=।॥ | परगणे कन्नड. |
| ५१२३९।= | परगणे खंडाळें. |
| ३९२१ | परगणे गोताळें. |
| २०३१८॥ | परगणे वेताळवाडी. |
| ८४९२।॥ | परगणे सुलतानपूर. |

हिसेरसीद तनखा.

| | |
|---|---|
| ६२५३४८- | परगणे सुतोडा व उंडणगांव येथील निमें. |
| ४६८१७॥ | परगणे फुलबारी येथील चौथाई. |
| २७२५४। | परगणे वैजापूर येथील आठवा हिसा. |
| १८९७६ | परगणे वाळुंज येथील दहावा हिसा. |
| १४१६८६॥ | परगणे पाटोदें येथील निमें. |
| ५२५६२ | परगणे गांडापूर येथील आठवा हिसा. |

---

८,६२,८९३।॥=।॥

एकूण आठ लक्ष बासष्ट हजार आठशें पावणें चवऱ्याण्णव रुपये पावणे तीन आणे तनख्यावर सरकार जमेखेरीज भिलपट्टीचा ऐवज दरसदें रुपये ५ पांच प्रमाणें रुपये ४३१४५ त्रेचाळीस हजार एकशें पंचेचाळीस रुपये ध्यावयाचा करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदरीलप्रमाणें भिलपट्टीचा ऐवज वसूल करून नेमणुकेप्रमाणें चौकशीनें

खर्च करून भिल्लांचा बंदोबस्त करणें. किल्ले कणेरा येथें नवी वस्ती केली आहे, त्यास इमारतीस वगैरे कार्याकारण खर्च लागेल तो पट्टीचे ऐवजीं चौकशीनें करणें; आणि हिशेब अखेरसाली हुजूर समजावणें; व ठाण्याचा बंदोबस्त होई तोंपावेतों लोक दिंमत शहा मीरखान रोहिले यास दोन महिने ठेऊन त्यांस रोजमरा एकमाहीपैकीं निमेपट्टीचे ऐवजीं द्यावयाविशीं तुह्मांस अलाहिदा सनद सादर जाली आहे, त्याप्रमाणें देणें ह्मणोन, जोत्याजी जाधवराव वाघोलीकर याचे नांवें.

सनद १.

एविशीं देशमूख व देशपांडे महालानिहाय यांस कीं, भिल्ल महालास उपद्रव करितात, त्यांचे बंदोबस्तास अहद कासारवारी तहद अजंठेपर्यंत तलघाट व वरघाट येथें ठाणीं ठेऊन, बंदोबस्त करावयाचा करार करून, वरघाटचा बंदोबस्त जोत्याजी जाधवराव याजकडे सरकारांतून सांगितला, त्यास शिबंदीचे खर्चाबद्दल ज्या महालास भिल्लांचा उपद्रव लागतो, त्या महालचे सरदेशमुखीसुद्धां दरोबस्त तनख्यावर सरकार जमेखेरीज भिलपट्टीचा ऐवज दरसदें रुपये ५ पांच प्रमाणें ध्यावयाचा करार करून वसूल मशारनिल्हेकडे देविला असे, तरी सदरहू ऐवजाचा वसूल जाधवराव याजकडे देत जाणें ह्मणोन, सनदा(१९).

१ परगणे अंतूर.
१ परगणे टाकळी.
१ परगणे खुलताबाद.
१ कसबे जातेगांव, सरकार दौलताबाद.
१ कसबे टाकळें, सरकार दौलताबाद.
१ परगणे खानापूर.
१ परगणे वेरूळ.
१ परगणे कन्नड.
१ परगणे खंडाळें.
१ परगणे गोताळें.
१ परगणे वेताळवाडी.
१ परगणे सुलतानपूर.
१ परगणे सुतोडा.
१ परगणे उंडणगांव.
१ परगणे फुलवारी.
१ परगणे वैजापूर.
१ परगणे वाळुंज.
१ परगणे पाटोदें.
१ परगणे गांडापूर.

---

१९

---

२०

वीस सनदा दिल्या असेत.

रसानगी यादी.

वरघाटचा भिलपट्टीचे ऐवजाचा वसूल जोत्याजी जाधवराव याजकडे देविला आहे, त्यास कांहीं महालचा हिसेरसीद तनखा धरिला आहे. त्यामुळें दरोबस्त तनख्याचे महालचे जमीदार भर तनख्याप्रमाणें वसूल द्यावयास बखेडा करितील, याजकरितां हिसेरसीद तनख्याचे महालचा सरदेशमुखीसुद्धां दरोबस्त तनख्यावर भिलपट्टीचा ऐवज दरसदे रुपये ५ पांच

प्रमाणें देत जाणें ह्मणोन, देशमूख व देशपांडे यांस सनदा सादर केल्या आहेत; परंतु वसूल घेणें तो जाधवराव याचे नांवें सनद सादर जाली आहे त्याप्रमाणें ध्यावा.

६५४–( ८६४ ) परगणे लोहारें, प्रांत खानदेश, हा महाल महादजी शिंदे यांजकडे आहे, तेथें भिल्लांचा उपद्रव नसतां, तुह्मीं भिलपट्टीची वरात रुपये १७५० साडे सत्राशें रुपयांची करून, मशारनिल्हेकडील कमाविसदारास निकड केली; आणि त्याजपैकीं सातशें रुपये नक्त घेतले, बाकी साडे दहाशें रुपयांची वाइदेचिटी एका महिन्याची लिहून घेतली. महिन्यानें भिलपट्टीचे माफीची चिठी सरकारची आणून द्यावी, असा करार करून घेतला आहे ह्मणोन हुजूर विदित जाहलें, त्याजवरून हें पत्र सादर केलें असे, तरी भिल्लांचे उपद्रवांत गांव असतील त्याजपासून भिलपट्टी घेऊन उपद्रव भिल्लांचा न लागे असा बंदोबस्त करावा. जेथें भिल्लांचा उपसर्ग नसेल, त्या गांवास भिलपट्टीचा उपद्रव करूं नये, याप्रमाणें सरकारची आज्ञा असतां, परगणे मजकूर येथें भिल्लांचा उपसर्ग नसतां, तुह्मीं रोखे करून साडे सत्राशें रुपयांची निशा करून घेऊन ऐवज घेतला, हें ठीक नसे. याउपरी परगणे मजकुरीं भिल्लांचा उपसर्ग नसल्यास ऐवज ध्यावयाचें कारण नाहीं. परतोन देणें. पुढें भिल्लांचे उपसर्गाखेरीज गांव असतील त्यांस भिलपट्टीचे ऐवजाचा तगादा न करणें ह्मणोन, नारो कृष्ण सरसुभा प्रांत खानदेश याचे नांवें चिटणिसी.

खमस समानीन
मया व अलफ
जिल्काद १९

पत्र १.

६५५–( ८९५ ) नारो कृष्ण यांस पत्र कीं, परगणे भडगांव, प्रांत खानदेश हा महाल चिरंजीव राजश्री महादजी नीळकंठ याजकडे फौजेचे सरंजामास आहे, तेथें तुह्मी साल तिगस्तां भिलपट्टी दरसदें रुपये ५ पांच प्रमाणें इतर महालीं तनख्यावर खेरीज सरदेशमुखी करून घेतली; आणि

सीत समानीन
मया व अलफ
रमजान २५

---

( 654 ) Náro Krishṇa of Khándesh was directed to levy Bhilpaṭṭi only from those villages which used to suffer from attacks by Bhils. The amount levied by him from a Pargaṇá, which was not subject to the depredations of the Bhils, was ordered to be refunded.

A. D. 1784-85.

( 655 ) The duty of bringing the Bhil-plunderers to justice was entrusted to Shiwarám Náráyaṇ on condition of his keeping out of the revenues realized by Bhilpaṭṭi the necessary force, and to make good the loss sustained by the people through plunder. A Bhil-disturbance occurred, but Náro Krishṇa, Sar Subhá, instead of compelling Shiwarám Náráyaṇ to fulfil the condition levied fresh cesses on the people to meet the charge of an additional force entertained by him. A complaint was therefore made to the Peshwá. The amount levied was ordered to be refunded.

A. D. 1785-86.

परगणे मजकुरीं सरदेशमुखीसुद्धां जाजती तीनशें रुपये घेतले; व सन इहिदे समानीनांत दहक सरकारांतून घेतला, ते समयीं परगणे मजकूरचे दहकाचा फडशा राजाराम खंडेराव कमाविसदार यांजपासून करून घेतला असतां हल्लीं तगादा करितां; व खानदेशांतील भिल्लांचा बंदोबस्त करावयाविशीं शिवराम नारायण यांणीं कबूल करून शिबंदीचा ऐवज खानदेशचे महालावर पाठऊन महालाची नुकसानी भिल्लांचे दंग्यामुळें जाहल्यास भरून द्यावी.याप्रमाणें सरकारांत कबूल करून याजकडील महालीं भिलपट्टीचा ऐवज घेतला असतां महालीं भिल्लांनीं दंगा करून दोन गांव लुटून नेले. त्यांचे बंदोबस्तास शिबंदी ठेविली. त्यास शिबंदीचा ऐवज व गांव लुटिले त्याचे नुकसानीचा ऐवज भिलपट्टींत मजुरा घ्यावा, ह्मणोन सरकारचें पत्र सन आर्बा समानीनांत सादर जाहलें असतां, ऐवज मजुरा न देतां सक्ती करून रोहिले पाठऊन महालीं कमाविसदारापासून ऐवज घेतला, व सन खमस समानीनचा भिलपट्टीचा ऐवज सरकारांतून घ्यावयाची आज्ञा नसतां उपद्रव करितां; व महालीं भिल्लांनीं नुकसानी केली, तो ऐवज मजुरा द्यावयाचा करार शिवराम नारायण यांणीं केला असतां देत नाहीं, ह्मणोन हुजूर विदित जाहलें; त्याजवरून हें पत्र सादर केलें असे, तरी भिल्लांनीं गांव लुटल्यामुळें नुकसानी जाहली व शिबंदी पडली, व वरकड महालचे शिरस्तेशिवाय भिलपट्टीचा ऐवज ज्याजती घेतला व दहका बाबत ऐवज ज्याजती घेतला असेल, त्यास वाजबी हिशेबमुळें ज्याजती ऐवज तुह्मांकडे निघेल तो त्यांस मजुरा देऊन, कानगोईचा ऐवज बाकी राहील तो याजपासून घेणें, व पुढें भिलपट्टीचा उपद्रव न करणें ह्मणोन चिटणिसी. पत्र १.

६५६–( १००७ ) भिल्लांनीं मुलकांत दंगा केला, कण्हेरा किल्ला घेतला, सबब त्यांचे पारपत्यास सरकारांतून फौज पाठऊन पारपत्य करून किल्ला सरकारांत घेतला. भिल्ल तेथून पळोन गेले; आणि बजीद होऊन सरकारांत भिल्लांनीं बाळाजी भिकाजी, व बाजी नारायण यांचे मारफतीनें महादाजी अनंत यांजपाशीं बोलणें लाविलें कीं, पूर्वीं श्रीमंत कैलासवासी बाजीराव साहेब यांणीं तह ठराऊन गांवगन्ना हक्क द्यावा. भिल्लांनीं जागल गांवगन्ना करावी. याप्रमाणें करार केला आहे. त्याप्रमाणें हल्लीं चालत नाहीं, त्यास साहेबीं कृपाळू होऊन आमचा हक्क गांव-

तिसैन
मया व अलफ
रजब १

(656) The Bhils raised an insurrection in the country and captured the fort of Kanherá. An army was therefore sent against them and the fort was taken back. The Bhils fled, and begged Mahádji Anant, through Báḷáji Bhikáji and Báji Náráyaṇ, that the Haks from villages, as agreed upon by the Peshwá Bájirao which were held back, might be continued to them, and intimated that if the Haks were granted, they would do the Police-duty of the villages and refrain from creating any disturbance. An agreement was then taken from the Bhil-Naiks.

A. D. 1789-90.

गन्ना चालवावा. जागल करून राहूं. मुलकांत दंगा करणार नाहीं ह्मणोन; त्याजवरून भिल्लांचे नाईकापासून मुचलका सरकारांत लेहून घेतला कीं, रानांत व डोंगरांत हट्या आहेत त्या मोडाव्या. गांवगन्ना राहून जागल करावी. हक्क पूर्वीचे कराराप्रमाणें गांवगन्ना सुदामत घ्यावा. हत्यार तरवार बंदूख बाळगूं नये. कमठा व तीर दरगांवीं जागलीस व वाट घाट चालवावयास बाळगावा; आणि लाखेचा लाखोटा गळ्यांत सरकारचे मोहरेचा बाळगावा व मोहरेचे लाखोट्याशिवाय भिल्ल राहील त्याचें पारपत्य करावें, याप्रमाणें करार करून सरकारांतून तीर्थ[स्व?]रूप कैलासवासी बाजीराव साहेब यांणीं गांवगन्ना हक्क चालवावयाचा करार केला आहे, त्याप्रमाणें हल्लीं करार करून भिल्लांपासून गांवगन्ना जागलीची व वाट घाट चालवावयाची चाकरी घेऊन, व गळ्यांत लाखेचा लाखोटा सरकाचे मोहरेचा बांधून, हक पूर्वींपासून चालत असेल, त्याचा भोगवटा मनास आणून, गांवगन्ना रयत निसबत ताकीद करून सुदामतप्रमाणें हक चालवीत जाणें ह्मणोन, महालानिहाय वगैरे यांचे नांवें चिटणिसी. पत्रें.

२ तुकोजी होळकर यांस.

१ परगणे वेरूळ.

१ परगणे उत्राण.

---

२

१ परगणे मेहुणबारें, निसबत माधवराव रामचंद्र यांस.

१ परगणे भडगांव, निसबत महादाजी नीलकंठ यांस.

१ परगणे वैजापूर, निसबत रामचंद्र नारायण यांस.

---

1 That they, the Bhils, would abandon the Haṭṭis (residences) built in forests and mountains.

1 That they would live in the villages and do the Police- duty.

1 That they would receivetheir Haks as usual.

1 That they would possess no sword or gun.

1 That they would use only arrows while on patrol duty in the Ghauṭs.

1 That they would wear each round his neck a packet bearing 'the seal of Government.'

1 That the Bhil wearing no such packet should be punished.

Orders were then issued to the various districts to cause the Haks due to Bhils to be paid by the rayats as before.

१ परगणे बहाळ, निसबत शिवराउ पवार यांस.

१ परगणे जामनेर, निसबत आनंदराव भिकाजी यांस.

१ कसबे वाकळे, निसबत लक्ष्मण त्र्यंबक यांस.

१ परगणे शेंदुरणी, निसबत रघुनाथ सदाशिव यांस.

१ परगणे वाळुंज, व सुलतानपूर, व खानापूर, निसबत पांडुरंग बल्लाळ यांस.

१ परगणे अंतूर, निसबत बाजी नारायण दिंमत राजश्री बाळाजी जनार्दन यांस.

१ कसबे जातेगांव, निसबत गिरमाजी मुकुंद यांस.

१ परगणे पाटोदें, निसबत बळवंत आपाजी यांस.

१ परगणे पाटोदें, निसबत शिवाजी विठ्ठल यांस.

१ परगणे गांडापूर निसबत व्यंकटराव महादेव यांस.

१ परगणे पाटोदें, निसबत विठ्ठलराव रामचंद्र यांस.

१ परगणे वेतालवाडी, व परगणे कन्नड, व परगणे टाकळी, व परगणे खुलताबाद, व परगणे फुलंबरी, व परगणे सुतोडा, निसबत संभाजी, व जोत्याजी, व मळोजी जाधवराव यांस पत्र.

१ परगणे चाळीसगांव, निसबत रघुनाथ सदाशिव यांस.

१ परगणे पाचोरें, निसबत भिकाजी विश्वनाथ यांस.

१ परगणे देहरें, प्रांत खानदेश, निसबत निळो यादव दिंमत यज्ञेश्वर दीक्षित यांस.

१ सरसुभा प्रांत खानदेश, निसबत नारो कृष्ण यांस.

१ परगणे देहरें.
१ परगणे चाळीसगांव.
१ परगणे मेहुणबारें.
१ परगणे बहाळ.
१ परगणे भडगांव.
१ परगणे उत्राण.
१ परगणे पाचोरें.
१ परगणे शेंदुरणी बारें.
१ परगणे जामनेर.

——
९

एकूण महाल नऊ येथील सरंजामी व कमाविसदार व जमीदार यांस ताकिदीविशीं.

२६ जमीदार व मोकदम यांस पत्रें सदरहूप्रमाणें, व तुह्मीं भिल्लांचे गळ्यांत सरकारचे मोहरेचा लाखोटा पाहून, त्यांजपासून गांवगन्ना जागलीची व वाट घाट चालवावयाची चाकरी घेऊन पूर्वीं हक पावत असेल, त्याप्रमाणें रयत निसबत चालवीत जाणें ह्मणोन.

पत्रें.

९ प्रांत खानदेश येथील देशमुख, व देशपांडे यांस.

१ परगणे चाळीसगांव.
१ परगणे मेहुणबारें.
१ परगणे भडगांव.
१ परगणे बहाल.
१ परगणे उत्राण.
१ परगणे पाचोरें.
१ परगणे शेंदुरणीबारें.
१ परगणे जामनेर.
१ परगणे देहरें.

९

१७ वरघाटचे महाल येथील देशमुख, व देशपांडे, व मोकदम यांस.

१ परगणे वेतालवाडी.
१ परगणे खानापूर.
१ परगणे वाळुंज.
१ परगणे सुलतानपूर.
१ परगणे कन्नड.
१ परगणे वेरूळ.
१ परगणे खंडाळें.
१ परगणे टाकळी, व खुलताबाद
१ परगणे फुलबारी.
१ परगणे वैजापूर.
१ परगणे अंतुर.
१ परगणे सुतोंडा.
१ परगणे गांडापूर.
१ परगणे पाटोदें.

१४

मोकदमांस.

१ कसबे आकळें.
१ कसबे जातेगांव.
१ कसबे सिऊर, व कसबे धांधलगांव.

१७

२६

४७

सत्तेचाळीस पत्रें दिल्हीं असेत.

६५७–( ११०० ) धोंडो महादेव याचे नांवें कीं, तुह्मीं विनंतिपत्रें छ. ४ रजबचीं पाठविलीं तीं प्रविष्ट जाहलीं. तालुके जवारीपासून तहद जुन्नरचे सरहदपर्यंत घाटबंधाटीनें शंभर कोसपावेतों, चोरटे कोळी यांणीं मोठा प्रळय मांडिला आहे. शंभर पाउणशें याप्रमाणें जमावाच्या

आर्बा तिसेन मया व अलफ रजब २७

(657) Dhondo Mahádeo represented that the Kolis were infesting the country for about 200 miles along the Ghauts from Táluká Jawar to the boundaries of Junnar, that they had formed into bands consisting of 75 or 100, that they levied black-

A. D. 1793-94.

टोळ्या दहा बारापर्यंत जमा होऊन, गांवगन्ना खंडण्या घेतात, व गांव जाळितात, माणसें मारितात. रतनगड, व त्रिंबक तालुका मिळोन शें दीडशें माणूस घाटाखाले बंदोबस्तास पाठविलें आहे; परंतु सरहद्द लांब चहुं पांचा जागा थांगे धरून लोक ठेविल्यावांचून बंदोबस्त होत नाहीं. दोनशें गाडदी त्यांचे खर्चाची बेगमी होऊन यावयाची आज्ञा लौकर जाहल्यास कांहीं किल्यांचे लोक, व गाडदी मिळोन चहुं पांचा जागा थांगे धरून, चोरट्यांचें पारिपत्य करावयास येईल. किल्यावरील भरती कमी करतां येत नाहीं. गाडदी बेगमी होऊन यावयास आठ पंधरा दिवस लागतील. मुलुक मारला जातो. हें जाणून शंभर सवाशें माणूस जदीद ठेऊन, व किल्याचे लोक ऐसे रवाना केलें. इतकियानें चोरट्यांचा बंदोबस्त होणार नाहीं. व राणेखान याजकडील पागा मौजे पांढुरली परगणे नासिक येथें मुक्काम करून राहिली आहे. किल्ले अलंग येथील जहागिरीचे गांवगन्ना रावाचीं गवतें नेतात. कुणबियांचे गांवांत गेल्यावर लावणी पडेल येविशींचे तपसीलें लिहिलें तें कळलें. त्यास गाडदी हुजूरचे यावयाचे नाहींत. दोनशें पावेतों माणूस तालुके त्रिंबक येथील शेऱ्याप्रमाणें तुह्मीं जदीद ठेवणें, व किल्याचे लोक मिळोन चोरट्यांचें पारपत्य करणें. बंदोबस्त जालियावर जदीद लोक दूर करणें. राणेखान याजकडील पागेचा उपद्रव गांवगन्ना होऊं नये ह्मणोन ताकीद केली आहे. उपद्रव लागणार नाहीं ह्मणोन. सनद १.

रसानगी, त्रिंबक नारायण परचुरे कारकून निसबत दप्तर.

६५८–( ११०५ ) नारो कृष्ण सरसुभा प्रांत खानदेश यांस कीं, तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. खानदेश प्रांतीं भिल्ल डोंगरांत जमा होऊन उपद्रव करूं लागले, त्याजवरून सरसुभा जदीद शिबंदी ठेऊन भिल्लांवर तळघाटीं चढाई केली; आणि वरघाटाकडून बाजी नारायण कमाविसदार परगणे अंतूर यांस सामील व्हावें ह्मणोन सांगितलें, त्याजवरून शिबंदी ठेऊन त्यांणीं व आह्मीं भिल्लांच्या हट्ट्या मारल्या, तेंव्हां भिल्ल जेर होऊन भेटले, त्यांचें बोलणें कीं पेशजींचे कराराप्रमाणें गळ्यांत लाखेचे लाखोटे बांधून, डोंगर सोडून, वाट घाट चालऊन

अर्बा तिसेन मया व अलफ सवाल ३०

---

mail from the villagers, burnt villages, and killed the villagers; that he had sent about 100 or 150 men from Ratangad and Táluká Trimbak for putting down the marauders. He asked for further assistance. He was permitted to entertain 200 men for the purpose.

( 658 ) The Bhils again made an insurrection in Khándesh. Náro Krishṇa Sar Subhá, Khándesh, attacked them. They offered to adhere to their former agreement, to tie round their necks sealed billets, to leave the hills, and to do duty as watchmen. Their offer was accepted, and their Haks were ordered to be continued to them.

A. D. 1793-94.

जागल करून राहूं. उपद्रव करणार नाहीं. किन्हई वगैरे ठिकाणीं ठाणीं ठेवावयाचीं असतील तेथें ठेवावीं. यास्तव आज्ञा येईल त्याप्रमाणें करीन, ह्मणोन लिहिलें. त्यास तुह्मीं व बाजी नारायण कमाविसदार परगणे अंतूर यांणीं शिबंदी ठेऊन भिल्लांचें पारिपत्य केलें, त्याजवरून भिल्ल भेटले, त्याचें बोलणें पडलें आहे, त्यास त्यांचे गळ्यांत लाखेचे लाखोटे बांधून, गांवगन्ना राहून, जागल करावी, डोंगरांत राहूं नये, येविशीं खातरजमा करून घेऊन, त्यांचा हक सुदामतप्रमाणें असेल तो ताकीद करून देवणें. सदरीलप्रमाणें बंदोबस्त करून शिबंदी दूर करणें. किन्हई वगैरे येथें ठाणीं तूर्त ठेवावयाचीं नाहींत. मसलत समंधें जदीद शिबंदी लाविली असेल, त्याच्या खर्चाचा ऐवज सरसुभा प्रांत मजकूर येथील हिशेबीं खर्च लिहिणें, समजोन मजुरा पडेल. शिबंदीचे खर्चाबद्दल भिलपट्टीचे ऐवजाचा वसूल घेतला असेल तो हिशेबीं जमा करणें ह्मणोन. सनद १.

राजश्री त्रिंबक नारापण परचुरे, कारकून निसबत दप्तर.

---

# १. राजकीय.

## ( क ) देशांतील बंडें.

### ( ३ ) इतर.

### नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

६५९.—( १९० ) चिमणराव देशमुख बागलाणकर याणें सरकारच्या परगणेयांत दंगा करून गांव मारितो, त्याचें पारिपत्य जाहलें पाहिजे, त्यास पंचवीस तीस हजार रुपये खर्च लागेल. पारिपत्य जाहल्यावर सदरहू खर्चापैकीं कांहीं ऐवज उगवेल, व दहा वीस हजारांचा मुलूख नेहमीं सर-

खमस सबैन मया व अलफ रबिलाकर ५

---

1 POLITICAL MATTERS.

C Risings in the Country,

(3) By others.

FROM NÁRO APPÁJI'S DIARY.

(659) Govind Hari Kamáwisdár of Báglán was at his request permitted to reduce to obidience Chimanrao Deshamukh of Báglán who was given to pillaging the country. The amount of Rs. 25,000 to 30,000 required for the purpose was ordered to be recovered as far as possible by forfeiting the Deshamukh's property and by fining his adherents.

A. D. 1774-75.

कारांत येईल. येविशीं आज्ञा जाहली पाहिजे, ह्मणोन तुह्मीं विनंतिपत्र लिहिलें, त्याजवरून हे सनद सादर केली असे, तर तुह्मीं व शंकराजी खंडेराव, व लक्षुमण विश्वनाथ, तालुके मो(मु)ल्हेर त्रिवर्गीं एकत्र होऊन देशमूख मजकूर याचें पारिपत्य करणें. या कामास तुमचे लिहिल्या अन्वयें पंचवीस तीस हजारपर्यंत रुपये लागतील ते तुह्मीं लावणें, त्यापैकीं परभारा ऐवज जितका उगवेल तो उगऊन घेणें, बाकी ऐवज राहील तो पेस्तर सालचे रसदेंत तुह्मांस मजुरा दिल्हा जाईल. दहा वीस हजारांचा मुलूख सरकारांत यावयाचा तो घेऊन बंदोबस्त करणें. देशमुख बदफैली करितो. त्याचें पारिपत्य होऊन, देशमुखास जे मिळोन आहेत, त्यांजकडून वगैरे ऐवज मसलत खर्चाचा परभारा उगऊन, पारिपत्य लौकर कराल हा भरंवसा आहेच. तरी लिहिल्या अन्वयें जलदीनें करणें ह्मणोन, गोविंद हरी कमाविसदार, परगणे बागलाण यांस. छ. ४, सफर. सनद १.

रसानगी यादी.

६६०–( ४७२ ) लक्ष्मण चांदो, व वासुदेव नारायण कमाविसदार परगणे भामेरें यांस सनद कीं, दोंडाईचकर राऊळ याजकडे मौजे वडदें तर्फ निंबगुळ पैकीं, नंदुरबार येथील चौथाई होती, त्यास राऊळानें मौजे मजकुरीं गढी बांधिली; आणि लोक मेळऊन परगण्यांत उपद्रव करितो, ह्मणोन हुजूर विदित जाहलें. ऐशास परगणे मजकूरचे लोक राऊळाकडे कोणी गेले असतील त्यांचीं घरें, वस्तभाव, मुलें माणसें सुद्धां जप्त करावयाची आज्ञा तुह्मांस केली असे, तरी रावळाकडे जे कोणी चाकरीस गेले असतील ते ठिकाणीं पाहून, त्यांचीं घरें, वस्तभाव सुद्धां जफ्त करणें; व मुलें माणसें कैद करून ठेवणें ह्मणोन. सनद १.

समान सबैन मया व अलफ रजब ६

रसानगी यादी.

## मुतालिक ह्यांचे रोजनिशी पैकीं.

६६१–( १३ ) जडगापा देसाई, परगणे चिमलगे याणें दंगा करून परगणे मजकूरचे गांव मारिले. याजकरितां पेशजीं तुह्मीं देसाई मजकूर यास धरून कैद केला होता, त्यास हमीदा बेगम कोम सिद्दी रहीम देसाई प्रांत विज्यापूर ही फैल जामीन राहून, देसाई मजकूर यास सोडवून नेला

समान सबैन मया व अलफ रबिलाखर ९

---

( 660 ) The Rául of Dondaiche built a fortified place at Wadade in Tarf Nimbguḷ in Parganá Nandurbár, and having enlisted some men in his service, plundered the country around. Orders were therefore issued to the Kámávisdárs of Parganá Bhámare to attach the houses and property of all persons who had joined him.

A. D. 1777-78.

FROM MUTÂLIK'S DIARY.

( 661 ) Jadgappá Desái of Parganá Chimalge raised an insurrection

असतां, फिरोन परगणे मजकुरीं वगैरे महालांत दंगा करून मुलूख मारिला, सबब जामीनापासून सरकार नुकसानीचे वगैरे कितेक जाबसाल भरून घ्यावयाचे, याजकरितां हमीदा बेगम इचे दरोबस्त महालानिहायचे देशमुखीचे वतनाची जप्ती करून, त्याची कमाविससादर केली असे, तरी देशमुखीचे वतनाचा हकदक, मानपान, व उबलीचे गांव वगैरे जे असतील ते जफ्त करून, वसूल घेऊन, सरकारहिशेबीं जमा करणें ह्मणोन, नारो राम कमाविसदार परगणे चिमलगे यांस. सनद १.

येविशीं देशमुखीचे वतनाची वगैरे हकदक, मान, व उबलीचे गांव वगैरे परत नेले असतील, त्यांचा वसूल मशारनिल्हे यांजकडे देणें ह्मणोन, चिटणिसी अठरा परगणे. व नऊ ठाणीं बेगम देसाई मजकूर हिची आहे. तेथील कमाविसदारांस व जमीदारांस. पत्रें ५४.

२ परगणे होनवड.

१ कमाविसदार, निसबत रास्ते.

१ देशमुख, व देशपांडे यांस.

———

२

२ परगणे गोटे कमाविसदार, निसबत प्रतिनिधी; व देशपांडे यांस.

२ परगणे आलमेल कमाविसदार, निसबत विसाजी कृष्ण; व देशपांडे.

२ परगणे अथणी कमाविसदार, निसबत रास्ते; व देशपांडे.

२ परगणे इंडी कमाविसदार नरसिंगराव जनार्दन; व देशपांडे.

२ परगणे तांबे कमाविदार नरसिंगराव जनार्दन; व देशपांडे.

२ परगणे हलसगी कमाविसदार नरसिंगराव जनार्दन; व देशपांडे.

२ परगणे होरती.

२ परगणे मुळवाड.

२ परगणे उकळी.

२ परगणे बागेवाडी.

२ परगणे कोल्हार.

२ परगणे ममदापूर.

---

A. D. 1777-78. and plundered some villages in the Pargaṇá. He was therefore arrested and imprisoned. Hamidá Begam Kom Siádi Rahim Desái of Pargaṇá Vijápur having stood security for him, he was released. He again raised an insurrection and plundered the country. Hamidá Begam's watan was attached pending a settlement of the sum due from her on account of the loss caused to Government.

२ हवेली विजापूर कमाविसदार, निसबत प्रतिनिधी; व देशपांडे.

२ परगणे जालवार कोकटनूर.

२ परगणे हुसूर कमाविसदार भापकर; व देशपांडे.

२ परगणे बिदरी कमाविसदार, निसबत शंकराजी घोरपडे; व देशपांडे.

२ परगणे हिपरगे.

२ परगणे चिमलगे, नागोराम कमाविसदार यांस; व देशपांडे,

२ परगणे कोकटनूर कमाविसदार, निसबत खंडेराव पाले; व देशपांडे.

२ परगणे बेलवती.

२ परगणे सिद्धनाथ.

२ मौजे गीरसागर परगणे रुळी.

२ परगणे चांद कवठें.

२ परगणे.

२ परगणे.

२ ————

---

५४ ५५

रसानगी यादी.

६६२–( ८८५ ) उद्धो दादाजी कमाविसदार, परगणे डबई, यांचें नांवें सनद कीं, तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें पावलें. परगणे मजकूर येथें इंद्राळेकर, व भमेरीकर, व जिरेकर गिराशे, तालुके चांपानेर व भिलाडें, तालुका गाइकवाड, यांणीं महालांत नित्य धाडी घालून गांव मारावे, व खळीं जाळावीं, पाटील धरून न्यावे, मारहाण करावी, जाजती गिरास मागावी, याप्रमाणें उपद्रव देऊं लागले. यास्तव जाजती शिबंदी ठेऊन, गिराशाचें पारिपत्य केलें; परंतु फिरोन गिराशे जमाव करून परगण्यांत उपद्रव करणार, त्यांचे पारपत्यास जाजती शिबंदी ठेऊन, बंदोबस्त जाहला पाहिजे ह्मणोन, तुह्मीं लिहिलें; त्यास गिराशाचे बंदोबस्ताबद्दल कार्याकारण जाजती

खमस समानीन
मया व अलफ
जमादिलाखर २०

---

(662) Uddho Dádáji, Kamáwisdár of Dabhoi represented that Girasias of Indrále, Bhámeri, and Jiri in Tâluká Champáner &c, frequently committed raids on the villages in his charge, made increased demands on account of their Girás, and took the Pátils prisoners, and prayed that sanction might be given to his entertaining more Shibundis. The sanction was given.

A. D. 1784-85.

शिबंदी लागेल, ते सरसुभ्याचे विद्यमानें ठेऊन, गिराशाचें पारपत्य करणें; आणि गिराशाचें पारपत्य जाहल्यावर दूर करणें ह्मणोन. सनद १.

परवानगी रूबरू.

६६३–( १००५ ) नारो चिमणाजी कमाविसदार परगणे अरूण वगैरे महाल यांचे नांवें सनद कीं, तुह्मीं विनंतिपत्रें पाठविलीं तीं प्रविष्ट जाहलीं. परगणे मजकूर येथें सेरसिंग गिराशा वगैरे यांणीं दंगा बहुत केला. चिचोर्डा किल्ला शिंद्याकडील घेतला. मौजे पिंपरिया परगणे मावन या ठाण्यास मोर्चे लाविले होते, त्यास स्वामीचे प्रतापेंकरून स्वार व प्यादे सरंजाम सुद्धां घेऊन जाऊन मोर्चे उठऊन दिले, परंतु सरकार तालुका खराब फार केला. घासदाण्याचे रोखे करून गांवगन्ना ऐवज घेतला. बळवंतसिंग लष्करांतून सुटून आल्यामुळें त्याचे भाऊबंद वगैरे मिळोन नानाप्रकारचे उपद्रव देतात, व ठाणीं ध्यावयाचे उद्देशांत आहेत. येविशीं त्यांस पत्रें पाठविल्यास, परस्परें एकमेकांवर घालितात. गांवगन्ना स्वाऱ्या करून जिराइताची वगैरे खराबी बहुत केली. तर्फ शहा पिंपरिया येथील पांच सहा गांवची बदमवेसी नेली. शिंद्याचीं पत्रें खेचीस येतात, त्यांचीं उत्तरें ते सालसीनें लिहितात. आह्मांकडील कारकुनापासीं खेची ह्मणतो कीं मुलुकाची आह्मांस आशा नाहीं. काहड चालेल तसें करूं आणि पोट भरूं. याप्रमाणें बोलतो. सालमजकुरीं हरभरेयाचे पिकावर हींव पडोन शेतें करपून गेलीं, व मदसुदनगडचा किल्ला व झाझोणचें ठाणें खालीं करून द्या ऐसें ह्मणतो. नवी शिबंदी ठेवून बंदोबस्त करित आहे ह्मणोन लिहिलें, त्यास मुलुकाचा व ठाण्याचा बंदोबस्त जाहला पाहिजे, यास्तव नेमणुकी स्वार व प्यादे आहेत, त्याशिवाय स्वार व प्यादे कार्याकारण ठेऊन ठाण्याचा व किल्याचा व मुलुकाचा बंदोबस्त करणें ह्मणोन. सनद १.

तिसेन मया व अलफ जमादिलाखर १९

रसानगी, त्रिंबकराव नारायण परचुरे कारकून निसबत दप्तर.

६६४–( १०३२ ) सरसुभा प्रांत गुजराथ येथें मवासांनीं दंगा केला होता, त्यांचे

---

( 663 ) Shersing Girassia created a disturbance in Pargaṇá Aruṇ &c. He captured the fort of Chichordá belonging to the Scindia. He also laid siege to the Tháṇá of Pimpriyá in Pargaṇá Máwan, but was repulsed by the Kamávisdár. He was assisted by Baḷwantsing who was a deserter from the army. They levied contributions from the people and completely ravaged the country. The Kamávisdár therefore asked for assistance. He was directed to entertain as many new men as were necessary, and to punish the rebels.

A. D. 1789-90.

( 664 ) The Mawás having created a disturbance in Gujerath, a force was sent to assist the Sar Subhá.

A. D. 1790-91.

इहिदें तिसेन मया व अलफ सवाल ७. पारिपत्यास हुजुरून पागा व पथकें व गाडदी पेशजीं पाठविले आहेत, त्याप्रमाणें कृष्णराव भिवाजी तालुके अमदाबाद यांजकडे.

सरंजामी पथकें यांचे स्वार.
२०० दिंमत रामचंद्र नागनाथ.
१५० दिंमत काशीराव रास्ते.

---

३५०

गाडदी दिंमत हाये निसबत राघो विश्वनाथ याजकडील असामी ५२५

एकूण साडे तीनशें स्वार, व पांचशें पंचवीस गाडदी देविले असेत, तरी सदरहूप्रमाणें मशारनिल्हेकडे रवाना करणें ह्मणोन, हरी चिंतामण यांचे नांवें. सनद १.

६६५–( १०६५ ) मल्हार खंडेराव यांणीं मोगलाई जाहागीरदार यांस मिळोन सरकार अमलांत बखेडे केले, सबब त्यांस कैद करून किल्ले अवचितगड तालुके मजकूर येथें अटकेस ठेवावयास, बरोबर चिंतो बापूजी याजकडील गाडदी देऊन पाठविले असत; तरी किल्ले मजकुरीं पक्के बंदोबस्तानें अटकेस ठेऊन, पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें ह्मणोन, बाबूराव पासलकर यांचे नांवें.

सलास तिसेन मया व अलफ जमादिलावल ५.

सनद १.

रसानगी, त्रिंबकराव नारायण परचुरे.

६६६–( १०७७ ) बाबूराव पासलकर यांचे नांवें कीं, तुह्मीं विनंतिपत्र छ. २१ सवालचें पाठविलें, तें प्रविष्ट जाहलें. जंजीरकराकडील चोरटे मुलकांत उपद्रव करावयास आले होते. त्याजवर स्वारी पाठविली त्यांणीं व किल्ले सोनगिरीस बातमीस आला होता, तो मिळोन सात आसामी धरून आणिले; त्यांजपैकीं पांच असामीचे हातपाय जंजीकराकडील महालचे सर्देवर नेऊन

आर्बा तिसेन मया व अलफ जिल्काद ३

---

(665) Malhár Khanderao, having with the assistance of Moglái Jahágirdárs created a disturbance in the Government territory, was sent to fort Awachitgaḍ for being imprisoned.

A. D. 1792-93.

(666) Thieves from the territory of Janjirkar were infesting the country. They were arrested by Báburao Pásaḷkar, and the hands and feet of five of them were cut off on the borders of the Janjirkar's territory. The Janjirkar having issued an order to the Jamidárs of the Peshwá's province to keep the country desolate, a counter order to the same effect was issued by Báburao to the officers of the Janjirkar. Báburao reported the matter to Government, and his action was approved.

A. D. 1793-94.

तोडविले. दोन असामी दाखल्यास ठेविले आहेत; व जंजीरकरानें बेकौल मुलकाची वसाहत न करण्याविशीं जमीदारास पाठविला होता. तो शेवेसीं पाठविला आहे; व चोरट्याचीं हत्यारें पाडाव करून आणिलीं आहेत; व जंजीरेकराकडील महालांत वस्ती न करण्याविशीं बेकौल पाठविले आहेत; ह्मणोन तपशीलवार लिहिलें तें कळलें. त्यास चोरटे पांच असामींचे हातपाय जंजीरकराचे सर्देवर तोडविले, व बेकौल चिठ्या त्यांचे महालीं पाठविल्या. उत्तम केलें. दोन चोरटे दाखल्यास ठेविले आहेत, ते पक्के बंदोबस्तानें ठेवणें, हत्यारें पाडाव करून आणिलीं आहेत; तीं तालुके बीरवाडी येथील हिसेबीं जमा करणें ह्मणोन.

सनद १.

रसानगी, त्रिंबक नारायण परचुरे कारकून निसबत दप्तर.

६६७–( ११०९ ) महादजी खंडेराव यांचे नांवें सनद कीं, तुह्मीं छ. २ जिल्हेजचें विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. कित्तूरकर देसाई जांबतुटीचे रानांत होता, तेथून पंचवीस स्वारांनिशीं निघोन, सुरापूर तालुक्याकडे गेला. ह्मणोन दोन चार बातम्या आल्या. बायका अगोदरच हलसीहून विजापुराकडे पाठविल्या, ह्मणोन बातमी आहे. काटक प्यादे वगैरे एक हजार अजमासें त्याजपासून निघोन, ते धारवाड वगैरे तालुक्यांत राहिले आहेत. त्यांचें बोलणें, ज्या गांवचे आहेत त्या गांवकरियांचे गुजारतीनें जामीन देऊन गावांत येतों ह्मणोन आलें. त्याप्रमाणें येत आहेत जांबुटकर देसाई याजवळ हल्लीं कित्तूर तालुक्याचे नाईकवाडी, काटक वगैरे देसाई याचे मिलाफी दोनशें व कारभारी दहा बारा असामी आहेत, व ककीरे कर्यातींत ककीरेकर देसाई यांजकडील व कित्तूरकरांकडील मिळोन पांच सहाशें माणूस आहे, त्यास ते नित्य उपद्रव करूं लागले असतां अबादी होणार नाहीं. शिबंदी दीड हजार माणूस व पांचशें स्वार ठेविले असतां बंदोबस्त होणार नाहीं. ककीरेकर देसाई दोन वर्षे अंमल चालूं देत नाहीं त्यास झाडींतील चार देसक जांबूट कमाविसदाराचे इतल्यांत आहेत. त्यांचें ह्मणणें कीं, कित्तूरकर देसाई यानें खानापूर महालाचे सरदेसकतीचे सहा हजार रुपये आकाराचें वतन माझें जबरदस्तीनें घेतलें आहे, तें मजला द्यावें; व एक वर्षपर्यंत शिबंदीचे खर्चास बाराशें रुपये दरमहा द्यावे. ह्मणजे झाडीचे आंगें तालुके मजकूरच्या सात आठ कर्याती आहेत, तेथें शिबंदी ठेऊन कोणाचा तलीतगादा होऊं देत नाहीं. येविशीं जामीन देतों. उपद्रव हो-

खमस तिसेन
मया व अलफ
जिल्हेज १४

---

(667) Mahádji Khanderao wrote that the Desái of Kittur had gone from the Jambut forest into the Pargaṇá of Surápur, that Kakirekar Desái had some force with him, that Jambutkar Desái offered to put down the Kitturkar, if he were given his watan worth Rs. 6000 taken by the Kitturkar. His offer was accepted.

A. D. 1794-95.

ऊन सरकार तालुक्याची खराबी जाहल्यास वतन चालवूं नये. नुकसानी जामिनापासून घ्यावी. ककीरे कर्यातींत अमल चालला नाहीं तो हस्तगत करून देतों ह्मणतो. त्याचा आकार सालास तीन हजार पर्यंत होईल. जांबुटकर वगैरे झाडींतील देसक याचें पारिपत्य व्हावें, तर परजन्यकाळ. झाडींत फौजेचा लाग नाहीं. फौज राहील ते कांहीं कावाड करील, यामुळें लावणी होणार नाहीं. यास्तव असें जाहल्यास बंदोबस्त होईल. बाकी देसच्या कर्याती मैदानच्या आहेत. चारशें स्वार व हजार गाडदी चार मास ठेविल्यानें बंदोबस्त राहील ह्मणोन लिहिलें, तें विदित जाहलें. ऐशास ज्या गांवचे काटक त्या गांवकरियाचे गुजारतीनें काटकांनीं फंद फितूर करूं नये, रयतेप्रमाणें गांवांत राहून रयतीप्रमाणें वसूल द्यावा, असे पक्के जामीन घेऊन त्यांस गांवगन्ना राहण्याची परवानगी देणें. जांबुटकर देसाई यांजपासून आठ कर्यातींत तलीतगादा कोणाचाही होऊन एक रुपयाचें नुकसान कधीं जाहल्यास भरून घ्यावें व पुढें वतन चालऊं नये, असा जामीन खातरजमेचा घेऊन दरमहा बाराशें रुपये शिबंदी खर्चाचे एकसाल द्यावयाचा करार करून बंदोबस्त करणें; आणि खानापूरचें वेतन पहिलें आपलें चालत होतें म्हणतो, त्याची चौकशी करून पेशजींपासून चालत होतें असें असल्यास, सहा हजार रुपयांचें वेतन त्याजकडे चालतें करणें; व देसचे कर्यातीचे बंदोबस्तास धोंडो बल्लाळ यास त्याची पागा व गाडदी धारवाड पैकीं पांचशें, व हुजूरचे पांचशें, मिळोन हजार, इतक्या सरंजामानिशीं ठेऊन तुह्मीं निघोन येणें ह्मणोन, महादाजी अनंत यास अलाहिदा लिहिलें आहे, तर सदरहूप्रमाणें जांबुटकरानें जामीन दिल्हा ह्मणजे खानापूरचें वतन याजकडे चालू करणें. व दरमहा बाराशें रुपये शिबंदी खर्चाबद्दल एकसाल देऊन, तालुके मजकूरचे हिशेबीं खर्च लिहिणें; आणि धोंडो बल्लाळ यास सरंजामानिशीं तालुक्याचे रखवालीस ठेवले आहेत, तर तुह्मीं रयतेस दिलदिलासा देऊन तालुक्याची लावणी व आबादी करणें. कित्तूरकर देसाई सुरापुराकडे गेला असल्यास कैद करून हुजूर पाठवणें ह्मणोन. सुरापूरकर यास पत्रें गेलीं आहेत, तर देसाई याचें पक्कें ठिकाण लाऊन लिहून पाठवणें ह्मणोन.

सनद १.

रसानगी, त्रिंबक नारायण परचुरे कारकून निसबत दफ्तर.

६६८–( १११२ ) परशराम रामचंद्र यांचे नांवें सनद कीं, सावनूर तालुक्यांत धोंडजी वाघ याचा उपद्रव जाहला होता, याजकरितां तुह्मीं सरकारचे गारदी ठाण्याठाण्यांत बंदोबस्तास ठेविले आहेत. त्यास धोंडजी वाघ टिपूकडे सांपडला. तालुक्यांतील बखेडा मोडला. यास्तव गाडदी

खमस तिसेन मया व अलफ मोहरम १३

(668) Dhondji Wágh having given trouble in Sáwanur, Gárdis were placed to watch the several posts. Dhondji having been arrested in Tippoo's territory, the Gárdis were ordered to be recalled.

A. D. 1794-95.

ठेवावयाचें प्रयोजन नाहीं, तरी ठेविले आहेत ते दूर करणें. जरुराती कार्याकारण बंदोबस्तामुळें प्रयोजन लागल्यास तुह्मांकडील सरंजामी फौज पाठवून बंदोबस्त करणें ह्मणोन.

सनद १.

रसानगी, त्रिंबक नारायण परचुरे कारकून निसबत दफ्तर.

६६९–(१११५) धोंडजी वाघ याणे जमाव करून कर्नाटक प्रांतांत सरकारचे महालीं दंगा करीत होता. त्याचा भाऊ सिदोजी वाघ कांहीं लोक घेऊन सावनूर तालुक्यांत येऊन उपद्रव करीत होता. त्यास भास्कर सखदेव कमाविसदार तालुके सावनूर यांजकडील माणको आपाजी यांणीं ठाणें बेलूर परगणा हावनूर, येथून लोकसुद्धां धरून आणिला. त्यास परशराम रामचंद्र यांणीं हुजूर रवाना केला. ते तालुके हाय येथील किल्यांत पाठविले असामी ५३ त्रेपन्न असामी बराबर गाडदी असामी दोनशें दिंमत हाय निसबत गणेश हरी यांस देऊन तालुके हाय येथें अटकेस ठेवावयाविशीं पाठविले आहेत, तरी सदरहू त्रेपन्न असामीचे पायांत बेड्या घालून, पक्या बंदोबस्तानें अटकेस ठेवून, पोटास शेर शिरस्त्याप्रमाणें देऊन, कारकून खेरीज करून बावन असामींपासून इमारतीचें काम घेत जाणें ह्मणोन, मामलेदार यांचे नांवें.

खमस तिसेन
मया व अलफ
रबिलावल ४

सनदा.

१ तालुके वसई निसबत सदाशिव रघुनाथ येथें पाठविले असामी.

५ जंजिरे वसई येथें.

- १ शर बाग.
- १ कृष्णाजी भगा.
- १ धावजी फडतरा.
- १ चांदोजी वागमारे.
- १ सटवाजी शिंदा

५

५ जंजिरे अर्नाळा येथें.

- १ कासीबा शिंदा.
- १ मानाजी फडतरा.
- १ नरसोजी वणगर.
- १ मानाजी यादव.
- १ राणोजी निकम.

५

१०

एकूण दहा असामी बरोबर गाडदी असामी २८ अठ्ठावीस देऊन पाठविले येविशीं. सनद.

(669) Sidoji Wágh, Dhondji Wágh's brother, who was ravaging the Táluká of Sáwanur was arrested with his men by Mánko Appáji at Belur in Pargaṇá Hávnur. Sidoji and his men were sent to be confined in forts.

A. D. 1794-95.

# सवाई माधवराव पेशवे
# यांची रोजनिशी.

## भाग ( ४ )

## २ लष्करी खातें.

### ( अ ) फौज.

६७०–( ३ ) राणोजी सलगर सरंजामी राजमंडळ, करवीरकर याजकडील. कलमें.

अर्बा सबैन मया व अलफ रजब ४

आपाजी सदाशिव मजमदार, व लक्ष्मण पांडरंग फडणीस दिंमत सलगर, याजपासून दरकाचें कामकाज सलगर घेत नाहीं. नवे कारकून ठेविले आहेत ते कामकाज करितात. त्यास राजपत्रीं कारकून जुने आहेत. त्यांजपासून कामकाज घेऊन वेतन नेमणुकेप्रमाणें देत जाणें. व नवे कारकून ठेविले आहेत ते दूर करणें. कलम १.

राणोजी सलगर याची स्वारसुद्धां चाकरीची नेमणूक सरकारांतून होईल त्याप्रमाणें तिकडे चाकरीस न गेल्यास त्याचा जातीचा ऐवज सरकारांत घेऊन, बाकी ऐवज स्वाराची चाकरी घेऊन, नेमणुकेप्रमाणें देत जाणें. कलम १.

एकूण दोन कलमें करार केलीं असेत, तरी सदरील प्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन, लक्ष्मण बल्लाळ याचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

---

## II MILITARY ADMINISTRATION

### ( A ) Army.

( 670 ) Ráṇoji Salgar, a Saranjám-holder under the Rájâ of Karvir, was directed to remove the new kárkoons entertained by him, and to accept service from the old kárkoons appointed by order of Government. He was further told to be ready to serve with his Sawárs wherever he may be directed. His personal Saranjám was to be withheld from him if he failed to serve in person.

A. D. 1773-74.

६७१–( १० ) गोविंद बल्लाळ यांचें नांवें सनद कीं, सुलतानजी वडगर अमिरुल् उ-

अर्बा सबैन मया व अलफ रमजान ३०

मराव, दिंमत शहाजी भोसले, यांचें तर्फेनें तुमचे तीर्थरूप बाळाजी नरसी याजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम चालत होता. त्याचा तपशील.

१ परगणे अकोले येथील मोकासा देखील जकात.

*　　*　　*

येणेप्रमाणें महाल एक, व सवाता दोन, व गांव बारा येथील सदरहूप्रमाणें मोकासा चालत होता, त्यास तुमचे तीर्थरूप मृत्यु पावले, याजकरितां सरंजाम याजकडून दूर करून सालगुदस्त शहाजी भोसले याजकडे कमावीस सांगितली होती. त्यास सालमजकुरीं त्याजकडील कमावीस दूर करून तुह्मांकडे सरकारची नजर रुपये १०००० दहा हजार एक साल हप्त्याचा करार करून घेऊन पूर्ववत्प्रमाणें महाल व गांवचा सदरहू मोकासा तुह्मांस फौजेचे सरंजामास करार करून दिला असे, तरी सदरहूचा वसूल घेत जाऊन, पेशजींचे कराराप्रमाणें स्वार बाळगून, सरकारचाकरी एकनिष्ठपणें शहाजी भोसले याचे निसबतीस करीत जाणें ह्मणोन. सनद १.

येविशीं महालानिहायचे जमीदारांस व मोकदमांस सनदा कीं मशारनिल्हेसीं रुजू होऊन मुकाशाचे अमलाचा वसूल सुदामतप्रमाणें सुरळीत देणें ह्मणोन. सनदा.

*　　*　　*

शहाजी भोसले यांस सनद कीं, सदरहू सरंजामाची कमावीस सांगितली होती. ते साल मजकुरीं दूर करून बाळाजी नरसी यांचे पुत्र गोविंद बल्लाळ यांजपासून दहा हजार रुपये सरकारांत नजर घेऊन पूर्ववत्प्रमाणें मशारनिल्हेकडे फौजेचे बेगमीस सरंजाम सदरहूप्रमाणें महाल व गांवचा मोकासा करार करून दिला असे, तरी तुह्मीं यांजपासून पेशजीं कराराप्रमाणें स्वारांची चाकरी घेऊन, यांजकडे सरंजाम सुदामत बमोजीब सुरळीत चालविणें ह्मणोन. सनदा.

---

१६

रसानगी यादी.

---

( 671 ) Báḷáji Narsi held a Military Saranjám from Amirul Umrao Sultánji Vadgar under Shaháji Bhosle. On Báḷáji's death the Saranjám was resumed and given for management to Shaháji Bhosle. It was now conferred on his son Govind Ballá! and a Nazar ( tribute ) of Rs. 10,000 was levied.

A. D. 1773-74.

## नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

६७२–( १७० ) सखाराम भगवंत याचे नांवें कीं, खासबरदार नाईक असामी.

खमस सबैन मया व अलफ मोहरम ६

| | |
|---|---|
| १ खंडोजी राजगुडे. | १ खंडोजी शेवळे. |
| १ बहिरजी सिंगटे. | १ लक्ष्मण धनवडे. |
| १ राणोजी जाधव. | १ शाहाजी गोले. |
| १ अण्णाजी सिंगटे. | १ सयाजी पवार. |
| १ जानोजी शिर्के. | ——— |
| | ९ |

एकूण नव असामी वस्ती बेलमाची, किल्ले वंदन, हे किल्ले साष्टी येथें जमाव सुद्धां चाकर होते, त्यांस इंग्रजानें बदमामली करून किल्ला घेतला. तेव्हां किल्यांतून बाहेर निघाले, त्यांणीं वरकड लोक चाकरीस आहेत, त्याप्रमाणें असावें, तें नकरितां बगरहुकूम निघोन आपले घरांस गेले आहेत. त्यांचें प्रयोजन आहे; यास्तव हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, तरी सदरील नव असामी माची मजकुरीं अगर आसपास गांवीं असतील, त्यांची चौकशी करून, त्यांस आणून, बंदोबस्तानें हुजूर पाठवणें. व त्यांचीं मुलें, माणसें व भाऊबंद व दिंमतीचे लोक वगैरे जागा असतील, त्यांचा शोध करून, त्यांस जामीन चांगले घेऊन, हुजूर लेहून पाठवणें, येविशीं राजश्री शामराव जगजीवन यांस लिहिलें आहे. तें पत्र त्यांजकडे रवाना करणें. त्यांजकडील लोक पाहिजेत तरी आणवणें. पत्र पावतांच सदरील लिहिले प्रमाणें तुह्मीं चौकशी करणें. त्यांची वाट न पाहणें. येविशीं बोभाट न करितां, जलदीनें बंदोबस्त करणें ह्मणोन. छ १४ जिल्काद. सनद १.

येविशीं चिटको गुंजे मशारनिल्हेकडील किल्ले वंदनास आहेत, त्यांस कीं, सदरील लिहिले प्रमाणें बंदोबस्त करणें ह्मणोन. १

———

२

परवानगी रूबरू.

---

### FROM NÁRO ÂPÁJI'S DIARY.

( 672 ) Certain Khásbardár Naiks having gone away to their homes, when Salsette was taken by the English, instead of continuing in service, orders were issued for their being brought to the Huzur and for security being taken from their relations.

A. D. 1774-75.

## जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

६७३–( २२१ ) दिंमत पागा हुजूर याजकडेस बेगमीस सालगुदस्तांप्रमाणें सालमजकुरीं राबते महालानिहाय येथील कमाविसदारांकडून बेगारीनें.

सीत सबैन मया व अलफ जमादिलाखर २९

प्रांत पुणें निसबत रामचंद्र नारायण यांजकडून.

२५ महार.
५ मांग.
५ चांभार.

३५

एकूण पस्तीस असामीविशीं.

तालुके हवेली, संगमनेर, निसबत त्रिंबक कृष्ण यांजकडून.

३० महार.
१० मांग.
१० चांभार.
५ जिनगर.

५५

एकूण पंचावन असामीविशीं.

परगणे पारनेर निसबत नारो बाबाजी यांजकडून असामी.

४० महार.
१० मांग.
१० चांभार.

६०

एकूण साठ असामीविशीं.

तालुके राहुरी निसबत बहिरो रघुनाथ यांजकडून महार असामी १० एकूण दहा असामीविशीं.

तालुके खेड, प्रांत जुन्नर, निसबत गंगाधर रघुनाथ यांजकडून बेगारी असामी.

९ महार.
३ मांग.
३ चांभार.

१५

एकूण पंधरा असामीविशीं.

प्रांत जुन्नर निसबत रघुनाथ हरी यांजकडून असामी.

२९ महार.
११ मांग.
९ चांभार.

४९

एकूण एकूणपन्नास असामीविशीं.

परगणे नेवासें वगैरे महाल निसबत रामचंद्र नारायण यांजकडून.

७५ महार.
५ जिनगर.

८०

एकूण ऐशीं असामीविशीं.

FROM JÂNARDAN APPÁJI'S DIARY.

( 673 ) Mahárs, Mángs and Chámbhárs were obtained from certain Tarfs and Parganás for service in connection with the Huzur Pagá. The number required for each Tarf is given in this Sanad.

A. D. 1775-76.

परगणे कर्डे निसबत बाबूराव माणकेश्वर सुभेदार यांजकडून असामी.

१० महार.

५ मांग.

५ चांभार.

२०

एकूण वीस असामीविशीं.

परगणे गांडापूर निसबत नारो बाबाजी यांजकडून.

७५ महार.

१० मांग.

१० चांभार.

९५

एकूण पंच्याण्णव असामीविशीं.

तालुके बेलापूर निसबत बाळाजी केशव यांजकडून महार. असामी १०

महार. असामी. १०

एकूण दहा असामीविशीं.

दहा सनदा छ. २४ रबिलाखरीं दिल्या असेत. रसानगी यादी.

६७४–( २८२ ) परगणे जंबूसर प्रांत गुजराथ, येथील अमल नारो शंकर यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम होता, त्यास ते मृत्य पावले सबब त्यांचे पुत्र रघुपतराव नारायण राजेबहादर यांजकडे पुर्ववत्प्रमाणें परगणे मजकूरचा अमल फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून हे सनद सादर केली असे; तरी यांसीं रूजू होऊन सुदामत प्रमाणें अमलाचा वसूल सुरळीत देणें ह्मणोन, परगणे मजकूरचे जमीदारांस.

सीत सबैन मया व अलफ रबिलोवल १२

सनद १.

परवानगी रूबरू.

६७५–( २९७ ) गणेश विश्वनाथ बेहरे यांजबरोबर फौज देऊन छावणीस ठेविले आहेत,

---

( 674 ) Náro Shankar being dead, the Parganá of Jambusar in Gujeráth, which was assigned to him in Military Saranjám, was continued to his son Raghunáthrao Náráyaṇ.

A. D. 1775-76.

( 675 ) Gaṇesh Vishvanáth being left in camp with the army, the

सवा सबैन मया व अलफ रबिलाखर १८ सबब शिक्का, मोर्तब, व सिक्के दौत एकूण तीन दागिने रुप्याचे अलाहिदा अक्षरें लेहून दिल्हीं आहेत, त्याप्रमाणें शिक्यांत खोदून तयार करून देणें ह्मणोन, हरी बल्लाळ कमाविसदार परगणे पिंपळनेर यांचे नांवें.

सनद १.

रसानगी, गणेश हरी पेठे.

६७६–( ३०१ ) जगन्नाथ नारायण, तालुके असेर यांस सनद कीं, हुजूर लोकांचें प्रयोजन आहे, त्यांस पांचशें लोक चांगले मर्द, त्यांत सरदार चार पांच लढाईत कामकाज केलें असे, अढलाचे बर्कंदाज, तिरंदाज, तेथें माणूस पाहून, तैनात करून सदरील लिहिल्याप्रमाणें जदीद लोक ठेऊन, हुजूर जलदीनें रवाना करणें. या लोकांस एक रोजमरा तालुके असेर पैकीं देऊन लोक जलद रवाना करणें ह्मणोन.

सवा सबैन मया व अलफ जमादिलावल २०

सनद १.

परवानगी रूबरू.

६७७–( ३७९ ) पांडुरंग गोविंद यांचे नांवें सनद कीं, तुह्मांस फौज सुद्धां कर्नाटक प्रांतीं रवाना केलें आहे, त्यास स्वारींत संस्थानिकास वगैरे कौल, व सनदा व पत्रें द्यावीं लागतील. याजकरितां हुजुरून मुतालीचा शिक्का व मोर्तब एकूण दोन डागीनें महादजी जाधव व कृष्णाजी यादव खिजमतगार यांजबरावर पाठविले आहेत, घेऊन स्वारींत कौल व सनदा व पत्रें द्याल त्यावर शिक्के करीत जाणें. आणि शिक्का व मोर्तब पावल्याचें उत्तर पाठवणें. जुनी शिक्के कटार तुह्मांजवळ आहे, त्या पैकीं दौत व कटार हे दोन दागिने ठेऊन घेऊन जुना शिक्का कैलासवासींचे नांवचा आहे तो व मोर्तब एकूण दोन दागिने माघारे पाठऊन देणें ह्मणोन. छ. २ सवाल. सनद १.

सवा सबैन मया व अलफ जिल्हेज २९

परवानगी रूबरू.

---

A. D. 1776-77. Kamávisdár of Pimpaḷner was ordered to provide him with a silver seal and silver signet with the letters engraved on it, as also a silver ink-stand.

( 676 ) Government being in want of men, the officer of Asher was ordered to send 500 good fighting men in charge of 4 or 5 Sardárs who had experience of battles.

A. D. 1776-77.

( 677 ) Pánḍurang Govind being sent out on a campaign to Karnáṭic, a royal seal and a signet was sent to him for being affixed to Sanads and Kowls to Sansthániks, which he might have occasion to issue. The old seal and signet of the time of the late Peshwá, which were with Pánḍurang Govind were ordered to be returned.

A. D. 1776-77.

६७८–( ४३० ) धोंडो गोपाळ कमाविसदार परगणे भेलसें, व खामखेडा याचे नांवें.

सब्‍बा सबैन
मया व अलफ
सफर २६

सनद.

सन खमस, व सीत सबैन दुसाला फाजील सरकारांत आहे, व सालमजकुरीं पर्जन्य पडला नाहीं, तेणें करून रब्बी कमी जाहली व हल्लीं छ. २३ जिल्हेजीं गारा नारळा येवढ्या पडल्या तेणेंकरून बैल व माणसें बहुत मृत्यु पावलीं, याजमुळें आफत भारी पडेल. फाजील साल मजकुरीं फार निघेल तें पेस्तर सालचे रसदेंत मजुरा द्यावें. ह्मणोन तुह्मी विदित केलें, त्यास गारांची वगैरे आफत पडली. त्याची तुह्मी महालीं गेल्यावर चौकशी करून हुजूर लेहून पाठवणें. समजोन आज्ञा कर्तव्य ते केली जाईल.

कलम १.

दरकदार वगैरे राघो पांडुरंग व सबनीस हे स्वार व प्यादे आपले निसबतीचे, नेमणूक स्वाराची व प्याद्याची महालीं आहे, त्यांत ठेवणें ह्मणोन हुजूर सनदा घेऊन येतात, परंतु लढाईचे कामीं पडल्यास दरकदार याचे स्वार व प्यादे याचे वस्तु काम होत नाहीं, व कोणी कोणाचे आज्ञेंत रहात नाहीं. येविशींचा बंदोबस्त व्हावा ह्मणोन विदित केलें. ऐशास दरकदाराचे स्वार व प्यादे महालीं एकंदर न ठेवणें. तुह्मीं स्वार चांगले ठेऊन बंदोबस्त चांगला करणें. हजरी गणतीची चौकशी दरकदार करतील ह्मणोन. कलम १.

६७९–( ५२९ ) बदल देणें मुसा जारज फिरंगी यांजकडील रोजमरे, मागील तटले आहेत. त्यांपैकीं मोघम रसानगी यादी. रुपये ३०००० तीस हजार रुपये, कमावीस नजर बाबत राजे सरजेतसिंग, बुंधेले हिंदूपंत यांचे पुत्र यांजकडे गणेश संभाजी याचे मार्फातीनें नजरेचा ऐवज करार केला, त्याचा हवाला आबाजी नाईक वानवळे यांणीं घेतला आहे, त्यापैकीं वानवळे यांजकडून तूर्त देवविले.

खमस सबैन
मया व अलफ
सफर २८

रुपये.

---

(678) Reference is made to a shower of hail-stones of the size of a cocoanut in Parganá Bhelse and Khámkhedá. The Kamávisdár of the above Parganás represented that Darakdárs were frequently permitted by the Huzur to enlist their Sawárs and men in the sanctioned military establishment of the province; that the Sawárs and men so enlisted were useless for military purposes, and that, moreover, they were not amenable to discipline. Orders were issued for discontinuing the practice complained against, and the Kamávisdár was authorized to enlist men of his selection, the Darakdárs keeping a record of their attendance and their numbers.

A. D. 1776-77.

(679) Rs. 30,000 were paid to Musá Naraji (George ?), a Portugese, in past (?) payment of remuneration due.

A. D. 1777-78.

६८०—( ५७८ ) किल्ले असेर येथें तोफा आहेत, त्यांपैकीं तोफा येणें प्रमाणें सुमार.

तिसा सबैन मया व अलफ रजब १७

१३ पंचरसी.

१ सुरजमुदी.
१ चांद.
१ लक्ष्मी.
१ सुमेरसिंग.
१ गुलाब.
१ येशवंती.
१ मार्तंड.
१ व्याघ्रमुखी.
१ भवानी प्रसाद.
१ बहिरी प्रसाद.
१ लक्ष्मण
१ तक्तराब.
१ महबूब.

१३

१० बीडीं.

१ कालपहाड.
१ हटी हणमंत.
१ जयवंती.
१ चंद्रवादल.
१ गरुड.
१ मकरध्वज.
१ राजहंस.
१ दिलदार.
१ दिलपसंत.
१ बिंद्राबन.

१०

२३

एकूण तेवीस तोफा आणावयास तोफखान्याकडील कारकून व लोक हुजुरून पाठविले आहेत, तरी सदरील तेवीस तोफा व या तोफांचे उपयोगी सामान जें असेल तें देऊन, तोफा लौकर रवाना करणें ह्मणोन, केशवराव जगन्नाथ याचे नांवें. सनद १.

परवानगी रूबरू.

६८१—( ६०१ ) त्रिंबकराव नारायण राजेबहाद्दर, यांचे नांवें, कीं तुमचे पथकाची गणती घ्यावयाकरितां गणेश संभाजी कारकून हुजुरून पाठविले असेत, तरी त्यांस गोट गणती व खंडी गणती देणें ह्मणोन. सनद.

तिसा सबैन मया व अलफ रबिलाखर ६

परवानगी रूबरू.

---

(680) Twenty-three pieces of cannon were ordered to be sent to Poona from fort Asher. The names of the pieces are given.

A. D. 1778-79.

(681) Gaṇesh Sambháji, Kárkoon, was sent to take muster of the battalion under Trimbakrao Náráyaṇ Ráje Bahádar.

A. D. 1778-79.

६८२-( ७५७ ) मुसा जारज फिरंगी यांजकडे सरकारच्या तोफा व बंदुका आहेत, त्यांची दागदोजी करावयास कोळसे वजन खंडी ३ खंडी कोळसे पडत अशीं लाकडें जळाऊ तर्फ पौडखोरें येथील रानपैकीं देविलीं असेत, तरी मशारनिल्हे माणसें पाठऊन तोडतील, त्यांस तोडूं देणें ह्मणोन, आनंदराव भिकाजी यांचे नांवें रसानगी, बाजी गोविंद, जबानी बाबूराव महादेव कारकून शिलेदार.

इसन्ने समानीन मया व अलफ जमादिलाखर ७

सनद १.

६८३-( ८१५ ) तालुके व किल्ले हाय येथें इंग्रजाचे वगैरे गडबडेमुळें बंदोबस्ताकरितां नेहमीं नेमणुकेशिवाय जाजती नामजाद लोक पाठविले आहेत, ते हुजूर पाठऊन देणें; व जदीद ठेविले आहेत, ते दूर करणें ह्मणोन.

अर्बा समानीन मया व अलफ साबान २९

सनदा.

१ तालुके विजयदुर्ग निसबत गंगाधर गोविंद. असामी.

२६१ हुजुरून नामजाद पाठविले आहेत ते.

९६ माजी रायगडकरी.

१०२ माजी सातारकर.

११ माजी विसापूरकर.

२ हुजूर हशम.

५० गाडदी दिंमत हाजी हुसेन.

---

२६१

३५० तालुके मजकुरीं जदीद ठेविले आहेत ते हशम व गाडदी मिळोन.

---

६११

सनद.

१ तालुके सुवर्णदुर्ग निसबत मोरो बापूजी. असामी.

१४८ हुजुरून नामजाद पाठविले आहेत ते.

९० हुजूर हशम.

५८ किल्ले विसापूर पैकीं.

---

१४८

---

(682) Musa Naraji (George), a Portugese, who was in charge of Government guns and cannon, was ordered to be supplied with 3 Khandies of coal.

A. D. 1781-82.

(683) Additional men, entertained at the several Tálukás in Konkan in consequence of the disturbance of the English, were ordered to be disbanded, and the men, deputed from the Huzur for assistance, were ordered to be sent back.

A. D. 1783-84.

३५२ तालुके मजकुरीं जदीद ठेविले आहेत ते.

———

५०० सनद.

असामी.

१ किल्ले माहुली निसबत दुर्गाजी शिंदे.

२२१ हुजुरून नामजाद पाठविले आहेत ते.

१४४ दिंमत आपाजीराव बोकसे.

७७ वसईकर लोक.

———

२२१

६० किल्ले मजकुरीं जदीद ठेविले आहेत ते.

———

२८१ सनद.

१ परगणे साकसे निसबत भास्कर लक्ष्मण, नामजाद लोक पाठविले आहेत ते असामी.

२४ निसबत त्रिंबक बल्लाळ यांजकडील लोक हुजूर पाठऊन देणें ह्मणोन सालगुदस्तां आज्ञा जाहली असतां पाठविले नाहींत.

९७ माजी सिबी गडकरी.

———

१२१ सनद.

असामी.

१ प्रांत राजपुरी निसबत गोविंदराव व चिमाजी माणकर.

११० हुजुरून नामजाद कुलाबकर पाठविले आहेत ते.

६४ प्रांत मजकुरीं जदीद ठेविले आहेत ते.

———

१७४ सनद.

असामी.

१ प्रांत कल्याण भिंवडी निसबत गोविंदराम.

८८९ नामजाद हुजुरून पाठविले आहेत ते.

९९ हुजूर हशम.

४०० दिंमत मुसा मुंत्रम.

५४ दिंमत सिद्दी मुबारक.

१८६ दिंमत संताजी सिलकंदा.

५१ दिंमत अर्जुनजी बोकड.

९९ गाडदी निसबत बापूजी हरी.

———

८८९

१२१ प्रांत मजकुरीं जदीद ठेविले आहेत ते.

———

१०१०

सनद.

१ तालुके रेवदंडा निसबत आनंदराव शिंदे.

१०० हुजुरून नामजाद पाठविले आहेत ते.

१०० माजी रायगडकरी.

२ बणदार निसबत तोफखाना.

———

१०२ पैकीं माजी रायगडकरी.

९२ तालुके मजकुरीं जदीद ठेविले आहेत ते.

———

१९२

सनद.

१ तालुके बीरवाडी निसबत गणेश बल्लाळ, व हरी गणेश येथें जदीद ठेविले आहेत, असामी १०० येविशीं. सनद.

१ परगणे नसरापूर निसबत बाळाजी जनार्दन, नामजाद लोक दिंमत जाधवराव बेलासे निसबत हुजूर हशम असामी १०२ एकशें दोन येविशीं. सनद.

१ तालुके नेरळ निसबत हरी लक्ष्मण जदीद लोक असामी २५ ठेविले आहेत येविशीं. सनद.

१ तालुके अंजणवेल निसबत त्रिंबक कृष्ण येथें जदीद लोक असामी ११७ एकशें सत्रा येविशीं. सनद.

———

११

अकरा सनदा दिल्ह्या असेत. रसानगी, सदाशिव केशव दात्ये.

६८४–( ९१५ ) अली वलद मुदफरशा फकीर होऊन पेशजीं येदगीरचे स्वारींत तोफखान्यांत राहिला होता. तो मारेकरी असें समजलें, सबब धरून आणून, बेडी घालून, कैदेंत ठेविला आहे, त्यास हल्लीं किल्ले सिंहगडास अटकेंत ठेवावयास बेडीसुद्धां रवाना केला आहे, त्यास किल्ले

सीत समानीन मया व अलफ रबिलावल १९

---

( 684 ) Alli Wd. Mudfarshá, who accompanied the artillery as a Fakir in the campaign of Edagiri, was reported to be an assassin. He was sent to prison.

A. D. 1785-86.

मजकुरीं अटकेंत ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें ह्मणोन, केशवराव जगन्नाथ किल्ले सिंहगड यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

६८५–( १००१ ) गाडदी दिंमत मुसा फेरात हा तुह्मांजवळ बिरादरीसुद्धां चाकरीस होता, त्यास तो मयत जहाला, सबब त्याची बिरादरी मुसा आलमेल फिरंगी याजकडे करार करून तैनात दरमहा पेशजींप्रमाणें. रुपये.

तिसेन मया व अलफ रबिलावल २९

| | | |
|---|---|---|
| १५५ | खुद्द जमातदार आफ्तागिरासुद्धां | १ |
| २० | बहिरो जिवाजी कारकून | १ |
| १५ | दफेदार | १ |
| ७५ | किरिस्ताव असामी | ५ दर १५ |
| १०० | गोरे फिरंगी असामी | ४ दर २५ |
| ९९ | गाडदी शेरेकरी असामी | ११ दर ९ |
| ९ | निम शेरेकरी भिस्ती व दिवट्या असामी | २ |
| ४७३ | | २५ |

एकूण चारशें त्र्याहत्तर रुपये पंचवीस असामींस करार करून देऊन, हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी मुसा फेरात याचे दिंमतीचे लोक चोवीस तुह्मांजवळ चाकरीस आहेत, ते याचे हवालीं करून, चाकरी करून, सदरहू रुपये पेशजींचे शिरस्तेप्रमाणें देत जाणें ह्मणोन, महादाजी अनंत यांचे नांवें. सनद १.

रसानगी याद.

---

(685) A Portugese Musá Farot, employed under Government, having died, another Portugese ( मुसा आलमेल ) was appointed to the command of the battalion of the deceased. His salary was Rs. 155 a month. He had 4 Portugese on a salary of Rs. 25 each, a month; and 15(5) Christians on a salary of Rs. 15 each, and 11 Gárdis at Rs. 9 each, under him.

A. D. 1789-90.

## २ लष्करी खातें.

### ( ब ) आरमार.

### नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

६८६–( १९८ ) प्रांत वसई येथील कलमें. बीतपशील.

खमस सबैन मया व अलफ रबिलाखर ५

प्रांत वसई येथील कोळ्यांच्या महांगिऱ्या पन्नास आहेत, त्यांचा उदीम सालमजकुरीं गडबडीमुळें चालला नाहीं. सरकार कामावर नेहमीं आहेत, त्यांस पांच सहा महिने अडशेरी वगैरे पावत आहे, परंतु प्रजन्यकाळीं कुटुंबाचे बेगमीस चारमाही दरमहागिरीस भात पांच खंडी प्रमाणें देवावें, ह्मणोन तुह्मीं विनंति केली, त्याजवरून दर महांगिरीस भात खारें गोडें मिळोन खंडी ५ प्रमाणें कैली खंडी २५० अडीचशें एकसाला प्रांत मजकूर पैकीं देविले असेत; तरी चाकरीबद्दल पावते करणें. कलम १.

आगर वसई व आगाशी व माहीम व केळवें प्रांत मजकूर येथील भंडारी चौकीपहारेयाचें काम नाकेबंदीचें करितात, सबब निमे घरपट्टी त्याजपासून सरकारांत घेत आहों ते सोडावी; ह्मणून तुह्मीं विनंति केली, त्याजवरून सदरहू भंडारी मजकूर चौकीपहारेयाचें काम करितात; सबब निमे घरपट्टी सरकारांत घेत आहां. ते नेहमीं सूट दिल्हे असे, तरी न घेणें. या ऐवजीं त्यांजपासून चौकीपहाऱ्याचें कामकाज घेत जाणें. कलम १.

---

## II MILITARY ADMINISTRATION.

### ( B ) Navy.

### FROM NÁRO APPÁJI'S DIARY.

( 686 ) The following orders were issued to the officer of Piánt Bassein.

A. D. 1774-75.

1 The private boats in the province were, owing to disturbance in the country, unable to ply for trade and were employed all the while on Government duty. Subsistance-allowance was given to the boatmen for 5 or 6 months by Government, and provision was now made for the monsoon by granting 5 Khandies of corn to each ship.

1 The Bhandáris of Âgar, Bassein, Âgáshi and Kelwe did the duty of guarding posts, and half the house-tax on their houses was therefore remitted.

एकूण दोन कलमें करार करून दिल्हीं असेत, तरी सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन, विसाजी केशव यांसी सनद पुरंधर. छ. ५ रबिलाखर. सनद १.

रसानगी यादी.

६८७–( ७१३ ) आनंदराव धुळप यांस सनद कीं, आरमार विजयदुर्ग येथील बंदोबस्ताविशीचीं. कलमें.

इसन्ने समानीन मया व अलफ रमजान ५

दरकदाराचे वडिलाचे नांवानें याजमुळें पायमल्ली होऊन सरकारकाम होत नाहीं, सबब सर्व दरकदार यांस हुजूर आणून, आरमार तुमचे हवाला केलें असे, तरी तुह्मीं मेहनत करून आरमारची तयारी जलदीनें करणें. आणि इक्तियारीनें कारभार करून लोकांची उस्तवारी दिलासा करून चाकरी बजाऊन दाखवणें. कलम १.

आरमारची बेमरामत जाली येणेंकरून सरकार नुकसानी फार होते, सबब तुह्मांकडे अखत्यार सांगितला असे, तरी तीन पाल, व तीन गुराब, व तेरा गलबतें तयार करून, स्वारीस जाणें. यास ऐवज असावा. त्यास सौंदल महाल व कोलावण नेहमीं तुह्मांकडे आहे, याशिवाय तूर्त सरकारांतून वीस हजार रुपये तुह्मांकडे दिल्हे

दरकदार हुजूर राहिले तेथील लिहिण्याचें कामकाज चाललें पाहिजे, सबब कृष्णाजी नारायण हुजुरून नेमून दिल्हे आहेत. यांचे हातें साऱ्या दरकाचें तूर्त कामकाज घेणें, तुमच्या सांगितल्याप्रमाणें हे वर्ततील. कलम १.

आरमारचें काम इक्तियारीनें सांगोन पैदास्त करून, शिबंदीस खर्च करावा, ह्मणून तुह्मांस आज्ञा केली असे, तरी इंग्रजाचे वगैरे मसलतीमुळें, तुह्मांस चाकरी सांगितल्यास नेमणुकेप्रमाणें लोकांस ऐवज सरकारांतून पावेल. चाकरीस बोलाविलें नाहीं, तरी सरकारांतून बेगमी जाहली आहे. याशिवाय फिरंगियाचे काफल्याखेरीज बेकौली तरांडीं धरून आणून, त्यांत खर्च करून संभाळावें. कलम १.

विजयदुर्ग, व रत्नागिरी, व अंजणवेल,

---

(687) The relations between Ánandrao Dhuḷap, Commander of the naval forces, and the Darakdárs under him being strained, the interests of the Government suffered. The Darakdárs were recalled, and the naval administration was left entirely into the hands of Dhuḷap.

A. D. 1781-82.

Krishṇáji Náráyaṇ was sent to do the writing business and was directed to act according to Dhuḷap's instructions. Dhuḷap was given Rs. 2000 in addition to the revenues of Saundal Mahal, and Koláva̤ṇ, and was directed to fit out 19 ships and to go on an expedition. He was informed that an additional amount would be given to him in case he was sent against the English, &c.

आहेत. यांत लागवड वगैरे खर्च करून सरकारचा कारखाना यथास्थित राखणें. याशिवाय पैदास्त करून त्यांपैकीं, बेहड्याप्रमाणें ऐवज घेऊन, बाकी राहील तो ऐवज सरकारांत देणें. गुदस्तांची शिल्लक ऐन जिन्नस सुद्धां असेल ती तुह्मीं सालमजकुरीं आरमारचे खर्चास घेणें. पैदास्त कमी जाहल्यास दुसरा ऐवज सरकारांतून पावणार नाहीं. सदरहू बेगमींत सरकाराचा कारखाना तयार राखोन यांपैकीं, व पैदास्त पैकीं, मेळऊन लोकांची समजूत करणें. कलम १.

सीफातले व झाप व काथ्या व मीठ व गल्ला तालुके हाय पैकीं नेमून अलाहिदा सनदा तालुकदारांस दिल्ह्या आहेत. त्याप्रमाणें देणें. कलम १.

सुतार व लोहार व चांभार यांची वेठ नेहमीं तालुक्याची असेल, ते वजा करून बाकी राहील तें तुह्मांकडे देविलें असे घेणें. कलम १.

सरकारचे माणूस कोणाचे निसबतीस एकंदर न ठेवणें. कलम १.

व देवगड येथील दालदी व गाबीत व कसबी भंडारी आहेत. त्यांपैकीं तालुक्याचे बेगमीस सालाबादप्रमाणें ठेऊन, बाकी तुह्मीं आरमाराकडे चाकर ठेऊन घेऊन जाणें. आरमारचे उपयोगी गैरदस्ती झाडें पाहून तोडणें, व दस्ती झाड सरकार कामामुळें जरुराती लागल्यास अगत्याअगत्य आरमाराकडे तोडून नेणें. आणि मामलेदारास लिहून देणें. त्याप्रमाणें रयेतीस दस्त मजुरा देतील. कलम १.

आरमाराकडे कारकुनांचा भरणा भारी आहे, त्यास सालमजकुरीं वीस पंचवीस कारकून चांगले लिहिणार मोसबेकरी व नेहमीं कामावर आहेत, त्यासुद्धां घालमेली नवेत असे निवडून ठेवणें, बाकी तूर्त रजेस लिहिणें. कलम १.

सरकार चाकरी लोक करतील त्यास चाकरीप्रमाणें तुह्मीं पाहून बक्षीस द्याल तें पैदास्तींत मजुरा पडेल. कलम १.

एकूण दहा कलमें करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदरहू लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन.

सनद १.

रसानगी यादी.

६८८–( ७७९ ) तालुके सुवर्णदुर्ग येथील आरमाराकडे गलबत महादेव नवें तयार आहे. त्याजवर लोकांची नेमणूक करून दिल्ही पाहिजे, ह्मणोन तुह्मीं विनंति केली, त्याजवरून महादेव गलबत नव बंदिस्त स्वारीचे उपयोगीं तयार जालें आहे, त्याजवर वरकड गलबतांचे अन्वयें लोकांची

सलास समानीन मया व अलफ सफर २७

(688) A new warship, named 'Mahádev', was prepared. It was manned by 30 Sepoys and 30 sailors and one Golandáj (Gunner). The total annual expenditure on account of the ship was Rs. 3,862-8.

A. D. 1782-83.

नेमणूक करून आरमारकरी यांचा शेरा दर असामीस पडतो, त्याप्रमाणें आकार. रुपये.

१९५० शिपाई असामी ३० एकूण आकार. रुपये.

१२३५ रोजमरे व कापड मिळोन दर असामीस शेरा रुपये ४१॥॥ प्रमाणें. रुपये.

७१५ अडशेरी दर असामीस शेरा गल्ला कैली १।१।॥ प्रमाणें खंडी ३९॥४।१॥ दर खंडीस रुपये १८ प्रमाणें रुपये ७१५ एकूण दर असामीस शेरा २३॥।। प्रमाणें. रुपये.

१९५०

शेरा एकंदर असामीस रुपये ६५ प्रमाणें. रुपये.

१८४५ दर्यावर्दी असामी ३० एकूण आठमाही.

आकार. रुपये.

१३८० रोजमरे द्यावयाचे त्याचा शेरा दर असामीस रुपये ४६ प्रमाणें. रुपये.

३५१ अडशेरी दर असामीस दरमहा गल्ला ८१॥१॥ प्रमाणें कैली ·॥३ एकूण आकार कैली खंडी १९॥ दर खंडीस रुपये १८ प्रमाणें ३५१.

एकूण शेरा दर असामीस रुपये ११॥≡ प्रमाणें. रुपये.

११४ जिनसांना डाळ तूप मिळोन दर असामीस रुपये ३॥।-प्रमाणें रुपये.

१८४५

एकंदर शेरा दर असामीस रुपये ६१॥ प्रमाणें. रुपये.

६७॥ गोलंदाज असामी १ एकूण आठमाही आकार. रुपये.

५४ रोजमरे ८ दर ६॥। प्रमाणें.

११।≡ अडशेरी आठमाही कैली ·॥२॥। एकूण दर खंडीस रुपये १८ प्रमाणें.

२८- जिनसांना डाळ तूप मिळोन. रुपये.

० लंग.

६७॥

३८६२॥

एकूण तीन हजार आठशें साडे बासष्ट रुपये, एकसष्ट असामींस सालीना नेमणूक बेहेड्याशिवाय जाजती सालमजकुरापासून करार करून देऊन हे सनद सादर केली असे, तरी सदरीलप्रमाणें लोक आरमारचे कसबी मर्द माणूस ठेऊन, गलबतावर चाकरी घेऊन, चाकरी बमोजीब आदा करीत जाणें ह्मणोन, बापूजी याचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

## २ लष्करी खातें.

### ( क ) किल्ले.

६८९–( १३ ) जंजिरे रेवदंडा येथील हशमाची दफ्तरदारी गोविंद गणेश यांचे नांवें आहे, त्यास अशक्त जाहले, नेत्रांनीं दिसत नाहीं, सबब त्यांचे पुतणे लक्ष्मण बाबाजी यांचें नांवें करार केली असे, तरी मशारनिल्हेचे हातून सदरील दफ्तरदारीचें कामकाज घेऊन, वेतन बेहडेयाचे नेमणूकप्रमाणें पावीत जाणें ह्मणोन, आनंदराव शिंदे यांचे नांवें. छ. २९ माहे साबान. सनद १.

अर्बा सबैन मया व अलफ रमजान ३०

रसानगी यादी.

६९०–( १५ ) किल्ले सातारा येथें भरण्यास लोक कमी आहेत; आणि हल्लींतो गडबडेचे दिवस आहेत, यास्तव कांहीं लोकांची नेमणूक करून दिल्हियास बंदोबस्त करूं ह्मणोन तुह्मी विनंतिपत्र लिहिलें; त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी गडबडेचे दिवस आहेत, सबब असामी ५० पन्नास ठेऊन बंदोबस्त करणें, लोक चांगले आपले खातरजमेचे इतबारी ठेवणें, सदरील असामी कमसेरेकरी अखेरसालपर्यंत ठेवणें ह्मणोन, नागोजी शिंदे व बाबूराव कृष्ण यांचे नांवें. छ. १५ रमजान.

अर्बा सबैन मया व अलफ रमजान ३०

सनद १.

रसानगी यादी.

---

## II MILITARY ADMINISTRATION.

### ( C ) Forts.

( 689 ) Govind Gaṇesh, Daftardár of the Hasham at fort Rewadandá, having become debilitated, the post was conferred on his nephew Laxamaṇ Báwáji.

A. D. 1773-74.

( 690 ) Owing to the troubled state of the country, 50 additional men were permitted to be entertained at Fort Satárá.

A. D. 1773-74.

६९१-( ९४ ) तालुके वसई येथील मामलत सालमजकुरीं विसाजी केशव यांस सांगितली असे. येविशीं. सनदा.

खमस सबैन मया व अलफ साबान ५

१८ किल्याचे व कोटाचे हवालदार व कारकून वगैरे यांस कीं, तालुके मजकूर येथील मामलत पेशजींचे मामलेदारांकडून दूर करून मशारनिल्हेस सांगितली असे, तरी तुह्मीं यांचे रजातलबेंत वर्तोन किल्याची व कोटाची अलंग नौबत चौकी-पहारा यथास्थित करीत जाणें ह्मणोन. सनदा.

१ गणाजी चंद्रराव मोरे नामजाद व कारकून जंजिरे वसई यांस.

१ रामाजीराव बोकसे हवालदार व कारकून जंजिरे अर्नाळा यांस.

| | |
|---|---|
| १ किल्ले वडर(ज्र)गड. | १ किल्ले भोपतगड. |
| १ किल्ले भवानगड. | १ कोट मांडवी. |
| १ किल्ले इंद्रगड. | १ कोट केळवे. |
| १ किल्ले अर्जुनगड. | १ कोट माहीम. |
| १ किल्ले असावा. | १ कोट शिरगांव. |
| १ किल्ले कालदुर्ग. | १ कोट तारापूर. |
| १ किल्ले बल्लाळ. | १ कोट डाहाणू. |
| १ किल्ले सेवगा. | —— |
| १ किल्ले कुरंग. | १८ |

१ येसाजी शिवदेव यांस कीं, तुह्मीं मशारनिल्हे यांचे आज्ञेंत वर्तणूक करीत जाणें, ह्मणोन.

——

१९

रसानगी यादी.

---

( 691 ) The following 18 forts were under the control of the Mámlatdár of Bassein.

A. D. 1774-75.

1 Janjira Vasai.
2 Janjira Arṇáḷá.
3 Vajragad Killa.
4 Kille Bhawángaḍ.
5 Kille Indragaḍ.
6 Kille Arjungaḍ.
7 Kille Asáwá.
8 Kille Káḷdurga.
9 Kille Ballaḷgaḍ.
10 Kille Shewaga.
11 Kille Kurang.
12 Kille Bhopatgaḍ.
13 Koṭ Máṇḍavi.
14 Koṭ Kelve.
15 Koṭ Máhim.
16 Koṭ Shirgaon.
17 Koṭ Tárápur.
18 Koṭ Dáháṇu.

६९२-( ११२ ) महादजी इंदुरा यास किल्ले असेर येथील सरनोबती आहे, त्यास महादजी मजकूर महायात्रेस जाण्यास निरोप मागतो; त्याजवरून त्यास महायात्रेस जाण्याची आज्ञा केली असे, तरी त्यास निरोप देणें; आणि त्याचे लेकापासून किल्ले मजकूर येथील सरनोबतीचें कामकाज घेऊन महादजी इंदुरा यास तैनात पावत होती, त्याप्रमाणें देत जाणें ह्मणोन, जगन्नाथ नारायण याचे नांवें. सनद १.

खमस सबैन मया व अलफ सवाल ८

परवानगी रूबरू.

६९३-( ११७ ) गणपतराव कृष्ण यांस सनद कीं लोक माजी राईगडकरी, व महाडकरी यांजकडील.

खमस सबैन मया व अलफ सवाल २३

लोक नामजाद पाठवावयाची नेमणूक.

असामी.

२५० साष्टीस.

१५० तालुके मुल्हेर.

---

४००

एकूण चारशें असामींची नेमणूक केली आहे, त्यास माजी लोक वरकड जागा जागा नामजाद आहेत, त्यास सारेच शेतसनदी, सबब फेरबारीनें चाकरी घ्यावीसा करार केला आहे. ऐशास हरदू जागा मिळेल तर खेपेस शंभरप्रमाणें लोक तुह्मीं रवाना करून, त्या ऐवजीं तेथून मुबदला माजी गडकरी येतील त्या जाबत्याप्रमाणें चाकरी घेणें. कलम १.

कलमें.

चाकरमाने लोक यांची शेतसनद गुदस्तांची पावली, व सालमजकुरीं पावेल, व वेठ बिगार वगैरे उपसर्ग लागतो, व खोतीचे गांवचा हरएकविशीं लढा पडतो, सबब जाबसालास हुजुराहून कारकून पाठविले आहे[त]. त्यास या लोकांचे धारे वगैरे सदरहू कामें कारकुनाचे विद्यमानें समजानें घेत जाणें. कलम १.

सन अर्बा सबैनांत जमाबंदी खेरीज सादिलवार पट्टी करून सालमजकुरीं हजार रुपये घेतले आहेत, त्यास मुदामत शिरस्ता नसतां नवीन पट्टी सालमजकुरीं गुदस्तांची करून वसूल घेतला आहे, तो माघारा देणें. कलम १.

लिंगाणकर लोकांची शेतसनद सालगुदस्तां

---

(692) Mahádji Indurá, Sar Nobat of fort Asher, asked permission to go on a pilgrimage to Benares. The permission was accorded, and his son was appointed to his post.

A. D. 1774-75.

(693) It being desirable that the men at the forts of Raigaḍ and Mahâḍ, who held lands for service, should serve at different places, orders by turns were issued accordingly.

A. D. 1774-75.

सन अर्बा सबैनांत रायगडास सहाशें लोकांची चाकरी जाली आहे, त्यास सालगुदस्तां चाकरीस पावती जाली असेल ते नांवनिशीवार लिहून हुजूर पाठवणें. कलम १.

रुपये १५८८ पंधराशें अठ्यांशींची नेमली होती, त्यास गुदस्तां आकार कमी जाला त्याप्रमाणें शेतसनद कमी खर्च पडली आहे, त्यास सालमजकुरीं कीर्द जाली आहे, सबब सालगुदस्तांप्रमाणें आकाराबरहुकूम नांवनिशीवार जाबता पुण्याहून येईल त्याप्रमाणें खर्च लिहिणें. कलम १.

एकूण पांच कलमें करार करून दिल्हीं असेत. सदरहू लिहिल्याप्रमाणें करणें ह्मणोन, मशारनिल्हे यांस. सनद १.

रसानगी यादी.

६९४–( २११ ) महादाजी नारायण याचे नांवें सनद कीं, किल्ले अहमदनगर येथें सर्दी बहुत याजमुळें लोक आजारी बहुत आहेत व कलह आहे; तो माणूस चांगले कर्नाटकी बरकंदाज जमखिंडीकडील शेंपन्नास असामी आज्ञा जाहल्यास आणवूं, व दौलताबादपैकीं पंचविसांपासून पन्नास पावेतों माणूस विश्वासू नगरांत ठेवावयाची आज्ञा जाल्यास ठेऊं ह्मणोन, नारो बाबाजी यांणीं विनंतिपत्र लिहिलें आहे, त्यास कर्नाटकी माणूस आणवावयाचें प्रयोजन नाहीं. दौलताबादेचे लोक आहेत, त्यांपैकीं चांगलें माणूस विश्वासू पाहून, पन्नासपर्यंत किल्ले अहमदनगर येथें ठेवणें ह्मणोन. सनद १.

सीत सबैन मया व अलफ जमादिलावल ११

परवानगी रूबरू.

## जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

६९५–( २९२ ) किल्ले हाय तालुके शिवनेर येथील खेरीज मुशाहिराची सालगुदस्तांचे बेहेड्याचे नेमणुकेशिवाय जाजती खर्चाची नेमणूक सालमजकुरापासून खेरीज.

सीत सबैन मया व अलफ रबिलाखर १९

---

(694) Náro Bábáji represented that many men in the fort of Ahamadnagar were, owing to the dampness of the place, ill, and that they were not, moreover, well disposed towards each other. He therefore requested permission to get about 50 or 100 strong Karnátic men from Jamkhindi and to keep about 25 to 50 honest men from Daulatábád in Nagar. Mahádji Náráyan was informed that it was not necessary to get Karnátic men, and that select honest men out of those who had come from Daulatábád should be employed in the fort.

A. D. 1775-76.

FROM JANÁRDAN APPÁJI'S DIARY.

(695) In the items of sanctioned expenditure for the forts in Táluká Shiwaner appear tho following.

A. D. 1775-76.

नक्त. रुपये.

१३ किल्ले शिवनेर.

१० सदरे पुढील झेंडे यांस खाद्या सुमार पांच व काव रंगास वगैरे मिळोन.

३ दसऱ्यास बकरीं २ एकूण किंमत.

१३

९ किल्ले चांवड.

२ तुलसीपूजन, व हुताशनी व दीपवाळी मिळोन.

५ चांदरातीस विड्याचे पानांबद्दल सालीना नेमणूक.

२ पीर किल्यावर आहे, त्याचे गलेफास शेल्याबद्दल.

९

५ किल्ले कुंजरगड येथील दरवाजा नवा करून सालमजकुरीं लाविला त्यास रोगणाबद्दल.

२७

वजनी वजन. पक्कें.

८॥७ किल्ले शिवनेर.

८।= मुसलमानांची ईद रमजान व मोहरमची, त्यास तोफांचे बार करावे लागतात, त्याची नेमणूक.

वजन. पक्कें.

८। दारू.

८८= आंबाडी बुचास.

८।=

८८५ तोफांचे व जेजाळाचे जामग्यास सूत.

८॥ किल्याचे गीर्दनवाईचे झाडें तोडितात, त्यांचे कमरेस चऱ्हाटें बांधण्याबद्दल आंबाडी.

८॥७

८१॥१ किल्ले चांवड.

८॥६ चांदरातीस विड्याबद्दल सुपारी दरमहा वजन ८८३ प्रमाणें दरमाही.

FORT CHANWAD.

Rs.

2 For the worship of Tulsi.

2 For clothes to the Pir.

FORT SHIWANER.

On account of gun-powder for firing cannons on the Eed of Ramján and Moharam.

FORT KUNJARGAD.

On account of

Oil for lighting lamps before Hanumant and Pir.

ऽ।५ दिव्यास तेल.

ऽऽ६ बिनी दरवाजा दरमहा ऽऽ।। प्रमाणें दरमाही.

ऽऽ९ सदर बालेकिल्ला दरमाहा ऽऽ।।। प्रमाणें दरमाही.

---

ऽ।५

ऽ। गस्तीस जातां लोक दुखावतात, त्यांस द्यावयास तूप व तेल मिळोन वजन. पक्कें.

ऽऽ५ तूप.

ऽऽ५ तेल.

---

ऽ१।।१

ऽऽ९ किल्ले जिवधन येथील सदरेस तेल दरमहा वजन ऽऽ।।।प्रमाणें दरमाही दिव्यास.

ऽ।= किल्ले कुंजरगड येथील हनुमंत व पीर आहेत, त्यांस दीपाबद्दल तेल दरमहा वजन पक्कें ऽऽ१ प्रमाणें दरमाही.

---

ऽ।२।।।९

एकूण सत्तावीस रुपये नक्त व पावणे तीन मण नव शेर वजन पक्कें सालीना जाजती खर्च नेमून दिला असे. चौकशीनें खर्च करणें ह्मणोन, उधो विरेश्वर यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी. छ. २२ रबिलावल.

६९६–( ३३९ ) तालुके अवचितगड येथील किल्यावरील लोकांचे कबिले तोतयाचे

---

( 696 ) The members of the families of the men, employed at the fort of Awachitgad, were, in consequence of the insurrection raised by the Impostor, taken into the fort. The

A. D. 1776-77.

सवा सबैन मया व अलफ रमजान २९ गडबडीमुळें किल्यावर घेतले आहेत, त्यास तोतयाची गडबड वारेतों ज्या असामींचे कबिले किल्यावर आले असतील त्यास दर असामीस कबज अडशेरी बद्दल दरमहा १ एक प्रमाणें देविला असे, तरी तालुके मजकूरचे ऐवजीं सदरहूप्रमाणें देत जाणें. गडबड वारल्यावर मना करणें; व तालुके मजकूरचे चाकरमाने लोकांकडे नवे पट्टीबद्दल ऐवज येणें आहे, तो सालमजकुराचे रोजमरेयांत वजा करून घेतां, तो तूर्त न घेणें. सालमजकूरचे अखेर रोजमरेयांत वजा करून पुढें घेणें ह्मणोन, आबाजी बल्लाळ, व भास्कर महादेव यांचे नांवें. छ. ५ रजब.

सनद १.

परवानगी, राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस.

६९७–( ४०२ ) किल्ले सिंहगड येथील कारखानिशी विठ्ठल येशवंतराव पोतनीस यांजकडून बापूजी कमाजी यांजकडे होती, त्यास सन इसन्ने सबैनांत किल्ले मजकुरीं वीज पडोन दारूखाना उडाला. ते समईं कारखानीस मशारनिल्हे कबिला सुद्धां घरदार उडोन गेले; तेव्हां त्यांचे बंधु बाजीराव कमाजी यांचे नांवें कारखानिसी हुजुरून करार करून देऊन चालविली. सन तिगस्तां दरक संबंधें कर्जाचा ऐवज सरकारांत घेतला; व सालमजकुरीं तोतयाच्या बखेड्यांत कारखानीस व यांचे तर्फेचा कारकून किल्ले मजकुरीं नवता; ह्मणोन विदित जालें; त्यावरून पूर्ववत्‌प्रमाणें बाजीराव कमाजी यांकडे किल्ले मजकूरची कारखानिशी करार करून वेतन सालीना रुपये २०० दोनशें पेशजींप्रमाणें करार करून देऊन पाठविले असेत, तरी यांपासून किल्ले मजकूरचे कारखानिशीचें कामकाज घेऊन, वेतन पेशजींप्रमाणें पाववीत जाणें ह्मणोन, नारो महादेव यांचे नांवें.

सवा सबैन मया व अलफ मोहरम २

सनद १.

रसानगी यादी.

६९८–( ६०० ) रामाजीराव राणे हवालदार किल्ले चांवड तालुके शिवनेरी हे सिंह-

---

men were therefore granted an allowance of Rupee 1 each per month so long as the disturbance lasted.

( 697 ) The office of Kárkhánnis at fort Sinhgar was held by Bápuji Kamáji on behalf of Vithal Yeshwantráo Potnis. He and his family, with their house, were blown up in Isanne Sabain in the explosion of gun-powder, which was caused by the descent of lightning at the fort. The office was therefore conferred on his brother and was continued to him, as he was not implicated in the conspiracy formed in favour of the Impostor.

A. D. 1776-77.

( 698 ) The Haváldár of fort Chánvad was desirous to go to the

तिसा सबैन मया व अलफ रबिलाखर ४ — स्थाचे गंगास्नानाकरितां जाणार, त्यास किल्ले मजकूरच्या बंदोबस्तास त्यांचे पुत्र दोघे किल्ले मजकुरीं नेहमीं चाकरीस आहेत, ऐशास गंगास्नानास जाण्याविशीं सरकारची आज्ञा असावी, म्हणोन राजश्री बाळाजी जनार्दन फडनीस यांस तुम्हीं लिहिलें; त्यावरून रामाजीराव राणे यांस गंगास्नानास जावयाची आज्ञा करून त्यांस अलाहिदा पत्र सादर केलें असे, तरी मशारनिल्हेचे पुत्र बाबूराव राणे यांस हवाल्याचे कामकाजास ठेऊन किल्ले मजकूरचा त्यांजकडून बंदोबस्त करऊन मशारनिल्हेस गंगास्नानाकरितां पंधरा रोजांचा निरोप देणें. गंगास्नान करून आल्यावर पेशजींप्रमाणें हवाल्याचें कामकाज मशारनिल्हेपासून घेत जाणें म्हणोन, बाळाजी महादेव तर्फ मजकूर यांस. पत्र १.

सदरील अन्वयें रामाजीराव राणे हवालदार यांस. १.

२.

परवानगी रूबरू.

६९९–( ६३५ ) सेनाधारी व सेनालेखक, किल्ले गडगडा, तालुके कावनई, यांस कीं, किल्ले मजकूर येथील हवाला येशवंतराव भोसले यांजकडे होता, तो दूर करून हल्लीं कादरखान वल्लद नथेखान यांस सांगोन पाठविले असेत, तरी यांचे रजेतलबेंत वर्तोन किल्ले मजकूर येथील अलंग नौबत, चौकी पाहरा करून किल्ला हुशार राखणें म्हणोन. (समानीन मया व अलफ साबान २०) सनद १.

रसानगी यादी.

७००–( ७०८ ) जंजिरे उंदेरी येथील हवाला पेशजीं बाळाजी विश्वासराव यांस होता, ते सन सबा सबैनांत मयत जाहले, त्यापासून मशारनिल्हेचा लेक भवानजी विश्वासराव याचे हातें सुभाहून हवाल्याचें काम घेत आले, हुजूरची सनद सादर जाहली नव्हती, सबब भवानजी विश्वासराव यांस हुजूर आणून, सालगुदस्त सन इहिदे समानीनापासोन जंजिरे मजकूरचा हवाला सांगोन वतनें. (इसन्ने समानीन मया व अलफ साबान ९)

---

A. D. 1778-79. Godáwari for bathing, that being the year in which the sun entered the Sign of Lion, and applied for a fortnight's leave. The leave was granted and his son was appointed to officiate for him.

( 699 ) The office of Hávaldár of fort Gadgadá was taken away from Yeshwantrao Bhosle, and conferred on Kádarkhán Wd. Nathekhán. (A. D. 1779-80.)

( 700 ) A new Havâldár was appointed to the fort of Underi. Security was taken from him. The following were some of his duties. (A. D, 1781-82.)

असामी.

१ खुद्द.

१ पोरगा.

१ दिवट्या.

———

३

एकूण तीन असामींस जंजिरे मजकुरीं पेशजीं पावत आहे, त्याप्रमाणें तैनात शाई शिरस्ता दरमाहे. रुपये २८

पैकीं रोजमरा दुमाही. रुपये २०॥

सालीना मोईन.

अर्ज बाब नक्त रुपये १० कापड मोईन बक्षीस. रुपये २०

दरमाहे अडशेरी खुद्द व पोरगा व दिवट्या मिळोन रोजमरेयाशिवाय, भात कैली साडेतिशेरी. मापें ८३

तेल दिवटीस दरमहा वजन. पक्कें ८८२॥

तैवजाची नेमणूक सुभा आहे त्यापैकीं, यांस पावत आहे दरमाहे.

पानें विड्याचीं. सुमार ७५० सुपारी. वजन. पक्कें ८८।९

एकूण असामी तीन पैकीं ऐन एक व पोरगा एक व दिवट्या एक यांसी तैनात शाई शिरस्ता दरमाहे अठ्ठावीस रुपये पैकीं दुमाहे रोजमरा साडे वीस रुपये यास सरसालांत पावती रोजमरे व भर माहे एक व कापड तैनातेप्रमाणें अठ्ठावीस आंख सरसाल चाकरीस व अडशेरी दरमाहे भात साडे तिशेरी तीन मण, व तेल दिवटीस दरमाहें वजन पक्कें अडीच शेर, व सालीना अर्जबाब नक्त दहा रुपये व कापड मोईन बक्षीस आष्टोस हुजूरची पेशजीं नेमणूक, व सुभा तैवजाची नेमणूक आहे त्यापैकीं यांस दर माहे पानें विड्याचीं साडे सातशें व सुपारी वजन पक्कें दीड पाव सुभा पावत आहे, त्याप्रमाणें यांस नेमणूक सालगुदस्त अवल सालापासून करार करून जंजिरे मजकुरीं हवाल्याचे चाकरीस आहेतच. यांस हुजूर आणून हवाला करार करून पाठविले आहेत, यांस जामीन आनंदराव बिन यशवंतराव चवाण कोंडगराव देशमुख, तर्फ अंजनवेल, सुभा दाभोळ हुजूर घेऊन जामीन कतबा दप्तरीं विल्हेस लाविला असे, हवाल्याची कैद कानू यांचे हातें घेऊन, वेतन पेशजीं बमोजीब सदरहूप्रमाणें पाववीत जाणें, या खेरीज कलमें.

---

1 To sign and seal the accounts of grain &c. received in the store,

1 Do the daily accounts of the store,

1 To receive information of out-going and incoming vessels,

1 To receive information regarding soldiers going on and returning from leave,

1 To be present at the monthly muster-roll,

1 To accord permission to soldiers wishing to go out of the fort.

दिमतीस लोक पेशजीं नाहींत, सबब हल्लीं असामी २५ पंचवीस हुजूर करार करून नांवनिशीवार नेमणूक जाबता अलाहिदा लेहून पाठविला आहे, त्याप्रमाणें चाकरी घेऊन रोजमरे व अडशेरी व कापड द्यावयाचा शिरस्ता जाबत्यास लिहिला आहे, त्याप्रमाणें चाकरी बमोजीब पाववीत जाणें. हे लोक जंजिरे मजकूरचे बेहडेयाचे भरण्यांत ठेऊन यांचे ऐवजीं दुसरे दूर करणें.
कलम १.

बाळाजी विश्वासराव सन सबा सबैनांत मयत जाहल्यापासोन भवानजी विश्वासराव हवाल्याचे कामास सुभाहून ठेऊन पेशजींप्रमाणें वेतनाची पावती जहाली, त्यापासून कबजे करावी. कलम १.

भवानजी विश्वासराव याजबरोबर जंजिरे मजकूरपैकीं शिपाई असामी.

१ संताजी तानाजी कदम.

१ सूर्याजी लखमोजी सणस.

१ दादजी रामजी संकपाल.

---

३

एकूण तीन असामी रवाना केल्यापासून हुजूर चाकरी जहाली आहे, यांचे रोजमरे व अडशेरी राहिली असेल ते देणें.
कलम १.

हवाल्याची कैदकानू चालावी त्यापैकीं तूर्त चालते. कलमें.

१ कोठी व मुलकी धारा, वगैरा जिन्नस येईल त्याचे जमावर्खावरी मोर्तब होत आहे.

१ कोठीचे कीर्दीवरी शिक्का मोर्तब होत आहे.

१ गलबत बाहेर जातें येतें त्याचा दाखला आहे.

---

३

एकूण तीन कलमें चालवितां, याखेरीज चालवीत नाहीं तीं. कलमें.

किल्याचे रोजनिशीवर शिक्का मोर्तब बलकवडे व महादाजी कृष्ण यांचे कारकीर्दींत होत होते त्याप्रमाणें चालवणें.

१ रजेस शिपाई जातो तो समजतो, परंतु येतो त्याचा दाखला समजत नाहीं, त्यास येईल त्याचा दाखला समजावणें.

१ दरमहा हजिरी होईल तेसमईं यांस जवळ बसऊन हजिरी घेणें.

१ दरवाज्याबाहेर शिपाई जातो येतो, तो बहुतेक यांचे परवानगीनें जातो येतो, त्याप्रमाणें असावें; यांचे परवानगी शिवाय जाऊं येऊं नये.

---

४

एकूण चार कलमें हल्लीं चालवावयाची आज्ञा केली असे, तरी सदरहूप्रमाणें चालवणें. कलम १.

यांचे नांवाचा शिक्का हल्लीं पाहिजे, त्यास जुना शिक्का बाळाजी विश्वासराव यांचे नांवाचा आहे, तो मोडून नवा यांचे नांवाचा करून देणें. कलम १.

एकूण पांच कलमें सदरहू लिहिल्याप्रमाणें करणें ह्मणोन, गणेश बल्लाळ यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

७०१–( ७३५ ) किल्ले उंदेरी येथील कोठीची मोजदाद करावयाकरितां सरकारांतून दादो महादेव कारकून शिलेदार यांस पाठविले असेत, तरी मशारनिल्हे किल्ले मजकूर येथील कोठीची मोजदाद करितील, त्याचा जाबता करून देणें ह्मणोन, गणेश बल्लाळ यांचे नांवें. सनद १.

इसन्ने समानीन मया व अलफ मोहरम ८

परवानगी रूबरू.

७०२–( ७६९ ) त्रिंबक कृष्ण तालुके अंजनवेल यांचे नांवें पत्र कीं, किल्ले मजकूर येथील हवाला धोंडजी पाटवणें याजकडे आहे, त्यास हवाल्याचे कैद-कानू वगैरे बंदोबस्ताविशीं मशारनिल्हेचें पत्र हुजूर आलें, त्याज-वरून ठराव करून दिल्हा. कलमें बीतपशील.

सलास समानीन मया व अलफ रजब २८

मशारनिल्हेचे पथकाचे लोक तेथें आहेत, त्यांचा रोजमरा नांवनिशीवार ज्याचे त्याच्या हातावर तुह्मीं वांटणी करितां, त्यास तालुके मजकूरच्या सर्व लोकांचे रोजमरेयाची वांटणी करीत असाल त्याप्रमाणें यांच्या पथकाची करणें. कलम १.

सुभा निसबत व किला निसबत कोठीच्या किल्या सुभा असतात, त्यास सुभा निसबत कोठीच्या किल्या सुभा असाव्या. किला निसबत कोठीच्या किल्या हवालदाराकडे ठेवीत जाणें. कलम १.

बंदरकिनारा किल्याचे लोकांचा रोजमरा सन समान सबैनापासून तकूब होता, तो सन समानीनापासून देविला असतां यांचे लोक किल्यांत नेहमीं असोन रोजमरा दिल्हा नाहीं, तो दुसाला समानीन व इहिदेचा ऐवज नेमणुकेपैकीं राहिला असेल तो सदरहू दुसालांत चाकरी जालेले लोक हजीर असतील त्यांचा देणें; व पुढें सन इसन्नेंत किल्याचे व सुभाचे लोकांचे मिळोन तकूब रोजमरेयाविशीं सनद सादर आहे त्याप्रमाणें करणें. कलम १.

---

(701) A kárkun was sent to examine the stores at fort Underi.
A. D. 1781-82.

(702) The following instructions were issued for the guidance of Trimbak Krishṇa, Mámlatdár of Anjanwel, and Dhonḍji Páṭvaṇe, the Havá1dár of the fort of Anjanwel.
A. D. 1782-83.

1 The keys of the store-room of the Táluká should be kept by

कृष्णाजी पाटणे यासी किल्ले विजयगड येथील हवाला होता, तेव्हां तोतयास मिळाला, सबब पुढें त्याचा खंड रुपये बाराशें जाला ते धोंडजी पाटणे याचे वरातेंत वजा केले आहेत, ते यांणीं हवाला घेतला असिल्यास वजा केले तें ठीक केलें, हवाला घेतला नसिल्यास माघारे देऊन, कृष्णाजी पाटणे यांजपासून वसूल कराराप्रमाणें घेणें.

कलम १.

किल्याचे दरवाज्याची परवानगी हवालदाराची. पडकोटच्या दरवाज्याची परवानगी सुभेदाराची. त्यास किल्याचे दरवज्यास सुभेदारांनीं चार असामी खबरदारीबद्दल ठेवणें तर ठेवावे, त्यास हवालदारांनीं दिक्कत करूं नये. पडकोटच्या दरवाज्यास हवालदारांनीं दोन असामी ठेवावे, त्यास सुभेदारांनीं दिक्कत करूं नये. किल्लेकरी लोकांची परवानगी किल्याचे व पडकोटचे दरवाज्यास हवालदाराची व पडकोटचे दरवाज्यास सुभा निसबत व मुलकी माणसास परवानगी सुभेदाराची. येणेंप्रमाणें असावें.

कलम १.

पडकोटच्या दरवाज्याच्या किल्या सुभा ठेवीत जाणें. किल्याचे दरवाज्याच्या किल्या हवालदाराकडे रहातील.

कलम १.

मशारनिल्हेच्या पथकाचे लोक हुजूर येऊन पाठविले, त्यापैकीं कांहीं गेले, त्यांचे ऐवजीं दुसरे ठेविले यामुळें तैनात कमी केली असलियास माणूस पाहून तैनात करणें ते जुन्या शेऱ्याचे अन्वयें करावी. अदावतीनें उगेच घालूं नये; सनदेचे नेमणुकेप्रमाणें मशारनिल्हेच्या पथकाचे लोक राखावे.

कलम १.

किल्लेकरी लोक रजेस जाणें, अगर रजेपैकीं किल्यास येणें, तर सुभा दाखला देऊन जावें यावें.

कलम १.

लांकूडफाटें, व पान व किरकोळ कामगारी एका दोहों रोजाचे किल्लेकरी जाणें तर हवालदाराचे परवानगीनें जावें यावें.

कलम १.

किल्यांत लोक आहेत, त्यांत कितेक मातबरही आहेत; त्यांस किल्या निसबत सरकार काम असेल तें हवालदारांनीं

---

the Subhá ( Mámlatdár ), and those of the store-room of the fort should remain with the Haváldár.

1 The keys of the door in the outer wall of the fort should be kept by the Subhá, and those of the door of the fort proper by the Haváldár.

1 Permit to pass the fort door should be given by the Haváldár, and that to pass the outer door by the Subhá.

1 Four men of the Subhá should stay at the fort-door and 2 men of the fort should stay at the outer door, for assistance.

1 The men in the fort when going on or returning from leave should send intimation to the Subhá. The Subhá should not grant leave to the fort people direct.

गलबत वगैरे बाहेरून बंदरांत येईल त्याची परवानगी हवालदाराकडे लागावी. सुभेदारास पुसोन येऊं द्यावें; व बाहेर जाईल त्यास सुभाची परवानगी बंदरावरील बुरजास लागल्यावर हवालदारास पुसोन जाऊं द्यावें. गलबताचा झाडा सुभेदारांनीं व हवालदारांनीं घ्यावा. कलम १.

किल्लेकरी लोकांस सुभाहून परभारें रजा देऊं नये. कलम १.

किल्याची कारसाई व सरंजाम हंगामशीर सुभाहून पावता करावा, हवालदाराचे संसाराची बेगमी लांकूडपाठ्याची कार्याकारण करावी. कलम १.

किल्लेकरी लोकांचे रोजमरेयाची वांटणी करणें ते हवालदाराचे पथकसुद्धां सुभाचा कारकून पाठऊन किल्याचे दरकदार व हवालदार यांचे गुजारतीनें वांटणी करावी. कलम १.

सांगावें. त्यांणीं हवालदाराचे सांगितल्याप्रमाणें करावें. एकादा दिक्कत करूं लागल्यास सुभाहून ताकीद करावी. हवालदारांनीं माणसाचे स्वरूपाप्रमाणें चाकरी घ्यावी. उगेंच कोणावर रागें भरूं नये. कलम १.

दाभोळचे तरीवर किल्याकडील शिपाई असतो, त्यास तरीवर चिठी किल्याची चालत नाहीं, याजकरितां किल्याकडील शिपाई नसावा; ह्मणून हवालदाराचें बोलणें, याजकरितां किल्याकडील शिपाई आहे तो किल्यांत पाठऊन सुभाचा शिपाई ठेऊन तरीची खबरदारी करणें. कलम १.

सुभाचे कोठीपैकीं किल्लेकरी यास अडशेरी घालणें जाली तरी किल्याकडील चिठी नांवनिशीवार यावी, त्याप्रमाणें कारखानिसानें द्यावी. कलम १.

किल्याकडील कारसाई चूड, ओढा वगैरे नेमणुकेप्रमाणें खर्च होणें ते हवालदाराचे परवानगीनें व किल्याकडील चिठीनें खर्च करावा. कलम १.

सतरा कलमें करार करून दिल्हीं आहेत. याप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन, चिटणिसी. पत्र १.

---

1 The permission of the Haváldár should be sufficient authority for a man in the fort to go out on business for a day or two.

1 The Haváldár should assign duties to the fort-people according to their capacity. If anybody objected, the Subhá should warn him.

1 Permission to land boats coming into the harbour should be given by the Haváldár; when boats were going out, the permission of the Subhá should be obtained.

1 The duty of searching boats should be performed by the Haváldár and Subhá together.

&c. &c. &c.

७०३–( ७८६ ) तालुके शिवनेर येथील किल्ले हायचे लोकांचे रोजमरेयाचे बोभाट फार दिवस पडिले आहेत, त्याचा बंदोबस्त होऊन येत नाहीं; व अखेर साल समीप आलें, त्यास किल्याच्या चातुरमासाच्या बेगम्या अद्याप जाहल्या नाहींत, याजकरितां हल्लीं हुजुरून आपाजी बाबाजी, व गणेश संभाजी कारकून पाठविले असेत, तरी साल गुदस्तां व साल मजकूरचा ऐवज तुह्मीं वसूल घेतला असेल, त्यापैकीं खरेदी गल्ला व लोकांचे रोजमरेयापैकीं ऐवज दिल्हा असेल, तो वजा करून बाकी ऐवज राहील तो, सरकारचे कारकुनाचे हवाला करणें. हे लोकांस वांटणी करितील; व गल्ल्याची खरेदी करून किल्याचे बेगमीस देतील. तुह्मी याजउपर मुलखांत वसुलाविशीं रोखापत्र एकंदर न करणें, पुढील वसूल हे करून किल्याचे बेगमीस ऐवज देतील. तुह्मीं वसूल आजपावेतों केला आहे, तो याचे हवाला करणें ह्मणोन, कृष्णाजी रामचंद्र यांचे नांवें.

सलास समानीन
मया व अलफ
रबिलाखर ९

सनद १.

येविशीं महालकरी व मोकदम तालुके मजकूर यांचे नांवें सनदा कीं, साल गुदस्तां व सालमजकूरचा ऐवज कृष्णाजी रामचंद्र यांजकडे दिल्हा असेल, तो उभयतांकडे रुजू करून देणें व पुढील वसूल हे घेतील. कृष्णाजी रामचंद्र यांजकडे न देणें ह्मणोन. सनदा २.

१ मोकदम देहाय यांस.

१ महालकरी यांस.

—— ——

२ ३

परवानगी रूबरू.

७०४–( ८५५ ) जंजिरे रत्नागिरी तालुके मजकूर येथील बंदराकडील तटाचें काम हयग्रीव बुरुजाचे उत्तरेस खचलें आहे तें बांधावें लागतें, त्यास बंदरालगती जागा पर्जन्य आहे तों काम तयार जालें पाहिजे; परंतु लोकांचा भरणा भारी असल्याविना काम लौकर आटोपणार नाहीं; याजकरितां आरमारकरी लोक रजेस घातले आहेत, ते कामावर हजीर धरून काम तयार करा-

खमस समानीन
मया व अलफ
रमजान १९

---

(703) The wages of the men at the Táluká of Shiwaner having long remained unpaid, and no provision having been made in the fort against monsoon, 2 Kárkoons were sent from the Huzur to arrange about the matter, and the officer of the Táluká was directed to hand over to them all the balance in his possession.

A. D. 1782-83.

(704) Sanction was ordered to the repair before the monsoon of a bastion called हयग्रीव (horse-neck), in the fortifcations on the sea-side of fort Ratnágiri, which had fallen down,

A. D. 1784-85.

वयाची आज्ञा जाली पाहिजे, ह्मणोन तुह्मीं हुजूर विनंति केली; त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी जंजिरे मजकूर येथील बंदरकिनारा तटाचें काम खचलें आहे, तें पर्जन्यकाळांत आरमारें चालतीं न जालीं तों तयार जालें पाहिजे, त्यास आरमारकरी लोक रजेस आहेत, ते हजीर धरून तटाचें काम जलदीनें तयार करणें. आरमारकरी लोकांचा गैरहजिरीचा आकार अडशेरीसुद्धां तालुके मजकूर येथील साल गुदस्त सन अर्बा समानीनचे अजमासास वजा केला आहे तो. रुपये.

६९० नक्त.

३७४४८ गल्ला कैली साडे तिशेरी बारुळे मापें खंडी १६॥=॥ एकूण किंमत फ्रोक्ताचे निरखानें, दर खंडीस रुपये २२॥ प्रमाणें. रुपये.

---

१०६४८

एकूण एक हजार चवसष्ट रुपये एक आणा वजा केले आहेत, त्यापैकीं दोनशें चवदा रुपये एक आणा, या बेरजेपुरती गैरहजिरी साधून बाकी साडेआठशें रुपये हजिरीस आरमारकरी लोक लागतील, त्याचा ऐवज सरकारांतून एकसाला मजुरा दिल्हा जाईल ह्मणोन, महिपतराव कृष्ण यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

७०५–( ९७३ ) किल्ले कोथळागडचे पायथळालगत मौजे मालेगांव तर्फ अंदरमावळ येथील रान आहे तें राखोन अडचण ठेविल्यास किल्याचे उपयोगी, याजकरितां हैबतराव माणकेश्वर यांस आज्ञा केली आहे, त्यास ते रानाची हद्द नेमून देतील, त्याप्रमाणें रान राखणें. शेतेंपोतें कोणास करूं न देणें, त्या रानापैकीं किल्याचे कारसाईस, चुडी व ओडे घेत जाणें ह्मणोन, संभाजी भावे हवालदार व कारकून किल्ले मजकूर यांचें नांवें. सनद १.

सीत समानीन मया व अलफ जिल्काद ११

परवानगी रूबरू.

७०६–( १०२३ ) गणपतराव शिर्के हवालदार जंजिरे वसई यांणीं विनंति केली कीं, कोटांतील पाणी वाईट, व हवा सर्द, नेहेमींच राहिल्यानें आजार लागतो, यास्तव किल्याबाहेर सुभा आठा चोहोंरोजीं येऊन जाण्याविशीं आज्ञा असावी ह्मणोन; त्याजवरून किल्यांतील हवा सर्द, याजमुळें

इहिदे तिसैन मया व अलफ जमादिलावल १६

---

( 705 ) The forest at Málegaum in Andar-Mávaḷ, which lay at the foot of the fort of Kothaḷágaḍ, was ordered to be preserved as being necessary for the safety of the fort.

A. D. 1785-86.

( 706 ) Ganpatrao Ṣirke, Haváldár of fort Bassein, represented that the climate of the fort was damp, and that water was bad, and requested that he might be allowed to visit the

A. D. 1790-91.

आठा चोहोंदिवशीं सुभा बाजीपुरा येथें येतील त्या दिवशीं, किल्याचे बंदोबस्तास चांगला माणूस ठेऊन, सुभा येऊन, फिरोन संध्याकाळीं किल्यांत जाऊन बंदोबस्त करितील. त्यास सदरहूप्रमाणें करवीत जाणें ह्मणोन, गणपतराव जिवाजी तालुके वसई यांचे नांवें. सनद १.

रसानगी याद.

७०७–( ११९६ ) बापूजी शिंदे याचे नांवें सनद कीं, किल्ले धारवाड येथील दरवाज्याचे परवानगीचा वगैरे तुमचा व बाबूराव साळोखे हवालदार यांचा खटला पडला आहे, त्यास किल्याचें काम नाजूक, तुह्मीं ज्याचें काम त्याचे हातून घेऊन साऱ्यांनीं एकविचारें राहून किल्याचा बंदोबस्त राखावा, तें न होतां तुमचे उभयतांचे कटकटीमुळें दरवाजे किल्याचे वेळचे वेळेस न लावितां, एके दिवशीं बाहेरील दरवाजा उघडा राहून आंतील दोन दरवाजे दोघांनीं लावले. माणसामाणसांत कटकटी होतात, व बाहेरील मनुष्य हवालदाराचे परवानगीवांचून सदरेपर्यंत जातें ह्मणोन हुजूर विदित जाहलें. ही गोष्ट चांगली नाहीं. हल्लीं किल्याचे बंदोबस्ताविशीं. कलमें.

खमस तिसेन
मया व अलफ
रबिलावल ४

१ तुह्मीं किल्यांत राहून महालचा कारभार करितां; याजमुळें महालांतील वगैरे लोक आंत मनस्वी येतात जातात, याणें किल्याचा बंद राहत नाहीं, यास्तव तुह्मीं बाहेर पेठेंत राहून महालचा कारभार करीत जाणें. किल्यांत तुह्मांस राहणें, तर बाहेर पेठेंत येऊन कारभार करावा. आंत राहून किल्याचें मात्र कामकाज, देखरेख करीत जावी. कलम.

१ किल्यांत लोक येतील जातील त्यांची परवानगी तुह्मीं हवालदार यांस सांगावी. हवालदारांनीं दरवाज्यास सांगत जावी. परभारें तुह्मींच सांगों नये. कलम.

१ किल्यांतील भरतीचे लोकांची रजा व कामगिरी व हजिरी व वांटणी करणें ते हवालदार, व दरकदार, यांस सदरेस बसऊन करीत जाणें, त्यांचे इतल्याखेरीज न करणें. कलम १.

---

town of Bájipoorá once a week for change. Permission was granted, but he was directed to return to the fort in the evening.

( 707 ) A dispute having arisen between Bápuji Scindiá, the officer of the fort of Dhárwár, and Báburao Sáḷokhe, Háváldár of the fort, regarding their respective control over the fort, the following instructions were issued:—

A. D. 1794-95.

1 To prevent too many people frequenting the fort, Bápuji should transact business of his mahál outside the fort, though he might continue to reside in the fort.

1 Permission to admit men in the fort should be communicated by Bápuji to the Haváldár, and not to the gate-keepers direct.

१ दरवाजे व कोठ्याच्या किल्या हवालदार याजवळ ठेवीत जाव्या, दरवाजे व कोठ्या उघडणें व लावणें तें वेळचे वेळेस तुह्मीं हवालदारास परवानगी सांगोन करवीत जाणें. कलम.

१ हशमनीस व हशमाचे फडणीस पेशजींपासून किल्यांत राहून दरकाचें कामकाज करितात, त्याप्रमाणें हल्लीं किल्यांत राहातील. दरकाचें काम ज्याचे त्याचे हातून घेत जाणें. कलम १.

---

५

एकूण पांच कलमें लिहिलीं असेत, सदरीलप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन, मशारनिल्हे यांचे नांवें. सनद १.

रसानगी, त्रिंबकराव नारायण परचुरे कारकून निसबत दप्तर.

७०८–( ११९७ ) बाल सावंत भिरवडेकर हवालदार किल्ले पारगड याचे नांवें सनद कीं, तुह्मांस किल्ले मजकूरचा हवाला सांगोन पाठविलें, त्यास तुह्मीं लोक घेऊन गेलां ते साळशी वगैरे तालुक्यांतील किल्यांत उपयोगी नाहींत, यास्तव तुह्मांस मात्र किल्यावर घेऊन लोक माघारे लाविले, ह्मणोन किल्लेकरी यांणीं विनंतिपत्र पाठविलें. ऐशास साळशी वगैरे तालुक्यांतील लोक ठेविले असतील ते दूर करून स्वदेशी कलानिधि तालुक्यांतील चांगलें माणूस ठेऊन त्रिंबकराव येशवंत मामलेदार यांस दाखवणें. मशारनिल्हे हजिरी घेऊन करार करतील, ते लोक नेमणुकेप्रमाणें किल्यावर नेऊन अलंग नोबत, चौकीपहारा चांगला राखणें ह्मणोन. सनद १.

खमस तिसेन मया व अलफ रविलाखर ६

रसानगी, त्रिंबक नारायण परचुरे कारकून निसबत दप्तर.

---

1 Orders regarding leave, muster, and duties of the men in the fort should not be passed by Bápuji except in the presence of the Havàldár and the Darakdárs, and with their consent.

1 The keys of the gates and stores should remain with the Havàldár, and he should open the gates and doors under Bápuji's order.

( 708 ) Bál Sávant Bhirwadeker was appointed Havàldár of the fort of Párgad. He took some men from Sálshi with him. The fort-officers admitted him, but sent his men away as being unfit for service in the fort, and reported the fact to Government. Bálá Sávant was directed to select for employment residents of the province ( in which the fort was situated ), as also residents of Táluká Kalánidhi, and to enlist them after they are inspected and approved by the Mámlatdár, Trimbakrao Eshwant.

A. D. 1794-95.

# ३ मुलकी खातें.

## ( अ ) जमिनीची पाहणी व जमाबंदी.

७०९–( ४० ) रामराव जिवाजी चिटणीस यांजकडे मौजे खोजेवाडी तालुके सातारा हा गांव आहे, त्यास तिगस्तां जिल्हेदाराच्या वगैरे उपद्रवाकरितां वोस पडला होता, त्यास वासुदेव अनंत, व हुजूर मामलेदार गंगाधर शामराव यांजकडे कारकून पाठऊन पांचसाला कौल आणविला. लावणी होईल त्याप्रमाणें हिसेरसीद घ्यावा असें असतां, सालमजकुरीं दोन्ही मामलती तुह्मांकडे जाहल्या आहेत, त्यास तुह्मीं जास्ती ऐवज घेऊं ह्मणतां ह्मणोन, यांणीं हुजूर विदित केलें, त्याजवरून हें पत्र सादर केलें असे, तरी ज्याप्रमाणें गांवास कौल दिला आहे, त्याप्रमाणें वाजवी वसूल घ्यावा. जास्ती उपद्रव न करणें ह्मणोन, हैबतराव भवानीशंकर यांचे नांवें.

अर्बा सबैन मया व अलफ सफर ५

पत्र १.

रसानगी यादी.

## नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

७१०–( १९२ ) कृष्णाजी माधवराव व भिवराव येशवंत उपनाम पानसी, गोत्र मुद्गल, सूत्र आश्वलायन, महाजन व आउटके, मौजे बेलवाडी, तालुके कर्डे सरकार जुन्नर, यांणीं हुजूर कजबे पुणें येथील मुक्कामीं विनंति केली कीं, मौजे मजकूर येथील हरदू वतनें आपलीं, त्यास आउटकीचे वतनाचें बलुतें पेशजीं मोगलाई अमलांत गांवची बटाई होत होती, तेव्हां सारे

खमस सबैन मया व अलफ रबिलाखर ५

---

# III LAND REVENUE AND ITS ADMINISTRATION.

## ( A ) Survey and assessment of land.

( 709 ) The village of Khojewáḍi suffered, in the year before the preceding, oppression at the hands of the holder of the Zillá Amal and others, and became consequently desolate. A kowl was consequently granted promising for 5 years the levy of revenue in proportion to the area brought under cultivation. It being represented that Haibatráo Bhawáni Shankar intended to recover a larger revenue, he was directed to abstain from doing so.

A. D. 1773-74.

## FROM NÁRO APPÁJI'S DIARY.

( 710 ) There was during the Government of the Mogals in Belwáḍi in Tarf Karḍe in Sarkár Junner, a watan called Ouṭki, the holder of which measured the produce of the whole village which was collected together, and which furnished the basis for

A. D. 1774-75.

गांवचा माल एकजागें जमा होऊन आउटकीयाचे हातें मालाची मोजणी होऊन, बलुतें पावत होतें. अलीकडे गांवची खंडणी होते, मालाची मोजणी होत नाहीं, त्यामुळें बलुतें पावत नाहींत, यास्तव मौजे मजकूरचे मोकदम व समस्त पांढरी मिळोन आउटक्याचे, बलि(लु)त्याचे ऐवजीं गांव निजबत जमीन परतनें आठ दर परतनी(स) बिघे नवप्रमाणें बहात्तर बिघे जमीन आपल्यास इनाम देऊन सन इसन्ने सबैनांत पत्र करून दिल्हें आहे, त्याबरहुकूम सगुणाबाई शिंदे यांजकडे मौजे मजकूरची जहागीर इनाम आहे, त्यांणीं आपलीं पत्रें करून दिल्हीं आहेत, त्याप्रमाणें चालत आहे. त्यास स्वामींनीं कृपाळु होऊन सरकारांतून करार करून देऊन, पत्रें करून दिलीं पाहिजेत ह्मणून; त्याजवरून मनास आणितां यास मौजे मजकूरचे आउटकीचे वतनाचें बलुतें गांवची बटाई होत नाहीं. खंडणी होते, याजमुळें पावत नाहीं, याजकरितां यास तुह्मीं बलुत्याचे ऐवजीं जमीन जिराईत चावर.

८१८ गांवकरी पांढर जमीन.

·।२४ भाडाचें थळ, शिरगांवचे वाटेवर पावणें दोन दोऱ्या आहेत, त्यापैकीं बिघे चोपन.

---

·॥१२

एकूण अर्धा चावर बारा बिघे जमीन साऱ्या व पट्या तुह्मीं द्यावयाच्या करून गांव निजबत जमीन इनाम आउटक्याचे, बलुत्याचे, ऐवजीं यांस देऊन पत्र करून दिल्हें; व सगुणाबाई शिंदे जहागिरीचे अमलदार यांणीं आपलीं पत्रें करून दिल्हीं आहेत, त्याप्रमाणें सरकारांतून जमीन यांजकडे करार करून दिल्ही असे, तरी सदरहूप्रमाणें अर्धा चावर बारा बिघे जमीन गांव निजबत इनाम मौजे मजकूरपैकीं याचे दुमाला करून देऊन यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालविणें ह्मणोन. छ. २ रबिलावल. सनदा, पत्रें.

२ सनदा.

१ नांवची.

१ मोकदम वरयाल मौजे मजकूर यास.

---

२

२ चिटणिसी. पत्रें.

१ देशाधिकारी, लेखक वर्तमान व भावी, तालुके कर्डें सरकार जुन्नर यांस.

---

the assessment of the land-revenue. The services of the watandár, it is stated, were not required during the Maratha Government as the revenue was fixed independently of the produce.

१ देशमुख व देशपांडे तालुके मजकूर यांस.

२

४

रसानगी यादी. सनद किल्ले पुरंदर.

७११–( २१३ ) रामजी बिन गावजी गलडा दिमत केसो कृष्णाजी निसबत हुजूर हशंम यांणीं हुजूर विदित केलें कीं, मौजे उंदीरगांव, तर्फ बेलापूर, परगणें संगमनेर, येथें आपलें बागाईत बिघे ८८ आठ व जिराइती बिघे ८१६ सोळा, येणेंप्रमाणें जमीन आहे, त्यास तात्याजी नाईक शुक्रे सराफ मौजे मजकुरीं आहेत, यांजपासून मुद्दल रुपये ४५ पंचेताळीस कर्ज घेऊन नाईकास बागाइतांत व जिराइतांत सरकत दिल्ही. सरकारसारा वारून बाकी राहील त्याचा तिसरा वांटा तक्षीम दिल्ही, त्यास दोन वर्षांनीं व्याजाचा हिशेब वगैरे उसाचें बीज ऐसें करून शंभर रुपयांचें फेरखत करून घेतलें. बोलीप्रमाणें चार सालें भरलियावर नाईक मशारनिल्हेकडे आपले रुपये ३०१॥ तीनशें दीड रुपया वाट्याचा वगैरे जिनसाचा येणें, त्यास आपले शंभर रुपये वजा करून बाकीचे रुपये देणें, व खत देणें ह्मणोन बोलत असतां, ऐकत नाहीं. धटाईच्या गोष्टी सांगतो. यास्तव आपण समस्त गांवकरी यांस साक्ष ठेऊन परागंदा जालों आहें ह्मणोन; त्याजवरून हें पत्र सादर केलें असे. तरी वाजबी मनास आणून जाजती ऐवज घेतला आहे तो माघारा देवणें. त्यापैकीं चौथाई घेऊन सरकार हिशेबीं जमा करणें ह्मणोन, नरसिंगराव बल्लाळ यांचे नांवें चिटणिसी.

सीत सबैन मया व अलफ जमादिलावल ३

पत्र १.

---

( 711 ) Rámji bin Gáwaji of Undirgaum, in Tarf Belápur of Parganá Sangamner, obtained a loan of Rs. 40 from Tátyáji Naik Shukre, and gave him his land consisting of 8 bighás of Bágáyat and 16 bighás of Jiráyat on condition that out of the net proceeds thereof, after paying Government assessment, $\frac{1}{3}$ should be taken by the creditor and $\frac{2}{3}$rds left to the owner. After 2 year's interest was calculated, a fresh account was struck including items on account of seed &c., and a new document for Rs. 100 was passed by Rámji. At the end of 4 years, Rámji told his creditor that the land-produce of his share was Rs. 301-8, and that he should return him the amount after deducting the Rs. 100 due to him. He refused. Rámji applied to the Peshwá, communicating the facts and informing that he had for the above reason left the village. Orders were issued for the balance due to Rámji being restored to him.

A. D. 1775-76.

## जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

७१२–( २८८ ) मौजे चिंचोडी, तर्फ कडे, परगणे पाडें पेडगांव येथील जहागीर

सीत सबैन
मया व अलफ
रबिलाखर १५

तालुके पट्याकडे व मोकासा विठ्ठल यशवंतराव खासनिस यांजकडे, व बाबती साहोत्र्याचा अमल राजश्री पंतसचिव यांजकडे, त्यांस पेशजीं सरकारांतून मौजे मजकूरचे वांटणीचा तह करून दिल्हा आहे, त्याप्रमाणें आजपर्यंत सुरळीत चालत आलें. आलीकडे दोन वर्षें पंतसचिव यांजकडील बाबतीचे कमाविसदार यांणीं खलेल करून परगणे मजकूरपैकीं निंबाळकरांकडे गांव आहेत तेथील तह निमे जहागीर व निमे स्वराज्य पैकीं, निमे बाबतीचा साहोत्रा, व निमे मोकासा आहे, त्या तहाप्रमाणें मौजे मजकूरचा ऐवज जाजती मागतात, त्यास पेशजीं तीन साला जमेची वांटणी सरकारांतून करून दिल्ही आहे, ते मनास आणून त्याप्रमाणें तह करार करून दिला पाहिजे व मागील दोन सालांचे जमावसूल बाबतीचे, पंतसचिव यांजकडून, गांवकरी यांस करून देविले पाहिजेत ह्मणोन, बाळकृष्ण केशव तर्फ पटा यांणीं हुजूर विदित केलें; त्याजवरून कैलासवासी नानासाहेब यांणीं सन सबा व सन समान व सन तिसा खमसन एकूण तीन साला जमेची वांटणीचा तह सन सितेनांत करून दिला आहे तो पाहून त्याप्रमाणें खेरीज सरदेशमुखी दरसदे आकारास. रुपये.

७५ जाहगीर तालुके पटा.

५० ऐन जहागीर.

२५ कसर सरकार.

---

७५

२५ स्वराज्य चौथाई.

१७॥= मोकासा विठ्ठल येशवंतराव खासनीस, दिंमत हुजुरांत याजकडे.

५॥।=। बाबती व साहोत्र्याचा अमल पंतसचिव यांजकडे.

४।=॥ बाबती.

---

### FROM JANÁRDAN APPÁJIS DIARY.

( 712 ) In certain villages in Parganá Páde Pedgaum, the Jahágir

A. D. 1775-76.

Amal was fixed at 50 per cent of the revenue, and the remaining 50 per cent was स्वराज्य ( Swarájya ) of which half was Sáhotra and half Mokásá. In Chinchodi, another village in the said Parganá, the practice was different, but the wahiwátdars of Pant Sachiv attempted to levy Sáhotrá at the above rate. The matter was taken to Government, and the following division of the revenues was fixed.

१॥ साहोत्रा.

---

५॥।=॥

१।ॾ॥ निम चौथाई बाबूराव सितोळे निसबत शाहाजी भोसले याजकडे.

---

२५

---

१००

एकूण शंभर रुपयांची वांटणी पेशजींप्रमाणें करून हें पत्र सादर केलें असे, तरी मौजे मजकूरचे जमाबंदीचा ठराव होईल, त्याचा वसूल सदरहू वांटणीप्रमाणें जिकडील तिकडे देत जाणें; व मागील दोन सालांचे जमावसूल बाबतीचे राहिले आहेत, ते करून द्याव-याविशीं सनदा व पत्रें छ. ४ रबिलावल.

२ सनदा.

१ मौजे मजकूरचे मोकदम यांस कीं, सदरहू वांटणीप्रमाणें जिकडील तिकडे अमल देत जाणें ह्मणोन.

१ पंतसचिव यांस कीं, सालमजकुरीं पेशजींची वांटणी पाहून त्याप्रमाणें बाबती साहोत्र्याचा ऐवज घेत जावा ह्मणोन.

---

२

१ माधवराव शिवदेव कमाविसदार निसबत पंतसचिव यांचे नांवें. चिट-णिसी पत्र.

---

३

रसानगी यादी.

---

Rs. 75 Jahágir.

50 Net Jahágir.

25 Kasar.

---

75

25 Swarájya Chauthái.

17–10 Mokásá.

5–14–6 Bábti and Sáhotrá.

4–6–6 Bábti.

1–8 Sâhotrá.

७१३–( ३६७ ) मोरो बापूजी यांचे नांवें सनद कीं, बाळाजी जनार्दन भानू खोत मौजे इलणें, तर्फ केळशी, तालुके सुवर्णदुर्ग, यांणीं विनंति केली कीं, मौजे मजकूरची खोती आपली आहे त्यास अलीकडे बांधेकरी खोती चालवीत होते, त्यास साल गुदस्तांपासून आमची खोती पूर्ववत्-प्रमाणें आपल्याकडे सरकारांतून चालती केली आहे; त्यास सालवारी पाहणी करून जमाबंदी ठरेल त्याप्रमाणें सरकारांत वसूल ध्यावा ह्मणोन; त्यावरून पाहणी करून जमाबंदी ठरेल त्याप्रमाणें मौजे मजकूरचा वसूल सरकारांत ध्यावयाचा करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी मौजे मजकूरची सालमजकुरीं पाहणी करून, पाहणीमुळें जमाबंदी ठरेल त्याप्रमाणें वसूल घेणें ह्मणोन.

सबा सबैन
मया व अलफ
जिल्हेज ३

सनद १.

रसानगी यादी.

७१४–( ३६९ ) मौजे राजापूर परगणे वाण, येथील जागिरीचा अमल सरकारांत आहे, व मोकासा बाबती सरदेशमुखीचा अमल पंतप्रतिनिधि यांजकडे आहे, त्यास लावणीची तर्तूद न पाहतां कमाविसदारांनीं सालोसाल जमाबंद्या भारी केल्या; व आफ्तीमुळें गांवांत जीवन राहिलें नाहीं, यास्तव सरकारांतून बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे. मौजे मजकूरचे पाटील कुळकर्णी यांणीं हुजूर येऊन अर्ज केला, त्याजवरून मौजे मजकूरचे लावणीचें कामकाज सालमजकुरीं सरकारांतून तुह्मांस सांगितलें असे, तरी इमानें इतबारें वर्तोन, गांवची लावणी करून, आकार चौकशीनें करणें. मौजे मजकूरचे अमलाचीं वगैरे कलमें.

सबा सबैन
मया व अलफ
जिल्हेज ४

---

1–7–6 Chauthai.

---

100

The Sardeshmukhi was to be levied in addition to the above.

( 713 ) At the request of Báláji Janárdan Bhánu, Khot of Mouze Ilaṇe in Tarf Keḷshi of Táluká Suwarṇdurg, orders were issued for fixing the assessment after a survey of the lands in the village, and for the levy of the assessment thus fixed.

A. D. 1776-77.

( 714 ) The Jahágir Amal of the village of Rájápur in Parganá Wáṇ, belonged to Government and the Mokásá, Bábti and Sardeshmukhi Amal to the Pant Pratinidhi. The Kamávisdárs in former years settled the revenue of the village without taking into account the extent of cultivation thereof, and owing to this cause and in consequence of scarcity the village was reduced to poverty. The Páṭil and Kuḷkarṇi having represented the fact to Government, Narsingrao Balláḷ was appointed to arrange for the cultivation of the village lands and the following instructions were issued to him.

A. D. 1776-77.

दिगांबर महादेव कमाविसदार परगणे मजकूर व तुह्मीं मिळोन गांवचे जरीब करून पड जमीन, जिराईत बागाईत, निवडून वहित जमीन आहे, त्यांत गांवकरी यांनीं मामुल धारा मोडून, कमी कौल देऊन, नुकसानी सरकारची केली असेल, त्याची चौकशी करणें. पड जमीन व वहित जमिनीचे लावणीचा बंदोबस्त करून गांवकरी यांचे गुजारतीनें कमाल जमेचे आकार बमोजीब सालबंदी इस्तावा चौकशीनें ठराऊन, अखेरसालीं सरकारांत आणून समजावणें, त्याप्रमाणें पेस्तर सालापासून इस्तावा बांधून दिल्हा जाईल. सालमजकूरची जमाबंदी तुह्मीं उभयतां मिळोन करून, आकार होईल त्यापैकीं, जागिरीचा ऐवज दिंगाबर महादेव याजकडे देऊन, मोकासा बाबती सरदेशमुखीचा ऐवज पंतप्रतिनिधि यांजकडे. कलम १.

जमाबंदी पैकीं दहक वजा करून, बाकी बेरजेपैकीं हिसा प्रतिनिधि यांस पावत होता, त्यास दहक वजा न करितां कच्चे आकाराचा हिसा पंतप्रतिनिधि यांस देत जाणें. कलम १.

वेठ बेगार सरकारची सालाबाद असेल त्याप्रमाणें देत जाणें. कलम १.

मौजे मजकुरीं बाकी असेल त्याची चौकशी करून, दार नादार निवडून हुजूर समजावणें. कलम १.

महाल मजकूरची नेमणूक. रुपये.

| | |
|---|---|
| १५० | कारकून. |
| ३० | प्यादा. |
| १८० | |

एकूण एकशें ऐशीं रुपये करार केले असेत, पैकीं निमे पंतप्रतिनिधि यांजकडील ऐवजीं वजा करून घेणें, बाकी निमे सरकारांतून मजुरा पडतील. कलम १.

गांवास बीज तगाई देऊन हंगामशीर उगऊन घेणें. कलम १.

---

1 Narsingrao should, in conjunction with the Kamávisdár of the Parganá, make a survey of the village distinguishing cultivated from uncultivated lands and Jiráyat from Bágáyat. These officers should further inquire whether any loss of revenue was caused by the village officials giving kowls for the cultivation of lands at lower rates. They should then fix the revenue, commencing with a reduced figure and gradually increasing it till the maximum was reached. The arrangement arrived at should be reported to Government at the end of the year, and a kowl would then be issued fixing the revenue for the successive years. The revenue for the current year should be fixed by Narsingrao and the Kamávisdárs, the Jahágir Amal being given to the latter and the Mokásá and other Amals to Pratinidhi.

एकूण साहा कलमें करार केलीं असेत, तरी सदरहू लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन, नरसिंगराव बल्लाळ यांचे नांवें. सनद, १.

येविशीं. सनदा पत्रें ३.

२ सनदा.

१ दिंगाबर महादेव कमाविसदार परगणे मजकूर, यांस कीं, मौजे मजकूरचे लावणीचें कामकाज सालमजकुरीं सरकारांतून नरसिंगराव बल्लाळ यांस सांगोन, आकार होईल त्यापैकीं पंतप्रतिनिधि यांस दहक वजा होऊन, सालाबाद हिसा पावतो; त्यास दहक वजा न करितां कच्चे आकाराचा हिसा द्यावा; व जागिरीचे अमलाचा वसूल तुह्मांकडे त्यांणीं द्यावा. याप्रमाणें करार केला असे ह्मणोन. सनद.

१ मोकदम मौजे मजकूर यांस अभयपत्र कीं, तुह्मीं बेवसवसा कुळें परागंदा जालीं असतील, तीं गांवांवर आणून आबादी करून सुखरूप राहणें ह्मणोन.

---

२

१ जमीदार परगणे मजकूर यांस चिटणिसी. पत्र.

---

३ ४

रसानगी यादी.

७१५-( ३७५ ) परगणे वरणगांव येथील जागिरीचा अमल नवाबाकडे आहे, त्यास जागिरीचा व स्वराज्याचा अमल येणेंप्रमाणें बीतपशील. रुपये.

सबा सबैन मया व अलफ जिल्हेज १६

७० हिसा जागिरदार.

४२॥ स्वराज्य.

---

1 Forced labour for Government purposes should be exacted as usual.

1 In regard to past arrears of revenue inquiry should be made as to the solvency or otherwise of the defaulters, and a report made to Government.

1 Grain should be advanced to rayats as Tagái for seed purposes and duly recovered at the proper season.

( 715 ) The Jahágir of Parganá Waranagaum belonged to the Nawáb and the Swarájya Amal to Government. The proportion of these Amals was as under——

A. D. 1776-77.

३० मुकासा व बाबती.
१२॥ सरदेशमुखी.

४२॥

११२॥

एकूण एकशें साडे बारा रुपये आकारास सत्तर रुपये जागीर व साडे बेताळीस रुपये स्वराज्य देखील सरदेशमुखी, तह असतां तहाप्रमाणें स्वराज्याचा अमल तुम्हीं घेत नाहीं, जाजती उपसर्ग करितां, म्हणोन हुजूर विदित जालें; त्याजवरून हें पत्र सादर केलें असे, तरी सुदामत तहाप्रमाणें स्वराज्याचा अमल घेणें, जाजती उपसर्ग न देणें म्हणोन. पत्रें.

१ विनायक रघुनाथ कमाविसदार बाबती सरदेशमुखी परगणे मजकूर यांस.
१ रामराव निंबाजी यांस मोकाशाचे अमलाविशीं.
१ नारो कृष्ण यांस.
१ जमीदार परगणे मजकूर यांस.

४

चिटणिसी.

७१६–( ५२५ ) तर्फ नागोठणें, व तर्फ अष्टमी, व तर्फ सिमाल तालुके अवचितगड, येथील जमीदार हुजूर पुरंदरचे मुक्कामीं येऊन अर्ज केला कीं, दुतर्फा मामलेदारांचा तर्फ मजकूरचे रयतेस नवीन उपसर्ग लागतो, यामुळें रयत तजावजा होऊन मुलकाची आबादी होत नाहीं, येविशीं-

समान सबैन मया व अलफ सफर ६

Rs. 70 Jahágir
42½ Swarájya.
30 Mokásá and Bábti.
12–8 Sardeshmukhi.

112–8

(716) The Jamidárs of Tarfs Nágothṇe, Ashṭmi, Simál in T. Avachitgaḍ represented: that owing to the oppression of the Mámlatdárs of Government and the Mámlatdár of the Sudhágaḍkar who had concurrent jurisdiction over the Tarf, the rayats had left their villages and the country had suffered. The following instructions were therefore issued.

A. D. 1777-78.

चा बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे ह्मणोन; त्याजवरून मनास आणून, हुजुरून बंदोबस्त करून दिल्हा असे, त्याप्रमाणें दुतर्फा मामल[त]दारांनीं चालवावें, कलमें बीतपशील येणें- प्रमाणें.

जोशी व उपाध्ये रयतेच्या लग्नास पाठवणी पहिली घेत होते, त्यापेक्षां अधिक घेतात, त्यास पेशजीच्या चालीप्रमाणें घेतल्यानें रयतीस हलकें पडेल ह्मणोन, त्यास पहिले चालीप्रमाणें लग्नास घ्यावें. आडऊन ती घेऊं लागल्यास तुह्मीं ताकीद करणें. कलम १.

तोतयाचे दंग्यामुळें कित्येक गांव दुतर्फा सरकारांत जप्ती करून, पिकाच्या मळण्या केल्या. निमे रयतीस देऊन निमे राजभाग सरकारांत घेतला. सरखेल यांजकडील पटी सरदेशमुखीचा ऐवज त्यांचा त्यांस पावला नाहीं, याजकरितां आह्मांवर तलब करितील ह्मणोन, ऐशास दुतर्फा गांवची जफ्ती करून अर्धेल आली तो वाटा निमे निमे घेतला. सरदेशमुखीचा हिसा सरकार व सुधागडकरी याचे अमलपैकीं व त्यांणीं

तर्फ नागोठणें येथील स्वार ह्मैसवड, व बुरुंडी या दोहों खारींची जमीन सरकारतर्फेस पिकल्यास नव दाहा वर्षें उगवितात. सालमजकुरीं सरकारांतून पाहणी होणार, त्यास ज्या खारीची जमीन, त्या खारीकडे असावी ह्मणोन, त्यास तुह्मीं येविशींची चौकशी करून, जिकडील जमीन, तिकडे लावणें. कलम १.

रयतीस वेठ बिगार बहुत पडत्ये, यामुळें कीर्द होत नाहीं. वेठीचे उपद्रवामुळें रयत परागंदा होत्ये, शेतगी होत नाहीं. खोतांपासून नुकसान भरून घेतात, त्यास येविशींचा बंदोबस्त करून दिल्ह्यानें मुलुक आबाद होईल ह्मणोन; त्यास वेठ बिगार सरकारकामास अगत्याअगत्य लागेल, ती जमीदाराचे गुजारतीनें शिस्त करून घेणें. कलम १.

---

1 The village astrologers and priests should not levy Páthavaṇi (tax on marriage) at more than the former rates.

1 During the disturbance of the Impostor, the crops of the villages were attached, and half the produce was given to the cultivator, and the remaining half was taken by Government and the Sudhágaḍkar. The Ângriá demanded payment of his Sardeshmukhi right from the rayats. The payment should be made out of the share received by Government and the Sudhágaḍkar.

1 Owing to the exaction of forced service, the cultivators had to leave their villages, and cutivation had decreased. This resulted in a loss of revenue which the Khots had to make good. Forced service should in future be required from the cultivators, only when absolutely necessary for the purposes of Government and under the supervision of the Jamidárs.

आपले वांट्यापैकीं सरदेशमुखास द्यावा, तो न देत, सबब रयतीस सरदेशमुखी तगादा करितात तो करूं न देणें. कलम १.

वसुलास प्यादे महालींहून तितर्फा सरकार व सुधागड, व आंग्रे यांजकडून जातात, त्यांचे पोटाचा उपद्रव रयतीस फार लागतो, त्याची नेमणूक करून द्यावी ह्मणोन, त्यास वसुलास प्यादे मुलकांत तितर्फा जातील; त्यास वेळेस निठवेंभर तांदूळ व एक पैसा द्यावा, जाजती घेऊं न देणें. कलम १.

मुंबईहून गलबतें सावकारी नागोठणेंयाचे बंदरीं येतात, त्यास मागील चालीशिवाय दर गलबतास दोन नारळ मामलेदार सरकारांत घेतात, त्याप्रमाणें सुधागडकरीही सावकारांजवळ मागतात. यामुळें बंदर मजकुरीं कजिया होतो ह्मणोन, ऐशास नारळ घ्यावयाची चाल नवी केली आहे, त्यास दुतर्फा नारळ घेऊं नये. कलम १.

तर्फ मजकूरची रयत कर्जदार जाली आहे, त्यास कर्जदाराची निकड होत्ये. आणि द्यावयासी मवसर नाहीं. मुदती फुरसदीनें घेणें, ह्मणोन आज्ञा असावी. ऐशास दार नादार कुळें असतील, त्यांचे कर्जदारांस हप्ते करून देणें. कलम १.

तर्फ मजकुरीं सागवानी झाडें तोडावयाची मनाई आलीकडे केली आहे, त्यास वरकसी धारा गांवगन्ना आहे, त्या धान्याचे ऐवजीं रान तोडून वरकस करावा तरी सागवानी झाडें तुटतात. या अडचणीमुळें वरकस होत नाहीं. धारा भरून द्यावा लागतो ह्मणोन. ऐशास सागवानी रान भारी असेल तितकें मात्र राखावें, वरकड असेल तें रयेतीनें तोडावें. कलम १.

---

1 In view of the indebtedness of the rayats, the debts due by them to money-lenders should be recovered by instalments.

1 Peons whether of Government, or Sudhágaḍkar, or the Ángriá, visiting the villages for the recovery of revenue should receive one Niṭwe ( $\frac{1}{2}$ seer ) of rice and one pice at a time, but no more.

1 2 Cocoanuts were levied by the Mámlatdár for Government from every trading ship coming from Bombay to port Nágoṭne in excess of the fixed rates. The levy should be discontinued.

1 In the Tarfs, orders were formerly issued to prevent the cutting of timber. This prevented the cultivation of Warkas land on which assessment had already been imposed. Valuable timber-forests should be preserved. Timber elsewhere should be left open for cutting.

Orders were issued accordingly to the Government Mámlatdár as also to the Mámlatdár of Sudhágaḍ.

एकूण आठ कलमें लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें. नवीन उपद्रव रयतीस एकंदर न लावणें. येविशीं सुधागडकरी यांस ताकीद करून सदरील अन्वयें वर्तवणें ह्मणोन, कृष्णाजी रामचंद्र यांस. पत्र १.

सदरील अन्वयें आत्माराम रघुनाथ तर्फ सुधागड यांस. पत्र १.

२

चिटणिसी.

७१७-( ६४९ ) प्रांत भिंवडी येथील पहाणी सालमजकुरीं जाहालियाविना जमाबंदी समजणार [ नाहीं, ] याजकरितां पाहणी करावयाविशीं, व पाहणीमुळें भोजनखर्च वगैरे सात आठशें रुपये लागतील, त्याविशीं आज्ञा जाहली पाहिजे ह्मणोन तुह्मीं विनंति केली; त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी पाहणीमुळें सरासरी जमा जाजती साधेल, असें असल्यास रयतेस जलेल न करितां राजी रोखानें पाहणी इतबारानें करणें. पाहणीमुळें चार पांचशें रुपये भोजनखर्च वगैरे लागेल, तो लावणें. प्रांत मजकूरचे हिशेबीं तुह्मांस मजुरा पडेल ह्मणोन, गोविंद राम यांचे नांवें. सनद १.

समानीन
मया व अलफ
जिल्काद २७

रसानगी यादी.

७१८-( ७७३ ) तालुके विजयदुर्ग येथील मुलकी जमाबंदीचा मक्ता सन अर्बा सबैनांत, सन समान सबैनपावेतों पंचसाला करून दिल्हा होता, तो पुरल्यावर पाहणी व्हावी, ते जाहली नाहीं. मागील मक्त्याचे शेवटील सालचे बेरजेप्रमाणें सालेसाल उगवणी होत आहे, याजकरतां पाहणी करून जमाबंदी करावी, ह्मणोन दोन तीन वर्षे रयतेचें बोलणें आहे;

सलास समानीन
मया व अलफ
सवाल १२

---

( 717 ) The officer of Paránt Kalyán Bhiwandi represented that the Jamábandi of the province could not be fixed without inspection of the lands, and asked sanction to the expenditure of Rs. 700 or 800 on account of diet-money to officers making the inspection. He was ordered to make the inspection, if it was calculated to raise the revenue, and to take care that the inspection was honestly made, and that no oppression was caused to the rayats. Rs. 400 or 500 were sanctioned for expenditure as diet-money.

A. D. 1779-80.

( 718 ) The term of the 5 years settlement of revenue in Vijayadurga expired in A. D. 1777-78. No fresh inspection of land and settlement of revenue was however made, though asked for by the rayats, and the old rates continued to be levied.

A. D. 1782-83.

परंतु पाहणी जाहली नाहीं. सालमजकुरीं रयतेनें सुभा येऊन गवगवा फार केला, सबब बागाइतास गीर्दवारी बसविली आहे, तरी बागाइताची व जिराइताची पाहणी करावयाची आज्ञा जाहली पाहिजे, ह्मणोन तुह्मांकडील कारकुनांनीं विनंति केली; त्याजवरून मनास आणतां पेशजींचे मक्त्यास फार वर्षे जाहलीं, याजकरितां सालमजकुरीं पाहणी करावयाचा करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी बागाईत व जिराईत, व नक्तबाब यांची वाजबीचे रीतीनें कोठें गुंजावीस न ठेवतां व रयतेवर जलल न होतां हंगामी पाहणी करणें. गुदस्त बेरजेस सरासरीमुळें कमी न आणतां जाजती साधतां साधेल तें साधून हुजूर आणून समजावणें. समजोन जमाबंदीचा ठराव करून दिला जाईल ह्मणोन, गंगाधर गोविंद यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

७१९–( ८६८ ) तालुके शिवनेर येथील जमीदार व पाटील कसबे आळें येथें जाऊन बसले होते, त्यांजकडे तालुके मजकुरींहून कारकून पाठवून त्यांणीं आपलें हरद्र सांगितलें, त्याचा मजकूर तुह्मीं हुजूर लेहून पाठविला तो विदित जाहला ऐशास.

खमस समानीन मया व अलफ सफर २०

---

The rayats complained to the Subhá. A survey was therefore ordered with instructions not to allow the assessment to fall below the preceding year's Jamábandi, and to take care that it did not press heavily on the rayats.

( 719 ) The Pátils in Táluká Shivner and the Jamidárs being dissatisfied removed to village Aleṇ. The Kamávisdár sent his kárkun to get them back. They stated their grievances and asked for redress. Their grievances were:—

A. D. 1784-85.

1 Crops had partially failed owing to want of rain. The Jamidárs and Páṭils prayed that the Jamábandi be fixed after inspection.

2 Old debts were due from the rayats to the Sáwkárs. Permission should be given to these being paid after enquiry for the produce of the land.

3 The customary Haks of the Jamidárs should be paid. The Kamávisdár reported the facts to the Peshwá with the result that the first prayer was granted. In regard to the second, it was ordered that interest at exhorbitant rates should not be allowed, and that the amount reasonably due might be recovered by instalments from the net produce of the lands. In regard to the 3rd, information as to the extent of the Haks claimed was asked for.

मागील वोढणीचें कर्ज गांवगन्ना रयतेकडे सावकारांचें थकलें आहे, त्याचे हिशेब पाहून वाजबी देणें आहे, त्यास ऐवज नाहीं, असें समजलियावर कच्चे उत्पन्नापैकीं ऐवज लाऊन देऊं ह्मणोन तुह्मीं कबूल केलें आहे, त्यास गांवसंमधें वाजवी देणें सावकराचें असेल, त्याची चौकशी करून, ज्याचें व्याज मनस्वी असेल तें देऊं नये, रीतीचें व्याज करून कर्जाचा ऐवज ठरेल तो हप्तेबंदीनें कच्चे उत्पन्नापैकीं लाऊन देणें. कलम १.

जमीदार आपले हक्काचें बोलणें सुदामत प्रमाणें हक्क आह्मांस पावतो, त्याप्रमाणें द्यावा ह्मणोन बोलूं लागले; त्यावरून सरकारांत विनंति करून सुदामतप्रमाणें हक्क नेमून घेऊं ह्मणोन तुह्मीं कबूल केलें; त्यास सुदामत हक्क जमीदार काय घेतात, त्याची यादी हुजूर लिहून पाठवणें, समजोन आज्ञा करणें ती केली जाईल. कलम १.

साल मजकुरीं पर्जन्याचे आसीमुळें पिकास कमती आहे, त्याची पाहणी करून आकार होईल त्याचा वसूल घ्यावा, ह्मणोन जमीदार व पाटील यांचे बोलणें, त्याप्रमाणें कबूल करून समजाऊन आणून सुभाहून पाहणीस कारकून व महालकरी व जमीदार पाठविले आहेत. येविशींचे चौकशीस सरकारांतून कारकून पाठवावा ह्मणोन लिहिलें; त्यास सरकारांतून कारकून पाठवावयाचा नाहीं. तुह्मीं तालुके मजकुरींहून चौकशी करून कोणाची रुरयात न धरितां, रयतीस जलेल व सरकारनुकसान न होतां, व दुसरे कोणाची दरज न चाले ऐसी पाहणी करून जमाबंदीचा ठराव करणें. कलम १.

एकूण तीन कलमें लिहिलीं आहेत, सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन, बाळाजी महादेव यांचे नांवें. सनद १.

रसानगी, त्रिंबक नारायण परचुरे.

इहिदे तिसेन मया व अलफ सवाल १

७२०–( १०३९ ) खारापाट तर्फ वासी, व तालुके पेण, परगणे सांकसे येथील जमिनीचा धारा पेशजीं दर बिघा दहा मण भात घ्यावयाचा शिरस्ता होता, त्यास दहा मण धारा घेतलियानें जमाबंदी जरब होऊन, उगवणी आह्मांस न होय, याकरितां पाहणी करून सवाई सूट द्यावी. येविशीं रयतेचा अर्ज सरकारांत बहुत दिवस होता, परंतु सूट पडली नाहीं; त्यावर सन

A. D. 1790-91.

(720) The Government demand on a bighá of land in T. Wási and Tarf Peṇ in Parganá Sánksi was 10 maunds of rice, This being complained against as exhorbitant,

इसन्ने सबैनांन त्रिंबक विनायक यांणीं पाहणी केली, ते समई सवाई सूट द्यावयाविशीं अर्ज केला, तेव्हां त्यांणीं सवाई पैकीं निमसवाई दर बिघा एक मण सूट देऊन नऊ मण धारा ठरविला, त्यास सवाईपैकीं निमसवाई सूट न दिल्हियानें रयत बहुत नातवानीखालीं येऊन बाकीदार जाहाली. धारा जरब त्याची उगवणी होत नाहीं, यास्तव हल्लीं तालुके अवचितगड, व तालुके आतुरवलीत येथील खारी लगत्या आहेत, त्यास सवाई सूट सरकारांतून पडत आहे, त्याप्रमाणें आह्मांस द्यावयाची आज्ञा जाहली पाहिजे, ह्मणोन अर्ज केला; त्यावरून मनास आणितां तालुके अवचितगड, व तर्फ आतुरवलीत येथील खारी लगत्या आहेत, त्यांस सवाई सूट पडत्ये त्याप्रमाणें यांस पडावी, त्यापैकीं निमसवाई सूट दिल्ही आहे, त्याणें निभावणी होत नाहीं. रयत बहुत नादारीस येऊन बाकी फार राहूं लागली. जिरायताची व मिठागराची कीर्द हीच रयत करित्ये, त्याची निभावणी जाहली पाहिजे, यास्तव आबादीवर नजर देऊन सवाईपैकीं निमसवाई सूट पेशजीं पडली आहे, बाकी निमसवाई दर बिघा एक मण प्रमाणें सूट पडली नाहीं. ते सन तिसा समानीनापासून सूट द्यावयाचा सरकारांतून ठराव करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सन तिसा समानीनचा निमसवाईचा आकार सूट खर्च लिहिणें. सन तिसेनापासून जमेंत अजी वजा करणें ह्मणोन, भास्कर लक्ष्मण यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

७२१–( १०५७ ) गोपाळराव राम यांणीं हुजूर विदित केलें कीं, मौजे कर्जें तालुके सातारा येथील निमें गांवची कमावीस आह्मांकडे आहे, त्यास मौजे मजकुरीं तीस बिघे जमीन पाठस्थळ आहे; त्या जमिनीस कार्तिक मार्गशीर्ष पावेतों पाटाचें पाणी पुरतें, दोन पिकें होतात, याजकरितां सरकार धारा दर बिघा रुपये दहाप्रमाणें आकार होतो, त्यास सन इहिदे तिसेनांत पर्जन्य कमी पडला, पाट अगदीं चालला नाहीं, याजमुळें जमीन नापीक जाली, सबब सदरहू तीस बिघ्यांस दर बिघा रुपये पांच प्रमाणें सूट द्यावयाची आज्ञा जाहली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून हें पत्र तुह्मांस लिहिलें असे, तरी मुलुक शिरस्ता पाहून चौकशी करून तीस बिघ्यांस सूट देणें ह्मणोन, कृष्णराव अनंत मुक्काम सातारा यांचे नांवें चिटणिसी.

सलास तिसेन मया व अलफ सफर १५

पत्र १.

---

the assessment was reduced to 9 maunds, and was now after fresh complaints reduced to 8 maunds.

( 721 ) There were 30 bighás of Páṭasthal garden-land in mauze Karje in Táluká Sátárá, which produced two crops. The land bore assessment at Rs. 10 per bighá. The crops however failed in this year owing to scarcity of water, and remission was ordered to be granted as usual,

A. D. 1792-93.

## ३ मुलकी खातें.

### ( ब ) साऱ्याचा वसूल, सूट व हप्तेबंदी.

७२२–( २७ ) गोपाळराव भगवंत कमाविसदार परगणे इंदापूर, यांचे नांवें सनद कीं, परगणे मजकूर येथील खरीफ व रबीचें पीक आफ्तीमुळें गेलें; त्याची पाहणी सरकारांतून करून, त्या अन्वयें वसूल घ्यावा, ह्मणोन परगणे मजकूर येथील पाटील परस्थळीं टेंभुर्णीस गेले आहेत, त्यांस आणून, शेताची पाहणी करून, वसूल चालीस लागला पाहिजे, ह्मणोन तुह्मीं विनंतिपत्र लिहिलें; त्यास गांवगन्ना तुह्मीं हिंडून, शेतचें शेत पाहून आफ्तीमुळें पीक गेलें असेल, त्याचा अजमास करून, तितका ऐवज तकूब ठेऊन रयतीस दमदिलासा देऊन, बाकीचा ऐवज बेहड्याप्रमाणें वसूल घेणें. तकूबचा आकार होईल तो हुजूर लेहून पाठवणें, त्याचा फडशा हुजूर होईल. वसुलाची ढील न करणें. सदरहू लिहिल्याअन्वयें चौकशी केल्यास विशेष तोटा येणार नाहीं ह्मणोन. छ. ३ सवाल. सनद १.

अर्बा सबैन मया व अलफ जिल्काद ३०

रसानगी यादी.

७२३–( ५२७ ) तर्फ नागोठणें, व तर्फ अष्टमी, व तर्फ सिही महाल, तर्फ अवचितगड येथील जमीदार हुजूर पुरंदरचे मुक्कामीं येऊन अर्ज केला कीं, दुतर्फा मामलेदारांचा तर्फ मजकूरचे रयतीस नवीन उपसर्ग लागतो, याजमुळें रयत तजावजा होऊन मुलकाची आबादी होत नाहीं, येविशींचा बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे ह्मणोन; त्याजवरून मनास आणून हुजूरून बंदोबस्त करून दिल्हा असे, त्याप्रमाणें दुतर्फा मामलेदारांनीं चालावें कलमें बीतपशील.

समान सबैन मया व अलफ सफर ८

---

## III LAND REVENUE AND ITS ADMINISTRATION.

### ( B ) Recovery, remission, and postponement of revenue.

( 722 ) Gopáḷrao Bhagwant Kamávisdár of Pargaṇá Indápur represented that, owing to drought, the Kharip and the Rabi crops had failed. He was directed to visit the villages and make a field to field inspection, to suspend the collection of the revenue where the crops had failed, and to encourage the rayats. He was ordered not to be remiss in collecting the rest of the revenue, according to the Behedá. It was ordered that if careful inspection was made, much loss of revenue would not result.

A. D. 1773-74.

( 723 ) At the request of Jamidárs of Tarf Nágoṭṇe, Ashṭami, and Sihi Mahál in T. Awachitgaḍ, in which a Mámlatdár of Government and a Mámlatdár of Sudhágaḍkar had concurrent jurisdiction, the following instructions were issued.

A. D. 1777-78.

गल्लेपट्टीचा वसूल मागील शिरस्ता मार्गशीर्ष, पौष, माघमासीं घेत होते. अलीकडे गैरहंगामीं वसूल रयतीस लावितात, यामुळें भारी पडतें. भातावर रुपये दर खंडीस आठ नऊ घेऊन द्यावे लागतात ह्मणोन, त्यास मार्गशीर्ष, पौष दोन महिन्यांमध्यें पैसा वसूल घेत जाणें. अगोदर न घेणें. कलम १.

किल्याच्या नेमणुका आलीकडे जाजती पडतात. डोईओझ्यानें किल्यास भात न्यावयासी भारी पडतें, याजमुळें रयतीस शेतकीचा खप होत नाहीं; ऐशास किल्याचे बेगमीस गल्ला त्रिंबक विनायक याचे कारकीर्दीप्रमाणें रयतीकडून पोहचाऊन घेणें. जाजती न घेणें. कलम १.

घरटिपेस तितर्फा कारकून मुलकांत जातात, त्यांस शिध्याचा खर्च खोत पाटील दरघरास एक पैसा, व अच्छेर तांदूळ जमा करून शिधा द्यावा, ऐसी चाल असोन,

चवथाई गल्याचे तसरे दर खंडीस रुपये पंधराप्रमाणें द्यावे लागतात. मागील चाल वसुलाची, फाल्गुन, चैत्र, वैशाख पावेतों घेत होते. हल्लीं गैर हंगामीं वसूल लावितात, याजमुळें दर खंडीस दहा अकरा रुपये घेऊन द्यावे लागतात, याकरितां रयतीस भारी पडतें, त्यास पौष वद्यापासून अखेर सालपावेतों हप्तेबंदीप्रमाणें वसूल घेत जाणें. कलम १.

घरटिपेचा वसूल गैर हंगामीं दुतर्फा लागतो, यामुळें रयेतीस भारी पडतें, त्यास आश्विनमासीं वसूल घरटिपेचा घेत जाणें. अगोदर न घेणें. कलम १.

बारीक तांदूळ सरकारांत घेतात, त्याची सवाई रयतीस मजुरा देतात, अशी चाल आहे, त्यास आलीकडे तांदूळ घेतात, त्यास सवाई मजुरा देत नाहीं ह्मणोन; ऐशियास बारीक तांदूळ घेऊं नये. घेतल्यास सवाई प्रमाणें मजुरा देत जाणें. कलम १.

1 The revenue in kind was formerly recovered in the months of Márgashirsh, Poush, and Mágh. The Mámlatdárs now made demands for the same in other months. The rayats had consequently to suffer. The recovery should therefore be made in the months of Márgashirsh and Poush alone.

1 Similarly the cash payment to be made by the rayat for a quarter of his rent in kind, at Rs. 15 per khandi, was ordered to be recovered in instalments from the latter half of Poush to the end of the year.

1 The rayats were required to take rice on their head to the fort. This imposed a good deal of trouble on the rayats and interfered with their pursuits. It was ordered that the rayats should be called upon to take to the fort only so much rice as was actually required for the support of persons in the fort.

1 House-tax should be recovered in Ashwin and not before.

आलीकडे कारकून दर घरास जेवणाचे ऐवजीं अडीच तीन आणे घेतात, यामुळें रयतीस भारी पडतें ह्मणोन; ऐशास पोटखर्च ज्या गावीं कारकून वस्तीस राहतील त्या गांवापासून घ्यावा. नक्त व पोटगी सारे गांवापासून घेऊं न देणें. कलम १.

गांवगन्ना महारास राबणूक पडत्ये, त्यास पहिली चाल, सालांत दोन आठवडे राबणूक घेऊन, पोटास शेर द्यावा, ऐसी चाल होती. हल्लीं राबणूक भारी पडते, व पोटास शेरही देत नाहीं, याजमुळें कितेक गांवचे महार परागंदा जाले आहेत ह्मणोन; ऐशास राबते माहार पंधरा दिवस सालीना राबऊन पोटास देणें. जाजती न घेणें. कलम १.

तर्फ मजकुरीं कारसाई व वेठ बिगार वगैरे शिरस्ते, व खंड गुन्हेगारीचा ठराव जमीदाराचे विद्यमानें जीवन माफक होई. आलीकडे होत नाहीं, यामुळें दुतर्फा मामलेदारांचा कजिया होऊन कलह वाढतो. आमची व कुळांची छळणूक होत्ये ह्मणोन; त्यास तुह्मी जमीदाराचे विद्यमानें घेणें. जाजती जलेल न करणें. कलम १.

पेंढा दर खंडीस पन्नास घ्यावयाचा शिरस्ता पहिल्यापासून चालत आहे, त्यास आलीकडे बेमोईन घेतात. शिरस्तेप्रमाणें घेतल्यास भारी पडणार नाहीं ह्मणोन; त्यास सुदामतप्रमाणें पेंढा घ्यावा, जाजती घेऊं नये. कलम १.

जमीदारास पेंढापाल पडत होता, त्यास आलीकडे दोन वर्षें पाल पडत नाहीं; ह्मणोन; त्यास त्रिंबक विनायक याचे कारकीर्दीचे चालीप्रमाणें घेणें. जाजती न घेणें. कलम १.

तर्फ मजकूरची रयत बैल व टोणगे वहायास घेतात. व मोहतर्फी खूम उदमास घेतात, व गौळी खूम ह्मैसी कोण्ही घेतात. त्यास कैलासवासी आपासाहेब यांणीं तह करून दिल्हा आहे कीं, सदरहूस जकात माफ, असें असतां सांप्रत जकातदार जकातीचा तगादा करितात ह्मणोन; त्यास तीन वर्षांपूर्वील चाल असेल त्यांप्रमाणें चालवणें. नवीन करूं न देणें. कलम १.

---

1 Kárkuns of Government, the Sudhágaḍkar, and the Ángriá, visiting the villages for the purpose of enumerating houses, levied from the owner of each house $2\frac{1}{2}$ or 3 annas on account of food expenses, while formerly every house-owner in the village, where a kárkun halted, had to pay to the Khot, for the kárkun's food charges, one pice and half a seer of rice only. The former practice should be adhered to.

1 Rice of a fine quality should not be collected as revenue. If this be done, a deduction of $\frac{1}{4}$ the quantity due should be allowed in consideration of its superior quality.

1 Rice-straw should be levied at the rate of 50 bundles per khandi of rice.

एकूण कलमें अकरा सदरहू लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें, नवीन उपद्रव रयतीस एकंदर न देणें. येविशीं सुधागडकरी यांसही ताकीद करून सदरहूप्रमाणें वर्तवणें ह्मणोन, कृष्णाजी रामचंद्र यांस. पत्र १.

येविशीं आत्माराम रघुनाथ तर्फ सुधागड यांस. पत्र १.

२

चिटणिसी.

७२४–( ५२८ ) कृष्णराव बळवंत यांची स्वारी कर्नाटकांत सन मजकुरीं जात होती, तेव्हां मौजे जेजुरी तर्फ करेपठार, प्रांत पुणें, येथें फौजसुद्धां मुकाम होता, त्यास सरकारच्या कारखान्यास दाणा, रतीब व वैरण मौजे मजकुराकडून पावले आहेत, मजुरा देणें, त्याप्रमाणें तुह्मांस हिशेबीं मजुरा पडेल ह्मणोन, रामचंद्र नारायण यांस. सनद १.

समान सबैन मया व अलफ सफर १६

परवानगी रूबरू.

७२५–( ५५० ) परगणे लोहोनेर व खारी वेलूरपाले येथील सालमजकूरचा ऐवज तालुके धोडपचे बेहेड्यास लाऊन दिल्हा, त्याप्रमाणें तुह्मांस वरात दिल्ही आहे, त्यास महालीं रबीचे पिकास व अफूस धक्का बसला, यास्तव कमी येईल ह्मणोन, वासुदेव नारायण व जगदीश वेंकटेश

समान सबैन मया व अलफ रबिलावल २२

1 The Mahárs were formerly required to render menial service for two weeks only in this (the) year; and during this period they received some corn for their maintenance. Service for a longer period was now demanded from them, while even the usual allowance was not paid to them. The Mahárs had consequently absconded from the villages. The old practice should be followed.

1 The requisition for forced service should be made through the Jamidárs. Fines &c. should also be inflicted with their cognizance.

( 724 ) Krishṇarao Balwant, while proceeding with an army to Karnátic in the current year, encamped at Jejuri. A set off was allowed to the villagers in the revenue-demand for the provisions supplied to him.

A. D. 1777-78.

( 725 ) This Sanad shows that poppy was cultivated in Pargaṇá Lohoner and Khári Welurpále.

A. D. 1777-78.

कमाविसदार परगणे मजकूर यांणीं हुजूर विनंति केली; त्याजवरून परगणे मजकूरचा ऐवज सालगुदस्तां तालुके मजकुराकडे देविला आहे, त्याप्रमाणें सालमजकुरीं रुपये ४०००० चाळीस हजार तूर्त देविले असत, तरी सालमजकूरचे ऐवजीं ऐवज पावला असेल तो वजा करून बाकी ऐवज राहिला असेल तो घेणें. पुढें सरसुभेदार जमाबंदी ठरावितील त्यांत पावला ऐवज वजा करून बाकी राहील तो मग घेणें ह्मणोन, बाजीराव आपाजी यांचे नांवें.

सनद १.

येविशीं सर्वोत्तम शंकर यांस सनद कीं, सदरहू महालीं तुह्मी जाऊन, चौकशीनें जमाबंदी करून, त्यापैकीं महाल मजकूर वगैरे नेहमीं खर्च वजा करून बाकी राहील तो ऐवज धोडपेकडे देवणें ह्मणोन. १

---

२

७२६–( ६५७ ) गोविंदराम कमाविसदार प्रांत कल्याण भिंवडी यांचे नांवें

समानीन चिटणिसी. पत्रें.
मया व अलफ
जिल्हेज ७

१ प्रांत कल्याण भिंवडी येथील पाहणी बाजीराव रामचंद्र यांणीं सन समान सबैनांत करून सरसुभा समजाविलें कीं, पाहणीप्रमाणें उगवणी होणार नाहीं, यास्तव रयतीस मोघम सूट द्यावी, त्याजवरून महालावर मोघम सूट देऊन सालबंदी लाऊन दिल्ही, त्यास सूट दिल्ह्याप्रमाणें रयतीस मजुरा पडली, किंवा दर मापानें खोताकडे राहिली. ते व आणखी कितेक कलमें पाहणीसंमंधें वगैरे अंतस्थ घेऊन सरकार नुकसानी केली असेल ते व, परभारें मनस्वी रयतीवर पट्या करून, हरतऱ्हेनें ऐवज साधून, दरम्याने महालकरी वगैरे यांणीं घेतला असेल, त्याची चौकशी पुरतेपणें कळेल तशी वाजवीचे रुईनें करून सदरील अन्वयें ज्याजकडे ऐवज लागू होईल त्याजपासून रूरयात न धरितां वसूल घेऊन ऐवज प्रांत मजकूरचे हिशेबीं जमा करणें ह्मणोन. पत्र.

---

( 726 ) The Kamávisdár of Educ Prânt Kalyán Bhiwandi represented to

A. D. 1779-80. the Sar Subhá in Samán Sabain that the revenue fixed after inspection could not be realized, and recommended that remissions be granted. The recommendation was accepted. The new Kamávisdâr Govindrao Rám was now directed to make inquiries on the following points.

1 Whether the rayats received the remission, or whether the amounts were appropriated by the Khots.

१ कुंभाराचीं वधुवरें घोड्यावर बसऊन वरात मिरवूं नये. येविशीं कासार, सुतार, यांचा व कुंभारांचा कजिया होता, तो सरकारांतून मनास आणून कुंभाराचीं नवरानवरी घोड्यावर बसवावीं याप्रमाणें ठरलें, सबब कुंभारापासून नजरेचा ऐवज एकसाला सरकारांत घेतला, त्याप्रमाणें प्रांत मजकूर येथील कुंभारावर हुजुरून वरात जाली आहे, त्यास तेथील कुंभार गरीब, व दोन चार वर्षें प्रांतांत दंगा जाला, याजमुळें कांहीं परागंदा जाले, कांहीं आहेत ते खराब, याजकरितां येविशीं आज्ञा जाली पाहिजे, ह्मणोन तुम्हांकडील कारकुनांनीं हुजूर विदित केलें; त्याजवरून हें पत्र सादर केलें असे, तरी मुलुक शिरस्तेप्रमाणें नजरेचा ऐवज घेणें ह्मणोन. पत्र.

७२७–( ६६० ) मौजे मजकूरचे पाटिलांनीं हुजूर येऊन अर्ज केला कीं, मौजे मजकुरावर वालुसरा पडोन पिकें गेलीं, याजकरितां सरकारांतून नजर मोजब्यास कारकून देऊन भोंवरगांवचा पडोसा पाहून पिकें गेलियाची चौकशी केली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून गोविंद लक्ष्मण कारकून शिलेदार यांस सरकारांतून नजर मोजब्यास पाठविले असेत, तरी हे व तुह्मीं मिळोन भोंवरगांवचा पडोसा पाहून पिकें गेल्याची चौकशी करून, कुळारगवार समजूत पाडून जाबता आकारून, मशारनिल्हे बरोबर हुजूर पाठऊन देणें ह्मणोन, धोंडो केशव कमाविसदार मौजे पाडळी, संमत कोरेगांव, प्रांत वाई यांचे नांवें. सनद १.

समानीन
मया व अलफ
जिल्हेज १६

रसानगी यादी.

७२८–( ७०६ ) महादाजी धोंडदेव साठये कुळकर्णी पेठ बाजार, माखजन, तर्फ संगमेश्वर, तालुके रत्नागिरी यांणीं हुजूर विदित केलें कीं, सालगुदस्तां बाळाजी गोपाळ थोरात, वस्ती पेठ मजकूर याणें सरकारांत समजाविलें कीं, गोविंद बल्लाळ साठये कुळकर्णी, पेठ मजकूर यांणीं आपले

इसन्ने समानीन
मया व अलफ
साबान ९

---

1 Whether the officers who made the inspection received bribes and thereby caused loss in the public revenue; whether the officers of the Mahál unauthorizedly levied extra cesses on the rayats for their use. He was further directed, in case any wrongful misappropriations were discovered, to recover the amount misappropriated from the person concerned.

( 727 ) At the request of the Pátil of Pádaḷi, a kárkun was sent to make a rough inspection of the crops of the village, which were alleged to have been damaged and the Kamávisdár was directed to report the result of his inspection.

A. D. 1779-80.

( 728 ) Báḷáji Gopál Thorát complained that Govind Balláḷ Sáthaye Kuḷkarni of Peth Bájár, Mákhjan, in Tarf Sangameshwar in Táluká Ratnágiri caused a peon to torture

A. D. 1781-82.

लेकास सरकारचे बाकीकरितां प्याद्याकडून नाशिकास चाप लाविले, असें समजाऊन आपणांस पंचवीस रुपये मसाला करून हुजूर आणिलें, व रत्नागिरीचा कारकून साक्षीस होता, त्यांची साक्षी सुभाचीं बखरें आणविली, त्यावरून मनास आणितां पंचाइत मतें ठरलें कीं, कुळकर्णी यांणीं बाकीची पटी सरकारचे प्याद्याजवळ करून दिल्ही, चाप तों प्याद्याजवळ नवतेच. प्याद्यांनीं थोराताचे मुलास कोइंडी लाविली. ती कुळकर्णी यांणीं लावावयास सांगितली नाहीं; परंतु कोइंडी ज्या समई प्याद्यानें लाविली, तेव्हां कुळकर्णी जवळ होते, आणि सोडविलें नाहीं, हा दोष ठेऊन कुळकर्णी व आपली असामी रत्नागिरीस होती ते जफ्त करून कुळकर्णाचें उत्पन्न व मुशाहिरा व असामीचें वेतन सरकारांत जमा करणें ह्मणोन, सुभा सनद जाऊन जफ्ती जाली आहे. ते मोकळी करावयाची आज्ञा जाली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून हें पत्र सादर केलें असे, तरी पेठ मजकूरचें कुलकर्ण व कुळकर्णियाची असामी थोराताचे कजियाकरितां सरकारांत जफ्त केली होती, ती हल्लीं रदबदलीमुळें मोकळी केली असे, तरी कुळकर्णाचे वतनाची व असामीची जफ्ती मोकळी करून पूर्ववत्प्रमाणें कुळकर्णाचें व असामीचें कामकाज घेऊन, असामीचें वेतन सालमजकुरापासून देत जाणें ह्मणोन, महिपतराव कृष्ण तालुके मजकूर यांचे नांवें चिटणिसी.पत्र १.

७२९-( ७२९ ) रामचंद्र पवार यांणीं हुजूर विदित केलें कीं, परगणे बाहाळ व परगणे बोरनार येथील जहागीर आपल्याकडे सरंजामास सरकारांतून आहे, व सरदेशमुखी परगणे बाहाळ येथील महादाजी निळकंठ यांजकडे आहे, त्यास पेशजीं परगणे मजकूरची खंडणी एकेजागा जहागीरदाराचे कचेरींत होऊन तहशील परभारें अंमलदार करीत होते, याजमुळें गांवगन्ना खर्च

इसन्ने समानीन मया व अलफ जिल्काद १८

Báláji's son with an instrument of torture called ( châp ) for the recovery of Government revenue. Mahádji Dhondeo Sáthaye ( Báláji's relative ) was called to the Huzur, and an inquiry was made. It was found that another kind of torture called ( Koindi ) and not the one complained of was inflicted by the peon, and that the Kulkarni though present at the time did not interfere. The Kulkarna Watan and the emoluments of the office of kárkoon which Mahádji held was therefore attached. The attachment was through intercession now removed.

( 729 ) It was found that the system of collecting revenue separately by the different Amaldàrs besides being expensive led to oppression. The late Peshwá Mádhavráosáheb therefore issued orders to the effect that the collections should be received in one place at the office of the Jahágirdár and should then be distributed among themselves by the several Amaldárs. Rámchandra Powár, the Jahágirdár of Parganá Báhál and Bornár, represented that

A. D. 1781-82.

पडोन, माहालची खराबी होत होती, याजकरितां कैलासवासी माधवरावसाहेब यांणीं तह करून देऊन पत्रें करून दिल्हीं कीं, जाहगीरदाराचे कचेरींत एक जागा वसूल अमलदारांनीं हिसेरसीद ऐवज घ्यावा, याप्रमाणें चालत असतां सरदेशमुख यांणीं सन अर्बा सबैनांत दादासाहेब यांस गैरवाका समजाऊन पत्रें आणून सदरील तह मोडून, महालीं निराळी तहसील करूं लागले, याजमुळें महालची खराबी होऊन लावणी कमी होऊं लागली, याजकरितां पेशजीं कैलासवासी माधवरावसाहेब याणीं तह करून दिल्हा आहे, त्याप्रमाणें एकेजागा जहागीरदाराचे कचेरीस तहशील होऊन हिसा सर्वत्रांनीं घ्यावा, येविशीं ताकीद जाहली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, तरी तीर्थस्वरूप कैलासवासी रावसाहेब यांणीं पेशजीं पत्रें करून दिल्हीं आहेत, त्याप्रमाणें तुह्मीं हरदू महालाचे अमलदारांस व जमीदारांस ताकीद करून जहागीरदाराचे कचेरीस एकेजागा तहसील होऊन हिसेरसीद ऐवज जहागीरदार, मुकासी व बाबतीवाले, व सरदेशमुख घेत तें करणें. तीर्थस्वरूप कैलासवासी रावसाहेब यांचे पत्राप्रमाणें वहिवाट करवणें ह्मणोन, नारो कृष्ण सरसुभा, प्रांत खानदेश यांस चिटणिसी. पत्र १.

सदरील अन्वयें तहविशीं. पत्रें ८.

४ परगणे बहाळ येथील तहाविशीं.

१ जमीदार परगणे मजकूर यांस.

१ रामाजी महादेव कमाविसदार, मुकासा जफ्ती सोमवंशी परगणे मजकूर यांस.

१ बाळजी भोसले यांजकडे मुकाशापैकीं हिसा आहे त्याविशीं.

४

३ परगणे बोरनार येथील तहविशीं.

१ जमीदार परगणे मजकूर यांस.

१ सुलतानजी धायभर यांजकडे मुकासा आहे त्याजविशीं.

१ जनार्दन गोपाळ कमाविसदार बाबती सरदेशमुखी पैकीं मजकूर यांस.

३

---

these orders were, on a misrepresentation by Mahádaji Nilkanth the holder of the Sardeshmukhi amal, revoked by Dádásáheb, that this revocation had resulted in a decrease of cultivation, and that revenue had suffered. He therefore prayed that the previous orders be again enforced. His prayer was granted.

१ रामचंद्र पवार यांस पत्र कीं, सदरील तहप्रमाणें वहिवाट करीत जाणें ह्मणोन.

८ ९

नऊ चिटणिसी पत्रें दिल्हीं असेत.

७३०–( ७९३ ) परगणे बोरनार येथील बाबती व सरदेशमुखीचा अमल सरकारांतून जनार्दन गोपाळ यांजकडे आहे, त्यास महालाची जमाबंदी एकेजागां होऊन वांटणी जमीदारांनीं करावी; आणि परभारी ज्यांची त्यांणीं तहसील करावी, असें असतां तुह्मीं कचेरीस हिसा देतां, ह्मणोन हुजूर विदित जाहलें; त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, तरी पेशजींप्रमाणें ज्यांचा हिसा ते परभारी तहशील करितील, त्यास तुह्मीं दिक्कत न करणें ह्मणोन, रामचंद्र पवार यांचे नांवें. पत्र १.

सलास समानीन मया व अलफ जमादिलावल २७

येविशीं जमीदार परगणे मजकूर यांस पत्र कीं, तुह्मीं मशारनिल्हेसीं रुजू होऊन बाबती सरदेशमुखीचे अमलाचा वसूल यांजकडे सुरळीत देणें ह्मणोन. पत्र १.

२

चिटणिसी.

( या सनदेंतील हुकूम मागच्या सनदेंतील हुकुमाच्या अगदीं उलट आहे. )

७३१–( ८४८ ) मौजे कुरकवाडें तर्फ चिकणें, परगणें नंदुरबार, हा गांव बदलोन जमाबंदीचा पैका देत नाहीं, त्याचे पारिपत्यास वामनाजी हरी कमाविसदार परगणे मजकूर, दिंमत तुकोजी होळकर, हे गेले असतां गांवकरी यांणीं गोळी वाजऊन घोडीं माणसें जाया केलीं, तोफा खेरीज पारिपत्य होत नाहीं, यास्तव कुकरमुंढेपैकीं तोफा देवाव्या ह्मणोन वामनाजी हरी यांणीं लिहिलें; त्याजवरून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी ठाणें ध्यावयास कुकरमुंढें

खमस समानीन मया व अलफ साबान ३

( 730 ) The practice in Parganá Bornár was for the Jamidárs to do the Jamábandi of the revenues of the Mahál and to settle the amounts due to the several Amaldárs. The collections were then to be made by each Amaldár separately. The Jahágirdár of the Parganá, however, collected himself the amount due to Government on account of certain Amals, and paid it to their Kamávisdár. He was directed to conform to the old practice. ( This is at variance with the order contained in the preceding entry. )

A. D. 1782-83.

( 731 ) The villagers of Kurakwáḍe in Tarf Chikaṇ in Parganá Nandurbár revolted and refused to pay Government revenue. Wámnáji Hari, the Kamávisdár of Tukoji

A. D. 1784-85.

पैकीं तोफा २ दोन दारू गोळे सरंजामसुद्धां, व शंभर माणूस मशारनिल्हेकडे कुमकेस देविलें असे, तर देऊन दारूगोळ्याची किंमत व तोफांस खर्च लागेल तो मशारनिल्हेपासून घेणें. ठाणें हस्तगत जालियावर तोफा व माणूस कुकरमुंढेंयास नेणें ह्मणोन, नारायणराव यादव तर्फ कुकरमुंढें यांस. सनद १.

रसानगी यादी.

७३२–( ९६५ ) कृष्णराव गंगाधर यांचे नांवें सनद कीं, तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. परगणा नाशिक येथें सालमजकुरीं मघांचा पर्जन्य पडला, अलीकडे आजपावेतों पर्जन्य नाहीं, ब्राह्मण अनुष्ठानास लाविले आहेत, महर्गता बहुत जाहली, आफ्तीमुळें रयतीस आधार नाहीं. साल गुदस्तांचे जमा वसूल होऊन बाकीचा वसूल घ्यावयाचा त्यास खरीफाचें पीक गेलें आहे. याजकरितां आफ्तीची चौकशी करावयाविशीं आज्ञा जाहली पाहिजे ह्मणोन लिहिलें; त्यास परगणा मजकूर येथील आफ्तीची चौकशी करावयाविशीं सर्वोत्तम शंकर यांस आज्ञा केली असे, तरी त्यांजकडील कारकून, व तुह्मीं मिळोन गांवगन्ना कुळारगवार आफ्तीची चौकशी करून, जावता हुजूर पाठवणें. समजोन फडशा केला जाईल ह्मणोन. सनद १.

समान समानीन मया व अलफ रबिलावल १८

परवानगी रूबरू.

---

Ho!kar, proceeded against them, but the villagers took to arms, and repulsed him with loss. Two cannon-pieces and 100 men were therefore lent to assist him in reducing the village to submission.

( 732 ) Krishṇarao Gangádhar reported that there was a scarcity of rain in Pargaṇá Násik in this year, that Brahmins were engaged in invoking the deity for rain, that grain had become very dear, and that the rayats could hold out no longer. He asked permission to inquire into the extent of the scarcity, ( in order that the revenue collectors might be regulated accordingly ). Sarwottam Shankar was directed to make the investigation.

A. D. 1787-88.

# ३ मुलकी खातें.

## (क) शेतकीस उत्तेजन.

### (१) तगाई.

७३३-(२०४) परगणे सरभुवन, प्रांत गुजराथ, हा महाल फौजेचे पायमल्लीनें खराब जाहला, रयतेचीं घरेंदारें जळालीं, लावणी होत नाहीं, ह्मणोन हुजूर विदित जाहलें; त्यावरून हे सनद सादर केली असे, तरी परगणे मजकूरचे रयतीस तगाई देऊन महालची लावणी करणें, मामलतीची घालमेल जाहल्यास तुमचा ऐवज तगाईचा होईल तो व्याजसुद्धां ज्याकडे मामलत होईल त्याजकडून देविला जाईल ह्मणोन, चिंतामण हरी यांस. सनद १.

सबा सबैन मया व अलफ जमादिलावल ८

परवानगी रूबरू.

७३४-(६७३) घनश्याम त्रिंबक यांचे नांवें सनद कीं, तुह्मीं विनंतिपत्रें पाठविलीं तीं पावलीं, त्याचे जाबसाल येणेंप्रमाणें.

समानीन मया व अलफ रबिलावल १०

बापूजी होळकर हिंदुस्थानांतून देशीं येतां, व तुकोजी होळकर, व महादजी शिंदे गुजराथेंत जातां, महालोमहालीं मुक्काम करून घासदाणा वगैरे ऐवज घेतला, त्याची याद पाठविली ती पावली, त्यास पायमाली फौजे-

---

# III LAND REVENUE AND ITS ADMINISTRATION.

## (C) Encouragement to Cultivation.

### (1) Tagái.

(733) The Parganá of Sarbhuwan in Gujerath having suffered by the inroads of armies, the area of cultivation decreased. Orders were therefore issued to the Mámlatdár to encourage cultivation by making Tagái grants to the rayats.

A. D. 1776-77.

(734) Bápuji Hoḷkar while returning from Hindustán and Tukoji Hoḷkar and Mahádaji Scindia while proceeding to Gujerath levied Ghásdáṇá from the Maháls through which they passed. Ghanashám Trimbak informed Government of this fact. He was asked to report after inquiry and in consultation with the Sar Subhedár the loss sustained by the rayats on account of the movements of the army. He further informed Government that owing to 4 halts of the Hoḷkar and Scindia in Parganá Ner, the Parganá was pillaged and was lying desolate, and the rayats had absconded. He was directed to give letters of assurances to the rayats, Pátils, and Jamidárs, to grant Tagái, and to see that cultivation prospered.

A. D. 1779-80.

मुळें जाहली त्याची वगैरे चौकशी सरसुभाचे विद्यमानें करून लेहून पाठवणें, व पेस्तर लावणीचा बंदोबस्त करणें. कलम १.

परगणा नेर येथें होळकर व शिंदे यांचे मुक्काम चार होऊन परगणा लुटून बेचिराख केला, घरें मोडून नेलीं; यामुळे रयत परागंदा जाहली आहे, त्यास रयतीस व मोकदमांस व जमीदार यांस अभयपत्र व तगाई पेस्तर लावणीबद्दल द्यावयाकरितां आह्मांस खातरजमेचें पत्र द्यावयाची आज्ञा जाहली पाहिजे ह्मणोन लिहिलें; त्यास रयतीस व मोकदमांस व जमीदारांस अभयपत्रें, व तगाईविशीं तुह्मांस अलाहिदा पत्रें सादर आहेत, तरी तुह्मी दिलभरंवसा देऊन परगणा मजकूरची आबादी करणें. कलम १.

७३५–( १०८२ ) परगणे नेवासें वगैरे महाल येथील रयत साल गुदस्तां आप्तीमुळें परागंदा होऊन, खानदेश व वऱ्हाड प्रांतें गेली, व कांहीं गांवीं राहिली, त्यांचे बैल गुरें मयत जाहलीं; त्यास महालची लावणी जाहली पाहिजे याजकरितां रयतेचें बोलणें कीं, इस्ताव्याचें भरसाल, त्याप्रमाणें लावणी होत नाहीं, सबब कमती कौल करून द्यावा, व तगाई पोटगी द्यावी, ह्मणजे लावणीचा बंदोबस्त होऊन रयत मुलकावर गेली आहे, ते आणून आबादी करूं, येविशीं बोलण्यास दहा पांच गांवचे पाटील पुण्यास आले होते, त्यांची खातरजमा केली कीं, सरकारांत विनंति करून कौल व तगाईचा बंदोबस्त करून घेतों, याप्रमाणें त्यांस सांगोन महालीं रवाना केलें. येविशीं कौल व तगाई द्यावयाची आज्ञा जाहली पाहिजे ह्मणोन तुह्मीं विनंति लिहिली; ऐशास सुभाऊन चौकशी करून रयतेस कौल देऊन लावणीचा बंदोबस्त राखणें; व तगाई कार्याकारण पाहोन, तुह्मी रयतेस देऊन, तो ऐवज हंगामी त्यांजकडून वसूल करून घेणें ह्मणोन, मोरो हरी, दिंमत रामचंद्र नारायण यांचे नांवें छ. १७ जिल्हेज. सनद १.

अर्बा तिसेन मया व अलफ मोहरम १४

रसानगी, त्रिंबक नारायण परचुरे कारकून निसबत दफ्तर.

---

( 735 ) Some of the rayats of Pargaṇá Newáse &c. left their homes in the preceding year owing to scarcity, and went to Khándesh and Berárs. Those who remained lost their cattle. The Páṭils of several villages therefore came to Poona and requested Moro Hari in the service of Rámchandra Náráyaṇ that unless kowls were granted reducing the assessment, and unless Tagái was given, the village-lands could not be brought under cultivation. Moro represented the matter to Government. The concession asked for was allowed to be granted.

A. D. 1793-94.

# ३ मुलकी खातें.

## ( क ) शेतकीस उत्तेजन.

### ( २ ) पडीत जमिनीच्या लागवडीकरितां व बागाईत वाढविण्याकरितां विशेष प्रकारची सवलत.

### नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

७३६--( ७४ ) विरेश्वर हरी कमाविसदार, कसबे नारायणगांव, प्रांत जुन्नर यांचे नांवें सनद कीं, कसबे मजकूर येथील धरण सन सलास सबैनांत नदीस पाणी येऊन फुटलें, याजमुळें बागाईत पडलें, सबब साल-मजकुरीं धरणाचे कामाबद्दल पांच हजार रुपये द्यावयाची नेमणूक केली असे, तरी पाया पक्का घालून वरचें काम व्हावयास दिवसगत लागेल, सबब पाया जाहल्यावर दगड माती लांकडें वगैरे लाऊन, पाणी तुंबऊन, पाट चालता करून, बागाईत पेशजींप्रमाणें करणें. गांवचा ऐवज तूर्त वसूल यावयाचा नाहीं, सबब हुजुरून सदरहू पांच हजार रुपये द्यावयाचे, करार केला असे, तरी ऐवज घेऊन धरणाचें काम चौकशीनें करणें, ह्मणोन. छ. २४ जमादिलावल. सनद १.

खमस सबैन
मया व अलफ
जमादिलाखर २९

रसानगी यादी.

७३७–( ९५ ) तालुके अंजणवेल येथें पेशजीं बागाईत होतें, आलीकडे पीक कमी जाहलें, सरकारदस्त भारी पडतो, येणेंकरून रयत नाउमेद होऊन सालेसाल बागाईत कमी होतें, त्यास स्वामींनीं कृपाळु होऊन नक्की शिरस्ता व माफीचा कौल कांहीं सईल करून दिल्हियास रयत उ-

खमस सबैन
मया व अलफ
साबान ६

---

# III LAND REVENUE AND ITS ADMINISTRATION.

## ( C ) Encouragements to cultivators

### ( 2 ) Special concessions for the cultivation of waste tracts and the spread of irrigation, Kowls &c.

### FROM NÂRO APPÂJI'S DIARY.

( 736 ) A dam at Náráyaṇgaon in Muant Junner having been washed away in A. D. 1772–73, no Bágáyat crops could be grown. Sanction was given to the construction of a solid dam at a cost of Rs. 5,000.

A. D. 1774-75.

( 737 ) At the request of Náro Anant Parchure, Mahájan of Guhágar, the following terms were offered for the encouragement of cultivation in Táluká Anjaṇwel.

A. D. 1774-75.

मेदवार होऊन कीर्द करील; व दगड सडा आहे त्ये जागा झाडें व गवत कांहींच होत नाहीं, तेथें बाहेरून माती आणून घालून, नूतन जमीन शेत होये; व डोंगरांतील दगड फोडून वोढा नाला असेल त्यास माती घालून नूतन शेत होय ऐसें करावयास रयत उमेदवार आहे, याकरितां जो कोणीं उमेद धरून, नूतन जमीन तयार करील, त्यापैकीं निमे राहील त्यास वीस वर्षें माफी होऊन पुढें कमधारा पांच वर्षें घेऊन मग शिरस्तेप्रमाणें धारा ध्यावयाचा करार करून दिल्हियास आबादी होईल, व दर्यागर्क खाजणी जमिनीस बांधबंदिस्त करून नूतन शेत होय ऐसें करावयास रयत उमेदवार आहे, याकरितां जो जमीन तयार करील, त्यास त्या जमिनीपैकीं चौथाई जमीन इनाम व बंदिस्तीस खर्च मेहनत लागेल, त्याचा अजमास पाहोन माफी सालें, व इस्ताव्याचा कौल दिल्यास नवसाध्य ठिकाणाची लावणी होऊन, कीर्द महामुरा होईल ह्मणोन, नारो अनंत परचुरे महाजन कसबे गुहागर यांणीं हुजूर किल्ले पुरंदर येथील मुक्कामीं येऊन विनंति केली; त्याजवरून मनास आणितां बागाइताची लावणी व नवसाध्य ठिकाणें जमिनीवर पूर्वीं शेतें जाहलीं नाहींत; व नवीन व्हावयास असाध्य ते जमिनीची कस्त मेहनत चांगली करून तेथें शेतें करितील, त्यांस कीर्द महामुरीवर नजर देऊन बागाइताची व नवसाध्य ठिकाणांची सदरीलप्रमाणें उस्तवारी करून बागाइताची लावणी व शेतें करितील, त्यास माफी व इस्तावा शिरस्ता येणेंप्रमाणें.

---

1 Should any person bring an entirely rocky ground under cultivation by covering it with earth, and by providing embankments around it, half the land shall be given to him in Inám, and the remaining half shall be continued rent-free for 20 years, and at reduced rates for 5 years more, and shall after that period be subjected to full assessment.

1 Should any person reclaim salt-land by providing embankments, one fourth of the land shall be given to him in Inám and the remaining portion shall be continued rent-free and at reduced rates, for such periods as upon a consideration of the money and labour spent, may seem fit.

1 Should any person plant the following trees, no tax shall be levied on their account for the number of years specified below.

| | |
|---|---|
| 1 Cocoanut trees | 18 or 20 years, |
| 1 Betel-nut trees | 15- Do— |
| 1 Undaṇi trees | 12- Do— |

After the lapse of the above period, the following levies shall be made.

1 For each cocoanut tree 0-4 Annas and a load of loppings,

तालुकियांत सडा आहे त्ये जागा बाहेरून माती आणून नूतन जमीन मेहनतीनें रयत करील, व डोंगरांतील दगड फोडून वोढा नाला असेल त्यास माती घालून नूतन शेत होय ऐसें करावयास रयत उमेदवार आहे, त्यास उमेद धरून जो करील त्यास त्या जमिनीपैकीं निमे जमीन इनाम देऊन बाकी निमे राहील त्यास माफीसालें वीस होऊन, पुढें पांच वर्षें कमधारा घेऊन, मग शिरस्तेप्रमाणें धारा ध्यावयाचा करार केला असे, तरी सुभाहून तकवियत कौल देऊन जमीन तयार करवणें, तयार जाहल्यावर मोजणी करून जावते लिहोन हुजूर पाठवीत जाणें, ते पाहून त्यापैकीं निमे जमिनीचीं इनामपत्रें हुजुरून करून दिल्हीं जातील. बाकी निमे जमीन राहील, त्याचा सदरीलप्रमाणें माफी सालें व कमधाऱ्याचा कौल पाठऊन, पुढें शिरस्तेप्रमाणें धारा घेत जाणें. कलम १.

तालुके मजकुरीं दर्यागर्क खाजणी जमिनीस बांधबंदिस्त करून नूतन शेत होय असें रयत उमेद धरून करील, त्यास त्या जमिनीपैकीं चौथाई जमीन इनाम देऊन, बाकी तीन तक्षिमा जमीन राहील त्यास माफी सालें, व इस्तावा खर्च मेहनतीचा अजमास पाहून, शिरस्तेप्रमाणें दर ध्यावयाचा करार केला असे, तरी बागाइताचा शिरस्ता लावणीचे सालापासून माफीसालें.

| नारळ माडास. | सुपारीस. |
|---|---|
| सालें. | सालें १५ |
| उमर व पुलणवट | उंडणीस सालें १२ |
| नारळ फड जमिनीस | तांबड जमिनीस |
| १८ | २० |

यासी माफी सालें भरल्यावर सरकार दस्त दरझाडास पटी बाबसुद्धां नक्त. रुपये.

| | |
|---|---|
| नारळ माडास दस्त. | सुपारीच्या झाडास रुपये ‌‌ |
| नारळ माडास रुपये ।. | |
| भंडार माडास रुपये १ | उंडणीच्या झाडास रुपये |
| झांप दर माडास सुमार १ | |

एकूण शिरस्ता माफीचा नारळ माडास उमर, व पुलणवट जमिनीस सालें अठरा व तांबड जमिनीस सालें वीस, व सुपारीस सालें पंधरा, व उंडणीस सालें बारा, येणेंप्रमाणें माफी सालें भरल्यावर दस्त दरसाल दर झाडास नारळ माडास पावला व भंडार माडास एक रुपया व सुपारीस एक आणा व उंडणीस तीन आणे पट्टी बाबसुद्धां, नक्त माडास ऐन जिन्नस झांप सुमार एक, याप्रमाणें करार केला असे, तरी श्रमसाहस करून बागाईत नवकीर्द करील, त्यास साल मजकुरापासोन सदरहूप्रमाणें सुभाहून कौल जे सालीना घेईल त्यास देऊन, बागाइ-

1 For each cocoanut tree used by Bhandáris Rupee 1–Do.
1 For each betelnut tree. 0–1
1 For each Undaṇi tree 0–3

सुभाहून तकवियत कौल देऊन जमीन तयार करवणें, तयार जाहल्यावर मोजणी करून जाबते लिहोन हुजूर पाठवीत जाणें. ते पाहून त्यापैकीं चौथाई जमिनीचीं इनामपत्रें हुजुरून दिल्हीं जातील. बाकी तीन तक्षिमा जमीन राहील, त्याचीं माफी सालें व इस्ताबियाचा कौल सुभाहून देऊन, पुढें शिरस्तेप्रमाणें धारा घेत जाणें.

कलम १.

ताची आबादी करऊन, सालेसाल बागाइत होईल, त्याचा झाडा हुजूर समजावीत जाणें. कलम १.

एकूण तीन कलमें करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी गांवगन्नाचे खोत वगैरे सुभा आणून सदरील प्रमाणें जमिनीची लागवड करवणें म्हणोन, कृष्णाजी विश्वनाथ यांचे नांवें.

सनद १.

मोकदमानी, व रयानी, तर्फ गुहागर वगैरे महालानिहाये यांस कीं, मेहनत करून जमिनीची लागवड व बागाइताची लावणी करणें, सदरहूप्रमाणें कौल पाठऊन उगवणी करून घेतली जाईल म्हणोन.

$\frac{१}{२}$

रसानगी यादी.

७३८–( १०९ ) तालुके सुवर्णदुर्ग येथें पेशजीं बागाईत होतें, आलीकडे पीक कमी जाहलें, सरकारदस्त भारी पडतो, येणेंकरून रयत नाउमेद होऊन सालेसाल बागाईत कमी होतें. त्यास स्वामींनीं कृपाळु होऊन नक्की शिरस्ता व माफीचा कौल कांहीं सहल करून दिल्यास रयत उमेदवार होऊन कीर्द करील, व दगड सडा आहे तो जागा झाडें व गवत कांहींच होत नाहीं. तेथें बाहेरून माती आणून घालून व डोंगरांतील दगड फोडून ओढा नाला असेल त्यास माती घालून नूतन शेत होय असें करावयास रयत उमेदवार आहे, याकरितां जो कोणी उमेद धरून नूतन जमीन तयार करील, त्यापैकीं निमे जमीन इनाम देऊन, बाकी निमे राहील त्यास वीस वर्षें माफी होऊन, पुढें कमधारा पांच वर्षें घेऊन, मग शिरस्तेप्रमाणें धारा घ्यावयाचा करार करून, दिल्हियास आबादी होईल; व दर्यागर्के खाजणी जमिनीस

खमस सबैन मया व अलफ रमजान १७

( 738 ) Concessions similar to those granted to the rayats of Táluká Anjanwel ( vide Sábán 6 of this year ) were granted to the inhabitants of Táluká Suvarṇadurg,

A. D. 1774-75,

बांधबंदिस्त करून नूतन शेत होय, असें करावयास रयत उमेदवार आहे, याकरितां जो जमीन तयार करील, त्यास त्या जमिनीपैकीं चवथाई जमीन इनाम, व बंदिस्तीस खर्च मेहनत लागेल त्याचा, आजमास पाहून माफी सालें व इस्ताव्याचा कौल दिल्यास नवसाध्य ठिकाणांची लावणी होऊन, कीर्द महामुरा होईल ह्मणोन, गोविंद केशव बिवलकर खोत व कमाविसदार कजबे दाभोळ, तालुके पंचनदी, व महादाजी बल्लाळ पेंडसे महाजन मौजे मुर्डी व बाळाजी चिंतामण दातार महाजन कजबे आंजर्लें, व बाबाजी बल्लाळ साठे चौघुले कजबे मजकूर, तालुके केळशी यांणीं हुजूर किल्ले पुरंधर येथील मुक्कामीं येऊन विनंति केली; त्याजवरून कीर्द महामुरीवर नजर देऊन, बागाइताची व नवसाध्य ठिकाणाची सदरहूप्रमाणें उस्तवारी करून बागाइताची लावणी व शेतें करितील त्यांस माफी इस्तावा व शिरस्ता येणेंप्रमाणें.

तालुकियांत सडा आहे त्ये जागा बाहेरून माती आणून नूतन जमीन रयत मेहनतीनें करील, व डोंगरांतील दगड फोडून, ओढा नाला असेल त्यास माती घालून नूतन शेत होय असें करावयास रयत उमेदवार आहे, त्यास उमेद धरून जो करील त्यास त्या जमिनीपैकीं निमे जमीन इनाम देऊन, बाकी निमे राहील त्यास माफी सालें २० वीस होऊन पुढें पांच वर्षे कमधारा घ्यावा, याप्रमाणें करार केला असे, तरी तालुके मजकुराहून तकवियत कौल देऊन जमीन तयार करवणें; व त्या जमिनीचे मोजणीचे जाबते सुभाहून हुजूर पाठवाल त्यापैकीं निमे जमिनींचीं इनामपत्रें करून देऊन, बाकी निमे जमीन राहील त्याचा सदरहूप्रमाणें माफी सालें व कमधाऱ्याचा कौल पाळून पुढें शिरस्तेप्रमाणें धारा घेत जाणें. कलम १.

तालुके मजकुरीं दर्यागर्के खाजणी जमिनीस बांधबंदिस्त करून, नूतन शेत होय असें रयत उमेद धरून करील, त्यास

बागाइताचा शिरस्ता व लावणीचे सालापासून माफी सालें.

| | |
|---|---|
| नारळ माडास सालें. | सुपारीस सालें १५ |
| उमर व पुळणवट जमिनीस सालें १८ | तांबड जमिनीस सालें २० |

फणस व उंडणीस सालें १२

यासी माफी सालें भरल्यावर सरकारदस्त दर झाडास पटी बाबसुद्धां नक्त. रुपये.

| | |
|---|---|
| दस्त नारळ माडास नक्त. | सुपारीच्या झाडास रुपये/ |
| नारळ माडास रुपये ।· | फणस व उंडणीच्या झाडास /≡ |
| भंडार माडास रुपया १ | |

झांप दर माडास सुमार १.

एकूण शिरस्ता माफीचा नारळ माडास उमर व पुळणवट जमिनीस सालें अठरा व तांबड जमिनीस सालें २० वीस व सुपारीस सालें १५ व फणस व उंडणीस सालें बारा येणेंप्रमाणें माफी भरल्यावर दस्त दरसाल दर झाडास नारळ माडास

त्या जमिनीपैकीं चवथाई जमीन इनाम देऊन बाकी तीन तक्षिमा जमीन राहील त्यास माफी सालें व इस्तावा खर्च मेहनतीचा आजमास पाहून, शिरस्तेप्रमाणें दस्त घ्यावा ह्मणोन; त्याजवरून सुभाहून तकवियत कौल देऊन जमीन तयार करवणें, तयार जाहल्यावर त्या जमिनीची मोजणी करून, खर्च मेहनतीचा आजमास पाहून जमिनीचे मोजणीचे जाबते हुजूर पाठवाल त्यापैकीं चवथाई जमिनीचीं इनामपत्रें करून देऊन, बाकी तीन तक्षिमा जमीन राहील त्याचीं माफीसालें व इस्ताव्याचा कौल तालुकेयाहून देऊन, जाबते हुजूर पाठवणें, त्याप्रमाणें पाळलें जाईल. कलम १.

पावला व भंडार माडास एक रुपया व सुपारीस एक आणा व फणस व उंडणीस तीन आणे, पटी बाबसुद्धां. नक्त व माडास ऐन जिन्नस झांप सुमार एक, याप्रमाणें करार केला असे, तरी सुभाहून कौल देऊन श्रम साहस करऊन बागाइताची आबादी करवणें. कलम १.

एकूण तीन कलमें सदरहूप्रमाणें करार करून दिलीं असेत, तरी गांवगन्नाचे खोत वगैरे सुभा आणून, त्यांस कौल देऊन, जमिनीची लागवड व बागाईत यांची लावणी करऊन सदरहूप्रमाणें कौल पाठऊन उगवणी करून घेत जाणें ह्मणोन, मोरो बापूजी यांचे नांवें. सनद १.

मोकदमानी व रयान महालानिहाय तर्फ मजकूर यांस कौल कीं, जमिनीची लागवड करणें, व बागाइताची लागवड करणें. सदरहूप्रमाणें कौल पाठऊन उगवणी करून घेतली जाईल ह्मणोन. कौल.

२

रसानगी यादी.

## जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

७३९–( ४५४ ) महादाजी बापूजी खोत महाजन मौजे शेडवई नारगोली, तर्फ नातूपालवण, तालुके सुवर्णदुर्ग, यांणीं हुजूर विदित केलें कीं, मौजे मजकुरीं बागाइत पूर्वीं माहामूर होती, त्यास पेशजीं भालेराई जाहली, तेव्हां ब्राह्मण परागंदा होऊन गेले, त्यास सवाशें वर्षें जालीं; बागाइत

सबा सबैन
मया व अलफ
रविलाखर २६

FROM JÂNARDAR ÂPÂJI'S DIARY.

( 739 ) Mahádji Bápuji, Khot Mahájan of Mauze Shedwái Nárgoli, Nátupalwáṇ, in Táluká Suwarṇadurg, represented that formerly there was considerable canal-irrigation in the

A. D. 1776-77.

जमीन जंगलगर्क पाणीपाटसुद्धां जाहली आहे, याजकरतां सरकारांतून तकवियत कौल दिल्यास पाट चालता करून बागाईत करावयास ऊमेद्वार आहों ह्मणोन; त्याजवरून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी हल्लीं हे मौजे मजकुरीं पाट चालता करून बागाईत करणार याजकरितां तकवियत कौल सुभाहून मुलुकशिरस्तेप्रमाणें देऊन अमदानी करवणें ह्मणोन, मोरो बापूजी यांस छ. ३ रबिलाखर. सनद १.

रसानगी यादी.

७४०–( ८४९ ) कसबे नारायणगांव निसबत गोविंद गणेश येथील धरण बांधावयाचें काम लाविलें आहे, यास चुन्याचे चाकाचे व गाड्याचे बैल बांधावयास पडळ पाहिजे, याजकरितां सरकारचीं कुरणें मौजे कानसें व गंगापूर व सिनोली येथें आहेत, त्या कुरणांपैकीं वांसे हरजिनसी सुमारें ३०० तीनशें देविले असत, तरी सदरहू वांसे कापून नेतील, त्यास नेऊं देणें ह्मणोन, शिवराम रघुनाथ यांस. सनद १.

खमस समानीन मया व अलफ साबान ५

रसानगी यादी.

७४१–( ८७८ ) पांडुरंग बल्लाळ उपनाम अचवल, गोत्र भारद्वाज, सूत्र आश्वलायन वास्तव्य मौजे आंपगांव, तर्फ सानोळें, प्रांत कल्याण भिंवडी, यांणीं हुजूर कसबे पुणें, येथील मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, कसबे दहिवलें, परगणे मजकूर, सरकार बागलाण, प्रांत खानदेश, येथें नदींतील धरणाचा जुना बंधारा होता तो फुटला, त्याजमुळें कसबे मजकूरचा आकार कमी होतो, त्यास बंधारा बांधल्यास सरकार किफायत होईल. बंधाऱ्याचे बंदिस्तीस अजमासें एकतीसशें बासष्ट रुपये लागतील, त्यापैकीं अडीच हजार रुपये सावकारापासून कर्ज घ्यावें लागेल. त्यास पांच बिघे जमीन व बाकीचें काम रयतेपासून आंगमेहनतीनें घ्यावें लागेल, सबब मोकदम यांस पांच बिघे जमीन एकूण दहा बिघे जमीन, बंधाऱ्यामुळें बागाइती तयार होईल. त्यापैकीं इनाम करार दिल्यास बंधारा तयार करूं ह्मणोन, गणेश दादाजी कमाविस-

खमस समानीन मया व अलफ जमादिलावल २

---

village, that about 125 years before the Brahmins left the village, and that since then the lands and the acqueducts had been overgrown with the jungle. He prayed that Kowl might be given to enable him to bring the land again under Bágáyat cultivation. His request was granted.

( 740 ) A dam was being constructed at Kasbá Náráyaṇgaum.

A. D. 1784-85.

( 741 ) The old dam of the river at Dahiwle in Pargaṇá Dahiwle in Sarkár Báglán was damaged. Its repair was estimated to cost Rs. 3,162. The Kamávisdár proposed to obtain by loan Rs. 2,500 for the purpose from a banker and to exact service

A. D. 1784-85.

दार, परगणे मजकूर, यांणीं सरकारांत विनंति केली; त्याजवरून बंधाऱ्याचे बंदिस्तीस ज्या सावकारापासून कर्ज घ्याल त्यास पांच बिघे जमीन, व रयतेपासून आंगमेहनतीनें काम घ्यावें, सबब मोकदम यांस पांच बिघे जमीन, एकूण दहा बिघे जमीन बंधाऱ्यामुळें तयार होईल. त्यापैकीं इनाम करार करून दिल्ही जाईल ह्मणोन, मशारनिल्हेस सन सलास समानीनांत सनद सादर जाहली, त्याजवरून त्यांणीं यांजपासून अडीच हजार रुपये कर्ज घ्यावयाचें करार करून, धरणाचें काम यांस सांगितलें, त्यास अडीच हजार रुपयांचें काम असतां दोन हजार बहात्तर रुपयांत किफायतीनें करून, बाकीचें काम रयतेकडून करवून, धरण तयार केलें, त्यास धरणामुळें जमीन बागाइती तयार जाहली आहे, त्यापैकीं पांच बिघे जमीन स्वामींनीं कृपाळु होऊन कराराप्रमाणें इनाम देऊन भोगवटियास पत्रें करून दिल्हीं पाहिजेत ह्मणोन; त्याजवरून मनास आणतां धरणाचे बंधाऱ्याचे कामाबद्दल अडीच हजार रुपये पांडुरंग बल्लाळ यांजपासून कर्ज घ्यावयाचें करार करून, काम यांसच गणेश दादाजी कमाविसदार, परगणे मजकूर, यांणीं सांगितलें, त्यास यांणीं किफायतीनें दोन हजार बहात्तर रुपयांत काम केलें, हें जाणून, यांजवर कृपाळु होऊन, धरणाचे बंधाऱ्याचे बंदिस्तीमुळें बागाइती जमीन तयार जाहली आहे, त्यापैकीं यांस इनाम जमीन बिघे ५ साल गुदस्त सन अर्बा समानीनापासून, स्वराज्य व मोगलाई, एकूण दुतर्फा, देखील सरदेशमुखी दरोबस्त, कुलबाब कुलकानू, हल्लीं पट्टी, पेस्तर पट्टी, जळ, तरु, तृण, काष्ठ, पाषाण, निधि, निक्षेप सहित, खेरीज हक्कदार करून, इनाम तिजाई सुद्धां, नूतन इनाम सरकारांतून करार करून दिल्ही असे, तरी सदरहू पांच बिघे जमीन कसबे मजकूरपैकीं बागाइती थळांतील चतुःसीमापूर्वक यांचे दुमाला करून देऊन, यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें, इनाम चालविणें ह्मणोन, भोगवटियास सनदा व पत्रें.

३ सनदा.

१ नांवाची.

१ मोकदम कसबे मजकूर यांस.

१ गणेश दादाजी कमाविसदार, परगणे दहिवलें यांस कीं, सदरहू पांच बिघे जमिनीचा आकार होईल, तो सालगुदस्त सन अर्बा समानीनापासून मशारनिल्हेचे नांवें इनाम खर्च लिहीत जाणें ह्मणोन.

—

३

---

from the rayats for the rest of the amount, and asked for the grant of some Inams to the banker for the loan and to the Mokadam of the village for forced service. His request was granted.

२ चिटणिसी. पत्रें.

१ देशमुख व देशपांडे, परगणे मजकूर यांस.

१ देशाधिकारी व लेखक वर्तमान भावी, परगणे मजकूर यांस.

२

५

पांच सनदा व पत्रें दिल्हीं असत. रसानगी याद.

७४२-( ९२२ ) वेदशास्त्रसंपन्न सदाशिव दीक्षित दात्ये यांणीं हुजूर विदित केलें कीं, आपल्यास कसबे खेड येथें ठाणें थळपैकीं जमीन इनाम सरकारांतून दिल्ही आहे, त्यास मौजे नवलकेयाकडून वोढा कसबे मजकूरचे शिवारांत आला आहे, त्यास आपण नवीन धरण बांधून इनाम शेतांत पाणी आणणार, याजकरितां कोणी अडथळा करील, त्यास ताकीद जाहली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून हें पत्र सादर केलें असे, तरी दीक्षित नवीन धरण बेवारसी या वोढ्यास बांधून आपले शेतांत पाणी आणितील, त्यास कोण्ही मुजाईम होईल त्यास ताकीद करणें ह्मणोन, विनायक पांडुरंग कमाविसदार कसबे मजकूर यांचे नांवें चिटणिसी. पत्र १.

सीत समानीन मया व अलफ जमादिलाखर १३

सदरील अन्वयें मोकदम कसबे मजकूर या गांवास चिटणिसी. पत्र १.

२

## ३ मुलकी खातें.

### ( क ) शेतकीस उत्तेजन.

#### ३ इतर उपाय.

७४३-( ५२४ ) तालुके रत्नागिरी येथील रयेतीस धान्य नाहीं, सालगुदस्तां कोठीचा गल्ला दिल्हा होता, यामुळें बचाव जाला, सालमजकुरीं देतां नये, रयतीच्या बचावास्तव सावकारी महागिरीकर बोलाऊन आणून सांगितलें कीं, गल्ला कोठून आणाल, तेथून घेऊन येणें. जकातीचा पैका

समान सबैन मया व अलफ सफर ५

(742) Sadáshiv Keshao Dátye was permitted to construct a water-course from a rivulet for irrigating his field in Khed.

A. D. 1785-86.

III LAND REVENUE AND ITS ADMINISTRATION.

(C) Encouragement to cultivators.

(3) Other Measures (continued).

(743) There being scarcity of grain in the Taluká of Ratnágiri, it

पडों देणार नाहीं, याप्रमाणें बोलोन महागिऱ्या बाहेर घातल्या आहेत, जकातीचा आकार पांच सातशें रुपये अजमासें होतील, येविशीं आज्ञा जाली पाहिजे ह्मणोन, तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें, त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी गल्लयाची आबादी करवणें. जकातीचा आकार पांच सातशें रुपये होईल, तो एकसाला सालमजकुरीं माफ करून मजुरा दिल्हा जाईल ह्मणोन, सदाशिव केशव यांचे नांवें. सनद १.

परवानगी रूबरू.

७४४–(६५८) परगणे देहेर गोरठ व तालुके कोरकडा, प्रांत कल्याण भिंवडी, येथील सन इसन्ने सबैनांत पाहणी होऊन, त्रिंबक विनायक यांणीं जमावंदी ठरावली, त्या पाहणींतील कुळें, त्रिंबक, व रतनगड, तालुकियांत गेलीं आहेत, याजमुळें हे दोन्ही महाल खराब पडोन सरकार नुकसान जालें, हें वर्तमान सालमजकुरीं गोविंद राम मामलेदार, प्रांत मजकूर, यांणीं सरकारांत निवेदन केलें, त्याजवरून तुह्मांस पत्रें सादर जालीं कीं, सदरहू कुळें महालचे महालीं पाठवणें, नाहीं तर त्या कुळांचा धारा कल्याणचे मामलेदार बांधून देतील, त्याप्रमाणें तुह्मीं आपले तालुकियाकडे जमा धरणें, असें असतां त्याप्रमाणें न केलें; आणि तुह्मीं आपलेकडील कमाविसदारांस पत्रें कुळें रजाबंद करून नेतील तीं नेऊं देणें, याप्रमाणें पत्रें दिल्हीं, त्यास कुळाचे रजाबंदीचा प्रकार तरी, जें कूळ प्रांत मजकुरीं पन्नास रुपयांची जितकी जमीन करीत होतें तें कूळ तिकडे जाऊन तितकी जमीन पंचवीस रुपयांत करितें. उक्तें कूळ तिकडे नवें जातें तें तिकडील कमाविसदारास नफ्यांत मिळतें, हें जाणोन सहल कौल देतात, तेव्हां कूळ राजी होऊन कसें येईल ? दोन्ही तालुके सरकारचे; याजकरितां येविशीं आज्ञा जाली पाहिजे; ह्मणोन प्रांत मजकूरचे मामलेदाराकडील कारकुनांनीं हुजूर

समानीन मया व अलफ जिल्हेज ७

---

A. D. 1777-78.

was supplied in the preceding year from the Government stores. The scarcity continued in the current year, but the Government stores were unable to supply the demand. Traders were therefore encouraged by the officers of Ratnágiri to import grain by sea from other places, on promise of remitting the octroi duty payable on the import, amounting to about Rs. 500 or 600. The promise was ratified by Government.

(744) The lands of the Pargaṇa Deher Gorath and Tarf Korkadá in Previous Kalyán Bhivandi were inspected and their Jamábandi was fixed in A. D. 1771-72 by Trimbak Vináyak. Some of the tenants assessed at the Jamabandi left the province and went into the Talukás of Trimbak and Ratangad. Their lands remained uncultivated and the public revenue suffered. Govind-Rám, Mámlatdár of Kalyáṇ brought this fact to the notice of the Govern-

A. D. 1779-80.

विनंति केली, त्याजवरून हें पत्र सादर केलें असे, तरी प्रांत मजकूरचे दोनही महालांतील कूळ तुह्मांकडील हरदू तालुकियांत गेलीं आहेत, तीं महालचे महालीं आणितील, त्यांस ताकीद करून लाऊन देणें. कुळें येत नसलीं तरी, इसन्नेंत पाहणी जाली आहे, त्याप्रमाणें कल्याणचे मामलेदार त्या कुळाची जमा बांधून देतील, त्या बमोजीब कुळारगवार जमा धरून, वसूल घेणें. [ये]विशींचा बोभाट फिरोन येऊं न देणें ह्मणोन, धोंडो महादेव यांचे नांवें चिटणिसी. पत्र १.

## ३ मुलकी खातें.

### ( ड ) बिगर हुकूम लागवड केल्याबद्दल शिक्षा.

७४५–( २३४ ) मौजे शेळकेवाडी, तर्फ सातारा, येथें हुजुरातेकडील कुरण आहे, त्या कुरणापैकीं जमीन विसाजी दादाजी यांणीं वहित केली आहे, त्याचा वसूल सरकारचे कोठीस दरमाहाकडे येतो; त्याखेरीज मौजे मजकूरचा कुळकर्णी कुरणांतील जमीन दरम्यान वाहतो, त्या जमिनीचा वसूल सरकारांत देत नाहीं, मध्येंच दाबून खातो, त्याचा वसूल जमीन वहित केल्यापासून आजपावेतों सरकारचे कोठीस दरमहाकडे देविला असे, तरी सदाशिव गोविंद यांचे विद्यमानें कुळकर्णी मजकूर यास तुह्मीं ताकीद करून ऐवज होईल तो वसूल देवणें; व पुढें

सीत सबैन मया व अलफ सावान ९

---

ment. Dhonḍo Mahádeo, the officer of Trimbak and Ratangaḍ, was therefore directed to send the tenants back to Kalyáṇ or to fix the rent to be levied from them at the amount specified by the Mámlatdár of Kalyáṇ. Dhonḍo Mahádeo in his instructions to his Kamávisdár directed that the tenants, if willing, might be allowed to go to Kalyáṇ. The Kalyáṇ Mámlatdár again represented the matter to Government, and pointed out that as tenants obtained lands in Trimbak and Ratangaḍ at less rent, it was not possible that they would willingly come back to Kalyáṇ. He further added that both the tracts belonged to Government and prayed that orders might again be issued to the officers of Trimbak and Ratangaḍ. His request was complied with.

## III LAND REVENUE AND ITS ADMINISTRATION.

### ( D ) Punishment for unauthorized cultivation.

( 745 ) It was found that the Kulkarṇi of Sheḷkewáḍi in Tarf Sátárá used unauthorizedly to cultivate land out of the *kuraṇ* free of assessment. Assessment was now ordered to be recovered.

A. D. 1775-76.

सालमजकुरापासून आकार होईल, त्याप्रमाणें मशारनिल्हेचे गुजारतीनें कोठीस ऐवज देत जाणें ह्मणोन, कुळकर्णी यास ताकीद करणें ह्मणोन, कृष्णराव अनंत यांचे नांवें. पत्र १.

येविशीं मौजे मजकूरचे मोकदम व कुळकर्णी यांस. पत्रें २.

१ मोकदमास.

१ कुळकर्णी यास.

---

२

तीन पत्रें. रसानगी यादी.

---

## ३ मुलकी खातें.

### ( ई ) पिकाची नुकसानी भरून देणें.

७४६–( ३६ ) कजबे सुपें, परगणे मजकूर, येथें सालमजकुरीं खासास्वारीचा मुक्काम जाहला, ते समई कजबे मजकूर येथील शेताची पायमल्ली जाहली, त्याची चवकशी आनंदराव त्रिंबक सुभेदार, परगणे मजकूर, यांनीं करून हुजूर समजाविली, त्यापैकीं एक हिसा ऐवज हुजुरून पावला, बाकी रयत भाग दोन हिसे रुपये ८२४।।।॰ पैकीं सूट रुपये २४।।।॰ बाकी रुपये ८०० आठशें रुपये तुह्मांकडून कजबे मजकूर येथील सालमजकूरचे खंडणींत रयतेस मजुरा देविले असेत, तरी सदरहू आठशें रुपये आनंदराव त्रिंबक सुभेदार, परगणे मजकूर यांचे विद्यमानें ज्याचे त्यास पावते करणें ह्मणून, महिपतराव कवडे यांचे नांवें सनद छ. २२ सबैन.

अर्बा सबैन मया व अलफ जिल्काद ३०

सनद १.

रसानगी यादी.

---

## LAND REVENUE AND ITS ADMINISTRATION.

### ( E ) Compensation for crops damaged.

( 746 ) The Peshwá having encamped during the current year at Kasbá Supe, crops were damaged. Valuation of the damage was made by Ánandrao Trimbak Subhedár of the Pargana. One third of the amount was paid direct from the Huzur and the remaining $\frac{2}{3}$rds which are described as the rayat's portion of the produce, were ordered to be refunded to the parties concerned.

A. D. 1773-74.

## ३ मुलकी खातें.

### ( फ ) पीक.

७४७–( ५९७ ) पीलखान्याकडे हत्तीस मौजे कुंभारवलण, परगणे सुपें, येथील उसाचें थळ खरेदी करून ऊस हत्तीस चारिला, त्यास दर पांडास किंमत रुपये ८ आठ करार केली असे, तरी तुह्मीं थळाची मोजणी करून मोजणी होईल त्याची किंमत सदरीलप्रमाणें प्रांत पुणें पैकीं देणें ह्मणोन, रामचंद्र नारायण मामलेदार यांचे नांवें. सनद १.

तिसा सबैन मया व अलफ रविलावल २९

परवानगी रूबरू.

थळाचा आजमास दोन अडीच पांड होईल असें आहे, त्यास मोजणीमुळें कमजवाद काय भरेल त्याप्रमाणें सदरहू वर दर लिहिला आहे, त्याप्रमाणें हिशेब करून पैका देणें ह्मणोन, सनदेंत लिहिलें असे. छ. ६ रविलावल.

---

## ३ मुलकी खातें.

### ( ग ) गांवठाणाकरतां दिलेल्या जमिनी.

७४८–( ६६९ ) कसबे वोतूर, तर्फ मजकूर, प्रांत जुन्नर, येथें गांवांत वस्तीमुळें घरांची दाटी बहुत जाली आहे, आणखी कितेक लोक घरें बांधणार, त्यांस जागा पाहिजे, यास्तव गांवचे पूर्वेस मिरासदाराची जमीन आहे, त्यापैकीं साठ बिघे जमीन घरें बांधावयास देणें, त्याचे मुबदला गतकुळी जमीन मिरासदारास लाऊन देणें, जमीन घराखालीं जाईल, त्याचा धारा वरकड जमिनीवर साधून घेणें ह्मणोन, रामचंद्र शिवाजी यांस अलाहिदा सनद सादर जाली आहे, तरी साठ बिघे जमीन मिरासदाराची गांवचे पूर्वेकडील घरें बांधावयास नेमून देऊन, त्याचे

समानीन मया व अलफ मोहरम ३०

---

LAND REVENUE AND ITS ADMINISTRATION.

( F ) Yield of crops.

( 747 ) Sugar-cane crop in a field was purchased for feeding elephants. The price settled was Rs. 8 per Pánḍ.

A. D. 1778-79.

LAND REVENUE AND ITS ADMINISTRATION.

( G ) Grant of new sites for building purposes.

( 748 ) The population of Kasbá Otur in Pargaṇa Junner being over-crowded, and building site being much in demand, 60 bighas of Mirás land to the east of the village was ordered to be added to the existing site. The mirásdar whose land was

A. D. 1779-80.

मुबदला गतकुळी जमीन मिरासदारास लाऊन देणें ह्मणोन, मोकदम कसबे मजकूर याचे नांवें चिटणिसी. पत्र १.

सदरील अन्वयें देशमुख व देशपांडे, प्रांत जुन्नर यांचे नांवें. पत्र १.

२

७४९–( ८०६ ) मौजे गोऱ्हें बुदरुख, तर्फ कर्यात मावळ, येथें गावांत राहावयास गांवकरीयांस अडचण होते, याजकरितां मौजे मजकुरीं सरकारची शेरी आहे, त्यापैकीं तीन बिघे जमीन वसाहतीबद्दल सरकारदस्त गांवकरी यांजपासून घेऊन दिल्ही पाहिजे ह्मणोन, खंडोजी व रंगोजी पाटील खिरीड मौजे मजकूर यांणीं हुजूर अर्ज केला; त्याजवरून मौजे मजकुरीं सरकारची शेरी आहे, त्यापैकीं गांवकरी यांस वसाहतीबद्दल जमीन बिघे ८३ तीन बिघे जमीन दर बिघा रुपये दीड प्रमाणें रुपये ४॥ साडे चार रुपये सरकारदस्ताचे गांवकरी यांजपासून घ्यावयाचे करार करून देविली असे, तरी सदरील तीन बिघे जमीन चौकशी करून वसाहतीबद्दल नेमून देणें; आणि साडे चार रुपये दरसाल गांवकरी यांजपासून घेत जाणें ह्मणोन, नारो महादेव यांचे नांवें. सनद १.

अर्बा समानीन
मया व अलफ
रजब २६

रसानगी यादी.

# ३ मुलकी खातें.

## ( ह ) जंगल.

७५०–( ५८ ) मौजे तळवडें, निसबत राजश्री मोरो बाबूराव येथील कुळब्यांचीं घरें जळालीं, सबब वासे रायवळ सुमार ७५० सातशें पन्नास देविले असेत, तरी मौजे चास, तर्फ चाकण, येथील कुरणापैकीं नेमून देणें ह्मणोन, केसो कृष्ण यांचे नांवें छ. ७ रविलावल. सनद १.

अर्बा सबैन
मया व अलफ
रविलावल २२

रसानगी यादी.

---

taken, was given in exchange a piece of land equal in extent to the land taken up out of the Gatkuli land in the village. The assessment on the land transferred to the village site was ordered to be assessed on the remaining lands of the village.

( 749 ) The village site of Gorhe Budruk in Tarf Karjat Máwal being insufficient for the wants of the people, 3 Bighás of land from the Government *sheri* was given for building purposes and the assesssment thereon viz. Rs. 4–8 was ordered to be recovered from the villagers.

A. D. 1783-84.

III LAND REVENUE AND ITS ADMINISTRATION.

( H ) Forest and trees.

( 750 ) The houses of the Kunbis of Mouze Taḷawade having been

## नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

७५१–( ६९ ) बाळाजी कृष्ण यांचे नांवें सनद कीं, कुरणाचें कामकाज सालमजकुरीं तुह्मांकडे सांगोन करार कलमें येणेंप्रमाणें.

खमस सबैन मया व अलफ जमादिलाखर २९

सरकारांत खासगीकडे द्यावें.

१ गवत पुले. सुमार.

१५००००० पुणियांत आणून द्यावे.

१५००००० पांच सहा कोशीं कुरणांत पंधरा लक्ष गवताच्या गंजी घालोन ठेवाव्या. पागा उष्ट्रखाना, वगैरे यांच्या चिठ्या खासगीकडून होतील त्यांस द्यावे.

३००००००

पुण्यासभोंवतीं पंधरा वीस कोशीं कुरणें सरकारचीं व लोकांचीं आहेत; तीं जप्तींत ठेऊन तेथें तुह्मीं आपले कुर्ण्ये बसवणें. कलम १.

सरकारचे कुरणांत व लोकांचे कुरणांत गवत व लांकडें जळाऊ व इमारतीचीं लाकडें व वेळू व सायाचीं पानें वगैरे जें निघेल त्यांत लोकांचे कुरणांपैकीं गवत व सर्पण ज्याचें कुरण त्याचे संसाराचे खर्चापुरतें सरकारांतून नेमणूक करून द्यावी, त्याप्रमाणें त्यांस द्यावें. बाकी सरकारांत घ्यावयाचें तें व सरकारचे कुरणाचें मिळोन

---

A. D. 1773-74. burnt by fire, orders were issued to give them 750 beams from the kuraṇ of Mauze Chás in Tarf Chákaṇ.

(751) Bálàji Krishṇa was appointed to the Mámlat of the Kuraṇs,

A. D. 1774-75. and the following instructions were issued to him.

1 He should deliver to Government in Poona 15 lakhs of bundles of grass, and should keep a similar quantity ready for Government use in Kuraṇs within a radius of 5 or 6 Kos from the City.

1 He should take in his charge all the Kuraṇs existing within a radius of 15 to 20 Kos from Poona whether belonging to Government or private individuals, and keep his own men to manage them.

1 He should deliver to Government in Poona 1600 *Khandies* of fuel and 150 *Khandies* of coal.

1 Out of the timber, fuel, grass, bámboos, leaves, and other produce realized in a private Kuraṇ, a quantity sufficient to meet his annual wants should be given to the owner. The rest should belong to Government and should be sold excepting

तीस लक्ष सदरहूप्रमाणें द्यावे.

१ लाकडें जळाऊ व कोळसे चाळीस शेरी मणानें वजन पक्कें पुणियांत द्यावें.

खंडी.

१६०० लाकडें.

१५०० ऐन.

१०० माप वर्ताळा.

१६००

१५० कोळसे दीडशें खंडी.

१७५०

साडे सतराशें खंडी. सदरहूप्रमाणें द्यावें.

२ कलम १.

कारकून व कुरण्ये निसबतीस ठेवावे, त्यांची नेमणूक सालीना.

रुपये.

२००० कारकून असामी आठ एकूण.

१२०० प्रत असामी ४ एकूण, दर ३०० प्रमाणें.

८०० प्रत असामी ४

सरकारांत खर्चास लागेल तें द्यावें. बाकी फरोक्त करून पैका होईल तो हुजूर आणून समजवावा. येणेंप्रमाणें. कलम १.

लोकांचे कुरणांची जप्ती होईल, त्यापैकीं कदाचित् रजबदलीमुळें कुरण कोणास दिलें, तरी त्याचे संसारउपयोगापुरतें गवत व सर्पण द्यावयाचें तें वजा जाऊन बाकी गवत व सर्पण त्याजकडे जाजती जाईल, त्याची किंमत फरोक्ताचे निरखाप्रमाणें करून होईल ते मजुरा पडेल. येणेंप्रमाणें. कलम १.

बेपारी यांचे बैल किरकोळ कुरणांतून लाकडें तोडून भरून आणतील, त्यास दर बैली पाव रुपया, व पाहून जाजती साधेल तें, व गौळी वगैरे कुरणांत चारणी करतील, त्यांजपासून वनचराईचा पैका घेऊन सदरहू ऐवजाचा हिशेब सरकारांत समजवावा. येणेंप्रमाणें. कलम १.

गवत व सर्पण व पान ताब्या व वेळू वगैरेयाची चिठी सरकारांतून खासगीकडे होईल. खासगी चिठी तुम्हांवर होईल, त्याप्रमाणें तुम्हीं द्यावें. हिशेब देणें

---

such portion as may be required for Government purposes,and the proceeds credited to Government.

1 In case any of the private Kurans were through favour released from attachment, full allowance would be made to the Mamlatdár for the value of the forest produce ( minus the portion required for his daily use ) thus lost to him.

1 An establishment consisting of 8 Kárkuns, 175 foresters at a cost of Rupees 12,450 was sanctioned for the purpose.

1 A duty should be levied from all the traders carrying wood on bullocks, at the rate of 4 annas for every Rupee.

1 Forced labour would be supplied as usual.

1 Accounts should be rendered to Government.

एकूण, दर २०० प्रमाणें.

२०००

१०४५० कुरण्ये आकरमाही शिरस्ता.

| | |
|---|---|
| ५५०० | प्रत असामी १०० दरमहा दर असामी[स] रुपये ५ प्रमाणें रुपये ५०० एकूण. |
| ४९५० | प्रत असामी ७५ दरमहा दर असामी[स] रुपये ६ प्रमाणें, रुपये ४५० |
| १०४५० | १७५ |

१२४५०

एकूण बारा हजार चारशें पन्नास रुपये सालीना नेमणूक करून दिली असे, खर्च करणें, जाजती करूं नये. कलम १.

गाड्यांचे वोंगणास तेल सरकारांतून सालाबाद पावतें, त्या शिरस्तेप्रमाणें पावेल, व बेगारी गवत कापण्यास वगैरे सालाबाद खासगीकडे जिकडून पावत होते, त्याप्रमाणें तुह्मांकडे देविले जातील. कलम १.

काबडे व डोईभारे लोकांस ज्या कुरणांत पावतात, त्याच्या चिठ्या सालाबादप्रमाणें खासगीकडून होतील, व गवत कुरणांतून कापून आणावयाचें, व कापलेलें तो सरकारांत द्यावा. पर्जन्यामुळें जें कुरणांत गवत निघालें नाहीं, तरी ज्या सालीं पर्जन्य पडोन गवत निघेल, त्या सालाप्रमाणें गवताचा आकार पुले सुमारीचा होईल तो मजुरा पडेल. सारांश जें निघेल तें सरकारचें. कलम १.

द्यावयाचें, त्याच्या चिठ्या हुजुरून समजानें होतील, त्याप्रमाणें द्यावें. कलम १.

कलमें लिहून दिलीं आहेत, त्याचा पुस्तपन्हा सरकारांतून केला जाईल. येणें-प्रमाणें. कलम १.

एकूण दहा कलमें करार करून दिलीं असत, तरी सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें. सालमजकुरीं कमाविशीनें मामलत सांगितली असे, तरी कच्चा कारभार सरकारांत इमानें इतबारें आणून सालमजकुरीं समजवावा, तोटा नफा सरकारचा. पेस्तर सदरहू कलमें लिहिलीं आहेत, त्याप्रमाणें पुरवल्यास मक्त्यानें मामलत करून दिली जाईल ह्मणोन. छ. ८ रबिलाखर.

सनद १.

रसानगी याद.

## जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

७५२–( ३९४ ) वेदमूर्ति रामचंद्र पाध्ये सावेरकर यांचें घर मौजे कशेळी, तर्फ राजापूर येथें आहे, त्यास यांचे आगरांत दोन फणसाचीं झाडें उपळलेलीं आहेत, तीं हे आपलें घर बांधणार याजकरितां यांचीं यांस घरास बांधावयास देविलीं असे[त], तरी देणें ह्मणोन, तर्फ विजयदुर्ग निसबत गंगाधर गोविंद यांचे नांवें. छ. १४ जिल्काद.

सबा सबैन
मया व अलफ
जिल्हेज २९

सनद १.

रसानगी यादी.

७५३–( ४२४ ) साल मजकुरीं वारेझोडीनें बागायती दस्ती झाडें कांहीं मोडलीं आहेत, त्यांची चौकशी करून मोडल्या झाडांचा दस्त कमी करावयाची आज्ञा जाहली पाहिजे ह्मणोन; त्यास ज्या गांवीं मक्त्यापैकीं दस्ती झाडें मोडलीं असतील त्या गांवीं मक्त्या आलीकडे नवीं झाडें जाहलीं असतील त्यांची चौकशी करून दस्त जमा धरणें, आणि झाडें मोडलीं असतील त्यांचा दस्त कार्याकारण कमी चौकशी मुळें होईल तो कमी करणें ह्मणोन. कलम १.

सबा सबैन
मया व अलफ
सफर २

---

## FROM JANÂRDAN ÂPÂJI'S DIARY.

( 752 ) Permission was given to Ràmchandra Pádhye Sáwerkar of Kasháli in Tarf Rájápur to cut down two dead jack-trees in his Âgar ( field ) for building purposes.

A. D. 1776-77.

( 753 ) Some tax-bearing trees having been destroyed by a hurricane, permission was given to remit the revenue realized from them, and to assess the tax on trees which inquiry might show to have been newly planted.

A. D. 1776-77.

७५४-( ५३६ ) शिवराम रघुनाथ यांचे नांवें सनद कीं, सरकारचे कुरणाचें काम-

समान सबैन मया व अलफ सफर २६

काज पेशजीं बाळाजी कृष्ण ठोसर यांजकडे सन खमस सबैनांत होतें, ते समंई त्यांणीं सरकारचीं रानें, बहुली वगैरे लकडवाल्यांस लाकडें जळाऊ आणावयासी देऊन, त्यांजपासून सरकारांत रानव्याचे ऐवजीं दर बैलीं चवलप्रमाणें घेत गेले, त्याप्रमाणें सरकारांत घेत आहेत, त्यास सरकारचे रानांत लाकडें नाहींत, सबब राजश्री पंत सचिव वगैरे लोकांचे रानांतून रानवा देऊन लाकडें आणतील, त्यास दर बैलीं चवलप्रमाणें घ्यावयाचा मना केला असे, तरी त्यांजपासून न घेणें. सरकारचे रानांतून लाकडें लकडवाले वगैरे आणितील त्यांजवळून दर बैलीं चवलप्रमाणें शिरस्ते बरहुकूम घेत जाणें ह्मणोन. छ. २४ जिल्काद. सनद १.

रसानगी यादी, पुरंधर.

---

## ३ मुलकी खातें.

### ( आय् ) मामलेदार, कमाविसदार, जमीनमहसुलाचे मक्तेदार व खोत.

७५५-( ३१ ) विश्वासराव रामचंद्र यांचे नांवें सनद कीं, परगणे बोदवाड, प्रांत

अर्बा सबैन मया व अलफ जिल्काद ३०

खानदेश, येथील मामलत सालगुदस्तांप्रमाणें सालमजकुरीं तुह्मांकडे करार केली असे. परगणे मजकूर येथील देहे ५४ एकूण तनखा.

एकूण.

---

(754) The fee for bringing wood from Government forest was 2 annas per bullock.

A. D. 1777-78.

## III LAND REVENUE AND ITS ADMINISTRATION.

### (I) Mámlatdárs, Kamávisdárs, Farmers of land revenue, and Khots.

(755) The Mámlat of Parganá Bodwáḍ in Piánt Khándesh was farmed to Vishwásrao Rámchandra for 4 years for Rupees 44,001 every year. The instructions issued to him were as follows:—

A. D. 1773-74.

1 The establishment should consist of

Rs. 500 Kamávisdár.
250 Mujumdár.
200 Fadṇis.

७६२२७॥।६॥ ऐन तनखा टके दानपेशी.
१९४१.८८३ तोफीर.

९५६४५॥।९॥

एकूण पंच्याण्णव हजार सहाशें पावणे शेताळीस टके साडे नऊ रुके पैकीं वजा पंचोत्रा हक मोकदम, टके ४५७९॥।॥, बाकी बेरीज. टके.

९१०६६।९ ऐन.
८ सलामी.
१०१।६ सरद रफ्ती.

९११७५॥।३

एकूण एक्याण्णव हजार एकशें पावणे शहात्तर टके तीन रुके एकूण बस्तन दर रुपयास टका १। प्रमाणें. रुपये.

७२९४०॥= ऐन.
९११७॥‹ सरदेशमुखी दरसदे १२॥

८२०५८८≡

150 Kárkun appointed by the Kamávisdár.
350 Tarafdár.
2700 Peons.

1 Kowls previously given to the rayats should be respected.
1 The writing work should be performed by Mujumdár and Fadṇis.
1 Any Nazar, fine &c. on account of Watan should be paid to Government, when exceeding Rupees 1000. The assessment to be levied from the rayats should not be increased. The increase of revenue should be looked for in the increase of the area under cultivation.
1 The revenue should be collected in $4\frac{1}{2}$ instalments as usual in Khándesh.
1 End of Márgashirsha.
1 Do Do Mágh.
1 Do Do Chaitra.
1 Do Do Vaishákh.
1 Do Do Jeshṭha ( half instalment ).

एकूण ब्या[य]शीं हजार अठ्ठावन रुपये तीन आणे, पैकीं वजा दुमाले गांव देहे १८ निसबत अनंदराव भिकाजी रास्ते यांजकडे तनखा रुपये २४७६३, बाकी तनखा रुपये.

५७२९४।।≡ ऐन.

१०७५ सुभा निसबत कलमें.

---

५८३६९।।≡

पैकीं वजा आकार होत नाहीं, सबब तकूब रुपये १६३६८।।।≡ बाकी नेरीज इस्ताव्यास रुपये ४२००१ यासी इस्तावा सालें बीतपशील. रुपये.

४४००१ सन अर्बा सबैन सालमजकूर.

४२००१ बरहुकूम पेशजीं.

२००० जाजती.

---

४४००१

४४००१ सन खमस सबैन बरहुकूम गुदस्त.

४४००१ सन सीत सबैन बरहुकूम गुदस्त.

४४००१ सन सबा सबैन बरहुकूम गुदस्त.

---

१७६००४

एकूण एक लक्ष शहात्तर हजार चार रुपये पैकीं सन अर्बा चवेताळीस हजार एक रुपया, व सन खमस चवेताळीस हजार एक रुपया, सन सीत चवेताळीस हजार एक रुपया, व सन सबा चवेताळीस हजार एक रुपया, एकूण चौसाला मक्ता करार करून दिल्हा असे, तर सालबेसाल हप्तेबंदीप्रमाणें ऐवज सरकारांस पावता करून पावलियाचे जाब घेणें. तेणेंप्रमाणें मजुरा पडेल. सदरहू मामलतसंमंधें कलमें बीतपशील.

---

1 Full details of land in the Mahál including land newly brought under cultivation should be furnished to the Huzur without fail every year.

1 The Nemnook on account of GairSanad expenses was reduced from Rupees 2000 to Rupees 1125.

1 In case of any serious revolt the usual remissions would be granted.

महाल मजकूरची नेमणूक.

५०० कमाविसदार.

२५० निळकंठ गणेश मजमदार.

२०० धोंडो मल्हार फडणीस.

१५० कारकून निसबत कमाविसदार.

३५० तरफदार.

२७०० प्यादे.

---

४१५०

एकूण चार हजार एकशें पन्नास रुपये नेमणूक करार केली असे. खर्च चौकशीनें करणें. येणेंप्रमाणें. कलम १.

महालीं रयतीस कौल आहे, त्याजप्रमाणें पाळावा, जाजती चढाचा ऐवज दरम्यान कसर असेल ती व नवीन जमीनीची लावणी करून साधावा. जुने रयतीवर चढाची बेरीज घालूं नये. येणेंप्रमाणें. कलम १.

हप्तेबंदी खानदेशचे शिरस्तेप्रमाणें.

१ मार्गशीर्ष अखेर.

१ माघ अखेर.

१ चैत्र अखेर.

१ वैशाख अखेर.

·।।· जेष्ठ अखेर निमें.

---

४।।

एकूण साडे चार हफ्ते करार केले असेत. येणेंप्रमाणें. कलम १.

सरदेशमुखीचे अमलाची सनद अलाहिदा सादर होईल, त्याप्रमाणें अमल करणें. येणेंप्रमाणें. कलम १.

रसदेस व्याज एकोत्रा शिरस्तेप्रमाणें करार केलें असे, हिशेब बमोजीब मजुरा देऊं. येणेंप्रमाणें. कलम १.

मजमदार, फडणीस यांचे हातें लिहिण्याचें कामकाज घेत जाणें. येणेंप्रमाणें. कलम १.

आफ्ती फितूर मातबर जालिया चौकशी करून मुलुक शिरस्तेप्रमाणें मजुरा देऊं. येणेंप्रमाणें. कलम १.

वतन संमंधें कमाविसीचें कलम हजार रुपयांहून जाजती होईल तें मक्तियाशिवाय सरकारहिशेबीं जमा करणें. येणेंप्रमाणें. कलम १.

महालीं लावणी जुनी ठाणीं चढाचे बेरजेसुद्धां करून जमिनीचा झाडा दरसाल हुजूर आणून समजावीत जावा. न समजाविल्यास कार्यास येणार नाहीं. येणेंप्रमाणें. कलम १.

गैर सनदी खर्चाची नेमणूक पेशजीं रुपये २००० पैकीं वजा कमी सालगुदस्त पासून सरकारांत घ्यावे रुपये ८७५ बाकी करार.

६०० खेरीज मुशाहिरा.

५२५ दरबारखर्च.

---

११२५

अकराशें पंचवीस रुपये करार केले असेत, जाजती एक रुपया खर्च करूं नये, मजुरा पडणार नाहीं. येणेंप्रमाणें. कलम १.

हुंडणावळ महालींहून पुण्यापावेतों पडेल ती शिरस्तेप्रमाणें चौकशीनें मजुरा पडेल. येणेंप्रमाणें. कलम १.

मोकाशी यांस ऐवज सालाबाद तहप्रमाणें सालमजकुरीं आफत पडली आहे; त्याची चौकशी मुलुक शिरस्तेप्रमाणें सरसुभेदारांनीं करावी. येणेंप्रमाणें. कलम १.

एकूण तेरा कलमें करार केलीं असेत. सदरील प्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन. छ. २१ सवाल.

सनद १.

रसानगी अजमास.

७५६-( ३९ ) परगणें शेवली येथील मामलत तुह्मांकडे होती, ते दूर करून निळो रंगनाथ यांस सांगितली; ठाणें यांचे स्वाधीन करणें ह्मणोन लष्करांतच ताकीद जाहली असतां ठाणें यांचे हवाला करीत नाहीं, ह्मणोन विदित जाहलें; त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, तरी देखतपत्र ठाणें मशारनिल्हेचे स्वाधीन करून पावलियाचें कबज घेणें ह्मणोन, केसो कृष्ण यांचे नांवें.

अर्बा सबैन मया व अलफ मोहरम १

सनद १.

जमीदार परगणे मजकूर यांस कीं, मशारनिल्हेशीं रूजू होऊन अंमल सुरळीत देणें ह्मणोन.

पत्र १.

---

२

रसानगी यादी.

## नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

